# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

**दिनांक २३-०८-२००४ ते १३-१२-२००४**

**रजिष्टर क्र. १०**

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*
## स्थायी समिती सभा

| अ.क्र. | स्थायी समिती सभेचा दिनांक | विषय व ठराव क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | २३.०८.२००४ | विषय क्र.९४ ते १०३ | |
| २. | २६.०८.२००४ | विषय क्र. ते | |
| ३. | २७.१०.२००४ | विषय क्र.१०४ ते ११४ | |
| ४. | ०४.११.२००४ | विषय क्र.११५ ते १२५ | |
| ५. | २२.११.२००४ | विषय क्र.१२६ ते १३२ | |
| ६. | १३.१२.२००४ | विषय क्र.१३३ ते १३४ | |
| ७. | १३.१२.२००४ | विषय क्र.१३५ ते १५९ | |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २३.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१७) इतिवृत्त. सोमवार दिनांक २३ ऑगस्ट, २००४ रोजी स्थायी समिती सभा मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी ४.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील स.सदस्य उपस्थित होते.**

१. श्री.भाऊसाहेब ताठे
२. श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
४. सौ.शाहीन जफर महमूद जफर
५. श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
६. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
७. श्री.पारे सोपान भाऊराव
८. श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
९. श्री.सावंत मधुकर दामोधर
१०. श्री.रगडे भगवान दगडुबी
११. श्री.शेख मुनाफ शेख यासीन

<u>संवाद :-</u>

**मा.सभापती :** प्रकल्प विभागातील समूह संघटक श्री.महेंद्र यादव यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना सभागृहातर्फे दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात येत आहे. सर्वांना विनंती करण्यांत येते की, श्रध्दांजलीसाठी उभे रहावे.

(याचवेळी सभागृहातच सर्वांनी काम दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली.)

**श्री.भाऊसाहेब ताठे :** आजच्या सभेसाठी उपआयुक्त (प्रशासन) व (महसूल) तसेच मा.आयुक्त महोदय सुध्दा उपस्थित नाहीत. तरी आजची सभा तहकूब करावी.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्रशासन) यांनी मला विचारणा केलेली आहे. मा.आयुक्त साहेब हे बैठकीस उपस्थित राहतील तो पर्यंत चर्चा करुन करावी.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** सभेला अधिकारी आलेले नाहीत त्यांना बोलाविण्यांत यावे.

**श्री.मधुकर सावंत :** दहा मिनीटे सभा तहकूब करण्यांत यावी.

**मा.सभापती :** अधिकारी नसले तरी आपण सक्षम आहोत.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** काल दिनांक २२.०८.०४ रोजी स्थानिक ए.सी.एन.वर आठवडी बाजारातील दुरावस्था झालेली दाखविली. चिखल झालेले आहे. इतर बाजारात देखील काय व्यवस्था केली. या ठिकाणी आपण मुरुम व फरशीचा प्रस्ताव देणार होतो.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांची संबंधित अधिकारी यांनी माहिती द्यावी.

**शहर अभियंता :** आपण आठवडी बाजारात सिमेंट कॉंक्रीट केलेले आहे. जाफरगेट येथे उरलेल्या खुल्या जागेमध्ये चिखल झालेला आहे. त्याचे इस्टीमेंट केलेले आहे. जास्त चिखल होण्यापुर्वी कॉंक्रीट केले होते. त्या बाजारातील

ओट्याच्या बाजूचे कॉंक्रीट करुन रस्ता वगैरे तयार करण्याची लवकर प्रक्रिया पूर्ण करण्यांत येईल.

**मा.सभापती :** तात्काळ सोलिंग करुन खडी टाकून दुरुस्ती करावी व ए-१ निविदानुसार कामास सुरुवात करुन लोकांची गैरसोय होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** अशाच प्रकारचे अनेक भागामध्ये बाजारच्या ठिकाणी चिखलाने दुरावस्था झालेली आहे. त्यांची सुध्दा व्यवस्था व्हावी.

**मा.सभापती :** ठिक आहे. मनपा हद्दीतील इतर आठवडी बाजाराच्या ठिकाणी सुध्दा पाहणी करुन स.सदस्यांनी सुचित केल्यानुसार खडी व मुरुम टाकून तातडीने कार्यवाही व्हावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मागील तीन बैठकांमध्ये प्रशासकीय विभागाबाबत जो निर्णय घेतलेला होता. त्याची माहिती सभागृहात देणार होते. याबाबत सभागृहात कुठल्याही प्रकारची माहिती मिळालेली नाही व मला सुध्दा माहिती मिळालेली नाही. महानगरपालिकेतील विविध विभागांचा कार्यभार हा अतिरिक्त कार्यभार म्हणून अधिकारी सांभाळत आहेत. आणि अतिरिक्त कार्यभारामुळे जनतेला ज्या सुखसोयी आपण द्यावयास पाहिजे तेवढ्या प्रमाणात आपण देऊ शकत नाही. यामध्ये सांगावयाचे झाल्यास अतिशय महत्वाचे जो शिक्षण विभाग आहे. त्या विभागाचा सुध्दा अतिरिक्त कार्यभार म्हणून सोपविला आहे. सदरचा अतिरिक्त कार्यभार प्रकल्प संचालक श्री.जावरे यांचेकडे आहे आणि प्रकल्प विभाग सोबतच महिला व बालकल्याण समितीचाही कार्यभार श्री.जावरे यांचेकडे आहे. यामध्ये मागील वर्षी महिला व बालकल्याण समितीच्या मार्फत शिवणयंत्रे, सायकल वाटप करावयाचे होते ते सुध्दा या विभागामार्फत अद्यापही दिलेले नाही. याबाबतचा स्वतंत्र रित्या कुणाकडे कार्यभार असता तर एवढा विलंब झाला नसता. प्रकल्प संचालकाकडे इतकी कामे आहेत की, त्यांना सकाळपासून सायंकाळपर्यंत दारिद्रय रेषेचा सर्व्हे त्यांच्या यादी नुसार नांव टाकणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना वगैरे प्रकल्प राबविण्यांत येतात. गेल्या एक महिन्यापासून शिक्षण विभागाचा अतिरिक्त कार्यभार सोपविला होता. परंतू माझ्या मते या शासनाने अद्यापही शिक्षणाधिकारी, प्रतिनियुक्तीवर दिलेला नाही. (एवढ्यात नवीन शिक्षणाधिकारी रुजू झालेले आहेत. असे सांगितले जाते) दुसरे असे की, शासनातर्फे विविध संवर्गातील नोकर भरतीसाठी जाहिरात देवून भरती केल्या जात आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णयाप्रमाणे खुल्या प्रवर्गातील नोकर भरतीसाठी सुध्दा जाहिरात या मनपा प्रशासनाने दिलेली नाही. हा एक प्रकारे खुल्या प्रवर्गातील लोकांवर अन्याय आहे. हे आपण कशासाठी करीत आहोत. यास जबाबदार कोण याचा खुलासा संबंधित अधिकारी यांनी करावा व नंतरच चर्चा करावी.

**मा.सभापती :** स.सदस्य यांनी विचारलेल्या प्रश्नावर उपआयुक्त (म.) यांनी खुलासा करावा. सध्या त्यांचे कडे प्रशासकीय विभाग सक्षम करण्याची कार्यवाही चालू आहे. त्याची माहिती देतील. त्याच प्रमाणे सहाय्यक आयुक्त-१ यांनी मनपातील विविध विभागातील अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या त्यामध्ये प्रलंबित प्रकरणे मुख्याध्यापकांचे पदोन्नती, अभियंत्याचे पदोन्नती व इतर बाबी आहे. त्याची माहिती द्यावी. महिला व बालकल्याण समितीद्वारे स्लम विभागातील गरीब व होतकरु विद्यार्थी व विद्यार्थीनींना आपण शिलाई मशीन

व सायकल वाटप करतो ते अद्यापही झालेले नाही. ही बाब अतिशय खेदाची आहे. त्यामुळे या विभागाकडे प्रशासनाचे संपूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. यानंतर खुल्या प्रवर्गातील नोकर भरतीचा जो मुद्दा उपस्थित झालेला आहे. त्याबाबत शासनाने आतापर्यंत नोकरी भरतीवरील बंदी उठविली असून ती पुर्ववत चालू असावी अशा प्रकारे वर्तमानद्वारे बातम्या प्रसिध्दीस येत आहेत. त्यानुसार खुल्या प्रवर्गातील भरतीबाबत जी पदे रिक्त आहेत. त्यांच्या बाबतीत आपण काय कार्यवाही केली. याचा खुलासा सभागृहात द्यावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** शिक्षणाधिकारी हे सध्या रुजू झालेले आहेत. कार्यभार हस्तांतरण बाबत प्रकल्प संचालक यांना पत्र दिले आहे.

**मा.सभापती :** शासनाकडून वर्ग-१ दर्जाचे शिक्षणाधिकारी म्हणून आलेले आहेत की वर्ग-२ दर्जाचे आहेत जर वर्ग-२ दर्जाचे शिक्षणाधिकारी हे प्रतिनियुक्तीवर असतील तर या मनपात शिक्षकांमधून पदोन्नतीने का भरीत नाहीत. सध्या त्यांना रुजू करुन घ्यावे परंतू शासनाकडे वर्ग-१ दर्जाचे शिक्षणाधिकारी पदासाठी पत्रव्यवहार करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** रुजू झालेले शिक्षणाधिकारी हे वर्ग-२ दर्जाचे आहेत. त्यांना आपण शासनाच्या निर्णयाप्रमाणे रुजू करुन घेऊन प्रतिनियुक्तीवर वर्ग-१ चे पदासाठी शासनाकडे पुन्हा पत्रव्यवहार करण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सहाय्यक आयुक्त-१ हे शासन निर्णयाप्रमाणे शिक्षणाधिकारी यांना रुजू करुन घेऊ असे सभागृहात सांगतात. त्यांना असे बोलण्याचा काय अधिकार आहे. ते प्रशासनातील सक्षम अधिकारी आहेत काय?

**मा.सभापती :** सहा.आयुक्त-१ हे सक्षम अधिकारी नाहीत. तसे बोलू नये. परंतू शासनास वर्ग-१ चे शिक्षणाधिकारी यांना प्रतिनियुक्तीवर पाठविणे बाबत कळवावे व तशी कारणे देवून सुध्दा स्पष्ट करावे.

**सहाय्यक आयुक्त :** याबाबत तसे पत्र पाठवून विनंती करण्यांत येईल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शासनास या अगोदर पत्रव्यवहार करणेपुर्वी आपण शिक्षणाधिकारी हे वर्ग-२ च्या किंवा वर्ग-१ च्या कोणत्या वर्गातील द्यावा. अशी मागणी केली आणि जर वर्ग-२ च्या मधून मागणी केलेली असल्यास मनपातील गेल्या १८-१९ वर्षापासून जे मुख्याध्यापक पदावर कार्यरत आहेत. त्यांच्यामधून जेष्ठतेनुसार नेमणूक करावयास पाहिजे होती. प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे त्यांचे त्यापुर्वीचे गोपनीय अहवाल मागवून नंतरच पुढील कार्यवाही करावयास पाहिजे.

**मा.सभापती :** पदोन्नतीच्या बाबतीत बऱ्याच संचिका प्रलंबित आहेत. यामध्ये तांत्रिक/अतांत्रिक संवर्गातील असून प्रशासनाने कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही असे दिसून येते. त्यामुळेच अतिरिक्त कार्यभार सोपवून प्रशासकीय यंत्रणा राबत आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** महानगरपालिकेतील बऱ्याच विभागासाठी अतिरिक्त कार्यभार देवून कामे होत आहेत. परंतू असे गेल्या कित्येक दिवसांपासून अशा अनेक पदांचा अतिरिक्त कार्यभार वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडे देवून कामे करणार. त्यामुळे बरीचशी कामे खोळंबतात. याचा विचार प्रशासनाने करावा आणि खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा भरणे बाबतच्या शासनाकडून प्राप्त जी.आर.नुसार प्रशासनाने कार्यवाही का केली नाही याचा खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** तांत्रिक संवर्गातील पदोन्नतील संदर्भाने त्या त्या संवर्गातील जेष्ठता याद्या अद्यापही प्रलंबित आहेत. त्यामुळे कार्यवाही झालेली नाही. तर खुल्या प्रवर्गातील पदे भरणे बाबतचा जी.आर.प्राप्त आहे.

**मा.सभापती :** आता काही दिवसातच आचार संहिता लागू होणार आहे. त्यामुळे खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा कधी भरणार. यापुर्वीच कार्यवाही का केली नाही.

**सहाय्यक आयुक्त-१ :** शासनाकडून याबाबतचा जी.आर.प्राप्त झालेला आहे. अद्यापपर्यंत याबाबतचा स्टे होता. त्यामुळे कार्यवाही झालेली नाही. आता स्टे व्हॅकेट झ ाालेला आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सभागृहातच अत्यंत चुकीची माहिती सांगितली जात आहे. संबंधित अधिकारी यांना स्टे असल्याची माहिती कुणी दिली. स्टे कधी पर्यंत होता या अधिकाऱ्याची काम करण्याची पध्दतच वेगळी आहे. खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांची भरती करायची नाही अशा प्रकारचे पत्र मनपामध्ये कुणी पाठविले. खुल्या प्रवर्गातील लोकांवर अन्याय होत आहे.

**सहाय्यक आयुक्त-१ :** कुणावरही अन्याय होणार नाही. सर्व काही आपल्याच मार्गदर्शनाखाली कामकाज होत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** अद्यापपर्यंत खुल्या प्रवर्गासाठी भरती का केली नाही आणि जर स्टे होता तर कधी आला होता याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा भरणेची कार्यवाही प्रशासनाने तातडीने पूर्ण करणे आवश्यक आहे. महिला व बालकल्याण समितीसाठी सक्षम असा वर्ग-२ या अधिकारी यांची नेमणूक व्हावी.

**श्री.मधुकर सावंत :** खुल्या प्रवर्गातील लोकांवर अन्याय होवू नये याबाबत प्रशासनाने दखल द्यावी. त्याबरोबरच मागासवर्गीय पदे जी रिक्त असतील त्यांनाही न्याय द्यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शासनाकडून कोणत्याही प्रकारचा स्टे आलेला नव्हता. सहाय्यक आयुक्त हे सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. याबाबत त्यांनी सभागृहाची माफी मागावी.

**मा.सभापती :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** मागासवर्गीयाचे अनुशेष भरती वेळी जाहिरात दिल्यानंतर आहे सप्टेंबर २००३ मध्ये कोटीद्वारे स्टे होता. आणि जुलै-२००४ ला सदरील स्टे व्हॅकेट झालेला आहे. तसेच शासनाकडून १ जुलै २००४ अन्वये खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी शासनाकडून जी.आर.प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे कार्यवाही चालू आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** याबाबतची जाहिरात का दिली नाही. जुलै-२००४ नंतर स्टे आलेला आहे का? प्रशासनाने कार्यवाही का केली नाही.

**मा.सभापती :** या प्रकरणी सविस्तर माहिती मा.आयुक्त यांचे अवलोकनार्थ तात्काळ दाखवावी. त्याचप्रमाणे मागासवर्गीय व खुल्या प्रवर्गातील रिक्त जागा भरणे बाबत तसेच प्रशासकीय विभाग सक्षमीकरण बाबत माहिती द्यावी.

**उपआयुक्त (म.) :** प्रशासकीय विभागाचे सक्षमीकरण करणे म्हणजे प्रशासकीय विभागाचे कामकाजाच्या संदर्भाने जे शहरातील मनपाच्या खुल्या जागांवर अतिक्रमणे होतात ती तात्काळ काढणे. जी अनाधिकृत बांधकामे होतात. तात्काळ काढणे. जी अनाधिकृत बांधकामे होतात. त्यांचेवर एम.आर.टी.पी.ॲक्ट प्रमाणे कार्यवाही करणे ही अपेक्षित आहेत. आणि या दोन गोष्टी तात्काळ

होणेच्या दृष्टीने आम्ही प्रशासकीय विभागाची विभागणी करुन हे अधिकार झोन अधिकारी यांना देऊन तेथील इमारत निरिक्षक यांचे मार्फत करण्याचा प्रस्ताव तयार केलेला आहे. मा.आयुक्त यांचे मान्यतेने लवकरच अंतिम करण्यांत येणार आहे. आणि त्यानंतर दोन्हीही बाजूने एक प्रशासकीय विभाग व झोन कार्यालयामध्ये झोन अधिकाऱ्यांना मिळालेले अधिकार या संदर्भाने अनाधिकृत बांधकामे व अतिक्रमणे याबाबत कार्यवाही होवू शकते व प्रशासकीय विभाग सक्षम होवू शकतो.

**श्री.संजय शिरसाठ :** सध्या प्रशासकीय विभागात इमारत निरिक्षक किती आहेत?

**प्रशासकीय अधिकारी :** प्रशासकीय विभागात एकूण १४ इमारत निरिक्षक पाहिजेत व सध्या ६ इमारत निरिक्षक कार्यरत आहेत. त्यांचेवरच आम्ही काम करवून घेतो.

**श्री.संजय शिरसाठ :** या शहराची सर्वात मोठी आणि महत्वाची समस्या म्हणजे अतिक्रमणाची उपआयुक्त (म) व प्रशासकीय अधिकारी यांचे वेगवेगळे मत या ठिकाणी नोंदविण्यात आलेले आहे. त्या ठिकाणी प्रशासकीय अधिकारी यांनी ६ इमारत निरिक्षकांकरवी काम चालून होत असतील तर सक्षमीकरणासाठी इतर पदे भरण्याची काय आवश्यकता आहे. ते सक्षम आहेत. त्यांना आगाऊ वेतनवाढ द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** मी मागणी केलेली आहे. अस्थापना विभागास पत्र दिलेले आहे. १५ दिवसांत देतो म्हणून सांगितले आहे.

**मा.सभापती :** एखाद्या ठिकाणी अतिक्रमणाच्या संदर्भाने इमारत निरिक्षक सहाच्या सहा एकाच गाडीत बसून जातात. त्यामुळे सहा असणे काय किंवा १४ असणे काय यात काहीही फरक पडणार नाही.

**श्री.संजय शिरसाठ :** उपआयुक्त (म.) मार्फत अस्थापना विभागाकडे इमारत निरिक्षकांचे मागणी बाबत पत्र देवूनही कार्यवाही का होत नाही याची विचारणा करावी.

**मा.सभापती :** झोनमधील साफसफाई मंजूरांची मागणी असते. ती पूर्ण होत नाही. इतर विभागातील कार्यकारी अभियंता यांचा कर्मचाऱ्यांच्या मागण्या असतात. त्यांच्या इतरत्र बदल्या केल्या जातात. परंतू ते रुजू होत नाही. त्यामुळे प्रशासकीय कार्यवाही पूर्णपणे का होत नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** बीड नाक्यावरील कर्मचाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्याचे प्रकरण उघडकीस आल्याने त्यांच्या बदल्या करण्याचे आदेश देवूनही प्रशासनाने त्यांच्या बदल्या अद्यापही केलेल्या नाहीत. याचे कारण काय? दोन-दोन महिन्यांत काही ठराविक कर्मचाऱ्याच्या त्या ठिकाणी बदल्या जातात. असे अस्थापना विभाग काम करते. काही कर्मचारी १०-१२ वर्षापासून एकाच विभागात कार्यरत आहेत. याबाबचा खुलासा घ्यावा.

**सौ.शाहीन जफर :** बदली करुन कार्यवाही पूर्ण होते का? त्यांनी गुन्हा केल्याचे मान्य केले आहे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** प्रशासनास बदल्यांचे जमत नसल्याचे याबाबतचे अधिकार मा.महापौर व मा.सभापती यांनी द्यावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** बीड जकात नाक्यावरील भ्रष्टाचार प्रकरणी कर्मचाऱ्यांच्या त्या ठिकाणावरुन बदल्या का करीत नाहीत. याचे कारण काय? तेथील दोन पावती पुस्तके चोरी झालेले आहेत. ते उघडकीस आलेले असतांनाही प्रशासन कर्मचाऱ्यांना पाठीशी घालण्याचे कारण काय? त्यांचेवर तातडीने कार्यवाही व्हावी. कारण की ते भ्रष्टाचारी लोक चोर आहेत.

**मा.सभापती :** प्रशासनाने संबंधित कर्मचाऱ्यांवर तातडीने कार्यवाही करावी व त्यांच्या बदल्या झालेल्या आहेत. त्यांना २४ तासात पदस्थापनेच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी नोटीसा बजावण्यांत याव्यात. असे आदेश देण्यांत येतात.

**श्री.भगवान रगडे :** मो.मिसारवाडी येथे एक घर पडले. त्या संदर्भाने मा.सभागृह नेता व मा.सभापती तसेच उपआयुक्त (म.) यांनी येऊन शहानिशा केली. त्यावेळी मा.आयुक्त साहेबांनी संबंधित इमारत निरिक्षक श्री.संगेवार यांची बदली त्वरीत करण्यांत यावी असे सांगितले. तेथील परिस्थीती पाहिल्यानंतर त्याचप्रमाणे मा.आयुक्त महोदयांनी त्यांची बदली इमारत निरिक्षक म्हणून न ठेवता तेथून बदली करावी व इमारत निरिक्षकाचे काम देण्यांत येऊ नये. आणि सभागृहातही संबंधितांची बदली करण्यांत यावी असे आदेश देण्यांत आले होते.

**मा.सभापती :** श्री.संगेवार, इमारत निरिक्षक यांचे बदली बाबत त्यांना प्रशासकीय विभागातील साईटवरील कोठेही कामास पाठविण्यांत येवून नये. त्यांना कार्यालयीन कामे देऊन कार्यालयातच ठेवावे अशा प्रकारचे आदेश उपआयुक्त (प्र.) यांनी काढलेले आहेत.

**श्री.भगवान रगडे :** श्री.संगेवार या कर्मचाऱ्यांस प्रशासकीय विभागात ठेवण्याचे कारण काय? याचा खुलासा व्हावा. कारण तो कर्मचारी परत बऱ्याच ठिकाणी जाऊन पैसे जमा करीत फिरत आहे. त्यांचे वर कार्यवाही का होत नाही.

**मा.सभापती :** दिनांक २१.०८.२००४ रोजी इमारत निरिक्षक श्री.एस.बी.संगेवार यांचेकडील झोन क्र.५ येथील क्षेत्रीय काम काढून घेण्यांत येत आहे. पुढील आदेशापर्यंत साईटवरील कुठल्याही प्रकारचे तपासणीचे काम करु नये. कारण सर्व कामाचा कार्यभार इमारत निरिक्षक श्री.प्रभाकर पाठक यांचेकडे सोपविण्यांत येतो. आपण आज पासून कार्यालयात बसून संचिका हाताळणे, अहवाल तयार करणे तसेच मा.उच्च न्यायालयात पाक्षीक अहवाल तयार करुन सादर केल्या जातो ते तयार करणेची जबाबदारी देण्यांत येते. अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**श्री.भगवान रगडे :** संबंधित इमारत निरिक्षकास इतर विभागात बदली का करण्यांत येत नाही. प्रशासन संबंधितास पाठीशी का घालत आहे. याचा खुलासा करावा. मा.आयुक्त यांनी संबंधित इमारत निरिक्षकाबाबत शेरा लिहिलेला असतांनाही त्यांची इतरत्र बदली का केली नाही. त्यांना त्याच विभागात ठेवण्याचे कारण काय?

**मा.सभापती :** इमारत निरिक्षक श्री.संगेवार यांना याबाबत समज देण्यांत यावी. असे प्रशासकीय अधिकारी यांना सुचित करण्यांत येते त्यांचप्रमाणे त्यांना कुठल्याही प्रकारचे साईटवरील काम देवू नये. अशी एकतर्फी कार्यवाही व्हावी. सध्या उपआयुक्त (प्र.) हे रजेवर आहेत. ते आल्यानंतर पुढील कार्यवाही होईल.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** बऱ्याचशा संचिका प्रलंबित राहिलेल्या होत्या त्याचे काय झाले.

**मा.सभापती :** मा.आयुक्त यांचेकडे अंदाजपत्रकातील दर वाटाघाटीबाबत संचिका प्रलंबित होत्या. त्या संचिका आज संध्याकाळ पर्यंत निकाली काढण्यांत येतील.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** माझ्या वार्डातील विविध विकास कामाचे बाबतीत एकंदरीत नऊ संचिका आहेत. त्यावर कार्यवाही व्हावी.

**अति.शहर अभियंता :** स.सदस्यांनी विचारलेल्या प्रश्न बाबत बरीच प्रकरणे टेंडरमध्ये आहेत. रस्त्यांचे डांबरीकरण करणेचे कामाबाबत पावसाळ्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** शहरातील विविध विकास कामाचे संचिका, दरपत्रके व इतर बाबतीत संचिका तांत्रिक सहाय्यक यांचेकडे प्रलंबित असल्यास त्या मा.आयुक्त यांचेकडे तातडीने ठेवाव्यात. त्याचप्रमाणे स.सदस्य श्री.निमगांवकर यांनी सुचना केल्याप्रमाणे त्यांच्या वार्डातील कामांचे बाबतीत जी त्यांनी दिली. त्या कोणत्या स्टेजवर आहेत. त्या सर्व संचिका मा.आयुक्त यांचेकडे मंजूरीसाठी पाठवाव्यात.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** मा.आयुक्त यांनी जे विकास कामांचे बाबतीत संचिका हाताळून तातडीने कामे करीत आहेत. त्यांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते.

**श्री.भगवान रगडे :** मो.ब्रिजवाडी भागात मनपातर्फे वाचनालय सुरु करण्यासाठी प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत मला प्रशासनातर्फे अद्यापही उत्तर मिळालेले नाही.

**मा.सभापती :** प्रथम दर्शनी नगर रचना विभागाने याबाबत स्थळाच्या बाबतीत नकाशा असेल तर तो सभागृहात दाखवावा.

**उपअभियंता (न.र.) :** ब्रिजवाडी येथील मनपा वाचनालयाच्या संदर्भात शहर अभियंता विभाग व नगररचना विभाग यांचे तर्फे संयुक्त पाहणी करण्यांत येईल व तसा अहवाल सभागृहात सादर करण्यांत येईल.

**श्री.भगवान रगडे :** सदरील संचिकेचा जन्म २००३ मध्ये झालेला आहे. संबंधित जमीन ही आपल्या मालकीची आहे. किंवा नाही याची सभागृहात माहिती द्यावी.

**मा.सभापती :** या भागातील जनतेच्या सोयीसाठी सभागृह शाळा व शौचालयासाठी जागा उपलब्ध होत आहे. तर मग वाचनालयासाठी जागा उपलब्ध होत नाही. वाचनालय बांधणेच्या संदर्भात नगर रचना विभागातर्फे सकारात्मक अभिप्राय पाहिजे होते. ठिक आहे ती जागा आरक्षणातील खुली किंवा खेळाचे मैदान उद्यानासाठी आणि शाळेसाठी आरक्षित असेल. फक्त त्यांना त्या ठिकाणी वाचनालय बांधणेसाठी मंजूर मिळणे आवश्यक होते व त्या अटीवर मा.आयुक्त यांनीही मंजूर दिली होती. केवळ विशेष बाब म्हणून त्या ठिकाणच्या जागेवर वाचनालय बांधणेची परवानगी घ्यावी असे आपण आदेश दिलेले होते.

**उपअभियंता (न.र.) :** मी आजच याबाबत पाहणी करुन सभागृहाला माहिती देतो.

**मा.सभापती :** ब्रिजवाडी भागात सांस्कृतिक सभागृह शाळा शौचालयासाठी जागा उपलब्ध करुन दिली मग वाचनालयासाठी जागा उलपब्धतेसाठी काय अडचण आहे. यासाठी विशेष बाब म्हणून आपण सभागृहात वाचनालयासाठी मंजूरी दिलेली होती. तेव्हा नगररचना विभागाने लवकरात लवकर एन.ओ.सी.देऊन मंजूरीस्तव मा.आयुक्त यांचेकडे पाठवावी.

**श्री.भगवान रगडे :** माझी एक विनंती आहे की, त्या ठिकाणी एकंदर अडीच एकर जागा आहे. आणि प्रथमतः संबंधित बाबतीत तीन दिवसांचे निविदा काढण्यांत यावी आणि जर या बाबतीत रोडमध्ये हे वाचनालयाचे काम बाधित होत असेल तर त्या ठिकाणी आपण बांधणार नाही. आपण दुसरीकडे कुठेही बांधू. परंतू या ठिकाणी असे द्यावे की, थोड्याच दिवसात आचार संहिता लागू होणार आहे. तेव्हा तीन दिवसाची निविदा काढून पुढील कार्यवाही करावी.

**मा.सभापती :** उपअभियंता यांना सुचित करण्यांत येते की, शहर अभियंता यांचेकडे आपले अभिप्राय घेवून पाठविण्यांत यावे आणि निविदा काढून काम सुरु करण्याचे कार्यवाही करण्यांत यावी. परंतू स.सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे विकास रस्त्यामध्ये ती येत असल्यास त्या ठिकाणी काम करु नये.

**श्री.भगवान रगडे :** मी महानगरपालिकेचे अगोदर हित जोपासेन एवढे माझ्या लक्षात आहे. कारण मनपाचे आर्थिक उन्नती व्हावी हीच अपेक्षा आहे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** मागील दोन बैठकीत सेल ॲडची माहिती मला अद्यापही दिलेली नाही.

**मा.सभापती :** संबंधित गुत्तेदारास टर्मिनेशची कार्यवाही करुन मुख्य लेखाधिकारी मार्फत पाठवावयचे होते. ती संचिका मा.आयुक्त यांचेकडे पाठवावयाची होती.

**मालमत्ता अधिकारी :** लेखा विभागाकडून संचिका माझ्या विभागाकडे २१ तारखेला प्राप्त झालेली आहे. त्यांच्या मध्ये तीन मुद्यांवर खुलासा मागविणेत आला होता. तो तयार करण्याचे काम सुरु आहे. उत्तर तयार करुन पुन्हा लेखा विभागाकडे पाठवून मा.आयुक्त यांचेकडे संचिका पाठवावयाची आहे.

**मा.सभापती :** तात्काळ उपआयुक्त मार्फत मा.आयुक्तांकडे संचिका घेऊन जावे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** संबंधित अधिकाऱ्यांनी बनवाबनवीचे उत्तर सभागृहात देवू नये. जर कार्यवाही होत नसेल तर तसे सांगावे. परंतू अशा प्रकारचे उत्तर देवू नये. या प्रकरणी यांचा काही आर्थिक व्यवहार होत आहे काय त्यामुळे संबंधित अधिकारी अशा प्रकारचे उत्तर देतात. ते बरोबर नाही. संबंधित गुत्तेदाराकडून पैसे वसूल करणे आवश्यक आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आपल्या कालावधी मध्ये स्थायी समिती सभेमध्ये जेवढे प्रस्ताव मंजूर झालेले आहेत. त्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली याची विभाग निहाय यादी आपण मागविली होती. ती यादी सभागृहात सध्या दिसत नाही. ती कामांची यादी आपलेकडे प्राप्त झाली आहे काय आणि प्रशासनाने त्या सर्व कामांचा बाबतीत अंमलबजावणी केलेली आहे काय याची माहिती द्यावी.

**मा.सभापती :** दि.१०.०४.२००४ पासून आजपर्यंत स्थायी समितीमधील जे प्रस्ताव मंजूर झ ालेले आहेत. त्यावर काय कार्यवाही केली याची संबंधित विभागाकडून माहिती मागविण्यांत आली होती. उपआयुक्त (प्र.) त्यांचे घरगुती कामानिमित्त सध्या रजेवर आहेत. परंतू आचार संहितेपुर्वी सर्व सदस्यांना अंमलबजावणीच्या बाबतीत माहिती देण्यांत येईल असे सांगितले होते.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्थायी समितीमधील आजपर्यंत मंजूर झालेल्या कामांची अंमलबजावणी बाबत व प्रलंबित असलेल्या कामांचे माहिती बाबत सभागृहास यादी तयार करुन द्यावी व माझ्या वार्डातील काही प्रलंबित प्रस्ताव आहेत ते तातडीने मंजूरी व्हावी.

**मा.सभापती :** बऱ्याचशा स.सदस्यांच्या वॉर्डातील संचिका विविध कारणाने वाटाघाटीसाठी व दर निश्चित करणे साठी प्रलंबित होत्या. त्या आता मा.आयुक्त अशी सर्व प्रकरणांची वाटाघाटीद्वारे व इतर काही संचिका आहेत. त्या सर्व संचिकावर आजच कार्यवाही करुन मंजूरी प्राप्त होईल. त्याच प्रमाणे शिवाजी नगर, गारखेडा, येथील मनपाच्या शाळेच्या बाबतीत दि.२०.०७.०४ रोजी प्रस्ताव मंजूर झालेला होता त्यांचे काय झाले याचीही माहिती मिळालेली नाही. कारणापूरता उतारा मागवून पुढील कार्यवाही करावी.

**सौ.शाहीन जफर :** सिल्लेखाना येथील मनपाची शाळा बंद करुन शिफ्ट केली आहे व तेथील शिक्षकांची इतर शाळांत बदली केलेली आहे. त्या ठिकाणी एकूण तीन

शिक्षक असतांना त्यापैकी फक्त २ शिक्षकांच्या बदल्या केल्या. मात्र मलेका नावाच्या शिक्षीकेला त्याच ठिकाणी का ठेवण्यांत आले. जेव्हा की एखादी शाळा शिफ्ट झाल्यास त्या शाळेतील सर्वच शिक्षकांच्या बदल्या करणे भाग असते. परंतू या ठिकाणी तसे झाले नाही. तेथील एक शिक्षिका चार महिन्यांत निवृत्त होणार आहे. आणि त्यांना इतर ठिकाणी हलविण्याचे प्रकार शिक्षण विभागाकडून होत आहे. ते बरोबर नाही. न्याय सर्वांना सारखाच द्यावा. कुणासही दुजाभाव करु नये. परंतू शिक्षण विभागातील कारभार हा वेगळाच आहे. एखादी शाळा जर बंद करावयाची झाल्यास त्यास प्रशासनाची मंजूरी घेणे आवश्यक नाही काय?

**शिक्षणाधिकारी :** मागील वेळेस शिक्षण समिती मध्ये याबाबत प्रस्ताव मंजूर झालेला होता की, ज्या शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या अतिशय कमी आहे. त्या शाळा बंद करुन इतर शाळांमध्ये शिफ्ट करण्याची कार्यवाही केली होती. आणि त्यामुळे तेथील दोन शिक्षकांच्या बदल्या करण्यांत आलेल्या होत्या.

**सौ.शाहीन जफर :** या शाळांमध्ये उर्दूच्या बालवाडी साठी मराठीच्या शिक्षीका असल्याने उर्दू विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही काय? त्यामुळे शिक्षण विभागामार्फत अशा प्रकारे केलेली कार्यवाही योग्य नाही. प्रत्यक्षात परिस्थिती पाहूनच कार्यवाही होणे आवश्यक वाटते. दुसरे असे की, शिक्षण विभागातील प्रत्येक शाळांमधील शिक्षकांच्या पगारातून जे आर.डी.साठी पैसे कपात होतात तो एक वेगळाच घोळ सध्या चालू आहे. श्री.जिलानी यांनी सर्व शाळांचे आर.डी.पासबुक साठीचे पैसे शिक्षण विभागातून कपात करण्याविषयीचे धोरण अवलंबिले आहे. ज्यामुळे इतर शाळेतील काही शिक्षकांचे वेळेवर पैसे काढणे बाबत अडचणी निर्माण होण्याचा संभव आहे. तेव्हा याबाबतची शिक्षकांची व मुख्याध्यापकांची नाराजी दिसून येत आहे. याबाबतची कार्यवाही व्हावी. प्रकरण एकाच ठिकाणी रहावे याबाबतचा निर्णय व्हावा.

**मा.सभापती :** स.सदस्यांच्या सुचनेप्रमाणे शिक्षण विभागातील संबंधित क.लि.जे कुणी असतील तर त्यांचे जागेवर दुसऱ्यांना काम द्यावे. शिक्षणाधिकाऱ्यांनी स्वत: चौकशी करावी. त्याचप्रमाणे शिक्षण विभागातील आर.डी.चे पासबुक संदर्भात शिक्षणाधिकारी यांना तातडीने आवश्यक ती कार्यवाही करुन प्रकरण मिटविणे योग्य होईल.

**श्री.भगवान रगडे :** गेल्या बऱ्याच दिवसापासून प्रलंबित असलेला मिसारवाडी व भाग स्लम घोषित करणे बाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत आला आहे काय?

**प्रकल्प संचालक :** याबाबतची माहिती आता नगर रचना विभागाकडून प्राप्त होऊ शकेल.

**सहाय्यक संचालक :** मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करणेच्या प्रस्तावाबाबत नगररचना व प्रकल्प विभागामार्फत एकत्रीत पाहणी करुन पुढील योग्य ती कार्यवाही नियम ३७ ची कार्यवाही करावी लागेल. संयुक्त मोजी होणे आवश्यक आहे. संयुक्त मोजणीची कार्यवाही झाली नाही. मोजणी फीस भरण्यासाठी कळविण्यांत आले होते.

**मा.सभापती :** आतापर्यंत याबाबतची सुरुवात झाली नाही. ही अतिशय दुर्देवी बाब आहे. गेल्या साडेतीन वर्षापूसन स.सदस्यांनी वेळोवेळी सभागृहात चर्चा करुन आपल्या वॉर्डातील गाऱ्हाणे मांडतात आणि प्रशासन मात्र फक्त ऐकून गप्प राहते. कार्यवाही मात्र करीत नाही. तेव्हा अद्यापपावेतो कार्यवाही का झाली नाही. याची माहिती द्यावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** याबाबतचा कालावधी फिक्स करुन घ्यावा. कारण की स.सदस्यांची गेल्या कित्येक, दिवसांपासूनची मागणी असूनही ती प्रशासनाकडून प्रलंबित आहे आणि सभागृहाने सारखे चर्चा करीत असतात याचे गांभीर्य लक्षात घेत नाही. यासाठी विशिष्ट कालावधीपर्यंत प्रशासनास वेळ देवून प्रकरण शासनाकडे पाठविणे साठी आदेश द्यावेत.

**मा.सभापती :** संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितल्याप्रमाणे नियम ३७ ची कार्यवाही झालेली आहे. आणि याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे एका महिन्याच्य आंत कलम ३७ ची कार्यवाही करण्यास यावी व स्लम घोषित करण्याची कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** आरोग्य विभागातील आर.सी.एच.भरती बाबत काय स्थिती आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** याबाबत स्थगिती दिल्यानंतर छाननीची प्रक्रिया चालू आहे.

**श्री.मोहन मेघावाले :** माझ्या प्रभागामध्ये शाळेसाठीची विद्यार्थी संख्या जास्त असून या शाळेत शिक्षकांची संख्या मात्र दोनने कमी आहे. गेल्या तीन सभेपासून मी याबाबत बोलत आहे. या शाळेकरिता आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करावी.

**मा.सभापती :** ज्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या जास्त आहे आणि शिकविणेसाठी शिक्षकांची संख्या कमी पडत असल्यास त्या ठिकाणी शिक्षकांची तातडीने व्यवस्था व्हावी. समायोजनाचे प्रस्तावाचे काय झाले? त्यामध्ये स.नगरसेवकांकडे कमी शिक्षक आहेत. त्या ठिकाणी देण्याचा समावेश करण्यांत यावा.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** माझा वॉर्ड झोन क्र.४ मध्ये येतो. हा भाग फार मोठ्या प्रमाणात विखुरलेला असून या भागातील साफसफाई साठी मजूरांची संख्या अपुरी आहे. तेव्हा या झोनसाठी बाब मजूरांची तातडीने कार्यवाही व्हावी. झोन क्र.४ च्या विभाजनाचे काय झाले.

**मा.सभापती :** १५ ऑगस्ट २००४ ला झोन क्र.४ ची विभागणी करुन नवीन झोन करण्याची कार्यवाही सुरु असून या झोनमध्ये मजूर कमी होत असल्यास त्या ठिकाणी बाब मजूर देण्याची कार्यवाही प्रशासनाने करावी. त्याचप्रमाणे झोन क्र.४ मध्ये साकळे हे झोन नं.३ मध्ये स्व.निरिक्षक आहेत. त्यांना झोन नं.५ ला प्रभारी झोन अधिकारी म्हणून दिलेले आहे. त्यांना तिथेच ठेवा किंवा झोन नं.५ मध्ये स्वच्छता निरिक्षक म्हणून ठेवा.

**श्री.मधुकर सावंत :** झोन क्र.४ ची विभागणी करीत असतांना त्या त्या झोन मधील संबंधित नगरसेवकांशी चर्चा करावी. आणि नंतरच या झोनचे विभाजन करावे.

**उपआयुक्त (म.) :** झोन क्र.४ च्या विभागणी संदर्भाने प्रशासनातर्फे कार्यवाही चालू असून या झोनच्या विभागणीसाठी आवश्यक लागणारा कर्मचारी वर्ग देणेसाठी आस्था-१ कडून प्रस्तावित आहे. नगररचना विभागाकडूनही नकाशे प्राप्त झाले असून त्यानंतर नोटीफिकेशन जाहिर करण्यांत येईल. त्यानंतर एका महिन्याच्या आंत नागरिकांकडून सजेशन व ऑब्जेक्शन मागवून पुढील कार्यवाही करणेत येईल.

**श्री.मधुकर सावंत :** मालमत्ता विभाग सक्षमीकरण करणे बाबतही कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** मालमत्ता विभाग/प्रशासकीय विभाग हे दोन्हीही विभाग सक्षमीकरण करणे बाबत कार्यवाही व्हावी.

**श्री.भगवान रगडे :** नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे शहरातील संपूर्ण केरकचरा आणून टाकला जातो. जवळपास दिवसभरात ३५० मे.टन कचरा आणून टाकल्या जातो.

यापुर्वी त्यासंदर्भात मला माझ्या वार्डाद्वारे आंदोलन सुध्दा करावे लागले होते. विविध वर्तमानपत्रात बातम्याही छापून आलेल्या होत्या. मा.न्यायालयाने याबाबत सहा महिन्याचे आत सदरील ट्रेचिंग ग्राऊंड वरील कचरा उचलल्या गेला पाहिजे. असे आदेशित केले होते. परंतू अद्यापही याबाबत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही. हा कोर्टाचा अपमान होत आहे. याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड मधील संपूर्ण शहराचा कचरा दररोजचा टाकीत असल्याने येथील लोकांचे जीवन जगणे अतिशय कठीण होत चालले आहे. याबाबतची कल्पना आपण न केलेले बरी. त्या ठिकाणी साधी फवारणी सुध्दा महिन्यातून होत नाही. त्यामुळे दुर्गंधीयुक्त वातावरण होत आहे. तेव्हा याबाबतचा निर्णय प्रशासनाने तातडीने घ्यावा.

**मा.सभापती :** नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथील कचरा टाकणे ही अतिशय डोकेदुखीची बाबत बनलेली आहे. याबाबत मा.न्यायालयाच्या आदेशान्वये प्रशासनाने करोडी येथे कचरा डेपो हलविणे बाबत प्रक्रिया चालू होती. नागरिकांचा प्रखर विरोध आहे. गावकऱ्यांनी प्रवेश करु दिला नाही. या संदर्भात चर्चा केली. देवळाई येथील श्री.बुढण यांनी अर्ज केला आहे. २२ एकर जागा कचरा डेपो साठी घ्यावी. प्रशासनाने जागा तात्काळ पाहणी करावी.

**जीवशास्त्रज्ञ** : नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे नियमितचा पंपाने फवारणी दैनंदिन केल्या जाते. बाराच तास चालवतात.

**मा.सभापती :** आरोग्य वैद्यकीय अधिकारी व जीवशास्त्रज्ञ आणि मी स्वतः दि.२५.०८.०४ बुधवार रोजी सकाळी ०७.०० वाजता पाहणी दौरा करणार आहेत याची संबंधित अधिकाऱ्यांनी नोंद घ्यावी.

**श्री.भगवान रगडे :** किमान ४५ एकरची जागा गहाण ठेवली, अशी वर्तमानपत्रात बातमी आलेली आहे. आपल्या ताब्यांत आहे का? बँकेकडून रु.५०.०० लाख रुपये घेण्यांत आले. महानगरपालिकेची फसवणूक केली म्हणून दंड घ्यावा. त्यांना नोटीस फेकून ५० लाख मागितले होते ते थांबविले. पाच एकरचा करार खाडाखोड करुन ५ हेक्टर केले. या संदर्भात काय ठरले होते. कमिटी नेमली होती. पदाधिकाऱ्यांनी काम करायचे. चौकशीत हात गुंफलेले आहेत. नाहकरत प्रमाणपत्र कसे दिले सविस्तर खुलासा करावा.

**मा.सभापती :** या बाबतचे प्रकरणे न्यायप्रविष्ट असून संबंधित गुत्तेदाराबाबत गुन्हा दाखल झालेला आहे.

**विधी सल्लागार :** सदरील प्रकरणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचे मार्फत कार्यवाही झालेली आहे. आपण जी नोटीस दिलेली आहे. त्याबाबत कोणत्याही प्रकारची न्यायप्रविष्ट प्रकरण नाही किंवा मनाई हुकूम नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी (प्र.) :** या संदर्भाने माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही.

**मा.सभापती :** कार्यरत असलेले आरोग्य वैद्यकीय अधिकारी हे जेव्हा रुजू होतील त्यानंतर स.स.श्री.भगवान रगडे यांना खत प्रकल्पा बाबतची लेखी माहिती देण्यांत यावी.

**श्री.भगवान रगडे :** गांभीर्याने लक्ष द्यावे. अशाच प्रकारे हर्सुल तलावाचे बाबतीत सुध्दा प्रकरण बऱ्याच दिवसांपासून प्रलंबित आहे. या तलावाच्या संदर्भाने मी संबंधित वकीलाशी सुध्दा चर्चा केली. तेव्हा तेथील अटी व शर्ती ज्या घालण्यांत आल्या आहेत. त्याप्रमाणे जर १० फुटापर्यंत पाणी असेल तर

तेथील मच्छी पकडण्याचे गुना चालू राहील अन्यथा कमी पाणी असल्यास तेथील गुत्तेदारी बंद करणेत येईल. अशा प्रकारची नोटीस संबंधितास दिलेली नाही.

**मा.सभापती :** महानगरपालिकेतील अटी व शर्तीच्या बाबतीत कार्यवाही संबंधित गुत्तेदाराने केली असल्यास विधी विभागाशी चर्चा करुन प्रकरण कोर्टात दाखल करावे.

**मालमत्ता अधिकारी :** मी जेव्हा चार्ज घेतला त्यावेळी प्रकरणे खालच्या कोर्टात होते. आत प्रकरण उच्च न्यायालयात आहे.

**मा.सभापती :** सध्या कोर्टात काय प्रकरण आहे. याबाबत मा.न्यायालयात अटी व शर्ती बाबत न्यायालयास या बाबी निदर्शनास आणून द्याव्यात आणि संबंधित गुत्तेदाराचा ठेका रद्द कसा होईल याबाबतची माहिती वकीलामार्फत न्यायालयात सादर करावी.

**श्रीमती शाहीन जफर :** अशाच प्रकारचे प्रकरण सिल्लेखाना अनाधिकृत बांधकाम बाबतचे होते. खालच्या व मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहेत. पालन केले जात नाही. अवमानाची कार्यवाही घेण्याची शक्यता आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याची माहिती द्यावी.

**विधी सल्लागार :** सध्या जी प्रकरणे न्यायप्रविष्ट असून त्यास स्टेट स्को आहे. हे उठल्यानंतर पुढील कार्यवाही होईल. तीन वेळेस प्रकरण व्हॅकेटसाठी दाखल केलेले आहेत.

**मा.सभापती :** आपल्या वकीलामार्फत याबाबत कार्यवाही करावी. आता प्रकरण व्हॅकेट झाल्यानंतर कॅव्हेट दाखल करावे.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे बाबत काय झाले याची माहिती द्यावी.

**अति.शहर अभियंता :** महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारणेसाठी सन २००२-०३ ला अर्थसंकल्पात रु.१०.०० लाखाची तरतूद होती. अंदाजपत्रक तयार होते. परंतू जागे अभावी स्थगित ठेवले.

**मा.सभापती :** सर्वसाधारण सभेत ठराव झालेला आहे. तरतूद शिल्लक असेल तर स्थायी समिती सभेमध्ये निर्णय घेण्यांत येतो की, सुतगिरणी चौकात पुतळा उभारण्यासाठी शासनाकडून नाहरकत प्रमाणपत्र घेण्यांत यावे. त्याचप्रमाणे कै.वसंतराव नाईक यांचा पुतळा अनावरण करणे बाबतची कार्यवाही तातडीने व्हावी.

**अति.शहर अभियंता :** मा.महापौर यांचे मंजूरीने तारीख निश्चित करुन कार्यवाही करणेत येईल.

**विषय क्र.९४ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, युनायटेड वेस्टर्न बँक, शाखा मनपा यांना मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये जागा भाडेतत्वावर देण्यांत आलेली आहे. सदर भाडे बाबतचा करारनामा दिनांक ३१.०८.२००३ रोजी संपला आहे.

त्यामुळे सदर भाडेवाढ करिता प्रस्ताव भाडे समितीसमोर ठेवण्यांत आला होता व त्यांचे प्रत्यक्ष ताबा क्षेत्र १६३.३० चौ.मी.असून त्याचे भाडे रु.२६,२९१/- प्रतिमाह निश्चित करण्यांत आले आहे रु.५.०० प्रति चौ.मी.प्रतिमाह प्रमाणे सेवाशुल्क तसेच मालमत्ता कर व इतर कर नियमाप्रमाणे होणे योग्य. नवीन करारनामा प्रचलित अटी शर्तीनुसार दिनांक ०१.०९.२००३ पासून करणे योग्य. करिता प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.भगवान रगडे :** महानगरपालिका परिसरात मनपातर्फे युनायटेड वेस्टर्न बँकेला जागा देवून या बँकेमार्फत सर्व व्यवहार चालविल्या जातो. या बँकेशिवाय इतर बँकेस निविदा मागवून बँकेचा व्यवहार दुसऱ्या बँकांकडे द्यावा. एकाच बँकेकडे नेहमीसाठी व्यवहार ठेवू नये.

**मा.सभापती :** अनेक वर्षापासून सेवा देत आहे. सदरचा प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**श्री.संजय शिरसाठ :** बँकेचा प्रवेश बाहेरच्या बाजूने ठेवावा.

**श्री.मधुकर सावंत :** युनायटेड वेस्टर्न बँकेस करारनामा करणेसाठी एका वर्षाच्या कालावधी पर्यंतचा उशीर घेण्याचे कारण काय? याची माहिती द्यावी.

**मालमत्ता अधिकारी :** मी मालमत्ता अधिकारी पदाचा पदभार ४ फेब्रुवारीस घेतला त्यावेळी निदर्शनास आल्या बरोबर कार्यवाही केली.

(याचवेळेस स.स.श्री.भगवान रगडे प्रशासनाचा निषेध म्हणून सभात्याग करतात वेळ सायं.०६.१५ वाजता)

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे युनायटेड वेस्टर्न बँक, शाखा मनपा यांना मनपाच्या मुख्य इमारतीमध्ये भाडे तत्वावर देण्यांत आलेल्या जागेकरिता भाडे समितीने निश्चित केल्यानुसार त्यांचे प्रत्यक्ष ताबा क्षेत्र १६३.३० चौ.मी. करिता प्रतिमाह रु.२६,२९१/- भाडे रु.५.०० प्रति चौ.मी.प्रतिमाह प्रमाणे सेवाशुल्क तसेच मालमत्ता कर व इतर कर नियमाप्रमाणे घेऊन दिनांक ०१.०९.२००३ पासून प्रचलित अटी शर्तीनुसार नवीन करारनामा करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९५ :**

उपआयुक्त (म.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान वाहनतळ की वसुलीसाठी कार्यालयीन निविदा सूचना क्र.३ दिनांक २५.०५.२००४ रोजी दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यांत येवून सिलबंद निविदा मागविण्यांत आल्या होत्या.

त्यानुसार दिनांक १२.०७.२००४ रोजी झालेल्या स्थायी समिती विषय क्र.४७ मधील (२) मध्ये श्री.कौतिक वसंतराव लहाने यांचे जास्तीचे दर रु.२५,१०५/- प्रति माह दराने देण्यांचे मान्य केले होते. त्यानुसार संबंधित ठेकेदाराला तीन दिवसाच्या आत रक्कम भरण्याबाबत जा.क्र./मनपा/मामअ/१३६९/०४, दि.०५.०८.२००४ रोजी पत्र देण्यांत आले आहे. परंतू संबंधित ठेकेदाराने रक्कम न भरल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदारास पत्र देवून विचारणा करण्यांत आली की, प्रथम क्रमांक ठेकेदाराने दिलेल्या दर रु.२५,१०५/- मध्ये आपण ठेका घेण्यांस तयार असाल तर आपला विचार करण्यांत येईल. त्यानुसार दुसऱ्या क्रमांकाचे ठेकेदार श्री.देवेंन्द्र दौलत मोरे यांनी अर्ज देवून कळविले आहे. प्रथम क्रमाकांच्या ठेकेदाराने दिलेले दर रु.२५,१०५/- मला मान्य असून मी ते देण्यास तयार आहे. करिता संबंधित ठेकेदाराने दिलेले दर मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फी वसुलीसाठी दुसऱ्या क्रमाकांचे ठेकेदार श्री.देवेंन्द्र दौलत मोरे यांनी प्रथम क्रमांकाच्या ठेकेदाराने दिलेले दर रु.२५,१०५/- मध्ये ठेका घेण्याचे मान्य केल्यानुसार सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फी वसुलीचा ठेका संबंधितास देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र.९६ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र.५ ऑडीटर सोसायटी, हरसिध्दी सोसायटी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये नवीन डांबरीकरण या लेखा शिर्षाअंतर्गत रक्कम रु.५.०० लक्षची तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. परंतू सदर ठिकाणी पुर्वीचे डांबरीकरण झालेले असल्यामुळे तेथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करावे लागणार आहे. त्यामुळे सदरील रु.५.०० तरतूदीचा समावेश हा पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.५ ऑडीटर सोसायटी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणेसाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पामध्ये नवीन डांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत असलेली रक्कम रु.५.०० लक्षच्या तरतूदीचा समावेश हा पुनडांबरीकरण या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९७ :**

कार्यकारी अभियंता (ड्रेनेज व विद्युत) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, राज्य शासनाच्या अनुदान व हडकोच्या अर्थसहाय्याने नागरी स्वच्छता कार्यक्रम शासन निर्णय क्र.खस्वयो/१०९८/प्र.क्र./५९/पा.पु/२१, मंत्रालय मुंबई-३२ दि.१ डिसेंबर १९९८ नुसार राबविण्यांत येत आहे. या कामाकरिता सन २००३-०४ चे अर्थसंकल्पात ३१.०० लक्षची तरतूद करण्यांत आली होती. त्या कामाचे अंदाजपत्रकास प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र.१८४/४, दि.२०/१२/२००३ ला सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आहे. त्यानुसार या कामाची बी-१ निविदा जा.क्र./मनपा/लेखा/नि/८२/०४, दि.१६.०१.०४ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या शेवटच्या तारखेपर्यंत एकूण १४ निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतीत तारखेला एकूण ४ निविदा प्राप्त झाल्या. याचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मो.सोहेल सिध्दीकी | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५% जास्त दराने |
| २. | मे.युनायटेड कन्स्ट्रक्शन | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९% जास्त दराने |
| ३. | मे.जिव्हाळा सेवाभावी संस्था | - | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराने |
| ४. | श्री.एस.पी.घुले | - | निविदा उघडली नाही. |

प्राप्त निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा मे.सोहेल सिध्दीकी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराची

सदरील गुत्तेदारास वाटाघाटीस बोलाविले असता आज दि.२३.०८.२००४ रोजी मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दराने निविदा मान्य केली आहे. करिता प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे राज्य शासनाच्या अनुदान व हडकोच्या अर्थसहाय्याने नागरी स्वच्छता कार्यक्रम शासन निर्णयानुसार राबविण्याचे कामाकरिता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.सोहेल सिध्दीकी यांचे झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नगर भूमापन क्रमांक १२८७७/अ/१, जालना रोड, औरंगाबाद आरक्षण क्रमांक २१८ समावेशक आरक्षणासाठी (दुकान केंद्र व वाहनस्थळ) बांधकाम प्रस्ताव प्राप्त असून मेसर्स निर्मल असोशिएटस मार्फत श्री.पगारीया व इतर तीन यांनी सदर आरक्षणाच्या विकासाचा प्रस्ताव दिला आहे.

सदर प्रस्ताव २१५३.५० चौ.मी.एवढ्या क्षेत्रावर असून बाधित क्षेत्र वगळता १९२१.८८ चौ.मी.क्षेत्र असून विकास नियंत्रण नियमावलीनुसार १५००.०० चौ.मी.एवढे चटई क्षेत्र (F.S.I.) दर आहे. करिता अर्जदारास १५०० चौ.मी. अधिक रस्त्याने बाधित क्षेत्र २३१.३२ चौ.मी.असे एकूण १७३१३२ चौ.मी.बांधीव क्षेत्र देय आहे.

अर्जदाराना रस्त्याचा (F.S.I.) सोडून उर्वरीत २५% (३७५.०० चौ.मी.) महानगरपालिकेस देऊ केले आहे.

प्रकरणी महानगरपालिकेस घ्यावयाच्या जागेच्या स्थान निश्चितीकरिता नियुक्त चार सदस्यीय समितीने दिनांक ०९.०३.२००४ रोजी बोलवलेल्या बैठकीत जागेचे तांत्रिकदृष्ट्या (Location) जालना रोडची संभाव्य बाजू व त्यानुसार संभाव्य (Commercial Potential) याबाबत चर्चा केली तसेच कोणत्या पध्दतीने बांधीव क्षेत्र घेतले म्हणजे भविष्यात जे भाडेपट्ट्यावर देणे महानगरपालिकेस सोईस्कर होईल. याबाबत चर्चा केली. त्यानुसार तळमजल्यावर (Upper Ground Floor) जालना रस्त्यालगत जी चार दुकाने आहेत. त्यापैकी पुर्वेकडील एक दुकान व उर्वरित सर्व क्षेत्र तळमजल्यावरच पाठीमागील बाजूस अर्जदाराने महानगरपालिकेला घ्यावीत. पाठीमागील बाजूस महानगरपालिकेचे क्षेत्रात महानगरपालिकेचे क्षेत्रात महानगरपालिकेस आवश्यक तेवढेच स्वच्छतागृह ठेवून उर्वरित स्वच्छतागृहे अर्जदाराचे क्षेत्रात हलवावीत असे सर्वानुमते ठरविण्यांत आले व त्यास मा.आयुक्तांनीही दिनांक ३१.०७.२००४ रोजी अनुकूलता दाखविली व झालेल्या समितीचे इतिवृत्त स्विकारणे महानगरपालिकेच्या हिताचे आहे असे मत व्यक्त केले. त्यानुसार जमीन मालकास पत्र जा.क्र./मनपा/नरवि/२०२७/०४, दि.०३.०८.२००४ या पत्राद्वारे कळविण्यांत आले असता मंजूरीप्रमाणे क्षेत्र देण्यांत असमर्थता व्यक्त करुन सदर प्रस्ताव व्यवहार्य नाही असे म्हटले आहे.

मा.स्थायी समितीने समावेशक आरक्षणासाठी गठीत केलेल्या समितीपुढे हा विषय दिनांक १०.०८.२००४ रोजी घेण्यांत येऊन प्रस्तावावर विचार करण्यांत आला. जमीन मालक व महानगरपालिका यांचे सामजंस्य रहावे व दोघांचे हित लक्षात घेऊन संपूर्ण क्षेत्र तळमजल्यावर पाठीमागील बाजूस एकत्रितपणे घ्यावे म्हणजे महानगरपालिकेलाही त्याची देखभाल दुरुस्ती करणे कोणाला भाड्याने देणे आदी बाबी सुकर होतील. करिता १५००.००

चौ.मी. पैकी २५% म्हणजे ३७५ चौ.मी.बांधीव क्षेत्र तळमजल्यावर (Upper Level Ground Floor) एकत्रित भूखंडाचे उत्तर बाजूस घ्यावे असे सर्वानुमते ठरले.

सदर प्रस्ताव मा.आयुक्तांच्या अवलोकनार्थ व मंजूरीस्तव ठेवण्यांत आला असता प्रकरणी मा.आयुक्तांनी दि.२३.०८.२००४ रोजी दिनांक ०९.०३.२००४ चे समितीचे प्रस्तावास पुन्हा शिफारस केली आहे. सदर प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर निर्णयास्तव तथा आदेशास्तव सादर करण्यांत येत आहे.

**संवाद :-**

**मा.सभापती :** स्थायी समितीने समावेशक आरक्षणासाठी गठीत केलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर भूमापन क्रमांक १२८७७/अ/१/जालना रोड, औरंगाबाद आरक्षण क्र.२१८, समावेशक आरक्षणासाठी (दुकान केंद्र व वाहनतळ) प्राप्त बांधकाम प्रस्तावानुसार मेसर्स निर्मल असोशिएटस मार्फत श्री.पगारीया व इतर तीन यांनी सदर आरक्षणाच्या विकासाकरिता स्थायी समितीने समावेशक आरक्षणासाठी गठीत केलेल्या समितीने १०.०८.२००४ रोजी प्रस्तावावर विचार केल्यानुसार सदरची मालमत्तेबाबत वाद निर्माण होऊन प्रकरणात विलंब लागून ही मालमत्ता तशीच पडून राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून जमीन मालक व महानगरपालिका कोणाला भाड्याने देणे आदी बाबी सुकर होण्याचे दृष्टीने संपूर्ण क्षेत्र तळमजल्यावर पाठीमागील बाजूस १५००.०० चौ.मी. पैकी २५% म्हणजे ३७५ चौ.मी.बांधिव व क्षेत्र तळमजल्यावर (Upper Leval Ground Floor) एकत्रीतपणे भूखंडाचे उत्तर बाजूस होण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.९९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडको एन-७ म्हाडा कॉलनी, येथील खुल्या जागेवर जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामासाठी निविदा सूचना क्र.मनपा/लेनि/४२/०४, दि.०६.०८.२००४ अन्वये निविदा मागविल्या असता विक्रीच्या अंतिम तारखेला एकूण ३० निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेस एकूण ६ निविदा दर भरुन प्राप्त झाल्या आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.एस.एम.सज्जाद | - | ३% जास्त दराने |
| २. | श्री.मन्नान खान | - | ४% जास्त दराने |
| ३. | श्री.एम.एम.काझी | - | ४.५% जास्त दराने |
| ४. | श्री.एस.ए.नवाब | - | ७% जास्त दराने |
| ५. | मे.शहा कन्स्ट्रक्शन | - | ८% जास्त दराने |
| ६. | मे.एस.ए.कन्स्ट्रक्शन | - | १०% जास्त दराने |

वरीलप्रमाणे सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा श्री.एस.एन.सज्जाद यांची असून मा.आयुक्तांनी वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने निविदेला मान्यता दिली आहे. करिता ३% जी दराची निविदा मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सदरील काम चार महिन्यांत पूर्ण करण्या बाबत आदेश व्हावेत. तसेच बार चार्ट प्रमाणे काम करण्यात यावे. कामाच्या प्रगती संबंधी दर पंधरा दिवसाला अहवाल सादर करावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो. सदरचे काम लवकर पूर्ण करण्याचे दृष्टीने दर पंधरा दिवसाला कामाचा प्रगती अहवाल सादर करण्यांत व चार महिन्यांचे कालावधीत काम पूर्ण करण्यांत यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७ म्हाडा कॉलनी येथील खुल्या जागेवर जिम्नॅशियम हॉल बांधणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.एम.सज्जाद यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% कमी दराने करुन घेण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०० :**

श्री.सै.मुकरम सै.मिस्कीन, जवान झोन क्र.३ महानगरपालिका, औरंगाबाद यांनी त्यांची दोन वर्षासाठी रोखण्यांत आलेली वेतनवाढ पुर्ववत सुरु करणे व निलंबन काळ सेवाकाळ गृहीत धरणे बाबत सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.सै.मुकर सै.मिस्कीन, जवान झोन क्र.३, महानगरपालिका, औरंगाबाद यांचे अपील मंजूर करण्यांत येते. त्यांची दोन वर्षासाठी रोखण्यांत आलेली एक वेतनवाढ पूर्ववत सुरु करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच त्यांचा निलंबन काळ (दि.१९.०१.२००२ ते २०.०६.२००२) सेवाकाळ समजण्यांत यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०१ :**

सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्दनुसार मौजे ईटखेडा येथील गट क्र.२४/पैकी मिळकत धारक बालाजी इंटरप्राईजेस तर्फे सचीन छापरवाल व रविंद्रसिंग जोहार यांनी १५ मीटर व ३० मीटर रुंद रस्त्याखालील क्षेत्र संपादन करणेसाठी मिळकत धारकाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना दिल्यावरुन भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचेकडे दिनांक ०१.०४.२००४ रोजी पाठविलेला आहे. दरम्यान मिळकत धारकाने उक्त रस्त्याखालील बाधित क्षेत्र खाजगी वाटाघाटीने संपादन करणे यासाठी संमती दर्शविल्यामुळे मिळकत धारकाचे उक्त रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र १५ मिटर रुंद रस्त्यासाठी १४६८ चौ.मी.व ३० मीटर रुंद रस्त्यासाठी २८५ चौ.मी. असे एकूण बाधित क्षेत्र १७५३ चौ.मी.साठी सर्व वाटाघाटी जाता रुपये ५,४५,८७४/- (रुपये पाच लाख पंचेचाळीस हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त) मोबदला निश्चित केलेला आहे. मिळकत धारकाने उक्त बाधित क्षेत्र नोंदणीकृत दस्तऐवज करुन ७/१२ वर महानगरपालिकेचे नांवे करुन दिलेला आहे.

करिता उपरोक्त बाधित क्षेत्राचा वरीलप्रमाणे निश्चित केलेला मोबदला रु.५,४५,८७४/- संबंधित मिळकतधारकास देणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना वाढीव हद्द नुसार मौजे ईटखेडा येथील गट क्र.२४/ पैकी मिळकतधारक बालाजी इंटरप्राईजेस तर्फे सचिन छापरवाल व रविंद्रसिंग जोहार यांचे १५ मीटर व ३० मीटर रुंद रस्त्याने बाधित होणारे क्षेत्र १५ मीटर रुंद रस्त्यासाठी १४६८ चौ.मी. व ३० मीटर रुंद रस्त्यासाठी २८५ चौ.मी.असे एकूण बाधित क्षेत्र १७५३ चौ.मी.खाजगी वाटाघाटीने संपादन करणेसाठी निश्चित केलेला मोबदला सर्व वजावाटी जाता रुपये ५,४५,८७४/- (रुपये पाच लाख पंचेचाळीस हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त) मोबदला संबंधित मिळकत धारकास अदा करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०२ :**

सहाय्यक संचालक, नगररचना, महानगरपालिका, औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की, सर्व्हे नंबर ३२/२, ३२/४, ३२/६ या मिळकतीवर श्री.काशिनाथ नावंदर व इतर यांना कार्यालयीन पत्र जा.क्र./मनपा/नरवि/ले-आऊट/१२५८/०१, दि.११.०७.२००१ नुसार सुचक व अभिन्यासास मान्यता देण्यांत आली होती. सदर रेखांकनातील विकास योजना आरक्षणे, आरक्षण क्रमांक ५ खेळाचे मैदान व आरक्षण क्रमांक ६ प्राथमिक शाळा या अंतर्गत बाधित क्षेत्राच्या मोबदल्याची रक्कम जमीन विकास शुल्क मध्ये समायोजित करण्याची विनंती संबंधित अर्जदारांनी शासनास तसेच महानगरपालिकेस केली होती. त्या अनुषंगाने संबंधित अर्जदारांनी सूचक अभिन्यासानुसार रेखांकनाची आखणी सक्षम प्राधिकरण तालुका निरिक्षक भूमी अभिलेख, औरंगाबाद यांचेकडून करुन घेतली आहे. सदर आखणी व मोजणी नुसार अर्जदारांचे आरक्षण क्रमांक ५ खेळाचे मैदान क्षेत्र ४४०२.७८ चौ.मी. व आरक्षण क्रमांक ६ प्राथमिक शाळा क्षेत्र ४६२०.८८ चौ.मी.साठी बाजार मुल्य दर शिघ्र सिध्दगणक (०१.०१.२००४ ते ३१.१२.२००४) नुसार एकूण मुल्यांकन रुपये ११,७०,७५४/- (अक्षरी अकरा लक्ष सत्तर हजार सातशे चौपन्न) हिशोबित होत आहे.

सदरील हिशोबित होणारी नावेचा रक्कम उक्त रेखांकनासाठी हिशोबित होणाऱ्या जमीन विकास शुल्काच्या रक्कमेत समायोजित करण्यांस मान्यता व्हावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्व्हे नं.३२/२, ३२/४, ३२/६ या मिळकतीवर श्री.काशिनाथ नावंदर व इतर यांचे रेखांकनातील आरक्षण क्रमांक ५ खेळाचे मैदानाचे क्षेत्र ४४०२.७८ चौ.मी. व आरक्षण क्रमांक ६ प्राथमिक शाळा क्षेत्र ४६२०.८८ चौ.मी.साठी एकूण मुल्यांकन रुपये ११,७०,७५४/- (अक्षरी अकरा लक्ष सत्तर हजार सातशे चौपन्न) इतकी हिशोबित होणारी मावेजा रक्कम उक्त रेखांकनासाठी हिशोबित होणाऱ्या जमीन विकास शुल्काच्या रक्कमेत समायोजित करण्यांस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०३ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, तिरुपती विहार ते सुतगिरणी चौक गटार बांधून सांडपाण्याची विल्हेवाट लावणेच्या

कामासाठी तयार करण्यांत आलेल्या रक्कम रुपये १७,०२,११९/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे. सदर कामासाठीचा ठराव क्र.१० फेब्रुवारी २००४ अन्वये पारित झाला असून या ठरावामध्ये अमन असोशिएटस ऐवजी अमन कन्स्ट्रक्शन झालेले आहे. तरी कंत्राटदाराच्या नावामध्ये दुरुस्तीसाठी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** स.सदस्यांकडून अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे बाबत प्राप्त झालेले प्रस्ताव अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलणे तसेच विविध कामासाठी सुधारित तरतूद उपलब्ध करुन देण्याचे अनुषंगाने सन्माननीय सदस्यांकडून प्राप्त झालेले विविध प्रभागातील नवीन कामे तसेच लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव पुढीलप्रमाणे आहेत. स.स.श्री.नंदकुमार घोडेले, श्री.काशिनाथ कोकाटे, (वॉर्ड क्र.३४ व ४९ करिता) सौ.निर्मला कांबळे, श्री.सोपान वारे, श्री.गणेश तांबे, श्री.प्रल्हाद निमगांवकर यांचेकडून लेखाशिर्ष बदलणे बाबतचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. नवीन कामाकरिता प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. नवीन कामाकरिता लागणारी तरतूद व वाढीव रक्कम तांत्रिकदृष्ट्या रद्द होणाऱ्या कामातून व बचतीमधून वाढीव तरतूद उपलब्ध करणे या प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्यांचा निर्णय घेते.

(मा.महापौर यांचेकडील पत्र क्र.मनपा/महापौर/१५५/०४, दि.२१.०८.०४ नुसार)

गणेशोत्सवानिमित्त शहरातील नागरिकांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा व शहराच्या स्वच्छता व सामाजिक जाणीव हया बाबत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून महानगरपालिकेतर्फे स्पर्धा/बक्षीस योजना घोषित करण्या बाबत प्राप्त प्रस्तावास स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देत आहे.

(मनपा कर्मचारी गणेशोत्सव मंडळाकडून प्राप्त निवेदनानुसार)

औरंगाबाद महानगरपालिका कर्मचारी गणेशोत्सव मंडळाकडून प्रतिवर्षी गणेशोत्सव साजरा करण्यात येत असून मनपा कर्मचारी गणेशोत्सव मंडळास यापुर्वी निधी उपलब्ध करुन दिल्याप्रमाणे यावर्षी व यापुढे प्रतिवर्षी रक्कम रु.२५,०००/- मनपा फंडातून उपलब्ध करुन देण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्यांचा निर्णय घेते.

(स.सदस्य श्री.प्रल्हाद निमगांवकर व सोपान वारे यांनी मांडलेली सूचना)

मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्रमांक २१६ (भाग) व २१७ (भाग) मधील औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ६ व ७ अनुक्रमे प्राथमिक शाळा व खेळाचे मैदानासाठी आरक्षित मनपा मालकीचे क्षेत्र प्रत्येकी एक एकर जमीन शैक्षणिक कार्यासाठी कै.सुशिलादेवी बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संस्था, औरंगाबाद यांनी मागणी केलेली आहे. सदर संस्था नोंदणीकृत असून संस्थेस जागेची निकड लक्षात घेता सदरील संस्थेस शाळा चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या मालकीची असलेली जमीन महानगरपालिकेने हरविलेल्या दराने कै.सुशिलादेवी बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक सेवाभावी संस्था, औरंगाबाद या संस्थेस तीस वर्षाच्या भाडे तत्वावर कराराने

जागा प्रदान करण्यांत यावी. प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्यांचा निर्णय घेते.

(म्युनिसिपल ऑफिसर्स असोशिएटस म्युनिसिपल कॉर्पोरेशनकडून प्राप्त निवेदनानुसार)

औरंगाबाद महानगरपालिका टाऊन हॉल परिसरातील असोशिएशच्या बॅडमिंटन हॉलला वुडन कोर्ट करुन देण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्यांचा निर्णय घेते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तिरुपती विहार ते सुतगिरणी चौक गटार बांधून सांडपाण्याची विल्हेवाट लावणेच्या कामासाठीचे ठरावामध्ये (स्था.स.सभा ठराव क्र.१०८ फेब्रुवारी २००४) कंत्राटदाराच्या नावांमध्ये अमन कंन्स्ट्रक्शन ऐवजी अमन असोशिएटस अशी दुरुस्ती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

- **निर्णय :**

  सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणे. काही कामांसाठी असलेली तरतूद करणे संबंधाने ज्या कामाकरिता सुधारित वाढीव आर्थिक तरतूद करण्यांत आलेली आहे. अशा कामांकरिता तांत्रिकदृष्ट्या रद्द होणारी कामे तसेच इतर कामांचे होणाऱ्या बचतीमधून वाढीव तरतूद उपलब्ध करुन या कामाकरिता वळती करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| वॉर्ड क्र. | कामांचे नांव व अर्थसंकल्पीय तरतूद | नवीन/सुधारित कामाचे नांव व सुधारित आर्थिक तरतूद | रक्कम |
|---|---|---|---|
| २८. | वॉर्ड क्र.२८ विटखेडा ते पैठण रोड जोडणाऱ्या नाल्यावर पुल बांधणे - ४५ लक्ष (सदरील कामाचे अंदाजपत्रकीय ३५ लक्षचे असल्याने झालेला १० लक्ष बचतीमधून) | १) श्री.धुत यांचे बंगल्यासमोर पैठणरोड ते आनंद विहार (मालखरे यांचे) गाडी रस्ता खडीकरण करणे.<br>२) महानुभाव आश्रम गाडी रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे.<br>३) पैठणरोड ते संतकबीर शाळा हिंदुस्थान आवास पर्यंतचा रोहयोचा रस्ता डांबरीकरण करणे. (खडीकरण झालेले आहे. डांबरीकरण करणे.)<br>४) पैठण रोडवरील कुशारे पार्कला लागून असलेल्या १००% विकास खर्च भरलेल्या वसाहतीस (माजी विभागीय आयुक्त श्री.कुसै साहेब व एम.डी.सी.चे श्री.देशमुख साहेब यांचे घराकडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण करणे.) | १० लक्ष<br><br>एकत्रित |
| ३४. | प्रभाग क्र.३४ समतानगर (पश्चिम) भागात जलवाहिनी टाकणे-४ लक्ष (पृष्ठ क्र.१५३ अ.क्र.५१) | १) वार्ड क्र.३४ मध्ये उद्यान विकसीत करणे-२ लक्ष<br>२) वॉर्ड क्र.३४ मध्ये पथदिवे लावणे-२ लक्ष | |
| ३२. | वॉर्ड क्र.३२ मध्ये कॉंक्रेटींग करणे-२ लक्ष | लालमन चौक ते सोनार गल्ली रोडवर खडीकरण करणे-२ लक्ष | |
| ५२. | एन-६ सिडको साईनगर | एन-६ सिडको साईनगर उद्यानात | |

| | | | |
|---|---|---|---|
| | उद्यानात वाचनालय बांधणेसाठीची व्यायामशाळा सुरु करण्यासाठी वर्ग करण्यांत आलेली तरतूद १.५० लक्ष. | व्यायामशाळा बांधणे-१.५० लक्ष | |
| ०२. | १) पृष्ठ क्र.१०१ अ.क्र.२ भीमनगर भावसिंगपुरा श्रावस्तीनगर येथे ड्रेनेज लाईन टाकणे-३.४३ लक्ष<br>२) पृष्ठ क्र.१०० अ.क्र.१ भिमनगर भावसिंगपुरा स्लम येथे दोन फुटपाथ ब्रीज बांधणे-२.९९ लक्ष<br>(वरील दोन्हीही स्पील ओव्हरमधील कामे तांत्रिक व प्रशासकीय कारणाने रद्द झाल्याने तरतूद वळती करणे.) | वॉर्ड क्र.२ भिमनगर, भावसिंगपुरा वार्डातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे-६.४२ लक्ष | |
| १७. | पृष्ठ क्र.१३२ अ.क्र.५० नाथप्रांगण येथील डांबरीकरण करणे-४ लक्ष | वॉर्ड क्र.१७ आदित्यनगर, उल्कानगरी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे-४ लक्ष | |
| ४९. | वॉर्ड क्र.४९ म्हाडा कॉलनी एन-७ खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे-५ लक्ष | वॉर्ड क्र.४९ मध्ये मोकळ्या जागी खुल्या रंगमंच करिता ओटा व शेड बांधणे-३ लक्ष | |
| ३१. | प्रभाग क्र.३१ हमालवाडा विविध गल्ल्यांत फरशी बसविणे-२ लक्ष | कोकणवाडी चौक ते रेल्वेस्टेशन फुटपाथ बांधणे-२ लक्ष | |
| | प्रभाग क्र.३१ रस्त्याचे डांबरीकरण करणे-२.५० लक्ष | कोकणवाडी ते रेल्वेस्टेशन फुटपाथ बांधणे-२.५० लक्ष | |
| | प्रभाग क्र.३१ मध्ये विविध ठिकाणी फुटपाथ बांधणे-३ लक्ष त्यातून ०.६० लक्ष वळती करणे) | | |
| | प्रभाग क्र.३१ नंदादीप हौ.सो.उद्यान विकसीत करणे - ३ लक्ष | | |
| | वेदांतनगर ते सेल्स टॅक्स ऑफिसपर्यंत २०० मी.मी.व्यासाची एसी जलवाहिनी टाकणे-७ लक्ष (यातून १.०० लक्ष वळती करणे) | | |
| | नवीन काम समाविष्ट करणे (इतर कामांचे बचतीमधून तरतूद उलपब्ध करणे.) | प्रताप नगर येथील दक्षिण उत्तर रस्त्याचे डांबरीकरण करणे-३ लक्ष | |
| ४५. | पृष्ठ क्र.१५४ अ.क्र.५८ प्रभाग क्र.४५ सी-३, सी-४, एन-११ सेक्टर, नवजीवन कॉलनी भागात जलवाहिनी टाकणे - ३ लक्ष (काम रद्द करणे) | नवीन काम<br>वॉर्ड क्र.४५ अंतर्गत विविध ठिकाणी उद्यान विकसीत करणे, ट्री गार्ड खरेदी तसेच वृक्षारोपण करणे व इतर कामे करणे-३ लक्ष | |

गणोशोत्सव निमित्त शहरातील नागरिकांच्या सुप्त कला गुणांना वाव मिळावा व शहराच्या स्वच्छता व सामाजिक जाणीव हया बाबत नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण व्हावी या दृष्टीकोनातून महानगरपालिकेतर्फे स्पर्धा/बक्षीस योजना घोषित करण्या बाबत प्राप्त प्रस्तावानुसार खालील प्रमाणे स्पर्धा बक्षीस योजना घोषित करण्यांस त्या अनुषंगाने येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येतो.

**बक्षीस योजना :-**

१. गणेशोत्सव मंडळाच्या परिसरातील स्वच्छता.

२. उत्कृष्ट सजावट व रोषणाई आकर्षक देखावा.
(जनजागृती, व्यसनमुक्ती, पर्यावरण विषयक, सजीव निर्जिव देखावा इत्यादी विषय)

३. उत्कृष्ट मुर्ती

वैधानिक कार्यवाही व्हावी.

- प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा कर्मचारी गणेशोत्सव मंडळास यावर्षी व यापुढे प्रतिवर्षी रक्कम रु.२५,०००/- (पंचवीस हजार रुपये) महानगरपालिका फंडातून निधी देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.
  वैधानिक कार्यवाही व्हावी.

- मौजे हर्सुल येथील सर्व्हे क्र.२१६ (भाग) मधील औरंगाबाद शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक ६ व ७ अनुक्रमे प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान साठी आरक्षित मनपा मालकीचे क्षेत्र प्रत्येकी एक एकर जमीन शैक्षणिक कार्यासाठी कै.सुशिलादेवी बहुउद्देशीय शैक्षणिक व सामाजिक सेवा भावी संस्था औरंगाबाद या संस्थेस शाळा चालविण्यासाठी महानगरपालिकेने ठरविलेल्या दराने तीस वर्षाच्या भाडे तत्वावर कराराने जागा प्रदान करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.
  वैधानिक कार्यवाही व्हावी.

- प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका टाऊन हॉल परिसरातील असोशिएशनच्या बॅडमिंटन हॉलला वुडन कोर्ट करुन देण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावाला स्थायी समिती सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. शहर अभियंता यांनी सदर कामाकरिता आवश्यक ती कार्यवाही करावी.
  वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :-**

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** मा.सभापती महोदय शहरात महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यांत यावा अशी फार पुर्वीपासूनची मागणी आहे. हा पुतळा उभारणेच्या संदर्भात प्रशासनाने काय कार्यवाही केली याची कृपया माहिती द्यावी. सुतगिरणी चौक, गारखेडा येथे महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारण्यांत यावा.

**अति.शहर अभियंता :** महाराणा प्रताप यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे करिता सन २००२-०३ च्या अर्थसंकल्पात रक्कम रुपये १० लक्ष तरतूद करण्यात आली होती. या कामासाठी अंदाजपत्रक देखील तयार केले होते. परंतू जागेच्या उपलब्धते अभावी पुतळा उभारणीचे काम स्थगित ठेवले.

**मा.सभापती :** महाराणा प्रताप यांचा पुतळा उभारणे संदर्भात दिनांक ५ ऑगस्ट, २००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर झालेला आहे. या कामाकरिता अर्थसंकल्पात तरतूद नसेल तर अतिरिक्त शहर अभियंता यांनी त्यांचे कडील तांत्रिक कारणांमुळे रद्द होणारी कामे तसेच काही कामांचे बचतीमधून या कामाकरिता रक्कम रुपये २०.०० लक्ष तरतूद उपलब्ध करण्यांत यावी. तसेच सदरचा पुतळा सुतगिरणी चौक, गारखेडा परिसरात उभारण्याची कार्यवाही करण्यांत यावी. या करिता शासनाची मान्यता घेणे. पोलिस खात्याचे नाहरकत प्रमाणपत्र घेणे. अंदाजपत्रक तयार करणे इत्यादी कार्यवाही अतिरिक्त शहर अभियंता यांनी तात्काळ हाती घ्यावी.

**विषय क्र.१०३-अ :**

**नगररचना विभागाचे सक्षमीकरण व कामाचे विभाजन संबंधी अहवाल**

औरंगाबाद महानगरपालिकेची स्थापना १९७ साली झाली. शहराची महानगरपालिका स्थापन होते वेळी मुळ, औरंगाबाद शहरा हद्दी लगत असलेल्या १८ खेड्यांचा समावेश महानगरपालिका हद्दीमध्ये करण्यांत येवून एकूण १३८ चौ.कि.मी.एवढी महानगरपालिका हद्द शासनाने आवश्यक अधिसूचनेद्वारे कायम केली. औरंगाबाद महानगरपालिकेची सदर १३८ चौ.कि.मी.हद्द असली तरी या हद्दीमध्ये नियोजन प्राधिकरण म्हणून एम.डी.सी.सिडको इत्यादी विविध स्वायत्त संस्था कार्यरत आहेत. तथापि, बहुतांश भागाकरिता महानगरपालिका, औरंगाबाद नियोजन प्राधिकरण आहे. औरंगाबाद महानगरपालिका शहरामध्ये नियोजन प्राधिकरण अंतर्गत सर्व कारवाई नगररचना विभागामार्फत करण्यांत येते.

नगररचना विभागामार्फत शहरामध्ये मुख्यत्वे करुन विकास योजना राबविणे, विकास योजना त्याच बरोबर गुंठेवारी विकसीत करणे, विकास परवानग्या देणे, इत्यादी कामे करण्यांत येत आहेत. कायद्या अंतर्गत असलेल्या तरतूदी नुसार त्यांची अंमल बजावणी अनाधिकृत बांधकामाबाबत प्रशासकीय अधिकारी विभागास मदत सिडको डीनोटीफाईड क्षेत्राची विकास योजना टी.डी.आर.बाबत महानगरपालिकेच्या इतर विभागास माहिती व मार्गदर्शन शासनाची पत्र व्यवहार, भूसंपादने इत्यादी असलेल्या प्रत्येक प्रकरणामध्ये निर्धारित कायद्यानुसार कालावधीची मर्यादा पाहता त्याठिकाणी असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असल्याचे प्राथमिक पाहणीमध्ये दिसून येते.

सदर विभागामध्ये सहाय्यक संचालक, नगररचना (शासन नियुक्त नगररचना विभागाचा अधिकारी-१, नगररचनाकार (उपअभियंता स्तर) -२, शाखा अभियंता-७, दुय्यम आवेक्षक-३, ट्रेसर-७, कनिष्ठ लिपिक-२, वरीष्ठ लिपिक-१, टायपिस्ट-१ इत्यादी कार्यरत आहेत.

महानगरपालिका सहाय्यक संचालक, नगररचना यांचे मार्फत विकास योजनेचीच कामे होणे अपेक्षित आहे. परंतू सध्या त्यांच्याकडे विकास परवानगीची कालमर्यादेची कामे असल्यामुळे त्यांना विकास योजना या विषयांवर काम करण्यास पुरेसा वेळ मिळत नाही. पर्यायाने शहराच्या विकास कामावर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे शहराच्या झपाट्याने झालेला विकास पाहता व विकास योजनेनुसार विकासाची सद्य:स्थिती पाहता या विभागाच्या कार्यपध्दतीमध्ये विद्यमान स्थीतीस अनुसरुन बदल करणे आवश्यक झाल्याचे दिसून येते. असे केल्याने कामाचा निपटारा अधिक अचूक व गतीमान होण्यास त्याची मदत होईल. त्या अनुषंगाने नगररचना विभागाचे सक्षमीकरण करणे बाबत मा.स्थायी समितीने यापुर्वीच मार्गदर्शन केलेले आहे.

त्यानुसार इतर महानगरपालिकांमध्ये ज्या कामकाज पध्दतीवर तेथील नगररचना विभागाची कामे सद्यःस्थितीमध्ये सुरु आहेत त्याच आधारावर महानगरपालिका, औरंगाबाद मध्ये देखील नगररचना विभागाची कामाबाबत रचना करणे योग्य राहील.

सहाय्यक संचालक, नगररचना यांचेकडे मुख्यत्वे करुन विकास योजना अंमलबजावणी भूसंपादन प्रकरणे, शासन पत्रव्यवहार, खाजगी वाटाघाटी, टी.अे.आर.प्रकरणे, सिडको (डिनोटीफाईड) क्षेत्राची विकास योजना, गुंठेवारी प्रकरणे, शहरामधील अनाधिकृत बांधकाम प्रकरणांवर कार्यवाही करणे, अकृषी प्रकरणांमध्ये नाहरकत प्रमाणपत्र देणे, विकास योजना सुधारित करणे, मनपाच्या मालमत्ता अधिकारी यांचेमार्फत संपादित केलेल्या जागेचे पी.आर.कार्ड तयार करणे, संपादित जागा मनपाच्या नांवे करणे, मनपातर्फे बांधण्यांत आलेल्या समाजमंदिर व्यायामशाळा इत्यादीची भाडे निश्चित करणे, विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आवश्यक सुधारणा करणे, नगररचना विभागाशी संबंधित उपसंचालक, ट्रॉफिक ॲण्ड ट्रान्सपोर्टेशन यांची मदत घेवून ट्रान्सपोर्टेशन प्लॅन तयार करणे व तो प्रभावीपणे राबविणे शासनाशी होणारा पत्रव्यवहार पाहणे इत्यादी व इतर मा.आयुक्त यांनी नेमून दिलेली कामे वर्ग करणे योग्य राहील.

तसेच शहर अभियंता अथवा कार्यकारी अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्यांकडे शहरामध्ये प्राप्त होणारी रेखांकन प्रकरणे, बांधकाम परवानगी भोगवटा प्रमाणपत्र, नाहरकत प्रमाणपत्र, नुतनीकरण प्रकरणे इत्यादी हस्तांतरीत करण्यास हरकत नसावी.

नगररचना विभागाचे अभिलेख स्वतंत्र ठेवण्या करिता यापुर्वीच आवश्यक प्रशासकीय कार्यवाही सुरु करण्यांत आली असून त्या करिता स्वतंत्र अभिलेख कक्ष, फर्निचर स्वतंत्र संगणक व्यवस्था, लिपीक दर्जाचे दप्तरी या स्वरुपाचे कर्मचारी उपलब्ध करुन देण्यांत येत आहेत. वरील प्रस्तावित केल्यानुसार सहाय्यक संचालक, नगररचना व शहर अभियंता अथवा कार्यकारी अभियंता दर्जाचे अधिकारी यांच्या कार्यकक्षा निर्धारित केल्यानंतर त्यांच्याकडे कामाचे स्वरुपानुसार इतर अधिकारी/कर्मचारी त्यांना देण्यांत येतील.

वरीलप्रमाणे नगररचना विभागाचे सक्षमीकरण करण्याच्यादृष्टीने कामाचे विभाजन व कार्यपध्दती विभागून दिल्यास प्रकरणांना गती येईल व नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर होण्यास मदत होईल. महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १५२ (१) तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६९ (१) व (२) अन्वये मा.आयुक्तांना असलेले अधिकार उपरोक्त वर दर्शविलेल्या अधिकाऱ्यांना प्रदान करण्यांस हरकत नसावी.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** सदर प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगररचना विभागाचे सक्षमीकरण व कामाचे विभागणी संदर्भात सादर केलेल्या अहवालास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>संवाद :-</u>**

**श्री.मधुकर सावंत :** प्रशासनाचे अभिनंदन, पुणे, नाशिक, महानगरपालिकेने, निर्णय घेतलेला आहे. स्थानिक अधिकारी असावेत आपल्याकडे बरीच प्रकरणे प्रलंबित

आहेत. कोणालाही पदभार देण्यांत यावा. नगर रचनामध्ये तज्ञ असलेल्यांना पदभार देण्यांत यावा.

**श्री.संजय शिरसाठ :** स्थायी समितीने आदेश दिले त्याप्रमाणे उपआयुक्त, स.सदस्य श्री.कोकाटे, श्री.किरमाणी यांची समिती पाहणी करायला गेली. या संदर्भाचा अहवाल अपेक्षित आहे. स्वतः अंतर्गत विकास करणे, रेखांकन प्रकरणात समितीचे असे निदर्शनास आले आहे की, त्यांना २००२ नंतरचा आकडा दिला. दोन रेखांकनाची पाहणी केली त्यात असे दिसून आले की, बांधकाम परवानगी न घेता काम चालू आहे. चार पूर्णत्वाच्या मार्गावर आहेत. बेटरमेंट चार्जेस घेत नाही. जागा आपल्याकडे आहे. जर उल्लंघन केले तर महानगरपालिकेचे नांव लावावे. २००२ ला तात्पुरते रेखांकन मंजूर केले. जागा ताब्यात घेतली नाही. दुसरे एका प्रकरणात पोच रस्ता नाही. परंतू अंतर्गत विकास करण्याची परवानगी दिली. उपआयुक्त अहवाल देतील. महानगरपालिका झाल्यानंतर विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्याची तसदी घेतली नाही. मात्र इतर महानगरपालिकेमध्ये हे झालेले आहे. नगररचना विभागाचे सक्षमीकरणा बाबत बारकाईने विचार व्हावा. मोठे भूखंड धारकांना त्रास होतो. समोरील अंतर ४.५ मीटर व मागे ३.०० मीटर नियमानुसार तशी बांधकाम परवानगी देवून कुंपन भिंतीची परवानगी द्यावी. चांगला प्रस्ताव आहे. तातडीने अंमलबजावणी करावी.

**मा.सभापती :** औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये बांधकाम परवानगी विकास नियंत्रण नियमावलीनुसार देण्यांत येते. ही विकास नियंत्रण नियमावली तयार होवून जवळपास २०-२२ वर्षापुर्वीची आहे. आताचे शहराचा विकास अधिक गतीमान होण्याचे दृष्टीने यापुर्वी ज्या प्रमाणे परवानगी देण्यांत येत होत्या. त्यानुसार मंजूर रेखांकनातील मोठ्या भूखंडाना १ पेक्षा अधिक इमारती असल्यास रस्त्याकडून ४.५० मीटर अंतर व इतर बाजूने इमारतीचे उंचीनुसार नियमाप्रमाणे सामासिक अंतर सोडण्याची परवानगी द्यावी. तसेच मोठ्या भूखंडावर परवानगी देते वेळी आतमधील प्रत्येक टेनामेंट करिता त्या टेनामेंटचे स्वतंत्र अस्तिवाकरिता (पोटविभागणी करीत नव्हे) अंतर्गत कंपाऊंड वॉलचे बांधकाम मंजूर करावे. त्यामुळे नागरिकांचा फायदा होणार आहे. तसेच भविष्यांत नागरिकांना त्यांचे स्वतंत्र अस्तित्वाबाबत हद्दी निश्चित करुन दिल्यास त्यानंतर कर आकारणी व इतर वसुली करण्यास महानगरपालिकेस सोयीचे होईल. प्रशासनाने त्वरीत कार्यवाही सुरु करुन वरीलप्रमाणे बांधकाम परवानगी देण्यांत यावी. मंजूर रेखांकन अथवा शेतजमीनीवर बांधकाम प्रस्तावाचे वेळी मोकळ्या जागेवरील कर आकरणी करतांना-

१. अंतीम मंजूर रेखांकनाच्या दिनांकांनतर तीस वर्षानंतर कर आकारणी लागू करण्यांत यावी.
२. सदर कर असतांना वेगवेगळ्या पध्दतीने मूल्यांकन न करता भूखंडावर सरसकट प्रती चौरस मीटर पध्दतीने तो प्रतिवर्षाकरिता आकारण्यांत यावा.
३. कराची आकारणीची पध्दत बाबी सारखी जसे की, बेटरमेंट चार्जेस एन.ए.सिटी डेव्हलपमेंट चार्जेस बांधकाम परवानगी फि इत्यादी प्रमाणे प्रति चौरस मीटर प्रमाणे असावी.

४. सदरील मोकळ्या जागेचा कर हा प्रतिवर्ष २१.०५/- प्रति चौरस मीटर या पध्दतीने भूखंडाच्या क्षेत्रफळावर आकारण्यांत यावा व त्याची कमाल मर्यादा रु.२५,०००/- पेक्षा जास्त नसावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
मा.सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २६.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

**गुरुवार दिनांक २६ ऑगस्ट, २००४ रोजी मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे सकाळी ११.३० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेला मा.आयुक्त व संबंधित अधिकारी तसेच खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
२. श्री. शेख इलियास किरयाणी
३. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
४. श्री. सावंत मधुकर दामोधर
५. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
६. श्री. रगडे भगवान दगडुबी
७. सौ. शाहीन जफर
८. श्री. माणिक साळवे

**मा.सभापती :** जे सभेला उपस्थित नाहीत त्याची नोंद घ्यावी. सभेकरिता आवश्यक कोरम नसल्यामुळे सभा एक तासासाठी तहकूब करण्यांत येते.

(वेळ ११.३२ वाजता सभेला पुन्हा सुरुवात १२.४५ वाजता.)

**मा.सभापती :** आजची सभा ही आचार संहितेच्या कालावधीत आपण होत आहेत. आचार संहितेचा भंग होणार नाही. याची सर्व सदस्यांनी नोंद घ्यायची असून एखाद्या विषयाच्या अनुषंगाने खबरदारीने चर्चा करावी. मतदारांवर प्रभाव पडेल. असा विषय उपस्थित करु नये. केल्यास ते आचारसंहितेचा भंग व त्याची जबाबदारी निश्चित होईल. पत्रकार बांधवाना सुध्दा विनंती की, वृत्तपत्रात देखील आचार संहितेचा भंग होईल. पत्रकार बांधवाना सुध्दा विनंती की वृत्तपत्रात देखील आचार संहितेचा भंग होईल. अशा बातम्या छापून आणण्यांत येवू नये. धोरणात्मक निर्णय एखाद्या एजन्सीला मान्यता देण्याचा विषय अंदाजपत्रक व तातडीने काम असेल तर मा.निवडणूक आयोगाच्या परवानगीने किंवा जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून मा.जिल्हाधिकारी आहेत. यांचेकडे विषयपत्रिका पाठवून त्यांच्या संमतीनेच असे विषय घेता येतील. सर्व सदस्यांना पुन्हा विनंती करण्यात येते की, आचार संहितेचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी, चर्चेला सुरुवात करावी.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** अधिकारी उपस्थित नाहीत. आपली परवानगी घेतलेली आहे का?

**मा.सभापती :** उपआयुक्त (म.) श्री.शिंदे यांना मनपाच्या सेवेतून कार्यमुक्त केलेले आहे. मा.आयुक्त तसेच उपआयुक्त (प्र.) हे मा.जिल्हाधिकारी यांचेकडून निवडणूकीचे कामानिमित्त गेलेले आहेत. मुख्य लेखाधिकारी आजारी

असल्यामुळे येवू शकले नाहीत. श्री.सोनी साहेब हे सुध्दा निवडणूकीच्या कामानिमित्त गेलेले आहेत. आता चर्चा करण्यांत यावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** चर्चा करुन काय फायदा होणार आहे. अंमलबजावणी होणार आहे का? आजच्या बऱ्याच वर्तमानपत्रात जागेचे घोटाळे झाले म्हणून बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. लिजवर देण्यांत आलेल्या बऱ्याच जागेचे भाडे भरलेले नाही. ४५ पेक्षा जास्त असे भूखंडाविषयी वृत्तापत्रास सविस्तर दिलेले आहे. ४०.४५ लोकांची नावे आहेत. यात शिशुविकास महिला मंडळ, बॉम्बे मर्कन्टाईल बँक, ज्योतीनगर डेव्हलपमेंट, अध्यक्ष दशमेशनगर करसन पटेल अशा बऱ्याच लोकांनी मनपाच्या जागा घेतल्या परंतू पैसे भरणा केलेली नाही. करार केलेला नाही. बऱ्याच संचिका गहाळ झालेल्या आहेत. हे वृत्तपत्र आपणाकडे सादर करतो. यात महानगरपालिकेचे जवळपास २०० ते ३०० कोटीचे नुकसान होणार आहे. वाटोळे होणार आहे. मनपाची बदनामी तर होईलच शिवाय मोठे नुकसान होणार आहे.

**मा.सभापती :** काही स्थानिक वृत्तपत्रामध्ये महानगरपालिकेच्या जागा नाममात्र भाडेतत्वावर दिलेल्या आहेत. शुल्क आकारुन देण्यांत येतात. त्या संदर्भात स.सदस्यांच्या भावना लक्षात घेता जागा दिल्यानंतर करारनामा झालेला नाही. तसेच ज्यांचा करारनामा झाला तर नुतनीकरण झालेले नाही. तसेच त्या अनुषंगाने भाडेमध्ये सुध्दा वाढ झाली नाही. सुरुवातीस जी जागा दिली ती त्याच व्यक्तीची झाली. त्याचेकडे लक्षच दिलेले नाही. ज्या शर्ती अटींचे पालन त्या मालकांनी करावयास पाहिजे. त्यांचे उल्लंघन झालेले आहे. त्या संदर्भात आपणाकडे माहिती असेलच.

**मालमत्ता अधिकारी :** मागील स्थायी समितीच्या बैठकीमध्ये लीजवर दिलेल्या जागेसंबंधी अहवाल मागविला होता. उपआयुक्त (म) यांना अहवाल सादर केलेला होता. तो आपल्याकडे त्यांनी सादर केलेला होता. प्राथमिक अहवाल मीच तयार केलेला आहे. जी बातमी वृत्तपत्रात आलेली आहे. जो १०.०८.२००४ रोजी प्रशासनाला अहवाल दिलेला आहे. त्यातील ते सर्व मुद्दे याबाबतीत आहे. मी चार्ज घेतल्या नंतर अहवाल तयार केलेला आहे. आता पाईप तपासणीचे काम चालू आहे.

**मालमत्ता अधिकारी :** संचिका तपासणे सुरु आहे. एकच कर्मचारी आहे. उदाहरण द्यावयाचे झाल्यास सर्वे नंबर ५४ मधील ५ लोकांना जागा दिलेली आहे. त्यांना नोटीस दिलेली आहे. त्यांनी जे अतिक्रमण केले आहे. ती जागा ताब्यात घेण्यास संबंधीचा कार्यक्रम उद्या हाती घेण्यांत येणार आहे.

**मा.सभापती :** काही ठिकाणी जागा भाडेने दिलेली नाही. काही ठिकाणी जागा कमी, वापर जास्त आहे. परस्पर जे आहे त्यानुसार वापर होत नाही. दिलेल्या जागेपेक्षा जास्त जागा ताब्यात घेतलेल्या आहेत.

**मालमत्ता अधिकारी :** अनुक्रमांक १ मध्ये शिशु विकास महिला मंडळ यांना भाडेने दिले आहे. भाडेवाढ करुन दिली आहे. ते कमी करुन द्यावे म्हणून त्यांची मागणी असून विचाराधीन आहे. आता मी संपूर्ण संचिका बरोबर आणलेल्या नाही. जी जी कार्यवाही केली त्याबाबतची संपूर्ण माहिती संचिकेमध्ये आहे. बॉम्बे मर्कन्टाईल्स बँकेचे पैसे मागील वर्षीच वसूल केलेले आहे. मार्च अखेर मी या सर्व संचिका तपासणी केलेल्या आहेत. पन्नालाल नगरच्या जागे बाबत नोटीस दिली. करारनामा झालेला नव्हता. एम.एस.ई.बी.ला २० लक्ष ची

नोटीस पाठविलेली आहे. संचिका आहे. २-४ कर्मचारी मिळाल्यावर हे काम लवकर पूर्ण होईल.

**मा.सभापती :** सध्या कर्मचारी मिळणार नाही. आचार संहितेमध्ये बदल्या वगैरे करता येत नाही. आहे त्याच कर्मचाऱ्यांकडून काम करावे लागेल. तशी मान्यता लगत असेल तर निवडणूक आयोगास पत्र व्यवहार करुन मान्यता घेऊन कर्मचारी देता येतील. मी ज्यावेळेस नगररचना विभागासंबंधी बैठक घेतली होती. त्यावेळेस भूसंपादित केलेल्या जमीनी किती हा मुद्दा निघालेला होता. संपूर्ण महानगरपालिकेच्या मालकीच्या भूसंपादित जमिनी त्याचे आजचे स्टेटस काय आहे? अतिक्रमण झालेले आहेत का? नगरपरिषदेच्या काळापासूनचे रेकॉर्ड मागविले आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** महिती काढण्याचे काम चालू आहे. सहा महिने लागतील.

**मा.सभापती :** काम सुरु होऊन १५ ते २० दिवस झाले असतील. काहीतरी माहिती काढण्याचे काम झालेले असेल दोन्ही उपअभियंता नगररचना यांचेकडे जबाबदारी सोपवून मर्यादित कालावधीत काम पूर्ण करता येऊ शकेल.

**श्री.भगवान रगडे :** सन २००० पासून ते सन २००४ पर्यंत किती जागा भूसंपादित केल्या कशासाठी केल्या?

**सहा.संचालक, नगररचना :** याची माहिती स.सदस्यांना लवकरच १० दिवसाच्या आत देण्यांत येईल.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** महापालिकेची हद्द किती हेक्टर चौ.मी. आहे. नियमानुसार किती जागा रिकामी पाहिजे?

**मा.सभापती :** मागच्या वेळेस हा प्रश्न उपस्थित झालेला होता. एकूण १३८.५ चौ.मी. क्षेत्र आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** ही बाब विकास योजना आराखड्याशी संबंधित आहे. महापालिकेचे एकूण १३८.५ चौ.कि.मी. क्षेत्र आहे. शासनाने विकास योजना मंजूर केलेली आहे. विकास योजनेसाठी अहवालही मंजूर केलेला आहे. अहवालामधील स्टेटमेंट करुन ही माहिती मिळू शकेल.

**श्री.साळवे माणिक :** भूखंडाचे विषय अनेक वर्षापासून चालत आलेले आहेत. परंतू आचार संहिता नुकतीच लागू झालेली असून आचार संहितेच्या नावाखाली पाणी, ड्रेनेज तसेच लाईट इत्यादी आवश्यक सोयी सुविधा देण्याचे बंद होऊ नये. हया आवश्यक सुविधा आहेत. ३-४-५ हजाराची जी जी कामे असतील ती थांबवू नये. यामुळे जनतेला त्रास होणार आहे.

**मा.सभापती :** निवडणूक आयोगाकडे विनंती करुन निविदा मंजूर करणे करारनामा करणे. वर्कऑर्डर देणे. याबाबतीत परवानगी घेऊनच कामे करता येईल. लहान लहान कामे करण्यांस तास होणार नाही. आचारसंहितेच्या काळात निवडणूक आयोगाची परवानगी घेऊनच कामे करता येतील.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** आचार संहितेच्या नियमावलीमध्ये सुध्दा देखभाल दुरुस्तीची कोणतेही कामे करण्यास बंधन नाही. अत्यावश्यक कामास आचार संहितेचा अडथळा, निर्माण होत नाही. केवळ दुरुस्ती, पाणी लिकेज खड्डे बुजविणे यामुळे आचार संहितेचा भंग होईल असे वाटत नाही. पाणी पुरवठ्याच्या बाबतीत निवडणूक आयोगाची परवानगी होऊन जायकवाडी येथील पाणी पुरवठ्याची ६ ते ७ कोटीची कामे करण्यासाठी मोठा कालावधी लागेल. पुन्हा आचार संहिता लागणार आहेच. पाण्याची टंचाई या शहरास भासणार

आहे. ६ कोटीस आपण मान्यता दिलेली आहे. याबाबतीत योग्य मार्गदर्शन निवडणूक आयोगाकडे घ्यावे लागेल. तसेच पाण्याचे मोठमोठे पंप असेल किंवा पाईपलाईन टाकण्याचे काम असेल त्याची संपूर्ण माहिती आपण निवडणूक आयोगाला कळविल्यास निवडणूक आयोगाकडून मार्गदर्शन येईल त्यानुसार स्थायी समितीची बैठक आयोजित करावी. तातडीच्या सर्व कामाबाबतची मंजूरी निवडणूक आयोगाकडून येईल. तसेच जे जे ३ ते ४ हजाराची लहान कामे आहे. त्या संदर्भात मागील बैठकीत आपण रुलींग दिलेली होती. आपण रुलींग दिली होती की, सार्वजनिक बांधकाम खात्यामध्ये जवळपास १ लक्ष पर्यंत रेटलिस्टची कामे केली जातात. नगरपालिकेच्या काळापासून ३०००/-रुपये होते. तेव्हापासून तसेच आहे. वेळावेळी बैठकीत निर्णय घेतलेली आहे. ती रक्कम मर्यादा वाढवून घेऊन असे केले तर आचार संहितेच्या कार्यकाळात बरीच कामे करता येतील. आचार संहितेच्या नियमावलीत बसून विकास कामे व्हावी अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** माझ्या कार्यकाळातील जे जे निर्णय झाले त्याची अंमलबजावणी झालेली आहे. काही कामे राहिलेली असतील तांत्रिक अडचणीमुळे काही कामे झालेली नसतील. त्याबाबतीत मार्ग काढून तीही मार्गी लावता येतील. आताच मुद्दा उपस्थित केला की, जी तातडीची कामे असेल ड्रेनेज असेल, विद्युत असेल उपआयुक्तांनी जे आदेश काढलेले आहे त्यात असे म्हटलेले आहे की, आचार संहितेच्या काळात कोणत्याही जाहिर नवीन निविदा काढता येणार नाही. ज्यांचे कार्यादेश दिलेले आहे ती कामे चालू ठेवता येतील. भुमीपूजन कोनशिला बसविणे इ.कार्यक्रम घेण्यांत येवू नये. पाणी पुरवठा, ड्रेनेज व स्वच्छताची कामे करता येतील. विद्युत पथदिवे तसेच आरोग्य विभागाची कामे करण्या संदर्भात प्रशासनाकडून योग्य ती कार्यवाही होईलच. जायकवाडी सिस्टीमाबाबत ७ कोटीचा प्रस्ताव होता. सर्वसाधारण सभेने मंजूरी दिलेली आहे. निविदा निघालेल्या आहेत. कार्यादेश देण्यासाठी कामासाठी निवडणूक आयोगास परवानगी द्यावी म्हणून विनंती करता येईल. पाणी पुरवठ्याची वेगळी टिप्पणी स्वतंत्र पाठविण्यांत येईल. पाणी पुरवठ्याची कामे जास्त आहेत. आता नाथसागरात पाणी आहे. संपूर्ण कार्यवाही झाल्यास २० एम.एल.डी.पाणी वाहू शकते. दररोज पाणी देणे शक्य होईल का? पुर्वी असा प्रश्न होता पाणी नव्हते म्हणून दररोज पाणी देता येणार नाही. अशी स्थिती होती. दररोज पाणी देणे शक्य होईल का पुर्वी पाणी नव्हते म्हणून दररोज पाणी देता येणार नाही अशी स्थिती होती.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** सिडको भागात दररोज पाणी देण्यांत यावे.

**श्री.भगवान रगडे :** मागील बैठकीत मी सुध्दा उपस्थित केलेला होता. झोपडपट्टी भागात कमी वेळ का होईना परंतू दररोज पाणी पुरवठा करण्यांत यावा. प्रायोगिक तत्वावर आपण एका भागात सुरु करणार होतो. कमी वेळ पाणी द्यावे परंतू दररोज पाणी द्यावे.

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** एका भागासाठी तसे करता येणार नाही.

**मा.सभापती :** यापुर्वी जे आदेश झालेले आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** सेल ॲड. बाबत काय कार्यवाही झालेली आहे?

**मालमत्ता अधिकारी :** सेल ॲण्ड विषयी लेखा विभागाने जे रिमार्कस दिले होते. त्याप्रमाणे संपूर्ण कॅलक्युलेशन करुन आहोत. टेंडरमध्ये त्या कंपनी मालकास १६ ग्रुप्स

दिले होते. आणखी दोन असे व ग्रुप्स होते. त्या सर्वांचे कॅलक्युलेशन करुन उद्यापर्यंत प्रशासनाकडे पाठविणार आहेत.

**शिक्षणाधिकारी :** मी. बी.के.बोरुडे औरंगाबाद महानगरपालिकेत दिनांक १८.०८.२००४ रोजी शिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्विकारलेला आहे.

**मा.सभापती :** चांगले काम करावे. मनपाच्या शाळांचा दुरावस्था झालेली आहे. श्री.जावरे यांनी त्यांचे कार्यकाळात चांगले प्रयत्न केलेले आहेत.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** झोन क्र.४ मधील दुरध्वनी बंद आहे. माहिती द्यायची झाल्यास कुणाकडे द्यावी.

**मा.सभापती :** झोनमधील किंवा महानगरपालिकेचे इतर ठिकाणचे जे जे दुरध्वनी बंद असतील तसेच कोटला कॉलनी पाण्याची टाकी येथील दुरध्वनी सुध्दा बंद असल्यास त्वरीत सुरु करण्यां बाबत योग्य ती कार्यवाही होईल.

यानंतर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | मा.सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २७.१०.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१९) इतिवृत्त. बुधवार दिनांक २७ ऑक्टोंबर, २००४ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.०० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालीलप्रमाणे स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री. ताठे भाऊसाहेब पुंडलिक
२. श्री. शेख इलियास किरमाणी
३. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
४. श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
५. सौ. शहीन जफर महेमूद जफर
६. सौ. रशिद बेगम गफ्फार यार खान
७. श्री. माणिक लक्ष्मण साळवे
८. श्री. मधुकर सावंत
९. श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१०. श्री. मेघावाले मोहन धन्नुलाल
११. श्री. पारे सोपान भाऊराव
१२. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
१३. श्री. रगडे भगवान दगडूजी
१४. श्री. स.सलीम स.युसूफ

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** अगोदर चर्चा घेण्यांत येईल. स.सदस्यांनी चर्चेत भाग घ्यावा.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** तीन चार महिन्यापासून उपआयुक्त (महसूल) या पदावर अधिकारी नाही. प्रशासनाने खुलासा करावा.

**मा.सभापती :** महानगरपालिकेच्या उपआयुक्त (महसूल) पदी श्री.अण्णासाहेब शिंदे यांचे जागेवर श्री.मनोहर हिरे यांची शासनाने नियुक्ती केलेली होती. प्रकरण न्यायप्रविष्ट झालेले आहे. परंतू शासनाने आदेश झाल्यानंतर श्री.अण्णासाहेब शिंदे यांना मनपाच्या सेवेतून कार्यमुक्त केलेले आहे. त्यांची जेथे बदली करण्यांत आली तेथे पाठविण्यांत आले. त्यानंतर शासनाकडे उपआयुक्त पदावर त्या संवर्गातील येणारे अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्या संदर्भात प्रशासनाने पाठपुरावा करावा म्हणून मी सुध्दा पत्र दिलेले आहे. उपआयुक्त (प्रशासन) यांनी याबाबत खुलासा करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** शासनाच्या आदेशानुसार उपआयुक्त (म.) या पदावर श्री.मनोहर हिरे यांची नियुक्ती केलेली होती. सर्वसाधारण सभेने एकमताने ठराव होऊन शासन नियुक्त नगर परिषद मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांस होवू नये म्हणून ठराव घेतलेला असून पुढील कार्यवाही साठी शासनाकडे पाठविण्यांत आलेला आहे. श्री.शिंदे यांची बदली झाल्यानंतर उपआयुक्त (महसुल) पदाचा अतिरिक्त कार्यभार उपआयुक्त (प्रशासन) स्वत: माझ्याकडे दिलेला आहे.

श्री.मनोहर हिरे यांनी न्यायालयात संचिका दाखल केलेली आहे व विनंती केली की मला याच महानगरपालिकेत रुजू करुन घेण्याबाबत शासनास आदेशित करावे. महानगरपालिकेने सुध्दा प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. गेल्या २६ तारखेला याबाबत सुनावणी झालेली आहे. आता प्रकरणाची पुढील सुनावणी तीन तारखेला होणार आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** श्री.मनोहर हिरे यांचे नांव घेण्यांची आवश्यकता नाही. मनपाच्या उपआयुक्त (प्र.), उपआयुक्त (म) पदाचा पदभार आहे. ते का भरण्यांत आले नाही व मुळ प्रश्न माझा आहे. न्यायालयाचे निर्णय झाल्यानंतर कार्यवाही होईल. मा.आयुक्तांनी स्पष्टीकरण करावे.

**उपआयुक्त (प्र.) :** मा.उच्च न्यायालयात या संबंधी प्रकरण चालू आहे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** दुसरे अधिकारी येईपर्यंत श्री.शिंदे यांना कार्यमुक्त करावयास नको होते.

**मा.सभापती :** शासनाचे आदेशच तसे हो ते की, श्री.शिंदे यांना कार्यमुक्त करावे लागले. आर.डी.सी.म्हणून त्यांची पोस्टींग झालेली आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** श्री.मनोहर हिरे व न्यायालयाचे प्रकरणाचा येथे संबंध येत नाही. प्रश्न उपआयुक्त (महसुल) पद रिक्त आहे. त्याबाबत कार्यवाही का केलेली नाही?

**मा.सभापती :** श्री.शिंदे यांचे संदर्भात स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने निर्णय घेतलेला आहे. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी निवडणूक कामात त्यांची बदली झालेली आहे. असे कळविले आहे. उपआयुक्त (म) पदाचा पदभार इतर कोणाकडे देता येईल का ते पाहिले पाहिजे असे स.सदस्यांचे मत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** या बाबत मा.आयुक्तांनी निर्णय घेतला पाहिजे. मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.आयुक्त :** आपणा सर्वांना माहिती आहे की, प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. तो पर्यंत दुसरे अधिकारी नेमता येत नाही. घेऊ नये असे आदेश नाहीत. तिसरा नेमला तर कायदेशीर अडचण होईल. प्रकरणात न्यायालयाने आदेश केलेला नाही. महापालिकेने व शासनाने म्हणजे नगरविकास विभागाने न्यायालयात आपापली बाजू मांडलेली आहे. प्रत्येक वेळेस चार दिवसाला दहा दिवसाला निर्णय होईल अशा प्रकारची सुनावणी चालू आहे. गेल्या २६ तारखेला सुनावणी झाली निर्णय अपेक्षित होता. परंतू झालेला नाही. आता तीन तारखेला सुनावणी आहे. तारखा देता देत ६०-७० दिवस होऊन गेलेले आहे. प्रशासनानेच अशी विनंती केलेली आहे की, एक प्रकरणाचा निर्णय घ्यावा नसता शासनाने दुसरा अधिकारी नेमण्याची परवानगी द्यावी.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** न्यायालयात प्रकरण चालूच राहील. तोपर्यंत हे पद रिक्तच ठेवणार आहेत का? तात्काळ निर्णय घेण्यांत यावा. शासनास कळवावे की तात्काळ प्रतिनियुक्तीवर अधिकारी द्यावे.

**मा.सभापती :** ठीक आहे. स.सदस्यांचे भावनेचा संदर्भ घेऊन शासनाला सर्वसाधारण सभेचा आलेला ठराव कळवावा की त्यानुसार आम्ही भरत नाही. शासनाकडून मार्गदर्शन होत नाही. प्रशासनाने न्यायालयास निर्णय देण्याबाबत विनंती करावी.

**मा.आयुक्त :** सध्या उपआयुक्त (प्रशासन) यांचेकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. त्यांचेकडून काढून दुसऱ्या अधिकाऱ्यांकडे देता येईल का हे बघावे लागेल.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** दुसरे अधिकारी येण्यास इच्छुक नसतील तर पुन्हा श्री.शिंदे यांनाच नियुक्त करुन घ्यावे.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** अनेक वेळा स्थायी समितीच्या सभा आपल्या अध्यक्षतेखाली झाल्या. जे जे निर्णय सभागृहात घेतले ते इतिवृत्तात आलेले आहे. परंतू त्यापैकी किती प्रकरणात अंमलबजावणी केलेली आहे. खुलासा करावा. घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी होत नाही. माझ्या वॉर्डातील दहा-पंधरा विषयांवर निर्णय घेतले कार्यवाही केलेले नाही. नेहरु नगर येथील ओपन स्पेस संदर्भात न्यायप्रविष्ट प्रकरण आले. त्याबाबत काय निर्णय घेतलेला आहे. शादीया विहार येथे डांबरीकरण करण्यांत आले नाही. ती वसाहत होऊन १५ वर्ष झाले तेव्हापासून तेथे लोक राहतात. किती दिवसात हस्तांतर करुन घ्यावयास पाहिजे.

**सहाय्यक संचालक, नगररचना :** मेहेरनगर येथील खुल्या जागेच्या अतिक्रमणा संदर्भात तेथील लोकांवर पोलिसात गुन्हे दाखल करावे म्हणून मा.उच्च न्यायालयाने आदेश दिलेले आहे. मुकूंदवाडी पोलिस स्टेशन येथे अर्जदाराने गुन्हे दाखल केले आहे. किती लोकांवर पोलिस गुन्हे दाखल केले आहे. किती लोकांवर पोलिस गुन्हे दाखल केले याबाबत प्रश्न आलेला होता म्हणून पोलिस स्टेशनला पत्र देवून माहिती मागविली आहे. पोलिसात गुन्हे दाखल करण्याचे आदेश मनपास दिलेले नव्हते. चार महिन्यापुर्वी आदेश झालेले आहे.

**मा.आयुक्त :** २९ जुलै, २००४ च्या बैठकीत मेहेरनगरच्या संदर्भातील ॲक्शन पॉईन्ट माझ्याकडे आहे. मेहेर नगर येथील काही लोक न्यायालयात गेले व आजची स्थिती काय असा प्रश्न होता. न्यायनगर गारखेडा येथील सर्व्हे नं.४२ (१) २६ जुलै, १९७८ चा तो ले-आऊट मंजूर आहे. आणि शेख उस्मान अ.रहेमान शे.हमीद शे.भिकन यांचे नांवे ते रेखांकन मंजूर होते. भगवान लक्ष्मण पवार नांवाचे एक गृहस्थ महानगरपालिकेच्या विरुध्द न्यायालयात गेले. या संदर्भात दोन्ही कोर्टाच्या दाव्यासंबंधी दिवाणी दावा क्र.७०/९३ विधी सल्लागार यांनी सविस्तर टिप्पणी सादर केलेली आहे. त्याबाबत ते खुलासा करतील.

**विधी सल्लागार :** मेहेरनगरच्या जागेच्या संदर्भात वाद चालू होता. श्री.पवार नांवाचे व्यक्तीने न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. न्यायालयाने या जागेसंबंधी जरी ओनरशिप डिसाईड केलेली नाही. परंतू मनपास मुथा दिली आहे. संरक्षित भिंतीचे काम करता येईल. अशी माहिती शहर अभियंता यांना कळविली. याबाबतीत काही वाद निर्माण झाल्यास कॅव्हेट दाखल करुन ठेवलेले आहे. प्रतिबंध कसे करता येईल. याबाबत कार्यवाही होईल. संरक्षित भिंतीचे कामकाज झालेले आहे. काही अडचण आल्यास विधी विभागाशी संपर्क करण्यांत यावा.

**मा.सभापती :** ८ कॅव्हेट घेतलेले आहे. संरक्षित भिंतीचे काम झालेले आहे. त्या जागेत उद्यान वगैरे विकास करण्याबाबत काय कार्यवाही केली.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** प्रेरणानगर येथील खुल्या जागेवर एका व्यक्तीने स्वत:च्या भावाचे पी.आर.कार्ड तयार केले होते. याबाबत अनेक वेळा मुद्दा उपस्थित केला. कार्यवाही काही झालेली नाही. लोक सर्रासपणे मनपाच्या मोकळ्या जागा हडप करीत आहेत.

**सहा.संचालक, नगररचना :** च्या जागेवर मनपाचे नांव लावण्याची कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत होईल.

**मालमत्ता अधिकारी :** या जागेच्या संदर्भात संपूर्ण कागदपत्र नगररचना विभागाकडून मालमत्ता विभागास प्राप्त झालेले नाही. पूर्ण चौकशी मी केलेली आहे.

**मा.सभापती :** दोन्ही अधिकाऱ्यांनी संयुक्त कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त :** मा.सभापतीच्या परवानगीने खुलासा करतो. या जागेचा सन १९९३ ला ले-आऊट मंजूर झाला. तेव्हापासून मनपाचे नांव लावण्याबाबत कार्यवाही चालू आहे. ले-आऊट मंजूर होऊन सुध्दा ११ वर्ष झाली. मालमत्ता अधिकारी यांनी व सहाय्यक संचालक, नगररचना या दोन्ही विभागाचे अधिकाऱ्यांनी समन्वय साधून सिटी सर्व्हे कार्यालयात जाऊन तेथे अपील केलेले असेल तर ते बोर्डावर घेणे. या जागेस मनपाचे नांव लावण्याचा सूचना दिलेल्या आहेत. यात मालमत्ता अधिकाऱ्यांचे चांगल्या प्रकारे प्रयत्न आहे. ले-आऊट जुना आहे. संपूर्ण कागदपत्र न मिळाल्यामुळे उशीर झालेला आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** स्व.कोमल कांबळे नांवाच्या लहान बालिकेचा पावसाळ्याच्या दिवसांत भिंत कोसळून नैसर्गिक आपत्तीतून मृत्यू झाला. मनपाने २० हजार आर्थिक मदत देण्याचे ठरविले. परंतू मध्यंतरी आचारसंहिता असल्यामुळे ती रक्कम देता आली नाही. आता सभागृहाच्या बाहेर दिवंगत मुलीचे आई-वडील आलेले आहेत. सभा थोड्या वेळासाठी तहकूब करुन त्यांना सभागृहात येण्याची परवानगी देवून मा.सभापती यांचे हस्ते २० हजारांच्या धनादेश प्रदान करावा अशी विनंती आहे.

**मा.सभापती :** ठीक आहे. सभा पाच मिनीटांसाठी तहकूब करण्यांत येते.

(तहकूबीची वेळा १२.२५ वाजता १२.३० वाजता पुन्हा सभेला सुरुवात)

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** शहरात मनपाच्या मालकीच्या किती खुल्या जागा आहेत. त्यापैकी किती जागा मनपाच्या नांवे असून किती नाहीत व किती जागेवर रेकॉर्ड असूनही त्या जागेवर अतिक्रमणे झालेली आहेत. अशा किती जागा आहेत.

**मा.सभापती :** या बाबतची माहिती यापुर्वीच्याच बैठकीत विचारणा केलेली होती.

**मालमत्ता अधिकारी :** याबाबत माहिती घेण्याचे काम चालू आहे. १५ दिवसाचा कालावधी द्यावा. सविस्तर माहिती बुकलेट तयार करुन सादर करण्यांत येईल.

**श्री.भगवान रगडे :** वसंत भुवनची इमारत मनपाच्या नावावर झालेली आहे का?

**मालमत्ता अधिकारी :** महानगरपालिकेचे नांव लागलेले आहे.

**मा.सभापती :** शहरातील संपूर्ण खुल्या जागेच्या संदर्भात सविस्तर अशी माहितीचे बुकलेट तयार करुन १५ दिवसात देण्यांची कार्यवाही व्हावी. वसंत भुवन इमारतीला मनपाचे नांव रेकॉर्डला आलेले आहे. तसेच नगररचना विभागातील काही संचिका गहाळ आहेत. दोन महिन्याचा कालावधी मागितलेला होता. माहिती तयार आहे का? तसेच नगररचना विभागाचे संगणकीकरण करण्यासाठी व कामाचे विभाजन करण्याबाबत आदेश दिलेले होते. त्याबाबत कार्यवाही झाली दिसून येत नाही.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** झोन क्र.४ ची व्याप्ती मोठी आहे. विभाजन होणे आवश्यक आहे. वारंवार सूचना करुनही कार्यवाही होत नाही हे स्पष्ट होते.

**सहा.संचालक, नगररचना :** अभिलेख कक्षात सर्व संचिका तपासणी करण्याचे काम चालू आहे. कर्मचारी नियुक्त केलेले आहे. माहिती काढण्याचे काम पूर्ण झालेले नाही.

**मा.सभापती :** संपूर्ण माहिती घेऊन सादर करण्या संदर्भात दि.२९.०७.२००४ च्या बैठकीत आदेशित केलेले होते. विभागाचे सक्षमीकरण करण्याचे आदेश दिले होते. दोन महिन्याचा कालावधी गेला.

**सहा.संचालक, नगररचना :** मोठ्या स्वरुपाचे काम असून कर्मचाऱ्यांना निवडणूकीचे काम देण्यांत आले होते. त्यामुळे पूर्ण होवू शकले नाही. किती वेळ लागेल सांगता येता नाही.

**श्री.संजय शिरसाठ :** प्रत्येक वेळेस नगररचना विभागावर चर्चा होते. मागील बैठकीत वसंत भुवन मनपाच्या नावे नाही म्हणून उत्तर दिले. नांवावर झाले. पी.आर.कार्ड दाखवा असे मा.आयुक्त म्हणतात काही जुन्या संचिकाच उपलब्ध होत नाही. म्हणून उत्तर दिले होते. या संदर्भात नगररचना व अतिक्रमण या विभागाच्या अधिकाऱ्या समवेत बैठक घेवून निकाली लावण्याचा निर्णय घेतला होता. आता पुन्हा उत्तर मिळते तपासणी करण्याचे काम चालू आहे. काही संचिका गहाळ आहेत. म्हणून सहा.संचालक यांनी यापुर्वीच्या एका बैठकीत स्पष्ट उत्तर दिले होते. अनेक संचिका सापडत नाहीत. कोणत्या संचिका सापडल्या नाहीत. साजेद प्रकरणातील सहा संचिका गहाळ असून सापडली का खुलासा करावा. जर सापडत नसेल तर अशा किती संचिका तपासणीमध्ये एक तरी संचिका असतील की त्या गहाळ झालेल्या आहेत. ए.डी.टी.पी.काम करण्यास सक्षम असले तरी त्यांचेकडे कामाचा व्याप वाढलेला आहेत. एखाद्या प्रकरणाच्या बाबतीत सकाळी न्यायालयात गेले तर सायंकाळी ५.०० वाजता येतात. अशी स्थिती आहे. नागरिकांचे अनेक प्रश्न प्रलंबित राहतात. या विभागाचे विभाजन करुन काही काम सक्षम अधिकाऱ्यांकडे देण्यांत यावे. साजेद प्रकरणाच्या ६ संचिकापैकी किती संचिका तपासणी मोहिमे मध्ये आढळून आलेल्या आहेत.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आताच मा.सभापती यांनी सभा तहकूब करुन नैसर्गिक आपत्तीतून स्व.कोमल कांबळे हिचा मृत्यू झाल्याबद्दल तिच्या कुटूंबियांना आर्थिक मदत म्हणून धनादेश दिला त्याबद्दल मा.सभापती व प्रशासनाचे अभिनंदन करते. दोन महिन्यांच्या कालखंडानंतर आज ही बैठक होत आहे. सभागृहात वारंवार स.सभासद प्रश्न विचारतात. सविस्तर चर्चा होते. त्यावर मा.सभापतीचे आदेश होतात परंतू त्या आदेशाचे पालन होते किंवा नाही. प्रत्येक बैठकीत प्रश्न उपस्थित केला तर अधिकाऱ्यांना अचूक उत्तर देता येत नाही. एकमेकांना माहिती देवून उत्तरे दिली जातात. अधिकाऱ्यांनी शिस्तबध्द अशा पध्दतीने काम केले पाहिजे. मागील बैठकीत काय विचारणा झालेली होती. त्याचे नियोजन करुनच उत्तरासह सभागृहात हजर राहणे आवश्यक आहे. सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर अधिकार धावपळ करतात ती होणार नाही याची काळजी घ्यावी. अतिशय वाईट वाटते. सहा महिन्यापुर्वी प्रश्न विचारला तरी त्यावर उत्तर मिळत नाही. तेच तेच प्रश्न पुन्हा विचारण्याची वेळ येते व आपण आदेश करतात. इतिवृत्तात नोंद होते. तरी त्या प्रश्नाचे उत्तर इतिवृत्त कायम करतांना मिळत नाही. ही अतिशय वाईट बाब आहे. प्रशासनाने यासाठी उद्याची बैठकीची उत्तरे होण्याची तयारी म्हणून

मा.आयुक्त यांनी अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. सूचना दिल्या पाहिजे गहाळ झालेल्या संचिका का सापडत नाही. स.सदस्य श्री.शिरसाठ हे सहा महिन्या पासून साजेद प्रकरणाच्या संचिकेच्या बाबतीत विचारणा करीत आहेत. उत्तर का मिळत नाही.उत्तरे मिळत नसतील तर चिंतन बैठक घ्यावी. हे सभागृह बरखास्त करावे. नागरिकांच्या वतीने स.सभासद पोट तिडकीने प्रश्न मांडतात. दहा हजार जनतेचे नेतृत्व आम्ही करतो. आमच्या प्रश्नाचा खुलासा मिळत नाही. अधिकारी उत्तर देवू शकत नसतील तर मा.अधिकाऱ्यांची कार्यशाळा घेतली पाहिजे. त्यांना योग्य त्या सूचना केल्या पाहिजे. संचिका गहाळ होतात. बऱ्याचशा मालमत्ता मनपाच्या नावाने नाही. असे किती दिवस ही थांबवून ठेवणार आहे. कार्यवाही करणार नाही का? गांभीर्य लक्षात घ्यावे. अधिकारी जी उडवाउडवीची व तारंबळीने उत्तरे देतात यात सभागृहाचा अवमान आहे. चिंतन बैठक झाली पाहिजे. सभागृहात उत्तरे देतात यात सभागृहाच्या अवमान आहे. चिंतन बैठक झाली पाहिजे. सभागृहात उत्तरे व्यवस्थित मिळाली पाहिजे. मनपाच्या नावावर का होत नाही. शिक्षण विभागाचा गोंधळ होतो. यास कोठेतरी आळा बसावा अशी माझी मागणी आहे. मा.आयुक्तांनी एक वर्षात अधिकारी, कर्मचाऱ्यांना सक्षम करु शकले नाही. अधिकाऱ्यांवर प्रभाव पडला नाही. सहा महिन्यापुर्वीच मनपाच्या २१ शाळांची प्रगती शुन्यावर आहे म्हणून दिले होते. त्या शाळांची काय प्रगती झालेली आहे. शिक्षणाधिकारी यांनी वृत्तपत्रात दिले ते वाचून अतिशय वाईट वाटते. अधिकाऱ्यांची मनमानी चालत असेल तर सभा होवून कशासाठी वाईटपणा घ्यायचा असा प्रश्न येतो. अधिकारी त्यांचे कर्तव्य करतात का? यात स.सदस्यांची बदनामी होते ही अतिशय वाईट पध्दत आहे. सदस्यांच्या तसेच त्याच बरोबर नागरिकांच्या भावना सुध्दा दुखावल्या जातात. नागरिकांच्या वतीने येथे प्रश्न मांडले जातात. आमचे वैयक्तिक प्रश्न कुणाचेच नसतात. परत एकदा विनंती करते आपल्या आदेशाचे पालन होत नसेल तर या सभेला अर्थ नाही आपण मनपा बरखास्त करु शकता परंतू त्या आधी अधिकाऱ्यांना कोठेतरी चोप देण्याचे काम मा.आयुक्तांनी करणे आवश्यक आहे. आपण आदेश देतो. आम्ही चर्चा करायची याला अर्थ नाही. याबाबत प्रशासनाने कुठेतरी काहीतरी ठोस निर्णय घेतला पाहिजे. अधिकाऱ्यांना उत्तरे देण्यासाठी आदेशित केल्यानंतर उत्तर देता येत नाही. मा.आयुक्तांना उभे रहावे लागते. अतिशय वाईट असून जनतेपर्यंत हा संदेश जातो. मा.आयुक्तांच्या अधिकाराची आम्हाला कल्पना आहे. आदर करतो. आता यापुढील बैठकीत कोणत्याही अधिकाऱ्यांला प्रश्न विचारल्यानंतर इतरांना न विचारता उत्तर देता यावे. यात वेळ जाऊ नये. अन्यथा आम्ही सभात्याग करुन जाऊ कोणत्याही अधिकाऱ्यांना उत्तर विचारल्यानंतर चोखपणे उत्तर देता यावे ही अपेक्षा असते. सहा संचिका साजेद प्रकरणाच्या गहाळ आहेत. तसेच किती मालमत्ता मनपाच्या नावाने आहे. त्याचेही उत्तर मिळालेले नाही.

**मा.सभापती :** स.सदस्यांचे एकच म्हणणे आहे की, टोलवाटोलवीची उत्तरे दिली जातात. सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर इतर अधिकाऱ्यांना विचारणा करुन उत्तर दिले जाते. इतिवृत्त सर्वांकडे असते. अगोदरच्या बैठकीत काय आदेश केलेले होते. त्याचे उत्तर स.सभासदांना अपेक्षित असते. ते मिळत नाही.

पुढील बैठकीत असे म्हटले जाते ही दुर्देवाची बाब आहे. इतर अधिकाऱ्यांकडून माहिती देवून अधिकारी उत्तर देत असेल व त्यात स.सभासदांचे समाधान होत नसेल व मा.आयुक्तांनाच वारंवार उत्तर देण्यांस भाग पाडत असेल तर दुर्देवाची बाब आहे. जे ॲक्शन पॉईन्ट असतात. त्याची कार्यवाही होत नसेल तर योग्य नाही. सभागृहाच्या वतीने मी आदेश देतो. आदेशाचे पालन होत नाही. पायमल्ली होत असेल तर योग्य नाही. त्याबाबत अनुभव स.सदस्यांच्या समोर आला म्हणून पोटतिडकीने स.सभासद येथे बोलतात. सहा संचिका मिळत नसतील तर तसा रिपोर्ट (टिप्पणी) मा.आयुक्तांकडे देण्यांत यावा. त्यांचा खुलासा होतील व ज्या अधिकाऱ्यांच्या काळात संचिका गहाळ झाल्या. असतील त्यांचेवर मा.आयुक्त कार्यवाही करतील.

**सहा.संचालक, नगररचना :** मा.सभागृहाचे सूचनांचे पालन केले जाईल. संचिका बाबत रेकॉर्ड विभागाकडून माहिती घ्यावी लागेल.

**मा.सभापती :** शिक्षण विभागाचा दर्जा उंचावल्या संदर्भात एक-एक तास चर्चा झाली आहे. सर्व शाळांचा सर्व्हे केला. आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविले. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी अधिकाऱ्यांनी काय प्रयत्न केले खुलासा द्यावा. नगर रचना विभागाच्या ८३० संचिकांचा आकडा दिला होता. त्याची माहिती समोर आलेली नाही. साजेद प्रकरणाच्या ६ संचिका बाबत प्रश्न केलेला आहे. त्याचे उत्तर नाही.

**मा.आयुक्त :** यात काही मुद्दे आहेत. संचिके बाबत खुलासा करण्यांत येतो. यापुर्वीही एकदा प्रशासनामार्फत खुलासा करण्यांत आलेला होता. संबंधित लिपिकास तात्काळ निलंबित केलेले होते. ज्या संचिका गहाळ आहेत. त्या संबंधी उपआयुक्त (प्र.) मार्फत अँटी करप्शन ब्युरो विभागास सुध्दा गोपनीय माहिती देण्यांत आलेली आहे. या व्यतिरिक्त संचिकेची माहितीची विचारणा होत असेल तर ती माहिती अधिकाऱ्यांना द्यावी लागणार आहे. ज्या संचिके बाबत दोन तीन महिन्यापुर्वीच्या व त्यानंतरच्या स्थायी समितीत बरीच चर्चा होऊन ए.डी.डी.पी.कडून उत्तर बरोबर दिले नाही. संपूर्ण सभागृह नाराज झाले. या संदर्भात अँटीकरप्शन विभागीय तशी माहिती कळविलेली होती. संबंधित अधिकारी संदर्भात ॲटीकरप्शन विभागीय तशी माहिती कळविलेली होती. संबंधित अधिकारी स्वतःजे काय करतात किंवा काय करीत नाही. यासंबंधी या सभागृहाला माहिती देणे आवश्यक आहे. नगररचना विभागाची सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने दोन कामे महत्वाची आहेत. ले-आऊट किंवा बांधकाम परवानगी १ एप्रिल, २००४ पासून आतापर्यंत त्या विभागातील संपूर्ण कामाचा आढावा आचार संहितेत घेतला. प्रशासनाच्या वतीने नवीन काही सूचना संबंधित अधिकाऱ्यांना प्रशासनाचा प्रमुख म्हणून केलेली आहे. व तशी माहिती सभागृहाला असावी म्हणून उच्चार केलेला आहे.

या मनपात अशी प्रथा आहे. बांधकाम परवानगी प्रकरण दाखल झाल्यानंतर बांधकाम वैयक्तिक असेल किंवा रेखांकनातील असेल प्रकरण दाखल होते. त्यानंतर नोटीस दिली जाते. नोटीस देणे हे कायद्यात आहे. प्रकरण तपासले. छाननी केली, अमुक त्रुटी आहेत. त्याची पुर्तता करावी म्हणून नोटीस दिली जाते. नोटीस नुसार पूर्तता केल्यानंतर प्रकरणाची कार्यवाही करणे प्रत्येक विभागाचे काम असते. कायद्याने ६० दिवसाच्या आत

बांधकाम परवानगी दिली पाहिजे. देता येत नसेल तर तसे स्पष्ट कारणे नमूद करुन कळविणे आवश्यक आहे. कागदपत्र पुर्ण असतील तर परवानगी दिली जाते. नोटीस दिलेले प्रकरण असेल तर कागदपत्र पुर्तता होईपर्यंत दिली जात नाही. ते थांबवून न ठेवता ६० दिवसांचे बंधन पाळले पाहिजे. ते पाळले जात नव्हते. मागील वर्षी व चालू वर्षात जे जे प्रकरण नोटीस देवून कागदपत्रांची पुर्तता झालेले प्रलंबित आहे. ती तपासून संबंधित विभागाचे प्रमुख यांचे खालील उपअभियंता व अभियंता यांना तपासणी करण्याच्या सक्त सूचना दिलेल्या आहेत. त्याचा अहवाल सभागृहाला द्यावा म्हणजे मागील एक ते दीड वर्षात काय काम केले हे समजेल. सभागृहाची जी नाराजी आहे ती दूर होईल. जे काम केले ते सभागृहाला सांगणे अपेक्षित आहे. मागील वर्षी पेक्षा यावर्षी त्या विभागात कामाचा वेग जास्त आहे.
तिसरी सूचना अशी की, नोटीस देवून प्रकरण प्रलंबित ठेवणे बरोबर नाही. त्या व्यक्तीला चकरा माराव्या लागतात. ६० दिवसाच्या आत परवानगी द्यावी नसता लेखी कारणासहीत तसे कळविणे आवश्यक आहे. हे करण्यास अडचण येणार नाही. त्या व्यक्तीकडून तीन चार महिन्यांनी कागदपत्राची पुर्तता झाली ते पुन्हा प्रस्ताव दाखल करु शकतात त्याला बंधन नसते काही लोकांनी मिळकतीचे पी.आर.कार्ड मिळविलेले असते. नकाशा मिळविलेला असतो. मुदतीत कागदपत्र प्राप्त केले नाही. ते पुन्हा आणण्याचा त्या व्यक्तीस काही प्रमाणात भूर्दंड होवू शकतो. याचा विचार केला व त्याचे पातळीवर तसे परिपत्रक काढण्याच्या सूचना दिल्या आहेत. जी कागदपत्र महत्वाची असतात त्याची छायाप्रत काढून त्या समोरच्या पार्टीला ती परत केली पाहिजे. पुन्हा नव्याने प्रकरण दाखल करतांना ते सोबत देतील. या बाबीतला टी.पी.विभागाचा पूर्ण आढावा तयार आहे. या विभागाचे संगणकीकरण करणे किंवा त्या विभागाचा अभिलेख अद्ययावत करणे. मा.सभापतींनी दोन-तीन महिन्यापुर्वी सूचना केल्यानुसार ए.डी.टी.पी.नी काही कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या. उपआयुक्त (प्र.) यांची मदतही घेतली. परंतू किती संचिका वर्गीकरण केल्या व राहिल्या. ए.बी.सी.डी. वर्गवारी नुसार संगणकीकरणात या संचिके बाबत नेमकी काय माहिती नोंद करीत आहे. याची माहिती माझ्याकडेही व सभागृलाही त्या विभागाकडून प्राप्त नाही. संगणक यंत्र आवश्यक असेल तर त्याबाबतची संचिका आचार संहिते पुर्वीच निविदा केलेल्या होत्या. आणखी काही संगणक आवश्यक असतील तर विभागाची एकत्रिक संचिका मुख्य लेखाधिकाऱ्यांकडून आलेली आहे. ज्या विभागास संगणक आवश्यक आहे ते दिले जातील. म्हणून अधिकाऱ्यांनी जे काम केलेले आहे. त्याबाबत स्पष्ट खुलासा केला पाहिजे. तसेच अडचण कोणती येते. त्याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. सभागृहाच्या माहितीसाठी सांगाते की, आल्यापासून प्रत्येक सभेचे ॲक्शन पॉईन्ट माझ्याकडे उपलब्ध आहे. त्याचा पाठपुरावा केला जातो. चिंतन बैठक घ्यावी म्हणून स.सदस्यांनी सूचना केली परंतू तशी बैठक घेता येत नाही.परंतू कार्यवाही करणेच्या सूचना दिलेल्या आहेत. अधिकारी, कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यासाठी एका संस्थेकडून प्रशिक्षण वर्गाची व्यवस्था केलेली आहे. तारखा निश्चित झालेल्या आहेत. कार्यालयीन कामकाजाचे व नवीन अधिक काय माहिती घेता येईल असे प्रशिक्षण राहणार आहे. हे जरी असेल तरी

अधिकाऱ्यांना हे नम्रपणे सांगणे आवश्यक आहे की, जितका अभ्यास आपण कराल, जितके लक्ष कामात द्याय तेवढी कार्यक्षमता वाढते. आत माहिती उपलब्ध असेल तर ले-आऊट बांधकाम परवानगी तसेच संगणकाची व अभिलेखाची निश्चित अशी माहिती देण्यांत यावी. साजेद बिल्डर प्रकरणा बाबत केलेली माहितीची लेखी स्वरुपात देण्यांत यावी.

**श्री.संजय शिरसाठ :** मा.आयुक्त यांचेकडे प्रत्येक सभेतील ॲक्शन पॉईट उपलब्ध आहेत. इत्थंभूत माहिती असते. परंतू दुदैवाने त्यांचे अधिनस्त अधिकारी यांचेकडून चुकीची माहिती दिली जाते. सहा संचिका साजेद प्रकरणाच्या गहाळ झालेल्या आहेत. त्याचे नांव घेण्या मागचा हेतू असा की, अनेक संचिका या नगररचना विभागातून गहाळ झालेल्या आहेत. मागे एका व्यक्तीने बेटरमेंट चार्जेस भरुन त्यांनी बांधकाम परवानगी मागितली होती. मनपाने पत्र देवून त्यांना कळविले की, पुर्वी जेव्हा केव्हा पैसे भरणा केले. त्याचे रेकॉर्ड नसल्यामुळे तुमच्याकडील माहिती द्यावी. प्रश्न साजेद बिल्डरच्या संचिके बाबत सर्वसाधारण सभेत मी मुद्दा उपस्थित केलेला होता. रेकॉर्ड विभागास एक कर्मचारी दारु पिलेला असतो. ५०० रुपये दिले तर संचिका देतो अशी माहिती आहे. मी सूचना केली म्हणून प्रकरण गांभीरतेने घेतले. आपण ताबडतोब बदली केली. त्या कर्मचाऱ्यांचा साजेद प्रकरणाच्या बाबतीत संबंध नव्हता. त्यासंबंधी दुसऱ्या कर्मचारी संबंधीत आहे. नेमक्या कोणत्या प्रकरणावरुन व कोणत्या कर्मचाऱ्यास निलंबित केलेले होते. खुलासा करावा. साजेद प्रकरणाच्या संचिके संदर्भात मनपाच्याच सक्षम अधिकाऱ्यांनी संचिकेवर नोंटीग केली की, पुर्वी त्यावेळी जो कर्मचारी रेकॉर्ड सांभाळत होता. त्याचा मृत्यू झाला. त्या व्यक्तीवर गुन्हा नोंद करावा अशी नोटींग केलेली आहे. अशी माझी माहिती आहे. नगर रचना विभागाकडून एखाद्या जागेवर बांधकाम परवानगीची पध्दत त्यांचे नॉर्म्स काय? दोन वर्षापुर्वी या मनपामध्ये एक खिडकी योजना सुरु केली. त्याचा हेतू असा की, ज्यांना बा.प. पाहिजे फलकावरील सुचनेस नमूद केलेली कागदपत्रे द्यायची व कागदपत्र तपासणी करायचे ते पूर्ण असतील तरच दाखल करुन घ्यायचे. नसेल तर घ्यायचे नाही. हे सर्व तपासणी केल्यानंतरच संचिका पुढील कार्यवाहीस गेली पाहिजे. परंतू येथे तसे होत नाही. संचिका कागदपत्र घेतात. संबंधित व्यक्ती अनेक वेळा कचरा मारतात. नंतर त्यांना सांगितले जाते. अमूक कागद त्यात नाही. संचिका होऊन दुय्यम आवेक्षकाकडे जाते. त्यांचेकडे काही दिवस राहते. नंतर कनिष्ठ अभियंता कडे महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंत्यांकडे वेळ कमी असतो. नंतर ते उपअभियंता यांचेकडे संचिका जाते. व नंतर संचिका काही वेळा सहा.संचालक नगररचना यांचेकडे सुध्दा जातात. प्रकरण दाखल केले. नंतर ६० दिवसात बांधकाम परवानगी दिली पाहिजे असे बंधनकारक आहे. त्यापुर्वीही परवानगी देवू शकता. हे प्रशासनाने लक्षात घ्यावे. ज्या वेळेस जो व्यक्ती बां.प.प्रकरण दाखल करतो. संपूर्ण कागदपत्र असतात असे माझे मत आहे. घरे बांधणारे सर्व बिल्डर नसतात. सामान्य व्यक्ती बँकेकडून कर्ज घेवून घर बांधकाम करीत असतात. मनपाची परवानगी दाखविली तर कर्ज मंजूर होते व परवानगीसाठी दोन-दोन वर्षाचा कालावधी लागत असेल तर एक खिडकी योजनेला अर्थ नाही. कशासाठी सुरु करण्यांत आली आहे. असा माझा प्रश्न

आहे. मिळकत धारकांना नोटीसा देतात. त्या व्यक्तीस अनेक वेळा यावे लागते. नियमानुसार एखाद्या व्यक्ती कागदपत्रांची पुर्तता करतो तो मनपाचा नियमाने कर भरण्यास तयार असतांना वेळ लागण्याचे कारण काय? केव्हा हे सर्व सक्षम होणार आहे. सर्व नकाशे सादर केले. कागदपत्र दिले म्हणजे जनतेला न्याय मिळतो हा प्रशासनाचा गैरसमज आहे. साजेद प्रकरणाचे दीड वर्षापुर्वी मुद्दा उपस्थित केला. नोटीस सुध्दा दिली. असेल तरी ती भिती बाळगणारे व्यक्ती नाही. त्यांनी मनपात काम केले त्यांना माहिती आहे. मनपाचे अधिकारी कुठे, कशी, कार्यवाही करु शकतात. सामान्य जनतेचे प्रश्न येथे सुटत नाही. म्हणून नगरसेवक पोट तिडकीने बोलतात. श्री.विकास जैन, महापौर असतांना जनता दरबार घेतला होता. अनेकांनी हाच मुद्दा उपिस्थत केला की, सर्व कागदपत्रे देवूनही बां.प.दिली जात नाही. असे कर्मचाऱ्यांनी सांगितले. मग कुठे त्यांना परवानगी दिली. एक खिडकी योजना आपण जेव्हा प्रत्येक वेळेस घोषणा करतो त्यापासून जनतेला काय फायदा मिळतो. हा त्या मागचा उद्देश समजावून घेतला पाहिजे. एक खिडकी योजना स्थापना झाल्यानंतर एक ही काम नगर रचना विभागाचे थांबू नये हा यामागे उद्देश होता. यापुढे एक संचिका पूर्ण असलेली थांबू नये अशी विनंती आहे. या स्थायी समितीमध्ये निर्णय घेतला या विभागाचे विभाजन करावे. कामे होत नाही म्हणून जनता नगरसेवकच जबाबदार आहे. असे समज करुन घेतात. एखाद्या कामासाठी नगरसेवक सोबत गेले तर त्यांना कशासाठी आणले मी तुमचे काम तात्काळ केले असते. असे म्हणणारे अधिकारी / कर्मचारी सुध्दा आहेत. म्हणून मा.आयुक्तांना विनंती अशा अधिकाऱ्यांना व जे कामचुकार कर्मचारी असतील त्यांचेवर कडक कार्यवाही करणे गरजेचे आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** सन २००३-०४ या वर्षात एकूण ७५३ प्रकरणे दाखल झालेली होती. ५७४ संचिकेस मान्यता दिली. १७९ प्रलंबित आहेत. ९८% प्रकरणे निकाली काढली.

**मा.सभापती :** एक खिडकी योजना म्हणजे एकही कागद कमी असेल तर प्रकरण स्विकारत नाही.

**श्री.संजय शिरसाठ :** एक खिडकी योजनेत खऱ्या अर्थाने जास्तीत जास्त सामान्य व्यक्ती परवानगी मागतो. बांधकाम परवानगी किंवा ले-आऊट परवानगी वेळेवर दिल्या जात नाही. ते तात्काळ मिळण्याची अपेक्षा त्या प्रकरण धारकास असते. भोगवटा प्रमाणपत्र सुध्दा किती लोकांनी घेतलेले नाही ते घेतले नाही म्हणून मनपास मिळणारा मालमत्ता कर मिळकत नाही. तसेच किती लोकांना बा.प.दिली. तीन बैठकी पुर्वीचा प्रश्न होता. उत्तर दिले नाही. उत्तर दिले तर अडचणीत येऊ शकता.

**मा.सभापती :** फास्ट ट्रॅक सिस्टीम प्रमाणे किती कालावधी असतो. पुणे मनपात आहे. यानंतर बा.प.प्रकरण असेल किंवा ले-आऊट प्रकरण असेल नियमात बसत असेल तर तात्काळ परवानगी द्यावयास पाहिजे.

**सहा.संचालक, नगररचना :** काही प्रकरणाची कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर १०-१५ दिवसांत निकाली काढलेली अशी प्रकरणे सुध्दा आहेत.

**मा.सभापती :** नागरिकांची हेळसांड होते. कास्ट ट्रॅक सिस्टीममध्ये ४८ तासाच्या आत कार्यवाही होणे आवश्यक आहे. ती सिस्टीम येथे लागू करावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** अधिकारी उत्तर देण्यास असमर्थ ठरतात म्हणून वारंवार मा.आयुक्तांना उत्तर द्यावे लागते. मा.आयुक्तांच्या उत्तरावर समाधान मानावे लागते. आताच एक खिडकी योनोचा उच्चार स.सदस्यांनी केला. एक खिडकी योजनेचा अधिकाऱ्यांना समजलेला नाही असे माझे मत आहे. आताच उत्तर दिले. ९८% प्रकरणे निकाली काढली. किती प्रकरणे प्रलंबित आहे. याचा खुलासा होणे आवश्यक आहे. एक खिडकी योजनेच्या माध्यमातून जनतेला सेवा दिली जात नाही. व्यवस्थीत उत्तर सभागृहात मिळत नाही. सहा संचिकेच्या संदर्भात उत्तर दिले अशी परिस्थिती कायम राहीली तर मनपाच्या हिताच्या दृष्टीने बरोबर नाही. प्रशासनाने वेळीच पावले उचलावीत.

**मा.आयुक्त :** फास्ट ट्रॅक सिस्टीम या मनपामध्ये यावयास पाहिजे. तसे प्रयत्न प्रशासनाचे आहेत. एक खिडकी योजना म्हणजे येणाऱ्या प्रकरणाची कागदपत्रे ही संबंधित लिपिक घेतात. सोबत असलेली कागदपत्रे ही बरोबर आहे की नाही. पूर्ण पुर्तता झाली की नाही. याची छाननी लिपिकाकडून अपेक्षित नाही. उपअभियंता यांनी बघावे. एक ते दीड तास दाखल प्रकरणे पहायला उप अभियंता दर्जाचा अधिकारी हवा. त्यात १६ मुद्दे आहेत. ती कामे कालावधीत त्यांनी छाननी करुन देणे आवश्यक आहे. खालच्या कर्मचाऱ्यांकडे हे काम दिले तर ही योजना सफल होणार नाही. तशा सूचना दिलेल्या आहेत. फास्ट ट्रॅक सिस्टीम पुणे मनपा प्रमाणेच ४८ तासाच्या आत त्या प्रकरणातील काम पूर्ण करता येईल असे प्रयत्न असावे म्हणून सूचना केलेल्या आहेत.

**श्री.भगवान रगडे :** सन २००२ पासून ब्रिजवाडी येथे वाचनालयाचे काम होईल म्हणून प्रकरण चालू आहे. याबाबत माहिती घेतली असता सदर जागा डी.पी.रोड मध्ये येते म्हणून सांगण्यांत आले. नो डेव्हलपमेंट झोनमध्ये येते. डी.पी.रोड येत असेल तर तसा खुलासा करावा. मा.आयुक्तांच्या ॲक्शन पॉईटमध्ये आहे. अनेक वेळा हे वाचनालयाची कार्यवाही करण्याबाबत सूचना केल्या. कार्यवाही होत नाही. हे योग्य नाही.

**मा.आयुक्त :** ॲक्शन पॉईट माझ्याकडे आहे. स.सदस्यांनी विचारलेला प्रश्न वेगळा आहे. वाचनालय शौचालयाचे उद्‌घाटन केले. होईल की नाही हा आपला प्रश्न आहे.

**श्री.भगवान रगडे :** त्या ठिकाणी १००% दलित वस्ती आहे. राहण्यास स्वतःचे घर नाही. त्या वाचनालयात गरीबांच्या मुलांना अभ्यास करण्यांस मदत होईल. वाचनालयासाठी इमारत असल्यास जे उच्च शिक्षण घेतलेले विधिज्ञ तेथे पुस्तके ठेवतील गरीब लोकांच्या पाल्यांना त्याचा फायदा होईल. म्हणून दलित वस्तीत उच्च शिक्षण कशा पध्दतीने दिले जावे. यासाठी प्रयत्न करावे. सदस्यांचा पदाचा चार-पाच महिन्याचा कालावधी राहीलेला आहे. ए.डी.टी.पी.व मालमत्ता अधिकारी यांना विचारणा केली तर अधिकारी एकमेकांवर नेतात.

**मा.सभापती :** अगोदर इमारती विशेष बाब म्हणून बांधलेल्या आहेत. या प्रकरणातील संचिका संपूर्ण नकाशासह मा.आयुक्तांकडे पाठवावी. म्हणून तीन-चार बैठकीपूर्वच सूचना दिलेल्या होत्या. डी.पी.रोड असेल तर पुर्वीच्या इमारती कशा झाल्या. विशेष बाब म्हणून मंजूरी द्यावी.

**सहा.संचालक, नगररचना :** डी.पी.प्लॅन रस्त्यामधील जागा असेल तर विशेष बाब म्हणून सुध्दा काम करता येणार नाही. मोजणीसाठी प्रकरण पाठविलेले आहे.

**सौ.शाहीन जफर :** सिल्लेखानातील जागेवर केलेल्या अतिक्रमणासंबंधी ६-८ महिन्यापासून मी प्रश्न उपस्थित करते आहे. गेल्या २४ तारखेला न्यायालयाने दिलेला स्टे व्हॅकेट झाला. स्टे व्हॅकेट घेऊन सुध्दा आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे. खुलासा करण्यांत यावा. यापुर्वी प्रश्न विचारलेला होता. पोलिस कोर्स कमी आहे म्हणून उत्तर दिले. त्या काळात सदर व्यक्ती न्यायालयात गेले. स्थगिती आदेश आणले होते. ते स्थगिती आदेश २४ तारखेला व्हॅकेट आले. त्यानंतर काय र्कावाही झाली. अतिक्रमण का काढण्यांत आले नाही.

**मा.सभापती :** या प्रकरणात न्यायालयाचे स्थगिती आदेश होते म्हणून कार्यवाही थांबविण्यांत आलेली होती. स्थगिती आदेश व्हॅकेट झाले. कार्यवाही करण्यासाठी पोलिस फोर्स आवश्यक म्हणून उत्तर दिले होते. पोलिस विभागास पत्र देणार होते व अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही होणार होती.

**प्रशासकीय अधिकारी :** पोलिस विभागास पत्र दिलेले आहे. जास्तीचे पोलिस मनपास मिळाले नाही. मागील वेळेस अतिक्रमण काढण्यासाठी गेलो असता मारहाण करण्यांत आली होती. मागे पोलिस असतांना दगडफेक झाली.

**श्री.संजय शिरसाठ :** ५० लक्ष रुपये पोलिस कर्मचाऱ्यांवर खर्च होतात. नुसते पत्रव्यवहार करीत आहे. पोलिस कर्मचारी मिळत नाही हे दुर्देव आहे.

**मा.सभापती :** पोलिस कर्मचारी तात्काळ मिळाले नाही. तर संबंधित व्यक्ती पुन्हा दुसऱ्या न्यायालयात जाऊन स्थगिती आदेश आणतील. तसा प्रकार पुन्हा होऊ नये. यासाठी विधी सल्लागार व प्रशासनाने दखल घ्यावी व पोलिस विभागास पत्र पाठवून पोलिस पथकाची मागणी करुन सदरचे अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही करावी.

**सौ.शाहीन जफर :** या सभागृहात नुसती चर्चा होते. कार्यवाही होत नाही. बाहेर नागरिक नावे ठेवतात यात मनपाची बदनामी होते. यापुर्वीच पोलिस बंदोबस्त करुन कार्यवाही होईल. म्हणून सांगण्यांत आले होते. कार्यवाही झाली नाही. त्यानंतर आचार संहिता लागू झाली. त्या कालावधीत संबंधितांने स्थगिती आदेश मिळविले सदर स्थगिती आदेश व्हॅकेट आला त्यानंतर का कार्यवाही केलेली नाही.

**विधी सल्लागार :** या बाबत अंतिम निर्णय झालेला नाही. जो इंटेरिस रिलिक होते. ते व्हॅकेट झालेले आहे आणि संबंधित विभागास कळविण्यांत आलेले आहे. यानंतर अंतिम आदेश झाले तर पुन्हा व्हॅकेट दाखल करण्यांत येईल.

**मा.सभापती :** मनपाचे सुरक्षा रक्षक व मनपाकडे दिलेला पोलिस कर्मचारी सर्व एकत्रित जाऊन व आणखी काही पोलिस कर्मचारी मागवून घेऊन ४८ तासाच्या आत तेथील अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

**सौ.शाहीन जफर :** स्थगिती आदेश मिळाल्यानंतर संबंधित व्यक्तीशी आपले अधिकारी चर्चेस बोलावितात. मी स्वत: श्री.कंकाळ साहेब व संबंधित व्यक्ती चर्चा करतांना बघितले. माझ्या माहितीप्रमाणे अधिकाऱ्यांकडून त्यांना मार्गदर्शन होते. यानंतर तात्काळ कार्यवाही केली नाही व पुन्हा स्थगिती आदेश मिळाले तर यास मनपा जबाबदार राहील.

**मा.आयुक्त :** पोलिस पथक मागविण्यांत आलेले होते. मा.पोलिस आयुक्तांशी माझी चर्चा झालेली होती. दि.२५.१०.२००४ पर्यंत त्यांनी असमर्थता दर्शविली होती. ती वेळ गेलेली आहे. याबाबतची संचिका मी तीन दिवसापूर्वीच बघितलेली आहे. लवकरच निर्णय घेऊन पुढील कार्यवाही होईल.

**सौ.शाहीन जफर :** मनपाकडे मोठ्या प्रमाणात पोलिस कर्मचारी असतांना कार्यवाहीस विलंब का? कार्यरत असलेले पोलिस सक्षम नाही का? पोलिस मनपाचे अधिकारी जातात, मार खातात. त्याबाबत छायाचित्र घेतले जाते व जनतेला व मनपा प्रशासनास तसे दाखवून दिशाभूल केली जाते.

**मा.सभापती :** संबंधित अधिकारी यांना आदेशित करण्यांत येते की, सदरचे अतिक्रमण ४८ तासाच्या आत काढण्यांत यावे. पोलिस आयुक्तांना पत्र देऊन पोलिस पथक मागवावे. अर्ध्या तासासाठी सभा तहकूब करण्यांत येते.

(वेळ दुपारी १.३० वाजता सभेला पुन्हा सुरुवात दुपारी २.२० वाजता)

**श्री.भगवान रगडे :** दसरा आला. दिवाळी आलेली आहे. मनपाच्या कामगारांना ४० दिवसांच्या बोनस दिला जाणार आहे का? खुलासा करावा.

**मा.सभापती :** या संदर्भात मी विचारणा केलेली आहे. मनपाचे प्रमुख पदाधिकारी व प्रशासन एकत्रित बसून निर्णय होतील. तो विषय या सभागृहाच्या कक्षेत येत नाही. बोनस देण्या संदर्भात सर्वसाधारण सभेची मान्यता घ्यावी लागणार आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गेल्या सहा महिन्यापुर्वी या सभागृहात महापालिकेच्या क्षेत्रात शिवाजी नगर हा परिसर येतो की नाही म्हणून जी चर्चा झालेली होती. १९९०-९२ मध्ये जे मतदान झाले तेव्हा त्या भागातून मनपामध्ये नगरसेवक म्हणून लोकप्रतिनिधी निवडून आलेले होते. सन २००० च्या मनपा सार्वत्रिक निवडणूकीच्या वेळी हा भाग मनपा हद्दीत येत नाही. म्हणून तेथील जनता मतदान पासून वंचित राहिली. तसे नोटीफिकेशन त्या वेळच्या आयुक्तांनी काढले होते. वेगळे नियोजन प्राधिकरणाकडे नाही. मनपामध्ये समावेश होत नाही. म्हणून तेथील काही नागरिक मा.उच्च न्यायालयात गेलेले होते व ही वसाहत समाविष्ट करुन घेण्या संदर्भात शासनास तसेच मनपास मा.न्यायालयाने आदेशित केलेले होते. एक तर हा भाग मनपाने कार्यक्षेत्र वाढवून समावेश करावा नसता त्या भागासाठी शासनाने स्वतंत्र प्राधिकरण करावे किंवा ग्रामपंचायत मध्ये समावेश करायचा का निर्णय घ्यावा असे आदेशित केले होते. त्यानुसार या सभागृहात चर्चा झाली होती व शासनाकडे पाठपुरावा करुन कार्यवाही करावी. हे कार्यक्षेत्र मनपा हद्दीतून वगळल्यास त्या भागातून जी जकात वसूल होते ती वसूल करता येणार नाही. हे निश्चित आहे. त्या भागातून येणाऱ्या वाहनावरील जकात वसूल करतो. नियमाने तसे करु शकत नाही. उत्पन्न मिळवून देणारा तो परिसर आहे आणि किती दिवस हा परिसर सेवा सुविधा देण्यापासून संचित ठेवणार आहेत. प्रस्ताव मंजूर होवून चार वर्षे झाली त्या संदर्भात प्रशासनातर्फे शासनाकडे काय पाठपुरावा झाला व तो भाग मनपा हद्दी समाविष्ट तेथील भागास भविष्यात सेवा सुविधा देता येतील अशी कार्यवाही व्हावी. तेथील जनेतला न्याय मिळाला पाहिजे असे माझे मत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** शिवाजी नगरचे नागरिक येणाऱ्या मनपाच्या निवडणूकीत मतदानापासून वंचित राहणार अशी बातमी घेत चार दिवसापूर्वीच एका दैनिकातून आलेली होती. त्या बातमीचा पाठपूरावा केला असता अशी माहिती मिळाली की, शासनाने एक जी.आर.काढून २००१ ची जनगणना जोपर्यंत पूर्ण होत नाही. तोपर्यंत कोणताही भाग मनपा असेल किंवा इतर प्राधिकरण असेल समावेश करुन होवू नये म्हणून तेथील जनता मतदानापासून पुन्हा वंचित राहते की काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे. १९८८ व १९९५ च्या सार्वत्रिक निवडणूकीत त्या भागातील नागरिकांनी मतदान केलेले होते. सन २००० च्या सार्वत्रिक निवडणूकीत ऐनवेळी तो भाग मनपा हद्दीत येत नाही म्हणून वगळला गेला. त्यानंतर काही लोक न्यायालयात गेले. मा.न्यायमुर्ती श्री.म्हसे व मा.न्या.श्री.दाभोळकर यांनी निर्णय दिला की, हा भाग एक तर नगर पंचयात निर्माण करावी. किंवा महानगरपालिका क्षेत्रात समावेश करुन घेण्यांबाबत शासनाने निर्णय घ्यावा. चार वर्षाचा कालावधी गेल्यानंतर सुध्दा तो भाग समाविष्ट करुन घेतलेला नाही. आता तर शासनाचे परिपत्रक प्राप्त आहे व तो भाग समावेश करायचाच नाही. अशी धारणा झालेली आहे. परंतू तेथील नागरिक मतदानापासून वंचित शहरातील शासनाने परिपत्रक काढले. सर्व महाराष्ट्रातील मनपांसाठी लागू केलेले आहे. न्यायालयाचे आदेश आहे. मनपाच्या वतीने शासनास कोणती माहिती देवून त्याचे कळविलेले आहे काय? न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले तर कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट ची कार्यवाही मनपावर किंवा शासनावर होऊ शकते हे लक्षात घ्यावे. म्हणून शिवाजी नगरच्या नागरिकांना मतदानापासून संचित राहू नये म्हणून तो भाग त्वरीत महापालिका हद्दीत समाविष्ट करुन घ्यावा व तेथील नागरिकांची कुचंबना होणार नाही व सोयी सुविधा देता येतील या दृष्टीने काम करावे. तसेच त्या भागातून जकात वसूल केली जाते. तेथे सोयी सुविधा न देता जकात वसूल करतो यासाठी शासनाकडे प्रशासनाने काय पाठपुरावा केलेला आहे.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** तेथील नागरिक पाणीपट्टी मनपाकडे भरणा करतात. लाखो रुपये पाणीपट्टी त्या भागातून जमा होते. म्हणून मनपाच्या हद्दीत समावेश करावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** शासन परिपत्रक काढले जाते. पुणे मनपाने २८ खेड्यांचा समावेश मनपा हद्दीत करुन घेतला त्यास शासनाने मान्यता दिली. जर पुणे मनपामध्ये समावेश करण्यास शासनाची हरकत नसेल तर एक प्रकारे अडथळा निर्माण करण्याचे काम होत आहे. हद्द वाढविण्याचा अधिकार महापालिकेस आहे. आपण प्रस्ताव पाठविलेला आहे का? पाठपुरावा करावा व पुन्हा पत्र व्यवहार करुन कार्यवाही करावी. तेथील भागातील जनता जो रोष व्यक्त करते त्यांची भावना रास्त आहे. मनपा त्यांचेकडून जकात कर वसूल करते. मनपाचे नियम त्यांना लागू आहेत. त्यांचे वेगवेगळे व्यवसाय असतील कर लावण्यांत येतो. अन्न भेसळ परवाना तो सर्व अटी शर्तीनुसार त्यांचेवर लादणार आहेत. व त्यांना सोयी सुविधा व मतदानापासून वंचित ठेवतो आहोत हा एक प्रकारे अन्याय होत आहे. तसेच छावणी भागात नगर नाका येत आहे. छावणीच्या हद्दीत येतो म्हणून मनपास काही प्रमाणात छावणी परिषदेला जकातीचा हिस्सा घ्यावा लागतो. तशी परिस्थीती या भागातील होवू शकते म्हणून हा भाग मनपा हद्दीत तात्काळ समाविष्ट करुन

घेण्याबाबत प्रशासनाने पावले उचलावित त्यांनी ५%,१०% मागणी केली तर काय करणार. प्रशासनाचा खुलासा द्यावा.

**मा.सभापती :** सन १९८८ तसेच १९९५ साली मनपा सार्वत्रिक निवडणूकीस शिवाजी नगर भागातील नागरिकांनी मतदान केले. २००० साली त्यांना ऐनवेळी हा भाग मनपा हद्दीत येत नाही. म्हणून वगळण्यांत आला. त्यानुसार तेथील काही नागरिक न्यायालयात गले व मा.न्यायालयाने सुध्दा असा निर्णय दिला की, एकतर हा भाग नगर पंचायत किंवा महानगरपालिका हद्दीस समावेश करावा म्हणून शासनास व महापालिकेस आदेशीत केले होते. २००० ते २००४ वर्षात कार्यवाही केली नाही. ३-४ महिन्यापुर्वी सुध्दा हा मुद्दा उपस्थित केलेला होता. शासनाने २९ सप्टेंबर, २००४ रोजी पी.आर.काढला परंतू त्या अगोदर २० जुलै, २००४ ला शासनाकडे सुध्दा पाठविलेला आहे. परंतू त्यात असे नमूद करणे गरजेचे आहे की, मा.न्यायालयाचे जे आदेश आहे ते नमूद करावे. आणि अशा प्रकारे मा.न्यायालयाच्या आदेशाचे पालन झाले नाही तर न्यायालयाच्या निर्णयाचे उल्लंघन होते. म्हणून नमूद करावे व तसे शासनास कळवावे. विशेष बाब म्हणून मान्यता घेण्याची कार्यवाही. यापुर्वी केव्हा माहिती पाठविण्यांत आलेली होती.

**सहा.संचालक (न.र.) :** ९ सप्टेंबरला शासनास पाठविण्यांत आलेले आहे व मा.न्यायालयाचे जे निर्देश दिले ते त्यात नमूद केलेले आहे. उलट शासनाकडून पाठपुरावा होता की, हा प्रस्ताव ताबडतोब पाठवावा. म्हणून त्यानुसार पाठपुरावा करुन ती सर्व कार्यवाही करुन शासनास पाठविण्यांत आलेले आहे. शासनाचा पुन्हा जो जी.आर.आला. त्यानुसार पुन्हा कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** मा.उच्च न्यायालयाचे जे निर्देश आहे त्याची प्रत शासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. विशेष बाब म्हणून मंजूरी घ्यावी. पुर्ण महानगरपालिकेमध्ये काही खेड्यांचा समावेश करण्यांत आला त्याप्रमाणेच परवानगी घेऊनच या भागाचा समावेश करता येईल. घुसता पत्रव्यवहार किंवा दुरध्वनी वरुन चर्चा करुन कार्यवाही होणार नाही. महानगरपालिकेच्या प्रभागाची रचने बाबत प्रक्रिया सुरु झालेली आहे. म्हणून तो भाग महापालिका हद्दीत समावेश व्हाव व तेथील नागरिक मतदानापासून वंचित राहणार नाही अशी भावना व्यक्त केलेली आहे. छावणी परिषदे प्रमाणे त्या भागातील जकात वसूली पोटी हिस्सा मागणी केली तर महापालिकेस परवडणारे नाही. विशेष प्रतिनिधी म्हणून सहाय्यक संचालक, नगररचना यांना पाठविण्यांत यावे व या बाबतीत तात्काळ पाठपुरावा करण्यांत यावा.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करावी उद्यापासून त्यांनी कामाला लागावे.

**मा.सभापती :** तात्काळ या संबंधी कार्यवाही व्हावी. शासनाची परवानगी मिळण्या संबंधी तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.भगवान रगडे :** एम.आय.डी.सी.भागात कारखान्याच्या जागेवर सर्रासपणे कमर्शियल इमारती निवासी वापराच्या इमारती होत आहे. महापालिकेची एन.ओ.सी.घेतली जाते का? एन.ओ.सी.घेण्याची गरज आहे की नाही?

**सहा.संचालक (न.र.) :** एम.आय.डी.सी.हे स्वतंत्र नियोजन प्राधिकरण आहे. त्यांना एन.ओ.सी.ची.गरज नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** गेल्या एका बैठकीत या विषयावर चर्चा झालेली होती. एम.आय.डी.सी. हा भाग महापालिका हद्दीत येतो. कमर्शियल किंवा निवासी इमारत कोणी प्लॅन बदलून बांधकाम करीत असेल तर महापालिकेची एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे. तशी माहिती महापालिकेस संबंधिताने सादर करणे आवश्यक आहे. असे मा.आयुक्त यांनी सुध्दा खुलासा केलेला होता. एम.आय.डी.सी. हे स्वतंत्र प्राधिकरण आहे. महापालिकेकडे येण्याची आवश्यकता नाही. तसेच सिडको सुध्दा हे स्वतंत्र प्राधिकरण आहे. मा.उच्च न्यायालयात जेव्हा काही केसेस चालू होत्या. त्यावेळेस जालना रोड कडील दक्षिण भागातील जागेचा विकास करावयाचा होता म्हणून महानगरपालिकेची एन.ओ.सी.घेतलेली नाही ती घेण्यांत यावी. म्हणून मा.न्यायालयाचे निर्देश होते. तसे मत व्यक्त केले होते. जे उत्तर अधिकारी देतात. ते त्यांची जबाबदारी बाजूला टाकण्याची उत्तरे देतात. एम.आय.डी.सी.भागात जर नवीन प्लॅन नुसार विकास होत असेल महानगरपालिकेच्या हद्दीत येत असल्याने एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे. सर्व कलमा सहीत दाखविले असते. चुकून माझ्याकडील पुस्तक विसरला. महानगरपालिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. एम.आय.डी.सी.हा भाग महानगरपालिकेकडे हस्तांतरण करुन घेतलेला आहे. रस्ते पाणी पुरवठा, विद्युत मेटनंन्स ई.कामे महापालिकेमार्फत होते. वसुलीची कामे महापालिका करते व विकास करण्यामध्ये कुठे बदल करुन नवीन प्लॅन नुसार बांधकाम होत असेल तर महानगरपालिकेची एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे. असा बदल होत गेला तर महापालिकेस सोयी सुविधा देण्याची साधने वाढवावी लागणार आहे.

**मा.सभापती :** इमारतीचा टॅक्स महापालिका वसूल करते. पाणी पुरवठा केला जातो. एखाद्या इमारतीचा वापरात बदल होत असेल किंवा तेथे जूनी इमारत काढून नवीन पध्दतीने होत असेल तर येणारा कर हा पुर्वीपेक्षा कमी येत असेल व वापर बदलला असेल तर महापालिकेची एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे.

**सहा.संचालक (न.र.) :** एम.आय.डी.सी. हा भाग कारखाने ई.साठी असून विशेष नियोजन प्राधिकरण आहे. नगर विकास विभागाने आदेश काढलेले आहे. ते तपासून पहावे लागेल. जळगांव रस्त्यापासून ब्रिजवाडी कडे २४ मी.रस्ता ठेवला ते ४५ मी. केले नाही. कारण हद्द येत नाही. विशेष नियोजन प्राधिकरण एम.आय.डी.सी.असल्याने ते त्यांनी पहावे.

**मा.सभापती :** आपण मुलभूत सेवा जेस विद्युत, पाणी पुरवठा कशाच्या आधारे देतो.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नगर विकास कायद्यानुसार शहरातील आम जनतेला सोयी सुविधा देणे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. महापालिकेस तसे शासनाचे सर्क्युलर आलेले आहे. कारखाने बंद करुन तेथे निवासी इमारती होत आहे. २ महिन्यापुर्वी हा विषय सभेत आलेला होता. मोठमोठे कारखाने बंद होत आहे. गोरगरीब नागरिक देशोधडीला लागत आहे. हे अत्यंत गंभीर होत आहे. हाल अपेष्टा सह करण्या लागत आहे. कारखानदारी बंद करुन तेथे कमर्शियल इमारती होत असेल तर ही बाब या महानगरपालिकेचे ट्रस्टी या नात्याने कदापि सहन करणार नाही. ज्यांना वापर बदल करायचा त्यांनी महापालिकेची एन.ओ.सी.घ्यावीच लागते असे माझे ठाम मत आहे.

**मा.आयुक्त :** अधिकाऱ्यांनी खुलासा केला. सोयी सुविधा देण्याचा ताण महापालिकेवर येतो. स्पेशल प्लॅनींग ऑथर्टी आहे. मान्य केले. दि.०२.०८.२००४ च्या

बैठकीचे इतिवृत्त आहे. माझा ॲक्शन पॉईट आहे. सविस्तर माहिती ठेवली नाही. अडचण असेल तर संचिका सादर करावी. सर्क्युलर वाचून विचार करुन सादर केली नाही. त्यामुळे सदस्यांनी नाराजी व्यक्त केलेली आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** चिकलठाणा भागातील अनेक मोठमोठे उद्योगधंदे बंद पाडले जात आहे. त्यास पायबंध केले पाहिजे. निवासी वापराचे इमारतीस परवानगी त्या भागात देण्यांत येवू नये. कमर्शियल वापर घेता कामा नये. कामगारांवर गदा आणण्याचे काम होऊ नये. या शहराचे आपण लोक प्रतिनिधी आहोत. कामगारांवर अन्याय होता कामा नये उलट त्यांना काम दिले पाहिजे.

**मा.सभापती :** अे.डी.टी.पी.विभागाकडे सर्क्युलर आहे. ॲक्ट व महापालिकेच्या नियमांचा भंग करुन कारखानदारी बंद करण्याचा कुणाचा कट असेल तर ते कदापि सहन केले जाणार नाही. सहा.संचालक, यांनी पुन्हा तपासणी करुन एखाद्या जागेत वापरात बदल होत असेल तर महापालिकेची एन.ओ.सी.लागते असे ठाम मत सभागृहाने व्यक्त केलेले आहे. म्हणून ॲक्टनुसार तसे जाहिर प्रगटन देवून जनतेला कळवावे. महापालिकेची एन.ओ.सी.घेणे बंधनकारक आहे.

**विधी सल्लागार :** सहाय्यक संचालक नगररचना विभागाचे सर्क्युलर काय आहे. त्यानुसार लिगल कार्यवाही करता येईल. महापालिकेची संमती द्यायला पाहिजे.

**मा.सभापती :** विधी सल्लागार व सहा.संचालक नगररचना यांनी एकत्रित चर्चा करुन शासनाकडून सविस्तर माहिती मागवावी व कारखाने बंद करुन त्या इमारती तोडून त्या ठिकाणी नवीन इमारत किंवा कमर्शियल वापर होत असेल तर महानगरपालिकेची एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे. नसता एन.ओ.सी.घेतले नाही. तर महापालिका त्यांचे विरुध्द कार्यवाही करेल असे जाहीर प्रगटन द्यावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** रेल्वेस्टेशन भागात सत्यम सिनेमागृह होते. महाराष्ट्र शासनाने परस्पर त्यास मंजूरी दिलेली होती. तेथील वापर बदल होणार होता. तरी सुध्दा महापालिकेकडे एन.ओ.सी.साठी प्रस्ताव सादर झालेला होता. म्हणून एका औद्योगिक वसाहतीला जागेवरील इमारतीच्या वापरात बदल करायचा असेल व महापालिकेची एन.ओ.सी.घेतली जात असेल तर चिकलठाणा भागातील औद्योगिक वसाहतीमधील इमारतीचा वापरात बदल करावयाचा असेल तर महानगरपालिकेची एन.ओ.सी.घेणे आवश्यक आहे. एका वसाहतीसाठी वेगळा नियम व दुसऱ्या वसाहतीसाठी वेगळा नियम असू शकत नाही.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** सेल ॲण्ड कंपनी मालकावर काय कार्यवाही करण्यांत आली. संपूर्ण रक्कम वसूल करण्यांत आलेली आहे का? खुलासा करावा.

**मा.सभापती :** प्रशासनाने त्या संबंधी अहवाल दिलेला आहे. त्याचा करारनामा रद्द केलेला आहे. शहरातील विविध ठिकाणी जाहिरात फलक, ॲडपोल व किऑक्स लावण्याचे काम सेल ॲउ कंपनीस दि.११.०७.२००३ रोजी देण्यांत आले होते. या एजन्सीकडून महानगरपालिके सोबत केलेल्या करारनाम्यानुसार करारनाम्यातील अट क्र.१ नुसार दि.०७.०८.२००३ ते ०७.०७.२००४ या कालावधीसाठी रु.३८,३६,९८९/- भरणा करणे बंधनकारक होते. त्यापैकी एजन्सीने १९,४०,२२६/- या कालावधीचे रु.३८,२६,९८९/- असे एकूण ५७,१३,०५२/- एवढी रक्कम येणे बाकी आहे. याकरिता महानगरपालिकेतर्फे

एकूण सात वेळेस नोटीस देवून भरणा करण्या बाबत कळविले आहे. संबंधिताने अजूनपर्यंत थकबाकीचा भरणा केलेला नाही. त्यामुळे करारनाम्यातील अट क्र.१ - ८ (बी व सी) चे उल्लंघन केल्यामुळे करारनामा रद्द करण्यांत येत आहे. तसेच करारनाम्यातील १-१० नुसार महानगरपालिकेस जमा केलेली सेक्युरिटी डिपॉझीट रु.३,८८,१८३/- महानगरपालिका फंडास जमा करण्यांत येत आहे. संबंधितास त्याप्रमाणे आदेश पारित करणे आहे. आदेश पारित केल्यावर तीन दिवसाच्या आत जाहिरात फलक इ.स्वखर्चाने न काढल्यास महानगरपालिका सदर जाहिरात फलक जप्त करुन संबंधीताकडून खर्च वसूल करेल.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** फक्त ३ लक्ष अनामत जप्त करुन महानगरपालिकेच्या फायद्याचे नाही. संबंधित एजन्सीकडे महानगरपालिकेची ५७ लक्ष थकबाकी ती केव्हा वसूल करणार आहे.

**मा.सभापती :** सेक्युरिटी डिपॉझीट जप्त केलेले असून करारनामा संपुष्टात आणलेला असून उर्वरित रक्कम वसूल करण्यासाठी ज्या होर्डींग आहेत. त्या जप्त कराव्या व महानगरपालिकेची असलेली थकबाकीची संपूर्ण रक्कम वसूल करण्यासाठी रिकव्हरी सुट दाखल करणार व काय जी वेगळी कार्यवाही करता येईल ती करण्यांत यावी. मालमत्ता अधिकारी व विधी सल्लागार यांनी संयुक्तपणे कार्यवाही करावी.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** हरीत क्रांतीचे नेते स्व.श्री.वसंतराव नाईक यांचे पुतळ्याचे अनावरण करण्यां संदर्भात मी अनेक वेळा मागणी केलेली आहे. जनतेला सांगून कंटाळलेले आहे. पुतळा सध्या तयार आहे. फक्त तारीख वेळ निश्चित करुन उद्‌घाटन करणे बाकी आहे. केव्हा कार्यवाही होणार आहे. खुलासा करावा.

**मा.सभापती :** २५ ऑगस्ट २००४ रोजी या पुतळ्याचे उद्‌घाटन करण्या संदर्भात निश्चित केलेले होते. परंतू दि.२४.०८.२००४ रोजीच विधानसभा आचार संहिता लागू झालेली होती. आता अति.शहर अभियंता यांना सूचना करण्यांत येते की, मा.महापौर व पदाधिकारी यांचेकडून वेळ मागवून घेऊन १५ दिवसाच्या आत या पुतळ्याचे अनावरण होईल. अशी कार्यवाही करावी.

**श्री.भगवान रगडे :** मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करण्या संदर्भात मी अनेक वेळा मुद्दा मांडलेला होता. त्या संदर्भात गेल्या ४ वर्षात प्रशासनाकडून शासनाकडे पाठपुरावा झालेला नाही. व सदर संचिका शासनाकडे गेलेली नाही.

**मा.आयुक्त :** या संदर्भात मी मा.सचिव यांचेसह चर्चा केलेली आहे. हा भाग स्लम घोषित करता येत नाही. शासनाने गुंठेवारी कायदा लागू केलेला आहे. त्या बसविता येते.

**सहा.संचालक (न.र.) :** मिसारवाडी हा भाग आरक्षणाने बाधित होतो. किती भाग होतो याची माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही. तपासणी करावी लागेल. मोजणी करावी लागेल.

**मा.आयुक्त :** सन २००२ चा हा प्रस्ताव होता. शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे. त्या अनुषंगाने काय झाले माहिती अधिकारी देतील. परंतू शासन गुंठेवारी कायदा लागू केला. मधल्या काळात कोणताच निर्णय न झाल्यामुळे होणारी कार्यवाही थांबवून राहिली. हया वसाहतीला स्लम घोषित केले नाही. म्हणून सोयी सुविधा देता आल्या नसतील हे तितकेच खरे. या वसाहतीतील किती

भाग गुंठेवारी कायद्यात समावेश करता येतो. किती भाग बाधित होतो. गुंठेवारी कायद्यात अगोदरची मागणी आहे. शासनाचे गृहनिर्माण विभागाकडे बघावे. पत्रव्यवहार वगैरे केला ही फार जुनी बाब आहे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** मुंबई मध्ये झोपडपट्टी भागास स्लम घोषित म्हणून शासन मान्यता देणार आहे. या शहरामध्ये अनाधिकृत अशा जवळपास स्लम घोषित नसलेल्या १०० वसाहती असतील. गुंठेवारी कायदा हा शासनाने गोर गरीब जनतेच्या दृष्टीने काळा कायदा काढला. गरीबांचे हित च्यात साध्य होणार नाही. ज्या अनाधिकृत सन १९९५-२००० पर्यंत विकास कामे करता येत होती. त्या वसाहतीत सन २००० पासून शासन बदलले म्हणून विकास कामे बंद केली. गुंठेवारी कायदा लागू केला. गुंठेवारी कायदा लागू करण्या अगोदर पासून मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करावा म्हणून मा.सदस्यांची मागणी आहे. शासनाशी पत्र व्यवहार झालेला आहे. त्याचा संदर्भ देऊन हा भाग स्लम घोषित करण्या संदर्भात तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.भगवान रगडे :** वेळीच कार्यवाही न झाल्यामुळे ही वेळ आलेली आहे. गेल्या चार वर्षात का शासन पातळीवर कार्यवाही केली नाही. दोन दिवसात पत्र व्यवहार करुन त्या संबंधीची कार्यवाही करावी व मला तसे लेखी पत्र देवून कळवावे. कार्यवाही होत नसेल तर ही सभा होवू नये. बंद करण्यांत यावी.

**उपआयुक्त (प्र.) :** प्रकल्प संचालक, यांनी या संदर्भात शासनाकडे पत्र व्यवहार केलेला आहे.

**मा.सभापती :** मुंबईला पाठवून कार्यवाही करण्यांत येईल. सक्षम अधिकारी पाठवून या बाबत तात्काळ कार्यवाही करावी. २ दिवसात मुंबईला पाठवून हा भाग स्लम घोषित कसा होईल. तशी कार्यवाही करावी व स.सदस्य श्री.रगडे हे अधिकाऱ्यांसोबत जाण्यास इच्छुक असेल तर त्यांना बरोबर होऊन जावे.

**सौ.शाहीन जफर :** २-३ महिन्यापुर्वी शालेय साहित्य खरेदी संदर्भात टेंडर झाले. सध्या शाळेत टेबल खुर्ची बेंच नाही. शालेय विद्यार्थ्यांना गणवेश वाटप करण्यांत आलेले नाही. ही कार्यवाही केव्हा होणार आहे. एक शिक्षणाधिकारी सर्वच शाळेवर नियंत्रण ठेऊ शकत नाही. त्यासाठी जेष्ठ मुख्याध्यापकांमधून कर्मचारी नियुक्त करावे त्यांना २०-२५० शाळेत जावून तपासणी करणे. खिचडी वाटप होते किंवा कसे असे किरकोळ अधिकार देण्यांत यावे. तर शिक्षक कर्मचारी यांचेवर वचक राहील. शैक्षणिक दर्जा सुधारण्यास मदत होईल. जास्तीत जास्त प्रमाणात शाळेवर भेटी दिल्या पाहिजे. १० शिक्षक डेप्युटेशनवर आहेत. त्यांना मुलांना शिक्षण देता येत नाही तर डी.एड.परिक्षा पास कसे झाले. काही शिक्षक तर १ ते ५ वी पर्यंतच्या मुलांनाच शिकवित पुढील वर्गास काही नाही म्हणून सरळ सांगतात. १० शिक्षक शून्य आहे. त्यांना स्वत: डी.एड. पदवी परिक्षेचे ज्ञान नाही. १ ते ४ थी पर्यंत समजू शकतो. परंतू ७ वी वर्गातील मुलाची परिक्षा ही बोडी मार्फत होते. शिक्षक जर शिक्षण देवू शकत नसतील तर त्या मुलाची प्रगती कशी होणार हा प्रश्न निर्माण होतो. दोन-तीन कर्मचारी शाळा तपासणी साठी नियुक्त्या कराव्या. तरच शैक्षणिक दर्जा वाढेल. गोर गरीबांची मुले असतात. त्यांना चांगले शिक्षण देणे महापालिकेचे कर्तव्य आहे.

**श्री.माणिक साळवे :** शालेय साहित्य वाटप झालेले नाही.

**मा.सभापती :** शिक्षणाधिकारी यांनी खुलासा करावा. तसेच शाळा दुरुस्ती बाबत काय कार्यवाही केली.

**शिक्षणाधिकारी :** फर्निचर प्राप्त झाल्याचे पत्र आजच मला मिळाले. तसेच पाटया, दप्तर, पुस्तके वाटपा संबंधीचा तक्ता तयार केला. गणवेशाचे सॅम्पल १५.१०.२००४ ला प्रयोग शाळेत चाचणीसाठी पाठविले आहे.

**मा.आयुक्त :** पाटया, पुस्तके वाटप करण्यासाठी माझी नियुक्ती नाही. हे काम खालच्या पदावरील अधिकाऱ्यांने करणे आवश्यक असते.

**शिक्षणाधिकारी :** मुंबई येथील प्रयोग शाळेकडून अद्याप अहवाल प्राप्त नाही. काही शाळेत जाऊन मी तपासणी घेतलेली होती त्याचा अहवाल घेतला.

**अधिक्षक अभियंता :** शाळा दुरुस्ती बाबत अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. तात्काळ मंजूरी घेऊन कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.सभापती :** २ पर्यवेक्षक एक मराठी व एक उर्दू यांची नियुक्ती का केली नाही. मुख्याध्यापकांचे पदोन्नती का झाली नाही. जेणे करुन शाळेतील शिक्षकांवर वचक निर्माण होईल.

**मा.आयुक्त :** शिक्षकांची जेष्ठता यादी अंतिम करुन १५-२० दिवसाचा कालावधी झालेला आहे. नी स्वत: पाठपुरावा केलेला आहे. पुढील कार्यवाही उपआयुक्त (प्र.) व शिक्षणाधिकारी यांनी करावयास पाहिजे. वेळ लागत असेल तर तसा खुलासा करावा.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** शिक्षणाधिकारी यांनी असे म्हटले की, महापालिकेच्या शाळा पेक्षा जिल्हा परिषद शाळा चांगल्या असे वृत्तपत्रात आलेले आहे. यात महापालिकेची बदनामी झालेली आहे. त्यांचेकडून खुलासा घ्यावा.

**मा.सभापती :** यापुर्वीही मी पत्र देवून सूचना केल्या होत्या की, मा.आयुक्त, विभाग प्रमुख किंवा पदाधिकारी यांचेशिवाय वृत्तपत्र धारकाजवळ कोणतेही संभाषण करु नये. त्यांचे कडून खुलासा घेण्यांत आलेला आहे. त्यांनी खुलासा केला की, त्यांनी अशी बातमी कुणाला दिली नाही. पत्रकारांनी माहिती घेतली असेल.

**सौ.शाहीन जफर :** काही शाळेत खिचडी शिजवून न देता तांदूळ वाटप होतात.

**मा.सभापती :** असे होत असेल तर स.सदस्य यांनी शिक्षणाधिकारी यांना माहिती द्यावी. त्यानुसार कार्यवाही करण्यांत यावी. शालेय गणवेश वाटप बाबत काय कार्यवाही केली.

**शिक्षणाधिकारी :** १५.१०.२००४ रोजी लॅब टेस्ट साठी पाठविण्यांत आलेले आहे.

**सौ.शाहीन जफर :** आरेफ कॉलनी तीन शुगुप्ता नावाच्या शिक्षीकेने शाळेजवळच बदली करुन घेतली काही शिल्लक शाळेवर वेळेवर येत नाही. शिक्षकामध्ये काही ताळमेळ नाही. मुख्याध्यापक लक्ष देत नाही.

**मा.सभापती :** यापुढे शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यापासून ते संपेपर्यंत शिक्षक कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यांत येऊ नये. कोणीही शिफारस केली तरी बदली करु नये.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** शालेय विद्यार्थ्यांची शैक्षणिक दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने बरीच कामे गती घेण्यांत आलेली आहे. फर्निचर उपलब्ध होत आहे. शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश येत आहे. इतर कार्यवाही चालू आहे. अभिनंदनीय बाब आहे. परंतू ८१ शाळांपैकी ज्या २१ शाळांची प्रगती शुन्यावर होती. अशा शाळांची प्रगती सुधारण्यांत आलेली आहे का?

**मा.सभापती :** शिक्षणाधिकारी नव्याने रुजू झाले. त्यांना कदाचित माहिती नसेल. बीड येथील एक शालेय समितीचे पथक तपासणीसाठी या शहरात आले होते.

महापालिकेच्या शाळांची त्यांनी तपासणी केली असता २१ शाळांची प्रगतीही शून्य आहे. असा शेरा दिला होता. त्या संदर्भात शिक्षण विभागा मार्फत त्या २१ शाळांचा दर्जा सुधारण्याबाबत काय प्रयत्न केले गेले. खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** गुणवत्ता अभियाना अंतर्गत ८ शिक्षकांच्या वेतनवाढ थांबविण्यांत आलेली आहेत. काही शिक्षकांना सक्त ताकीद देण्यांत आलेल्या आहेत. जुलै महिन्याचा अहवाल माझ्याकडे प्राप्त आहे. मराठी माध्यम ३ ते ४ हया वर्गातील विद्यार्थ्यांचा दर्जा ३४% तर उर्दू माध्यमांचा ४२% ५ वी ७ वी माध्यमांचा १ ते ४ थी वर्गातील ४३% व ५ वी ७ वी दर्जा उंचावलेला आहे. सप्टेंबर ओर मराठी माध्यम १ ते ४ थी ५०% तर ५ वी ते ७ वी ५५% दर्जा उंचावलेला आहे. २१ शाळांच्या संदर्भात पुढील बैठकीत माहिती सादर करण्यांत येईल.

**मा.आयुक्त :** खुलासा करतांना हे लक्षात येणे आवश्यक आहेत की त्या २१ शाळांचा समावेश करुनच ही टक्केवारी आहे.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** झोन क्र.४ चे विभाजन करावे. साफसफाई होत नाही. पाणी पुरवठा सुध्दा अनियमित होत आहे. ड्रेनेजची देखील समस्या आहे.

**उपआयुक्त (प्र.)** : या बाबत ठराव मंजूर झालेले आहे. त्या अनुषंगाने प्रशासकीय बाबी तपासण्यांत आल्या या झोनचे विभाजन करीत असतांना २९,०००/- हजार मालमत्तांचा आलेख लक्षात घेवून हॉटेल अमरप्रीत ते शहानूरमियाँ दर्गा व काही झोन क्र.६ चा भाग वगळण्यांत आलेला आहे. झोन क्र.४ मध्ये १२ हजार झोन क्र.९ म्हणून १६ हजार मालमत्ता फिक्स होतील. संपूर्ण नकाशे प्रशासनामार्फत तयार केलेले आहे. या झोनसाठी लागणारा कर्मचारी व सविस्तर असा प्रस्ताव प्रशासन पदास हीत सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवणार आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** मा.महापौर यांनी झोन क्र.४ चे विभाजन झाले म्हणून १५ ऑगस्ट दिनी घोषणा केली होती. आम जनतेला माहिती गेली. प्रशासनाच्या कोणत्या अधिकाऱ्यांनी मा.महापौरांना तशी माहिती दिली. झोनचे विभाजन करण्या संबंधीची सर्व कामे अर्धवट होते. नकाशे सादर करणार आहे. सर्वसाधारण सभेत प्रस्ताव येणार आहे. त्यानंतर कार्यवाही होईल. मा.महापौर यांची दिशाभूल केली. असा अर्थ निघतो. प्रशासनाने मा.महापौरांना विनंती केली. विभाजनाची घोषणा करावी. दिशाभूल केली. १५ ऑगस्टला मा.महापौरांच्या तोंडी घोषणा करवून घेतली.

**मा.आयुक्त :** कुणी माहिती दिली याबद्दल माहिती घेतली जाईल.

**उपआयुक्त (प्र.)** : झोन क्र.४ चे विभाजन झालेले आहे. सर्व कामांचे नियोजन केलेले आहे. दुर्देवाने आचार संहिता प्रिंसीपली झोन क्र.४ चे विभाजन झाले आहे. नोव्हेंबर च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव देणार आहे.

**मा.सभापती :** विभाजनाची कार्यवाही सुरु झाली आहे. असे सांगावयाचे असते.

**श्री.प्रल्हाद निमगांवकर :** आचार संहितेत नाथ प्रांगण अनाथ झाले. नाथ प्रांगण भागात सर्रासपणे अनाधिकृत बांधकाम चालू आहे. तसेच वॉर्डात अनियमित पाणी पुरवठा होतो आहे. विद्युत पुरवठ्याचा प्रॉब्लेम आहे. कृपया आपण उच्च पातळीवर प्रश्न सोडवावे.

**मा.सभापती :** या बाबत प्रशासकीय अधिकारी यांनीद पाहणी करुन कार्यवाही करावी.

**श्री.इलियास किरमाणी :** ले-आऊट संदर्भात कमेटी स्थापन केलेली होती. कमेटीत उपआयुकत (म.) श्री.शिंदे साहेब होते. त्याची बदली झाली. आत अहवाल कोण सादर करणार आहे.

**मा.सभापती :** उपआयुक्त (म) यांचा चार्ज श्री.कांबळे यांचेकडे आहे. टी.पी.विभागाची या संदर्भात बैठक झालेली आहे. त्या संबंधीची कार्यवाही पूर्ण करुन सभागृहाला अहवाल सादर करावा. व कार्यवाही चालूच ठेवावी.

**श्री.इलियास किरमाणी :** मालमत्ताचा सर्वे स्पीक कंपनी मार्फत होत आहे. ज्या तरुणांना काही त्यातले ज्ञान नाही अशा मुलांकडून सर्वेक्षणाचे काम सदर एजन्सी करीत असून किराडपुरा भागात मालकास भाडेकरु आहे. म्हणून ज्यादा टॅक्स लावण्यांत येईल. कमर्शियल टॅक्स लावण्यात येईल. म्हणून पैसे घेतले. जनतेला त्रासदायक होत आहे. जो कर्मचारी सर्वेक्षण करतो. त्यास थोड्या फार प्रमाणात ज्ञान असणे आवश्यक आहे. इतर टेक्नीकल कर्मचारी वर्ग त्या एजन्सीकडे आहेत की नाही. प्रशासनाने चौकशी केली की नाही. निविदेची मुदत केव्हा पर्यत आहे. रु.५,०००/- प्रति दिवस दंड आकारण्यांत येतो. २-३ वेळा मुदत वाढ दिली जाते काय कारण आहे. पूर्ण खुलासा करावा. मुदतवाढ देण्याचा अधिकार सर्वसाधारण सभेचा आहे. कोणाच्या अधिकारात मुदतवाढ दिली.

**मा.सभापती :** सर्वेक्षणाचे काम दुसऱ्यांना दिले असले तरी देखरेख करण्याचे काम महापालिकेकडे आहे. फीलस्टाफ नियुक्त नाही. नॉर्म नुसार सदर एजन्सीकडे कर्मचारी नियुक्त आहे किंवा नाही हे तपासणे आवश्यक आहे. जनतेवर अन्याय होता कामा नये. दखल घेण्यांत यावी. रितसर सर्वेक्षण होवून कर आकारणी आली पाहिजे. निविदेच्या अटी शर्ती प्रमाणे काय होते की नाही. मुदतवाढ देण्यांत आलेली आहे का?

**मालमत्ता अधिकारी :** प्रत्येक झोनमधील वॉर्ड वाईज संबंधितांकडून माहिती घेतलेली आहे. मा.फड साहेबांच्या सहीने ओळख पत्र दिले आहे. पहिल्यांदाच अशी तक्रार आलेली आहे. सर्वेक्षणाचे काम चालू आहे. सर्व अभिलेख आपणाकडे आहे. कामाची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** सर्वेक्षणाचा अहवाल प्रत मिळाली त्यात ते सर्वेक्षण किती केले. कोणत्या मालमत्ता आहे. कोणत्या भागातील आपल्या काही सविस्तर अशी माहिती दिलेली नाही. सर्वेक्षण करण्याचे काम किती बाकी आहे. मुदततीत हे काम होणार आहे का असा आमचा प्रश्न आहे. कोणत्या भागातील सर्वेक्षण पूर्ण झाले तसा उल्लेख नाही. ५-६ ठिकाणी "नील" दाखवले किती पूर्ण किती अपूर्ण प्रगती पथावर किती हे दाखवले नाही. काही झोनमध्ये किती मिळकती आहेत. संख्या टाकलेली झोनचा प्रोफार्मा दुसऱ्या झोनशी जुळत नाही. अर्धवट माहित आहे.

**मालमत्ता अधिकारी :** हा रिपोर्ट कोणी दिला मला माहिती नाही.

**श्री.संजय शिरसाठ :** झोन नं.५ मधील तक्ता स्तंभ २ मध्ये ५/१, ५/२, ५/३ मध्ये किती मालमत्ता आहे. संख्या वगैरे दिलेली नाही. झोन क्र.४ मध्ये अनेक रकान्यात रिकामी जागा सोडण्यांत आली.

**मा.आयुक्त :** झोन क्र.४ मध्ये बरीच कामे झालेली आहे. एरिया वाढलेला आहे. एकाच पध्दतीने सर्व झोनची माहिती देणे आवश्यक आहे. ४/१ मध्ये १८० आहेत. सर्व्हे केला याच भागात ३१ मिळकती आढळून आल्या. त्याची तपासणी पूर्ण

झाली. पूर्णपणे माहिती आलेली आहे. याच नमून्यात सर्व झोनची माहिती यायला हवी.

**श्री.संजय शिरसाठ :** ८/६ भागात पूर्वीच्या मालमत्ता १२ होत्या. सर्वेक्षणाचे १०८६ काढण्यांत आल्या तर ४/९ मध्ये १५५० चे १०२९ झाले. सिंधी कॉलनी भागात ४/८ मध्ये २२५० मालमत्ता होत्या. तर सर्वेक्षण केले नंतर १७९५ ची नोंद आली. जवळपास १००० मालमत्ता कोठे गेल्या.

**मालमत्ता अधिकारी :** ३१ डिसेंबर पर्यंत वाढवून दिले आहे.

**मा.आयुक्त :** सभागृहाच्या वतीने सूचना करतो की, संपूर्ण माहिती संगणकामध्ये घेवून कोणत्या भागात किती मालमत्ता होत्या. वाढ किती झाली. सर्वेक्षणामुळे महापालिकेचा फायदा झाला पाहिजे. जेव्हा जनतेला दिलासा देण्याबाबत दोन गोष्टी सांगतो जोपर्यंत दोन झोनचे सर्वेक्षण करुन यात फायदा समजून येत नाही. तोपर्यंत संबंधित एजन्सीजला ०५ पैसे सुध्दा देण्यांत येणार नाही विचार करुन पहिल्यांच मुदतवाढ दिली आहे. ३०-३५ दिवसापुर्वी बिल दिलेले आहे. होणारा फायदा कळाला पाहिजे.

**मा.सभापती :** ज्या पध्दतीचा तांत्रिकदृष्ट्या कर्मचारी वर्ग असावयास पाहिजे. तसा ठेवण्याचे सूचना त्या एजन्सीला कराव्यात.

**श्री.ईलियास किरमाणी :** काहीच होणार नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** कै.बाळासाहेब पवार यांचा पुतळा बसविण्या बाबत निश्चित झाले होते. तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. संबंधित अधिकारी यांना याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याचे आदेश करावे.तसेच संत एकनाथ महाराज यांचा पुतळा बसविण्याचा निर्णय घेतलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा सिडको एन-७ भागात पुतळा बसविण्याचे निश्चित केलेले आहे. यासाठी शासनाची मंजूरी घ्यावी लागणार आहे. तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात. नाट्यगृहाच्या बाबत काय कार्यवाही केलेली आहे. मा.विभागीय आयुक्त यांना पत्र देवून ती जागा सिडकोकडून महापालिकेकडे हस्तांतरण करुन घेण्याबाबत कार्यवाही करणार होते. तेथे नाट्यगृह हे महापालिकेच्याच वतीने व्हावे. २५ लक्ष रुपये यापुर्वीच सिडकोला दिलेले आहे. नाट्यगृहाच्या बाबत एका बैठकीत चर्चा झालेली होती. मा.विभागीय आयुक्त यांना तसे पत्र द्यावे म्हणून सूचना होत्या. जागा हस्तांतरण करण्या संदर्भात नाट्यगृह महापालिकेच्या वतीनेच व्हावे म्हणून तरतूद ठेवण्यांत आलेली आहे. ते नाट्यगृह इतर कोणत्या एजन्सीला दिले असले तरी महापालिकेच्या वतीनेच ते बांधणे नाट्यगृह महापालिका बांधू शकते.

**मा.सभापती :** कै.बाळासाहेब पवार यांचा पुतळा बसविण्याबाबत मंजूरी झालेली आहे. तरतूद करण्यांत आलेली असून तात्काळ प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच सिडको भागात एन-७ चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचे पुतळा बसविण्या बाबत मंजूरी झालेली आहे. तरतूदी बाबत बघावे. तसेच संत एकनाथ महाराज यांचापुतळा बसविण्या बाबत निर्णय घेतलेला आहे. त्या संदर्भातही कार्यवाही करावी. नाट्यगृहाच्या संदर्भात मा.विभागीय आयुक्त यांना पत्र व्यवहार करण्याच्या सुचना केली होती. तरतूद उपलब्ध आहे. पत्र व्यवहार झालेला आहे का? तसेच अहिल्याबाई होळकर यांचा पुतळ्यासाठी

तरतूद उपलब्ध असून जागा उपलब्ध आहे. याबाबतची तात्काळ कार्यवाही करण्यांत यावी.

**श्री.संजय शिरसाठ :** शासनाची मान्यता मिळेल यास अधिन राहून निविदा प्रसिध्द करावी.

**मा.सभापती :** तात्काळ या बाबत कार्यवाही करण्यांत येवून लवकरात लवकर परवानगी कशी मिळेल यासाठी प्रयत्न करावे. शासनाची परवानगी मिळेळ यास अधिन राहून निविदा काढण्यांत यावी. नाट्यगृहाबाबत खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** सिडको एन-५ येथे महापालिकेच्या वतीने नाट्यगृह होण्यासाठी जी जागा त्यासाठी ५० लक्षची तरतूद सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात ठेवण्यांत आलेली आहे. सदर नाट्य गृहासाठीचा भूखंड सिडकोने अद्याप महापालिकेस हस्तांतर केलेला नाही. मराठवाडा पॅकेज शासनाने मंजूर केले. त्यात १ कोटीची मंजूरी दिलेली आहे. नाट्यगृहाचे बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग एजन्सी आहे. मा.विभागीय आयुक्तांना पत्र देण्याच्या आपल्या सूचना होत्या. विभागीय आयुक्त यांना पत्रव्यवहार करुन उपयोग नाही. नगर विकास विभागाकडे जावे लागेल. त्यांना पत्रव्यवहार करावा लागेल. तेथे नाट्यगृहाचे काम शासन करणार आहे. तसे न होता महानगरपालिकेकडे तरतूद वळती करुन एजन्सी म्हणून महापालिका काम करेल असे पत्र नगर विकास खात्याला द्यावे लागेल. महापालिकेने यापुर्वी २५ लक्ष रुपये सिडकोला जमा केले व आवश्यक तरतूद या वर्षीच्या अर्थसंकल्पात ठेवली आहे. म्हणून नमूद करावे लागेल.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** नगरविकास विभागाकडे बैठक झाली होती. त्या बैठकीत नाट्यगृहाची जागा अगोदर हस्तांतर करण्यांत यावी असा मुद्दा उपस्थित केला होता. त्या बैठकीस आम्ही हजर होतो. जागा हस्तांतरा संबंधी पत्र द्या. आपण सक्षम आहोत.

**मा.सभापती :** नगर विकास विभागाचे बैठकीचे वृत्तांताचा संदर्भ नमूद करावा. वृत्ताची प्रत उपलब्ध करुन द्यावी. तात्काळ पत्र पाठवावे. पाठपुरावा करावा. पुतळ्यासाठी विशेष प्रतिनिधी पाठवा. निविदाची कार्यवाही करावी. कै.बाळासाहेब पवार यांचा पुतळा १५ दिवसांत अनावरण होईल. याबाबत कार्यवाही करावी.

**अति.शहर अभियंता :** महाराणा प्रताप पुतळ्यासाठी जागा निश्चित झालेली नाही.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** निवडणूकीच्या अगोदर काय काय निर्णय घेतले ते सोडून द्यावे. ती हवेत घोषणा होती. ५ कोटी रुपये खर्च येणार आहे. २ कोटीची तरतूद उपलब्ध आहे. हे नाट्यगृह बांधण्यास महापालिका सक्षम आहे.

**अति.शहर अभियंता :** जागा हस्तांतर करण्या संदर्भात अनेक वेळा पत्र दिले.

**श्री.इलियास किरमाणी :** वृत्तपत्रात आले, नाल्याचे टेंडर गेले. त्यात खाडाखोड होती. अमूक व्यक्तीला मिळणारे टेंडर दुसऱ्या व्यक्तीला दिले गेले. असे झालेले आहेत का? अंदाजपत्रक कोणी बसविले होते. कमेटीत कोण होते खुलासा करावा.

**मा.सभापती :** पुढील बैठकीत खुलासा देण्यांत येईल. विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**विषय क्र.१०४ :**

दिनांक २९.०७.२००४ (का.प.क्र.११) दि.०२.०८.२००४ (का.प.क्र.११ दि.२९.०७.०४ ची तहकूब सभा) दि.०२.०८.२००४ (का.प.क्र.१९) दिनांक ११.०८.२००४ (का.प.क्र.१५)

दिनांक १९.०८.२००४ (का.प.क्र.१६) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :-**

**कार्यकारी अभियंता (पा.पु.) :** दिनांक १९.०८.२००४ च्या सभेतील विषय क्र.९२ मध्ये मे.शहा कन्सल्टंट यांनी रुपये ३४.५६ लक्ष रुपयांमध्ये काम करण्यास नकार दिल्यास हे काम मे.एम.डब्ल्यु.एच.मुंबई यांचेकडून याच रकमेत (रुपये ३४.५६ लक्ष) करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. अशी दुरुस्ती करण्यांत यावी.

**मा.सभापती :** दुरुस्तीसह इतिवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

दिनांक १९.०.२००४ च्या सभेतील विषय क्र.९२ मध्ये मे.शहा कन्सल्टंट यांनी रुपये ३४.५६ लक्ष रुपयामध्ये काम करण्यांस नकार दिल्यास हे काम मे.एम.डब्ल्यु.एच.मुंबई यांचे कडून याच रकमेत (रुपये ३४.५६ लक्ष) करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

**विषय क्र.१०५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची दर सुची २००४-०५ नुसार रुपये १६,९७,१००/- च्या अंदाजपत्रकास दि.१२.०७.०४ रोजीच्या बैठकीत मा.स्थायी समितीची मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी निविदा सूचना क्र.२७ दिनांक १९.०७.२००४ द्वारे वार्षिक क्लोरीन गॅस पुरवठ्याच्या निविदा मागविण्यांत आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम दिनांकास दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशिल खालील प्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मे.पुष्पतारा सर्व्हीसेस, मुंबई | - | रुपये १७.२०० प्रति मे.टन |
| २. | मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद | - | रुपये १६.९९८ प्रति मे.टन |
| ३. | मे.शिरीष केमिकल्स, औरंगाबाद | - | रुपये २०,६१०/- प्रति मे.टन |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदेमधील सर्वात कमी दर हा मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांचा रुपये १६,९९८/- प्रति मे.टन असा असून पुरवठा हा दोन निविदा धारकामार्फत घेण्याचे प्रस्तावित असल्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचे निविदाधारक मे.पुष्पतारा सर्व्हीसेस मुंबई यांना दराबाबत विचारणा करण्यांत आली असता त्यांनी कमीत कमी दर रुपये १६,९९८/- टन या दरात पुरवठा करण्यांस तयार असल्याची स्विकृती सादर केली होती. कमीत कमी दरात वाटाघाटी करणेसाठी दोन्ही निविदा धारकांस दिनांक ११.१०.०४ नुसार पत्र देण्यांत आले होते.

दिनांक १४.१०.२००४ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात वाटाघाटी करण्यांत आल्या. त्यास मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांचे श्री.बसवराज मंगरुळे हे उपस्थित होते. वाटाघाटीमध्ये त्यांनी प्रति मे.टन रुपये २५/- असा दर कमी केला व पुरवठा दर रुपये १६,९७३/- प्रति मे.टन असा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण खात्याचे सध्याचे पुरवठा दराचे पुरावे दिला. दराच्या समर्थनाथ त्यांनी मे.फोनिक्स केमिकल्स यांनाच द्यावा अशी विनँी केली.

त्याचप्रमाणे पुरवठा हा विनाखंड देण्याचे हमीपत्र सादर करण्याचे मान्य केले असून पुरवठा वेळेवर न झाल्यास महानगरपालिकेमार्फत बाजार भावाने खरेदी झाल्यास फरकाची रक्कम सुरक्षा ठेव रक्कमेतून वळती करावी असेही स्विकृत केले आहे.

सदरच्या अटी व शर्तीस मा.आयुक्त महोदय यांनी शिफारस केली असून दराच्या वाटाघाटी दरम्यान रुपये २५/- प्रति मे.टन कमी केलेल्या दरास स्विकृतीस्तव शिफारस केली असून प्रस्ताव स्थायी समिती समोर सादर करणे बाबत सुचित केले आहे.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण केंद्रावरील वार्षिक क्लोरीन पुरवठ्याच्या रुपये १६,९७३/- प्रति मे.टन हया दराची निविदा स्थायी समितीच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या क्लोरीन गॅस पुरवठ्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.फोनिक्स केमिकल्स, औरंगाबाद यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार रुपये १६,९७३/- प्रती मे.टन हया दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०६ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या जलशुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या रसायनांपैकी वार्षिक तुरटी पुरवठ्या करिता रुपये १४.४२ लक्ष किमतीचे अंदाजपत्रकास दिनांक १२.०७.०४ च्या स्थायी समिती बैठकीत मान्यता प्राप्त झालेली आहे.

त्यानुसार निविदा सूचना क्र.२४/०४ दिनांक १९.०७.२००४ नुसार निविदा मागविण्यांत आल्या असता प्राप्त चार निविदामध्ये खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | एम.एस.एस.आय.डी.सी., औरंगाबाद | - | रु.२११९.०० प्रति मे.टन |
| २. | निया डीस्ट्रीब्युटर्स, जळगांव | - | कागद पत्रा अभावी निविदा उघडली नाही. |
| ३. | मे.विमल ट्रेडींग कं.जळगांव | - | रुपये १९९०.०० प्रति मे.टन |
| ४. | मे.शिव केमिकल्स, शेवगांव | - | रुपये १८९५.०० प्रति मे.टन |

वरीलप्रमाणे प्राप्त दरांपैकी सर्वात कमी दराची मे.शिव केमिकल्स, शेवगांव यांच्या निविदा दराच्या मंजूरीसाठी मा.आयुक्तांनी दि.०७.१०.२००४ रोजी शिफारस केली असून सदरची निविदा दर रुपये १८९५.०० प्रति मे.टन दराने खरेदी करणेच प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**<u>संवाद :-</u>**

**मा.सभापती :** सर्वानुमते मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी जलशुध्दीकरण केंद्र फारोळा येथे शुध्दीकरण प्रक्रियेत आवश्यक असणाऱ्या तूरटी पुरवठ्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच रुपये १८९५.०० प्रति मे.टन या दराची मे.शिव केमिकल्स, शेवगांव यांची निविदा स्विकारणेच्या सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०७ :**

प्रकल्प संचालक, यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहर स्वच्छतेच्या कामात रहिवासीयांचा सहभाग मिळविण्याच्या उद्देशाने खालीलप्रमाणे योजना सादर करण्यांत येत आहे. सदर योजना प्रत्येक विभागात प्रायोगिक सदर योजना प्रत्येक विभागात प्रायोगित तत्वावर एका कॉलनीत सुरु करण्यांत यावी. यासाठी शहरातील बेरोजगार युवकांच्या सेवा सहकारी संस्थाची यादी विभागीय कार्यालयांमध्ये महानगरपालिका तर्फे देण्यांत येईल. साधारणत: २०० कुटूंबासाठी सदर योजना राबविण्यांत येईल. एका कॉलनीत एका बेरोजगार युवकांच्या सेवा सहकारी संस्थेस काम देण्यांत यावे.

**<u>बेरोजगारयुवक सेवा सहकारी संस्थेची जबाबदारी :</u>**

१. ज्या कॉलनीचे स्वच्छतेचे काम बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेस देण्यास येईल. त्या कॉलनीतील सदस्य होणाऱ्या कुटूंबातील ओला व सुका कचरा पॉलीथीन बॅग मध्ये ठेवून बॅग स्टॅपलरच्या सहाय्याने बंद करुन दररोज (रविवारसह) सकाळी ९ वाजेपर्यंत जमा करुन बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेच्या मालकीच्या दोन डस्ट बीन्समध्ये नेऊन टाकणे.
२. दररोज कचरा नेतांना नवीन रिकामी पॉलीथीन बॅग त्या कुटूंबास देणे.
३. बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेच्या प्रतिनिधीस संस्थेतर्फे ओळखपत्र, हँड ग्लोज टॉय शुज गणवेश देण्यांत यावा.
४. दोनशे कुटूंबांसाठी दोन प्रतिनिधी काम करतील.

**<u>योजनेत सहभागी होणाऱ्या कुटूंबाची जबाबदारी :</u>**

१. ओला व सुका कचरा वेगवेगळ्या पॉलीथीन बॅगमध्ये जमा करुन दाराबाहेर ठेवणे. कचरा रस्त्याच्या काठावर ठेवण्याची परवानगी असणार नाही.
२. सदस्य कुटुंबाने दरमहा रु.३०/- शुल्क बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेस देणे बंधनकारक राहील. त्याबद्दल संस्थेकडून पावती देण्यांत येईल.
३. संस्था व कॉलनीच्या व्यवस्थापन समिती प्रमुखामध्ये ११ महिन्याचा करार करावा.
४. ओल्या कचऱ्यापासून बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेतर्फे गांडूळ खत निर्मिती व सुका कचऱ्या पासून रिसायकल करता येण्यासारख्या वस्तू तयार करण्यामुळे संस्थेस आर्थिक उत्पन्न मिळेल. त्यासाठी यंत्रणा उभी करण्यांस बँकेकडून कर्ज मिळणे शक्य आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील दहा ते पंधरा युवकांना कर्ज उपलब्ध होवू शकेल त्यांच्या संयुक्त प्रयत्नाने यंत्रे, डस्टबीन्स, पॉलीथीन बॅग्न खरेदी करणे शक्य होईल. शहरात महानगरपालिकेतर्फे अशा सहा बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थाना लोकसेवा केंद्र मंजूर करण्यांत आलेले आहेत. त्यांना देखील या योजनेत समावून घेण्यांत येईल. कोणत्याही

नोंदणीकृत बेरोजगार युवक सेवा सहकारी संस्थेस, महिला मंडळ, महिला बचत गट अथवा स्वयंसेवी संस्थेस या योजनेत सहभागी होता येईल.

**संस्थेस अपेक्षित खर्च :**

| तपशिल | द.म.खर्च रु. | व्यक्ती/ संख्या | वार्षिक खर्च रु. |
|---|---|---|---|
| दोन प्रतिनिधीचे मानधन | रु.२,०००/- | २ | २४,०००/- |
| दोन प्रतिनिधीचे गणवेश शुज टाय इ. | ----- | २ | २,०००/- |
| पॉलीथीन बॅग्ज रु. | ३,०००/- | ४०० बॅग्ज द.म. | ३६,०००/- |
| डस्ट बीन | ----- | २ | १,०००/- |
| **एकूण** | | | **६३,०००/-** |

१. गांडूळ खत निर्मिती पासून मिळणाऱ्या उत्पन्ना व्यतिरिक्त .............
२. दरमहा रु.३०/- प्रमाणे २०० कुटूंबापासून मिळणारे शुल्क रु.६,०००/- वार्षिक उत्पन्न रु.७२,०००/-
३. वार्षिक खर्च रु.६३,०००/-
४. निव्वळ नफा रु.७५०/- द.म.वार्षिक नफा रुपये ९,०००/-

प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :-**

**श्री.संजय शिरसाठ :** प्रस्ताव चांगला आहे. अंमल बजावणी केव्हापासून होणार आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर ताबडतोब कार्यवाहीस सुरुवात होईल. महापालिकेला या प्रस्तावाबाबत आर्थिक अडचण नाही.

**मा.आयुक्त :** धोरण म्हणून मान्य केले तर काही वृत्तपत्रात जाहिर प्रगटन देण्यांत येईल. तसेच सहा ठिकाणी लोकसेवा केंद्र मनपाचीच चालू आहे. त्यांचे मार्फत सुध्दा कार्यवाही करता येईल व जाहिरातीनुसार काही संस्था आल्या व आपल्या पध्दतीने पात्र ठरल्यास त्यांना देण्यांत येईल. या प्रस्तावाचा पाठपुरावा करुन मी स्वत: व प्रकल्प संचालक आम्ही तयार केलेला आहे. मंजूरी दिल्यानंतर कार्यवाही करण्यांत येईल.

**श्री.संजय शिरसाठ :** प्रस्ताव चांगला आणलेला आहे. त्याबद्दल मा.आयुक्तांचे सभागृहातर्फे अभिनंदन करण्यांत येते.

**मा.सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे. याबाबत तात्काळ पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहर स्वच्छतेच्या कामात रहिवाशांचा सहभाग मिळविण्याच्या उद्देशाने सादर करण्यांत आलेली योजना प्रस्तावातील अटी-शर्ती नुसार राबविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. तसेच सदर योजना प्रत्येक विभागात प्रायोगित

तत्वावर एका कॉलनीत सुरु करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१०८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मनपा आस्थापनेवर वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गात दैनिक वेतनावर कर्मचारी काम करीत आहे. सद्यः स्थितीत वर्ग-३ कर्मचाऱ्यांना रु.१००/- व वर्ग-४ कर्मचाऱ्यांना रु.८०/- एवढे दैनिक वेतन देण्यांत येते.

दिनांक १६ ऑक्टोंबर २००३ रोजीच्या शासन निर्णयात वर्ग-३ कर्मचाऱ्यांना रु.१६३/- व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना रु.१३७/- एवढे दैनिक वेतन देणे बाबत निश्चित केले असून मनपा कर्मचाऱ्यांना उक्त प्रमाणे दैनिक वेतनात वाढ करावयाची झाल्यास सन २००४-०५ या आर्थिक वर्षात रु.४३ लाख एवढी कर्मचाऱ्यांच्या वेतनात वाढ होत असल्याने रु.४३ लाखाचे वाढीव तरतूदीसह वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु.१६३/- व वर्ग-४ संवर्गातील रु.१३७/- दैनिक वेतनाचा दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

<u>संवाद :-</u>

**श्री.काशिनाथ कोकाटे :** प्रशासनातर्फे प्रस्ताव ठेवण्यांत आलेला असून दोन मुद्यांवर चर्चा होणे आवश्यक आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षात ठेवलेल्या तरतूदी मध्ये ४३ लक्षचा बोजा वाढणार आहे. ४३ लक्षची रक्कम ही कोणत्या महिन्यापासून ग्राह्य धरण्यांत आलेली आहे. दुसरा मुद्दा असा आहे की, महापालिकेच्या अस्थापनेवर लघुलेखक (उच्चश्रेणी) पद रिक्त झालेले आहे. पद रिक्त होवून जवळ पास १ वर्ष होत आहे. यापुर्वी या महापालिकेत फक्त स्थायी समिती व सर्वसाधारण सभांचेच कामकाज चालू होते. सन २००१ नंतर जवळपास ४ प्रभाग समित्या तसेच ४ विषय समित्यांची स्थापना करण्यांत आली. या सर्वच सभांचे इतिवृत्त नोंद करुन ते लिहून देण्यासाठी महापालिकेच्य अस्थापनेवर नगर सचिव विभागात एक दैनिक वेतनावर लघु टंकलेखक पदावर श्री.के.एस.नवले नावाचे कर्मचारी कार्यतर आहे. त्यांचे वेतन बघितले तर त्यांना रु.१००/- दैनिक वेतन देण्यांत येते. श्री.नवले यांचे बरोबर असलेले इतर कर्मचारी होते ते सेवेत कायम झालेले आहे. वेतनश्रेणी देण्यांत आलेली आहे. म्हणजे एखादा कर्मचारी रात्र आणि दिवस काम करीत असेल तरी कमीच पडते. अशा परिस्थतीत सुध्दा काम करीत असतांना त्या कर्मचाऱ्यांना न्याय मिळत नाही. जेव्हा सर्व कर्मचाऱ्यांना बाबतीत आपण विचार करतो तेव्हा एखाद्या कर्मचारी तो बोलत नाही म्हणून त्यांचे बाबतीत प्रशासन विचार करीत नाही. लघुलेखक (उच्च श्रेणीतील) पद रिक्त आहे. पद निर्माण करण्याची आवश्यकता नाही ते पद भरले तर खालचा कर्मचारी नियुक्त करता येईल. जे की, श्री.नवले यांना घेता येईल तसा उल्लेख करावा. तसेच प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने ऑक्टोंबर २००३ पासून अस्थायी दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दैनिक वेतन लागू केलेला आहे. याही मनपातील कर्मचाऱ्यांना रु.१६३/- व रु.१३७/- लागू करावा. कुठल्याही प्रकारची हरकत नसावी असे माझे मत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** रिक्त असलेल्या स्टेनोच्या पदावर श्री.नवले यांची नियुक्ती करण्यांत यावी. दैनिक वेतनात वाढ करण्याचा प्रस्ताव समोर आलेला आहे. यात

शासन निर्णय हा १६ ऑक्टोंबर २००३ चया आहे. एवढा उशीरा प्रस्ताव सादर करण्यांचे कारण काय? किती कर्मचाऱ्यांना याचा फायदा होणार आहे. याबाबत काहीच उल्लेख या प्रस्तावात नाही. आणि ते कर्मचारी कोणत्या वर्षात त्यांची नियुक्ती झालेली आहे. प्रशासनाने मत व्यक्त करावे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** हा प्रस्ताव स.सदस्यांनी ठेवलेला नाही. प्रशासनाचा प्रस्ताव आहे. प्रस्ताव मंजूर करत असतांना लेखा विभागाचा सल्ला घेतला असेल. तरतूद कशी उपलब्ध करावयाची याचा सल्ला घेतला असेल. प्रशासनाचे अधिकारी येथे आहे. उपआयुक्त (प्र.) किंवा मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त-१ :** महापालिकेच्या अस्थापनेवर वर्ग-३ संवर्गात अस्थायी एकूण ४४ कर्मचारी तर वर्ग-४ संवर्गात १९४ कर्मचारी कार्यरत आहे. जो शासन जी.आर.प्रस्तावात नमूद केलेला आहे. तो सहाय्यक कामगार आयुक्त यांचेकडून मागविलेला आहे. त्यानुसार हा दैनिक वेतनाचा प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** माझ्या प्रश्नाचा खुलासा मिळत नाही. शासनाचा १६ ऑक्टोंबर २००३ चा निर्णय असून हा प्रस्ताव उशीरा येण्याचे कारण काय तसेच कर्मचारी कार्यरत आहे. किती कर्मचाऱ्यांना याचा बेनिफीट मिळणार आहे.

**सहाय्यक आयुक्त -१ :** दैनिक वेतनावरील कर्मचारी यांनी दैनिक वेतनास वाढ करावी म्हणून विनंती निवेदन दिले होते. त्यानुसार पाठपुरावा करुन हया शासन निर्णयाच्या आदेशाची प्रत मिळविली आहे. त्यानुसार प्रस्ताव ठेवण्यांत आलेला आहे.

**मा.सभापती :** प्रस्ताव कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आहे. त्यांच्या दैनिक वेतनात वाढ होणे आवश्य आहे. परंतू केव्हापासून द्यायची किंवा देणे गरजेचे आहे. याचा प्रस्तावात उल्लेख नाही असे स.सदस्यांची सूचना आहे. ४३ लक्ष वाढीव रक्कम कशी येते.

**सहाय्यक आयुक्त-१, श्री.माणिक साळवे :** लेखा विभागाकडून वाढीव रक्कम काढण्यांत आलेली आहे. त्यानुसारच नमूद केले आहे. ऑक्टोंबर २००३ पासून प्रस्तावातील दैनिक वेतन लागू केल्यास किती आर्थिक बोजा पडणार आहे.

**मुख्य लेखाधिकारी :** ऑक्टोंबर २००३ पासून जरी कामगांराना दैनिक वेतनवाढ केलेली असली तरी सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दिनांक २०.०५.२००४ रोजी परिपत्रक पारित केलेले आहे. मनपातील कर्मचाऱ्यांना प्रस्तावातील दैनिक वेतनात वाढ द्यावयाची झाल्यास रु.४३ लक्ष वाढीव खर्च अपेक्षित आहे. वर्ग-३ संवर्गात ४४ कर्मचारी तर वर्ग-४ संवर्गात १९४ कर्मचारी आहेत.

**श्री.संजय शिरसाठ :** वाढीव तरतुद ही प्रशासनानेच करुन द्यावयास पाहिजे होती.सभागृहाकडून वाढीव तरतुद करुन घेणे बरोबर नाही.शासन निर्णय मनपात येईपर्यंत वर्षाचा कालावधी झालेला आहे.आता तरतुद कोठून करावयाची हा प्रश्न निर्माण होतो हे बरोबर नाही.उशीरा का प्रस्ताव आणलेला आहे.सभागृहाचे कशाच्या आधारे तरतुद करावयाची की कोणत्या वॉर्डातील विकास कामे कमी करणार आहे हे ठरवून घ्यावे तरतूद उपलब्ध करुन घ्यावी.

**श्री.काशीनाथ कोकाटे :** कर्मचाऱ्यांच्या भावनेशी हे सभागृह सहमत आहे.दैनिक वेतनात वाढ होणे आवश्यक आहे.यात शंका नाही.तसेच कामगार अधिकारी पद या महानगरपालिकेत आहे का त्याची या प्रस्तावाबाबतची भूमिका काय आहे

त्याचे काम काय आहे ते काय काम करतात याचा सुध्दा खुलासा होणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :** कामगार अधिकारी हे पद नेहमीसाठी काढून टाकण्यात आले त्यावर माझी सही झालेली आहे. ४३ लक्षची वाढीव तरतुद करावी लागणार आहे.हे प्रशासनाचे मत ठाम आहे.माझ्याकडेही हा प्रस्ताव सादर झालेला होता.आताच मुख्यलेखाधिकारी यांनी तोच खुलासा केला आहे.ज्या तारखेपासून हा प्रस्ताव मंजुर करु त्या तारखेपासून करु शकतो.आधीपासूनची रक्कम पाहीजे असेल तर थांबावे लागेल.

**श्री.संजय शिरसाठ :** तरतूद कशी करावयाची,कोठून करावयाची हे सर्व प्रशासनास माहित आहे.सभागृहाच्या भावना लक्षात घेवून १ एप्रिल २००४ पासून दैनिक वाढ करण्यात यावी. फरकाची रक्कम सुध्दा लवकरच देण्याची कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** ठिक आहे.प्रशासनाचे सुध्दा हेच मत आहे.आर्थिक वर्ष हे एप्रिल २००४ ते मार्च २००५ पर्यंत आहे.जो प्रस्ताव सादर झालेला आहे त्या प्रस्तावात शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्ताव मंजुर करण्यात येतो व १ एप्रिल २००४ पासून दैनिक वेतनात वाढ करण्यास व रुपये ४३ लाखाची वाढीव तरतुद सुधारीत अंदाजपत्रकात करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.दिवाळी पुर्वी वेतनातील फरकाची रक्कम देण्याची कार्यवाही व्हावी.तसेच लघुटंकलेखक श्री.के.एस.नवले यांची शैक्षणिक पात्रता विचारात घेवून दिनांक २-८-२००४ रोजीच्या स्थायी समितीमध्ये निर्णय घेण्यात आलेला होता त्या बैठकीतील घेतलेल्या निर्णयाचा संदर्भ प्रशासनाने घ्यावा.गेल्या ७ वर्षापासून त्यांनी केलेली सेवा विचारात घेता व लघुटंकलेखक या पदावर त्यांची निवड समितीने केलेली निवड ग्राहय धरुन लघुटंकलेखक (उच्चश्रेणी) लघु-लेखक टंकलेखकचेही पद रिक्त असेल त्या पदावर कायम स्वरुपी नेमणूक करण्यास पुनश्च आदेश देण्यात येत आहे.

**उपआयुक्त (प्र.)** : लघुलेखक (उच्च श्रेणी) एक पद रिक्त आहे.या संदर्भात जेष्ठता यादी प्रसिध्द केलेली आहे.कमिटीच्या मार्फत लवकरच कार्यवाही होवून पुढील होणाऱ्या रिक्त पदावर विचार करण्यात येईल.,

**श्री.काशीनाथ कोकाटे :** प्रशासनाने खुलासा केलेला आहे.जेष्ठता यादी लावण्यात आलेली आहे.त्यात वेगळा आक्षेप असा आहे की,दैनिक वेतनावरील लघुटंकलेखक श्री. के.एस.नवले यांचे बरोबर असलेले रिक्षाचालक यांना कायम स्वरुपी सेवेत घेतलेले आहे.परंतु श्री.के.एस.नवले यांना सेवेत कायम स्वरुपी सामावून घेण्याबाबत प्रशासनाने डोळेझाक केलेली आहे हे स्पष्ट करतो.म्हणून ही बाब आता प्रशासनाच्या लक्षात आणून दिलेली आहे.आता प्रशासनाने वेळ काढू धोरण स्विकारु नये.त्यांना कायम स्वरुपी सेवेत वेतनश्रेणीवर घेण्याबाबत प्रशासनाकडून उशिर होत आहे.तरी वेळा आता येऊ देवू नये असे प्रशासनास आदेश करावे व त्यांना कायम स्वरुपी वेतन श्रेणीवर घेण्यात यावे.

**मा.सभापती :** उपआयुक्त (प्र.) यांना आदेशित करण्यात येते की,श्री.के.एस.नवले यांना रिक्त असलेल्या पदावर कायम स्वरुपी वेतनश्रेणीवर सेवेत घेण्याबाबत तात्काळ कार्यवाही करावी कारण ते करीत असलेल्या विभागातील कामाचा व्याप लक्षात घेता व त्यांनी केलेली मागिल ७ वर्षाची सेवा ही चांगलीच आहे.

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मनपा अस्थापनेवरील वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गात दैनिक वेतनावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना दैनिक वेतनात वाढ करण्याबाबतच्या शासन निर्णयानुसार वर्ग- संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु.१६३/- व वर्ग-४ संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १३७/- दैनिक दिनांक ०१ एप्रिल २००४ पासून लागू करण्यास व सुधारीत अर्थसंकल्पात रु. ४३ लाखाचे वाढीव तरतुदीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.थकबाकीची रक्कम दिवाळीपुर्वी अदा करण्यात यावी.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**- : ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. १०९:**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वार्षीक ब्लिचिंग पावडर खरेदी करीता वर्ष २००४-०५ मधील रसायन खरेदी तरतुदी मधून रुपये १६,५०,००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांच्या दि. १७-६-२००४ च्या शिफारशीनुसार दि.१२-७-०४ च्या स्थायी समिती सभेत ठराव क्र. ४१ अन्वये मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार महापालिका निविदा सुचना लेखा २७/२००४ दिनांक १९-७-२००४ नुसार निविदा मागविण्यात आल्या.निविदा विक्रीच्या शेवटच्या दि.२९-७-०४ रोजी नऊ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या शेवटच्या दिनांक ३०-८-०४ रोजी सात दर भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या.त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.फोनिक्स केमिकल्स,औरंगाबाद | रु. १३,३५८.०० टन |
| २) | मे.शिव केमिकल्स,शेवगांव | रु. १२,४००.०० टन |
| ३) | मे.निशा डिस्ट्रीब्युटर्स,जळगांव | रु. १३,८००.०० टन |
| ४) | मे.शिरीष केमिकल्स,औरंगाबाद | रु. १२,९६०.०० टन |
| ५) | मे.दिपक लॅब,नांदगाव | रु. १४,२००.०० टन |
| ६) | मे.बालाजी केमिकल्स,पुणे | निविदा उघडण्यात आली नाही. |
| ७) | मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज,कोटा | रु. ११,८८०.०० टन |

वरील प्राप्त निविदांमध्ये मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज,कोटा यांचा दर रुपये ११,८८०.००/- मे.टन हा सर्वात कमी आहे.ब्लिचिंग पावडरचा पुरवठा दोन पुरवठा धारकांमार्फत घेण्याचे प्रस्तावित असल्यामुळे निविदा धारकामधील दुसऱ्या व तिसऱ्या क्रमांकाचे कमीत कमी दराच्या निविदा धारकांना सर्वात कमी दर रुपये ११.८८०/- मे.टन या दराने पुरवठा करणे बाबत विचारणा केली असता क्रमांक दोनचे पुरवठाधारक मे.शिव केमिकल्स यांनी या दरावर पुरवठा करण्यास असमर्थता व्यक्त केली व क्रमांक तीनचे पुरवठाधारक मे.शिरीष केमिकल्स यांनी प्रतिसाद दिला नाही.

वरील करणामुळे पुरवठा हा सर्वात कमी दराचे एकाच निविदाधारक मे. क्लोरोकेम इंडस्ट्रीज,कोटा यांचे रुपये ११,८८०.००/- मे.टन या दराने खरेदीच्या प्रस्तावास मा. आयुक्तांनी शिफारस केली आहे.

मा.आयुक्तांचे शिफरशीनुसार वार्षीक ब्लिचिंग पावडर खरेदीच्या मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज कोटा यांच्या रुपये ११,८८०.००/- मे.टन या दराने खरेदी करणेचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री.संजय शिरसाठ :** पाणी पुरवठयाचे प्रत्येक बैठकीत ऐनवेळीच का प्रस्ताव सादर होतात.स्थगित करावा.

**कार्यकारी अभियंता (पापु.) :** मागच्या वेळेपेक्षा या वेळेस दर कमी झालेले आहेत.यात मनपाचा फायदा आहे. प्रस्ताव मंजुर करावा.

**मा.सभापती :** ठिक आहे.प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेकरीता वार्षिक ब्लिचिंग पावडर खरेदी करीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच रुपये ११,८८०/- मे.टन या दराची मे.क्लोरोकेम इंडस्ट्रीज,कोटा यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११०:**

कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा विभाग यांनी औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र,फारोळा येथील दोन गृह दुरुस्ती करतांना रुपये १३,९२,७६७/- चा प्रस्ताव मा.आयुक्त यांचे शिफारशीनुसार दि. १३-०८-०४ च्या स्थायी समितीच्या बैठकीत मंजुर करण्यात आला आहे.त्यानुसार दुरुस्ती अंतर्गत नोझल्स पुरवठयाच्या कामाकरीता महानगरपालिका निविदा सुचना /लेखा / ५५ /२००४ दि.१७-८-०४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा विक्रीच्या दि. २५-०८-०४ या शेवटच्या दिनांकास नोझल्स पुरवठया करीता चार निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या शेवटच्या दिनांक ३०-८-०४ रोजी तीन निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदातील दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.दास प्लास्टीक,औरंगाबाद | रु. ११,८१,४००/- |
| २) | मे.विकी असाशिएटस,औरंगाबाद | निविदा उघडण्यात आली नाही. |
| ३) | मे.विजय एंटरप्रायजेस,औरंगाबाद | रु.११,१८,४००/- |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेमध्ये मे.विजय एंटरप्रायजेस,औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून हे दर अ.प.रकमेपेक्षा ०.२९४% कमी आहेत.सदरच्या दरात पुरवठा घेण्याची शिफारस मा.आयुक्तांनी केली आहे.

करीता मे.विजय एटंप्रायजेस,औरंगाबाद यांचा सर्वात कमी म्हणजेच रुपये ११,१८,४००/- या दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेअंतर्गत जलशुध्दीकरण केंद्र,फारोळा येथील दोन गाळणीगृह दुरुस्तीच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ..रकमेपेक्षा ०.२९४% कमी दराची (रु. ११,१८,४००/-) निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११:**

कोकणवाडी,क्रांतीनगर,सुयोग कॉलनी येथील नाली दुरुस्ती करणे व पुनर्बांधणी करणे या कामाचे अंदाजपत्रक रुपये २,९४,९००/- चे असून सदर काम तातडीने करणे आवश्यक असल्याने मा.आयुक्तांनी सदर काम मु.प्रा.मनपा अधिनियम ५९४९ चे कलम ६७

(३) (यी) नुसार तातडीने सुरु करण्यास मंजुरी दिलेली आहे.त्यानुसार उपलब्ध गुत्तेदार श्री.आर.बी.रुड समुद्र यांच्याशी करारनामा करुन दिनांक १४-०६-०४ रोजीच्या कार्यादेशाप्रमाणे काम सुरु करण्यात आलेले आहे.

अंदाजपत्रकात गटारीच्या भिंतीकरीता आवश्यक खोदकामाची खोली १.२० मी.एवढी ठेवण्यात आलेली आहे.परंतु प्रत्यक्ष बांधकाम करतांना फौडेंशन करीता आवश्यक असलेला १.२० मी.खोलीवर न मिळाल्यामुळे ३.००मी.एवढया खोलीपर्यंत बांधकाम करावे लागले आहे. त्यामुळे खोदकाम एम-१५ कॉंक्रीट व स्टील याच्या परिमाणात दुप्पटीने वाढ झालेली आहे.त्यामुळे प्रस्तावित गटारींचे बांधकाम करण्यास रु. ४,९०,७००/- एवढा खर्च अपेक्षीत आहे.त्याप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक रु. ४,९०,७००/- चे तयार करण्यात आलेले आहे.

आतापर्यंत प्रस्तावित कामांपैकी ५०% एवढेच काम पूर्ण झालेले आहे.गटारीतील पाणी व्यवस्थितरित्या वाळूत जाण्यासाठी उर्वरीत बांधकाम करणे जरुरीचे आहे.त्यानुसार रु. ४,९०,७००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास व श्री.आर.बी.रुडसमुद्र यांचे मार्फत काम करणेकरीता मंजुरी मिळणेकरीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोकणवाडी,क्रांतीनगर,सुयोग कॉलनी येथील नाली दुरुस्ती करणे व पुनर्बांधणी करणे या कामाकरीता गटारींच्या भिंतीकरीता आवश्यक खोदकामाची खोली प्रत्यक्ष बांधकाम करतांना फौडेंशन करीत १.२० मी. ऐवजी ३.०० मी.एवढया खोलीपर्यंत बांधकाम करावे लागल्याने सुधारीत अंदाजपत्रक रु. ४,९०,७००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास व श्री.आर.बी.रुडसमुद्र यांचे मार्फत काम करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२:**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,प्रभाग क्र. २७ मो.फुलेनगर (उस्मानपुरा) स्लम येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम सन २००२-०३ या आर्थिक वर्षामधून प्रस्तावित होते.सदर कामाच्या अंदाजपत्रकास रितसर मान्यतेनंतर व कामाचा कार्यादेश दिल्यानंतर चालु करण्यात आले आहे.

तथापी फुलेनगर स्लम भागातील गल्ल्या अतिशय अरुंद असल्यामूळे आणि त्यातच नागरीकांनी पाणी भरणेकरीता रस्त्यावरच नळाचे खड्डे खोदले असल्यामुळे या रस्त्यावर डांबरीकरणाची कोणतीच मशिनरी जात नाही.त्यामुळे या ठिकाणी डांबरीकरण शक्य नाही.

करीता या ठिकाणी डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीट रस्ते तयार करण्यात यावेत अशी मागणी नगरसेवक तथा माजी महापौर श्री. प्रकाश निकाळजे व स्थानिक नागरीकांनी केली आहे.

या ठिकाणी डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीट रस्ते करणे करीता रुपये १२.०० लाख इतका खर्च अपेक्षीत आहे.या करीता लागणारी तरतुद खालील प्रमाणे कळविता येऊन शकेल व उपलब्ध तरतुदींच्या मर्यादेपर्यंत चालू आर्थिक वर्षात सदर काम करता येईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | तरतुद | पृष्ठ | अ.क्र. | प्रस्ताव मंजुरीस्तव |
|---|---|---|---|---|---|
| १) | फुलेनगर स्लम येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे.(डांबरीकरणासाठी राखून ठेवलेली स्पीन तरतुद | ३.० लक्ष | ९९ | ६ (२) | डांबरीकरणाचे काम रद्द करुन कांक्रेट करणे व लेखाशिर्ष बदलणे करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | वळती करुन ) | | | | |
| २) | प्रभाग क्र. २७ स्लम भागात कांक्रीट रस्ते तयार करणे. | २.० लाख | ११२ | १२ (२८) | |
| ३) | प्रभाग क्र. २७ एकनाथनगर स्लम भागात अंतर्गत कॉंक्रटींग करणे | २.० लाख | ११३ | १२ (१२) | एकनाथनगर ऐवजी फुलेनगर स्लम येथे कॉंक्रेटींग करणे.प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. |
| | **एकूण** | **७.० लाख** | | | |

करीता मो.फुलेनगर (उस्मानपूरा) स्लम येथे डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीट रस्ते करणे व त्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे लेखाशिर्ष बदलणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. २७ मो.फुलेनगर (उस्मानपुरा) स्लम येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे काम फुलेनगर स्लम भागातील गल्ल्या अतिशय अरुंद असल्यामुळे या रस्त्यावर डांबरीकरणाची कोणतीच मशिनरी जात नाही,त्यामूळे या ठिकाणी डांबरीकरण शक्य नाही,म्हणून या ठिकाणी डांबरीकरणाऐवजी कॉंक्रीट रस्ते करणे करीता रुपये १२.०० लाख तरतुदीच्या मर्यादेपर्यंत चालू आर्थिक वर्षांत काम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११३:**

सहाय्यक संचालक नगररचना,महानगरपालिका,औरंगाबाद प्रस्ताव सादर करतात की,दिनांक ८-१-९९ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेत विषय क्र.४५७/२४ नुसार मौजे उस्मानपुरा सर्व्हे नंबर ६ करीता मंजुर रेखांकातून जाणाऱ्या २४.०० मीटर विकास योजना रस्त्यात बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा मावेजा रोख स्वरुपात न देता मंजुर रेखांकनाचे खुल्या जागेच्या विहित टक्केवारीत सवलत देवून त्यातील २५०.०० चौ.मी. क्षेत्रांचा भुखंड संबंधित मुळ जमिन मालकास निवासी वापरास्तव देण्यास मंजुरी देण्यात आली होती.

तथापी दिनांक १३-११-२००१ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीमध्ये उक्त ठराव रद्द करण्याबाबत सविस्तर प्रस्ताव प्रशासनामार्फत ठेवण्यात आला.या प्रस्तावासंदर्भात पुर्नतपासणी करुन टिप्पणी सभागृहासमोर ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले.त्या अनुषंगाने सविस्तर टिप्पणी तत्कालीन आयुक्तांनी सभागृहासमोर ठेवली व या प्रकरणी दिनांक २७-३-२००२ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेतील विषय क्र. १०४/२२ नुसार सभागृहात झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मौजे उस्मानपुरा येथील सर्व्हे नंबर ६ मध्ये रेखांकनातील खुल्या जागेत २४.०० मीटर रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यास जितकी जागा प्रदान करण्यात आलेली आहे.तेवढीच जागा देण्यात यावी.संबंधीत व्यक्ती जागा घेण्यास तयार नसेल तर पैशाच्या स्वरुपाती संबंधित मोबदला द्यावा.प्रशासनान संबंधित व्यक्तिकडून जागा घेण्यासाठी जी कार्यवाही केली ती जशीच्या तशी ठेवून प्रदान केलेली जागा त्यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते".असा ठराव पारीत करण्यात आला.

या प्रकरणी प्रशासनातर्फे पुनश्च अधिक पडताळणी करण्यात आली.अर्जदाराने दिनांक ८-१-९९ चे ठरावाच्या संदर्भाने २५०.०० चौ.मी. ऐवजी ३९२.०० चौ.मी.क्षेत्राचे

पी.आर.कार्ड तयार करुन घेतले आहे.त्या क्षेत्रावर विकास कर आकारुन विकास परवानगी द्यावी अशी अर्जदाराची मागणी आहे.

रेखांकना अंतर्गत खुल्या जागेची मोजणी सक्षम प्राधिकरण नगर भुमापन अधिकारी,औरंगाबाद यांचेकडून करुन घेवून खुली जागा १०% पेक्षा जास्त असल्याची खात्री करुन घेण्यात आली आहे.आता आवश्यक १०% खुली जागा उपलब्ध होत असल्याने ३९२.०० चौ.मी.क्षेत्राची मिळकत पत्रिका तयार आहे.तेवढे क्षेत्र आम्हास विकास परवानगीसाठी अनुज्ञेय करावे अशी अर्जदाराची मागणी आहे.प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मौजे उस्मानपुरा सर्व्हे नंबर ६ करीता मंजुर रेखांकनातुन जाणाऱ्या २४.०० मीटर विकास योजना रस्त्यात बाधीत होणाऱ्या क्षेत्राचा मावेजा रोख स्वरुपात न देता मंजुर रेखांकनाचे खुल्या जागेच्या विहित टक्केवारी सवलत देवून संबंधीत मुळ जमीन मालकास निवासी वापरास्तव २५०.०० चौ.मी. ऐवजी ३९२.०० चौ.मी.क्षेत्राचे पी.आर.कार्ड असल्यामुळे आता आवश्यक १०% खुली जागा उपलब्ध होत असल्याने ३९२.०० चौ.मी. क्षेत्राची मिळकत पत्रिका तयार आहे.तेवढे क्षेत्र विकास परवानगीसाठी अनुज्ञेय करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये "नविन डांबरीकरण" या लेखा शिर्षाअंतर्गत अजिंक्य सोसा.राघवेंद्र हौ.सो.दत्तनगर मंजुर खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे (आर्थिक तरतुद रु. ५ लक्ष) या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

या कामाचा मोबदला स्पील ओव्हर कामा अंतर्गत सुध्दा झालेला असल्याने मनपा अर्थसंकल्प सन २००४-०५ मधील पान क्र. १३० अ.क्र.१/४ वरील तरतुद खालील कामांसाठी वळती करण्याचा व 'नविन डंबरीकरण ' ऐवजी 'नविन खडी' रस्ते असा लेखा शिर्षात बदल करणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

नवीन कामाचे नांव :- मौजे सातारा गट क्र. ५७ मधील २४ मी.रुंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे.

लेखाशिर्ष :- नविन खडी रस्ते.

आर्थिक तरतुद :- रु. ५.०० लक्ष.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,मनपा अर्थसंकल्प सन २००४-०५ मधील पान क्र. १३० अ.क्र.१/४ वरील तरतुद रु. ५.०० लक्ष मौजे साता गट क्र. ५७ मधील २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याचे खडीकरण करणे,या कामासाठी वळती करण्यास व 'नविन डंबरीकरण ' ऐवजी 'नविन खडी' रस्ते असा लेखा शिर्षात बदल करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.राजेंद्रसिंग जबिंदा यांचेकडून लेखाशिर्ष बदलणे बाबत प्रस्ताव प्राप्त झालेले असून सर्वसाधारण सभेत दि. २०-७-२००४ रोजी मान्यता मिळाल्यानुसार अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. १०४ अ.क्र.१ वरील पीर बाजार येथील जुने मार्केट सोडून नविन भाजी मंडई बांधणेच्या कामाकरीता

ठेवण्यात आलेली रक्कम रु. ५.०० लक्षची रक्कम उस्मानपुरा येथील विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाकरीता वळती करण्यात यावी,तसेच वॉर्ड क्र. ३१ बन्सीलालनगर मधील वेदांत नगर भागात फुटपाथ बांधणे,पुर्नडांबरीकरण लेखाशिर्षकातील कामाऐवजी शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षकात समावेश करणे तसेच वॉर्ड क्र. ७७ मधील विविध भागात पथदिव्यांची व्यवस्था करणेसाठीची रु. २.०० लक्ष तरतुद हिंदीभवन शहागंज निजामोद्दीन चौकात मेटल हेडलाईट बसविणेच्या कामासाठी वळती करणेस व या कामाकरीता २.५० लक्ष खर्च अपेक्षित असल्याने उर्वरीत ५० हजार इतर कामाच्या बचतीमधून तरतुद वळती करणे त्यास मंजुरी देण्यात येते.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणे अर्थसंकल्पातील पृष्ठ क्र. १०४ अ.क्र. १ वरील पीरबाजार येथील जुने मार्केट तोडून नविन भाजी विविध ठिकाणी डांबरीकरण करणे या कामाकरीता वळती करण्यास तसेच वॉर्ड क्र.३१ बन्सीलालनगर मधील वेदांत नगर भागात फुटपाथ बांधणे पुनर्डांबरीकरण लेखाशिर्षकातील कामाऐवजी शहर सौंदर्यीकरण या लेखाशिर्षकात समावेश करण्यास तसेच वॉर्ड क्र.७७ मधील विविध भागात पथदिव्यांची व्यवस्था करणेसाठीची रु. २.०० लक्ष तरतुद हिंदीभवन शहागंज निजोमोद्दीन चौकात मेटल हेडलाईट बसविणेच्या कामासाठी वळती करणेस व या कामाकरीता २.५० लक्ष खर्च अपेक्षित असल्याने उर्वरीत ५० हजार इतर कामाच्या बचतीमधून तरतुद वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | नविन /सुधारीत कामाचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद. | रक्कम. |
|---|---|---|---|
| २५ | पीरबाजार येथील जुने मार्केट तोडून नविन भाजी मंडई बांधणे.रु. ५.०० लक्ष (पृष्ठ क्र.१०४ अ.क्र.१) | उस्मानपुरा येथे विविध ठिकाणी डांबरीकरण करणे. | ५.०० लक्ष |
| ३१ | वेदांतनगर क्रिडा संकुलासमोर फुटपाथ बांधणे (अ.क्र.४ पान क्र. १३८ अ.क्र.६७ पान क्र.१४१) | पुनर्डांबरीकरण या लेखाशिर्षका ऐवजी शहर सौंदर्यीकरण या लेखा शिर्षकात समाविष्ठ करणे. | |
| ७७ | प्रभाग क्र. ७७ अंतर्गत विविध भागात पथदिव्यांची व्यवस्था करणे.(पान क्र. १८० अ.क्र.५७) रु. २.०० लक्ष | हिंदी भवन शहागंज निजामोद्दीन चौकात उंच सिमेंट पोलवर मेटल हेडलाईट बसविणे. | २.५० लक्ष |
| | | (या कामाकरीता २.५० लक्ष खर्च अपेक्षीत असल्याने उर्वरीत ५० हजार रुपये इतर कामाच्या बचती मधून तरतुद वळती करण्यात यावी.) | |

**मा.सभापती :** श्री.एस.बी.शहाणे,प्रभारी विभागीय अधिकारी विभाग क्र. ७ यांनी देयय वेतनवाढ थांबविण्यासंबंधी कार्यालयीन आदेश रद्द करण्याबाबत अपील सादर केलेले आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** यावर प्रशासनाचे मत घ्यावे.प्रशासनाने कार्यवाही करायची व सभागृहाने वेतनवाढ चालू करण्याबाबत शिफारस करायची हे बरोबर होणार नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** याबाबतीत पुढील बैठकीत प्रशासनाच्या वतीने सविस्तर माहिती दिली जाईल.त्यानंतरच निर्णय घेण्यात यावा.

**मा.सभापती :** ठिक आहे.पुढील बैठकीत माहिती सादर करावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
स्थायी समिती,महानगरपालिका,
औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद.*

**दिनांक ४-११-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.व क्र.२०) इतिवृत्त. गुरुवार दिनांक ०४ नोव्हेंबर २००४ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.०० वाजता "वंदे मातरम्" या गिताने सुरु झाली.या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री.भाऊसाहेब पुंडलिक ताठे.
२) श्री.शिरसाठ संजय पांडुरंग.
३) सौ.शाहीन जफर महेमुद जफर.
४) सौ.रशिदा बेगम गफ्फारखान.
५) श्री.माणिक लक्ष्मण साळवे.
६) श्री.मधुकर सावंत.
७) श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव.
८) श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल.
९) श्री.पारे सोपान भाऊराव.
१०) श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ.
११) श्री.रगडे भगवान दगडूजी.
१२) श्री.स.सलीम स.युसुफ.

**संवाद :**

**मा.सभापती :** अगोदर विषय पत्रिकेवर चर्चा करण्यात येईल.त्यानंतर जनरल चर्चा घेता येईल.

**विषय क्र. ११५:**

दिनांक २३-०८-२००४ (का.प.क्र.१७) २६-०८-२००४ (का.प.क्र.१८) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा.सभापती :** इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २३-०८-२००४ व २६-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. ११६:**

औरंगाबाद शहराकरीता प्रथमतः १९७२ साली भुमिगत जलनिःसारण योजना कार्यान्वित करण्यात आली.सदर योजना परिसर अभियांत्रिकी विभाग (म.जि.प्रा.) यांचे मार्फत पुर्ण करुन तत्कालीन नगर परिषदेस हस्तांतरीत करण्यात आली.सदर व्यवस्था शहराची लोकसंख्या सन २००१ मध्ये २,००,००० एवढी होईल.या आधारावर करण्यात आली होती.मात्र प्रत्यक्षात ही लोकसंख्या १९८१ मध्ये ओलांडून आजमितीस शहराची जवळपास

१० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या झालेली आहे.आज शहराकरीता हीच ड्रेनेज व्यवस्था अस्तित्वात आहे.

उपरोक्त व्यवस्थेत साधारणत: १,२५,००० लोकसंख्येचा आधार घेवून मलजलशुध्दीकरण प्रक्रीया केंद्र (Treament Plant) ज्यामध्ये संपवेल पंप हाऊस,ऑक्सीडेशन पाँडस विकसीत केलेले आहे.सदरील केंद्र कांचनवाडी येथे आहे.

नंतरच्या काळात १९८२ साली महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर वाढत्या औदयोगिकरण व वाढत्या नागरीकरणामुळे वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन भविष्यातील सेवा सुविधा करीता मे. शहा कन्सल्टंट,मुंबई यांचेकडून १९८६ साली शहराच्या जलनि:सारण योजनेसाठी अंतीम अहवाल करुन घेतला.त्यावेळी सदर योजनेचा अपेक्षित खर्च रु. ६५.२६ कोटी एवढा होता.या योजनेत शहर/ मनपा क्षेत्राचे भौगोलिक स्थितीचा विचार करुन दोन मलजलशुध्दीकरण प्रक्रीया केंद्र (१) मौ.वळदगांव-पाटोदा शिवारात १९२ एम.एल.डी. क्षमतेचा करण्याचे प्रस्तावित होते.

महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीमुळे निधी अभावी सदर योजना पुर्णपणे अंमलात आणणे शक्य झाले नाही.वाढत्या लोकसंख्येची गरज भागविण्यासाठी या योजनेशी सांगड घालून काही प्रमाणात मुख्य जलनि:सारण वाहिनी उपवाहिनीचे काम करण्यात आले.निधी उपलब्धतेनुसार झाल्टा शिवारातील प्रक्रीया केंद्राचे काम हाती घेण्यात आले तर वळदगांव पाटोदा शिवारातील प्रक्रीया केंद्रा संदर्भात कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही.

वळदगांव पाटोदा प्रक्रीया केंद्रा अभावी व १९७२ मधील उभारण्यात आलेले मलजलशुध्दीकरण केंद्र कमी क्षमतेकरीता असल्याने आज शहरातील एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात साधारणत: ९० दशलक्ष लिटर्स (एम.एल.डी.) सांडपाणी (Waste Water) नैसर्गिक पाणी प्रवाहातून वाहते.याचा लगतच्या परिसराचे पर्यावरणावर नक्कीच परिणाम होतो.ज्यामध्ये भुगर्भ जलसाठा जमिनीची सुपीकता नागरीकांचे सार्वजनिक आरोग्य इ.चा समावेश होतो.

दुषीत जलप्रवाहामुळे पर्यावरणावर होणारा दुरगामी परिणाम ही नक्कीच चिंतेची बाब असून त्यासाठी योग्य व परिपुर्तीपूर्ण क्षमतेकरीता प्रक्रीया केंद्र उभारणे व विदयमान जलनि:सारण व्यवस्थेचा स्तर उंचावणे हाच पर्याय असल्याने त्यासंदर्भात मा.प्राचार्य,अभियांत्रिकी महाविदयालय,औरंगाबाद यांनी माहिती घेऊन मनपा अधिकाऱ्यांसमवेत पाहणी करून संक्षिप्त प्राथमिक अहवाल दिला आहे.ज्यामध्ये अस्तित्वातील ड्रेनेज व्यवस्था,त्यातील बदल प्रक्रीया इत्यादीबाबत सूचना असून अंदाजीत खर्च रु.१७०.०० कोटी अपेक्षित केलेला आहे.

उपरोक्त जलनि:सारण व्यवस्था आजमितीस नाममात्र स्थितीत चालू असल्याने त्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या,करावी लागणारी दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे.त्यासाठीचा खर्च व योजना सुधारीत करण्याची गरज,आवश्यकता नमुद करुन उपरोक्त मुदयासंदर्भात दि. १२-०३-२००३ च्या मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव सादर करता त्यावरील मंजुर ठरावा आधारे अस्तित्वातील योजनेमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम टाळण्यासाठी योजना सुधारीत करुन सक्षम करण्यासाठी निधी उभारण्यात येऊन प्रत्यक्ष कार्यवाही करण्याबाबत निधी उभारण्यास मान्यता झालेली आहे.मंजुर ठरावा आधारे राज्यशासन प्रदुषण नियंत्रण मंडळ,केंद्र शासन आदींकडे अर्थ सहाय्याबाबत पत्रव्यवहार करण्यात आला आहे.

अर्थ सहाय्य प्राप्ती व निधी उभारण्याचे कामी प्रत्यक्ष योजना संबंधाने सविस्तर व माहितीपूर्ण अहवाल आवश्यक त्या सर्व तांत्रिक माहिती नकाशे,डिझाईनसह असणे आवशक

असून तो उपरोक्त संस्था,आर्थिक संस्थांना वेळोवेळी सादर करणे गरजेचे असल्याने असा परिपूर्ण व अद्ययावत तांत्रिक अहवाल व त्या आधारे सक्षम योजना तयार करण्याचे दृष्टीने मा.मुख्य अभियंता म.जि.प्रा.औरंगाबाद यांचेशी संपर्क साधून प्रत्यक्ष चर्चा केली.वर नमूद पत्र व्यवहारासंदर्भात मा.सचिव,नगरविकास विभागत,मंत्रालय मुंबई यांनीही चर्चेवेळी सदर सुधारीत योजनेचा प्रस्ताव / अहवाल महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मार्फत सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.मा.सर्वसाधारण सभेच्या प्रस्ताव मान्यतेनंतर निधी उभारण्याचे कार्यवाहीत पत्र व्यवहार करणे,आर्थिक संस्थेकडे योजना सादर करणे इ. दृष्टीने Project Report असणे गरजेचे असल्याने महापालिकेने अशा अनुभवी व या क्षेत्रात तज्ञ असलेल्या महापालिकेकरीता स्वतंत्र योजना तयार केलेल्या कन्सल्टंट कडून Project Report तयार करुन घेण्याबाबत राज्यस्तरीय वर्तमानपत्र,इंटरनेट माध्यमातून निविदा प्रसिध्द करुन दर मागविले होते,परंतु नंतर मा.सचिव नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे वरील प्रमाणे निर्देश प्राप्त झाले ती प्रक्रीया थांबविण्यात आली.या संदर्भात Project Report तयार करण्यासाठी अंदाजीत खर्चाच्या २% रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरनाकडे प्रथम जमा करावी म्हणजे Detail Project Report तयार करण्यात येईल.ज्यामध्ये अस्तित्वातील प्रत्येक वाहीनाचा विचार करुन Cife विचारात घेऊन त्यांचे बदलाबाबत सविस्तर सर्व्हे करुन अस्तित्वातील ड्रेनेज लाईन Pnase मध्ये बदलणे पूर्ण क्षमतेसाठी मलशुध्दीकरण प्रक्रीया केंद्र उभारणे इ.सह Project Report तयार करण्यात येईल असे चर्चेवेळी मुख्य अभियंता म.जि.प्रा.औरंगाबाद यांनी स्पष्ट केले.

उपरोक्त निर्देशानुसार Project Report प्रथम अंदाजीत खर्चाच्या २% रक्कम भरणा केल्यानंतरच प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात येणार असून निधी संस्थांना उभारणे,अर्थसहाय्य प्राप्तीकरीता आर्थिक योजना सादर करणे इ.सह योजना निश्चिती करीता असा परिपूर्ण /सक्षम असा Project Report असणेही तितकेच गरजेचे असल्याने Project Report तयार करुन घेण्याचा व त्यासाठी २% रकमेबाबत तसेच या प्रकल्पाकरीताच्या अंदाजीत खर्च रक्कम रु. १७० कोटीचा निधी उभारण्याबाबत अर्थ सहाय्य प्राप्ती बाबतचा प्रस्ताव विचारार्थ /आदेशार्थ सादर.

**संवाद :**

**मा.सभापती :** या विषया संदर्भात माहिती संबंधीत अधिकाऱ्यांनी द्यावी.

**कार्य.अभि.(वि./ड्रेनेज) :** औरंगाबाद शहरातील अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहीनीचा स्तर उंचावणे,मलप्रक्रीया केंद्र बांधणे यासाठी दिनांक १९-३-२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेने ठराव पारीत केलेला आहे.या ठरावामागे शासकीय अभियांत्रिकी महाविदयालयाने रिपोर्ट दिला होता.सदर रिपोर्ट डिसेंबर २००२ मध्ये मनपास प्राप्त झालेला होता की,मलप्रक्रीया केंद्र व त्याची सिस्टीम जी आहे ती तोकडी असल्यामुळे त्याचा स्तर वाढविण्यासाठी सर्व्हे करणे,नविन ड्रेनेज लाईन टाकणे,मेन सिवर लाईन टाकणे इत्यादीसाठी १७० कोटीचा खर्च येईल असे अहवालात नमुद केले होते.दिनांक १९-३-२००३ च्या सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुर केला आहे.अध्यक्ष महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,नगर विकास विभागाचे सचिव सभापती स्थायी समिती यांची चर्चा घेऊन नागरी विकास समिती,भारत सरकार यांचेकडे अर्थसहाय्यासाठी दि. ५-६-२००३ रोजी पत्र दिलेले आहे.कन्सल्टंट नेमण्यासाठी दि. १७-७-२००३ रोजी जाहीर निविदा प्रसिध्द केली होती.मध्यंतरीच्या काळात नगरविकास विभागाकडून असे कळविण्यात

आले की,सदरचा रिपोर्ट व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तयार करुन घ्यावा.या संदर्भात म.जि.प्रा.चे अधिकारी यांचेशी संपर्क साधला असता एकूण रकमेच्या २% रक्कम म्हणजेच रुपये ३.४० कोटी प्रथमत: महाराष्ट्र जीवन प्राधिककरणाकडे भरणा करावी त्यानंतरच प्रकल्प अहवाल (Project Report) तयार करण्यात येईल असे कळविले आहे.

**मा.सभापती :** महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ३.४० कोटी रुपये देता येतील परंतू प्रोजेक्ट करण्यास १७० कोटी रुपये लागणार आहेत.एवढी मोठी तरतुद कशातून करणार आहोत.यावर्षी हे काम करणे शक्य आहे का?

**कार्य.अभि.(ड्रे./वि.) :** तरतुद उपलब्ध करुन देण्यासाठीच प्रस्ताव सादर केलेला आहे.यावर्षीच्या अर्थसंकल्पात टोकन रक्कमेची तरतुद फक्त ५ लक्ष करण्यात आलेली आहे.

**मा.सभापती :** एवढया रकमेची तरतुद करता येईल का?

**कार्य.अभि.(ड्रे./वि.) :** शहरातील नाल्याबाबत तसेच ड्रेनेज लाईनचे परिस्थिती काय आहे.याबाबतची सी.डी. तयार केलेली आहे.ती सभागृहात दाखविण्यात येईल,त्यानंतर आपणास सविस्तर चर्चा करता येईल.

(यावेळी सभागृहात शहरातील ड्रेनेज लाईन तसेच नाल्यांची परिस्थिती बाबत प्रोजेक्टवर चलचित्र दाखविण्यात येईल.)

**कार्य.अभि.(ड्रे./वि.) :** मेन सिव्हर लाईनचा नकाशा आहे.झांबड इस्टेटचा नाला आहे.यात आर.सी.सी.पाईप टाकण्यात आलेले होते ते पूर्णपणे भरलेले आहेत.काही ठिकाणी मेन सिव्हर लाईन पूर्णपणे बंद झाल्यामुळे नाल्यातून मलमुत्र वाहत आहे.ते पाईप फुटलेल्या अवस्थेत असून पाणी बाहेरुन वाहत आहे हे स्पष्ट दिसते.काही ठिकाणी नाल्यातील पाईपच दिसून येत नाही.गाळामध्ये पूर्णपणे गच्च भरलेले दिसून येतात.हा नाला बालाजी नगरचा आहे.नाल्यात ड्रेनेज लाईन टाकण्यात आलेली होती.नाल्याच्या बाजुला मोठया प्रमाणात अतिक्रमण झाल्यामुळे नाला अरुंद झालेला आहे.शिवशंकर कॉलनी,नाथनगर हे सॉलीड वेस्टने पूर्णपणे भरलेले आहेत.मेन सिवरच्या वस्ती सुध्दा बऱ्याच ठिकाणी अनधिकृत बांधकामे झालेली आहेत.ड्रेनेज लाईनला लागूनच बांधकाम केलेले आहे.दिसत असलेले चित्रानुसार नाल्याची रुंदी अतिशय कमी झालेली असून नाल्यावर स्लॅब टाकून बांधकाम केलेले आहे.काही लोकांनी डायरेक्ट नाल्यामध्ये लाईन सोडलेल्या आहेत.त्यामुळे मेन सिवर लाईनमध्ये मलमूत्र जात नाही.हा भानुदास नगरचा नाला आहे.येथून स्ट्रॉम वॉटर पाईप लाईन जाते आणि तेथूनच ड्रेनेज लाईन झालेली आहे.हा फकीरवाडी,चुनाभट्टीचा नाला आहे.दरवर्षी नाला सफाई होते.पावसाचे पाणी वाहत जावे यासाठी व्यवस्था केली जाते.आर्थिक तरतुदीप्रमाणेच काम करण्यात येते.मेन सिवर लाईन या नाल्यामध्ये असल्यामुळे देखभाल दुरुस्तीसाठी अडचणीचे ठरते.हा दलालवाडी औषधी भवनचा नाला आहे.या ठिकाणी ६ फुट गटार आहे.ती पूर्णपणे भरलेली दिसून येते.ही मेन सिवर लाईन कॉंक्रेटींग करुन टाकलेली आहे.ही मलवाहीनी ऑक्सीडेशन पॉंड बनेवाडीच्या विहिरीकडे जाते.सुयोग कॉलनी पदमपुरा येथे पुर्णपणे बांधकाम हे ड्रेनेज लाईनवर करण्यात आलेले आहे.ही खाम नदी असून होलीक्रॉस शाळेच्या समोर मेन सिवर लाईन यातून नाल्यात पाणी वाहते आहे.शिवाजी कॉलनी समतानगर येथे ड्रेनेज लाईन १९७१ साली टाकण्यात आलेली होती

आणि घराची प्लींथ लेव्हल ही खाली असल्यामुळे घरामध्ये पाणी जाते.सिल्लेखाना ते समर्थनगर ते कार्तिकी हॉटेलपर्यंत ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामास सन २००४-२००५ मध्ये मंजुरी मिळालेली आहे.अरिहंतनगर येथे खुल्या गटारी कुठेही नसल्याने पावसाचे पाणी किंवा सांडपाणी हे कॅचपीटद्वारे डायरेक्ट जोडलेले आहे.सर्व वाळू,माती ही वाहनाऱ्या कंचपीट द्वारे ड्रेनेज लाईनमध्ये जाते.दुर्जल विहीर पंपाजवळ बनेवाडी येथे साधारणतः तेथे ५ एम.एल.डी.करीता ६ ऑक्सीडेशन पॉडस् आहेत.या विहीरीवर पंप हाऊस आहे.येथे मेन सिवर लाईन मधील पाणी पंप घेऊन येत होते.साधारणतः १९९४-९५ पासून बंद आहे.१९७२ साली अंडरग्राऊंड सिस्टीम औरंगाबाद शहरात आलेली आहे. त्यावेळी सन २००१ साली २ लक्ष लोकसंख्या होईल या दृष्टीने टाकण्यात आलेली आहे.जुन्या शहरामध्ये त्यानंतर जसे शहर वाढते झाले तसे पाईप लाईन टाकण्यात आलेल्या आहेत.सन १९८६ मध्ये शहा कन्सल्टंसी यांनी संपूर्ण शहराचा सर्व्हे करुन घेतलेला होता.त्यानुसार मनपाने ड्रेनेज लाईन मेन सिव्हर लाईन टाकण्यास सुरुवात केली.त्यामध्ये मलप्रक्रीया करण्यासाठी ३०० हेक्टर जागा वळदगांव पाटोदा येथे संपादन करणे संबंधी त्यामध्ये नमुद केलेले होते.ती कार्यवाही न झाल्यामूळे आजच्या स्थितीला या शहरातील प्रत्येक दिवशी ८० ते ९० एम.एल.डी.मल प्रक्रीयेद्वारे वाहून नेण्याची कार्यवाही होते.झाल्टा येथे प्रोजेक्ट तयार करीत आहोत.सिडको येथेही प्रोजेक्ट चालू आहे. अशा प्रकारे १८ एम.एल.डी. ट्रीट करुन शकतो. उर्वरीत ७२ एम.एल.डी. मलनिःसारण हे नाल्यातून वाहते आहे.त्यामुळे प्रदुषण होण्याची मोठी शक्यता आहे.त्यामुळे ही कार्यवाही करण्यासंदर्भात चारपानी अहवाल घेतलेला होता.संपूर्ण सर्व्हे करण्याकरीता एकूण रक्कमेच्या २% इतकी रक्कम कन्सल्टंट नेमण्याकरीता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला ३.०० कोटी रक्कम द्यावी लागणार आहे.त्यासाठी सदरचा प्रस्ताव मंजुरीसाठी स्थायी समितीसमोर ठेवण्यात आलेला आहे.

**मा.सभापती :** जनसंपर्क अधिकारी यांनी पत्रकात बांधवांना कोरे कागद तसेच विषयपत्रिका ऐनवेळचे विषयांच्या प्रती पुरविण्याची व्यवस्था करावी.आताच सीडीवर सर्व माहिती दाखविण्यात आली.१९८९ साली शहा कन्सल्टंसी कडून १० लक्ष रुपये देवून शहरातील सर्वेक्षणाचे काम केलेले होते,त्यानुसार बऱ्याच ठिकाणी मेन सिवर लाईन टाकण्यात आलेल्या आहेत.जसे खामनदीवर पानचक्कीपासून छावणीपर्यंत त्याचप्रमाणे जय भवानीनगर भाग असेल. रोशनगेट असेल या भागात मेन सिवर लाईन टाकलेल्या आहेत.त्याची अवस्था पाहीली तर त्याचे पाईप तुटलेले आहे.संपूर्ण नाल्यातून मल वाहते आहे.काही ठिकाणी अतिक्रमण झालेले दिसून येते.काही ठिकाणी पाईप लाईन तुटलेल्या असून मध्येच गॅप पडलेला आहे.याचा अर्थ मेन सिवर लाईन असून नसल्यासारखे झालेल्या आहेत. पूर्णतः पॅक झालेल्या आहेत. ज्या मेन सिवर लाईन टाकल्या सन २००१ च्या लोकसंख्येनुसार केलेले आहेत.या शहराची लोकसंख्या झपाटयाने वाढत आहे.सध्या त्या लाईनमुळे काम करण्यास अडचण निर्माण होते असे आपण म्हटलेले आहे.शहा कन्सल्टंसी ही माझ्या माहिती प्रमाणे देशातील सर्वा चांगली एजन्सी

आहे,त्यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार मेन सिवरलाईन या शहरात टाकण्यात आलेल्या आहेत आणि ते आता अडचणीचे झालेले आहे.

**कार्य.अभियंता (ड्रे.व वि.) :** नाल्यामध्ये देखभाल दुरुस्तीचे काम करण्यास त्रास होतो म्हणून माझे स्टेटमेंट केलेले आहे.ज्याप्रमाणे त्या लाईन्स अस्तित्वात होत्या त्या परिस्थितीत आज नाहीत काम करीत असतांना नाल्याचे पाणी एका बाजूला होणे सुध्दा अडचणीचे होते.नाले अरुंद झालेले आहेत.१९८६ ला शहा कन्सल्टंसी यंनी रिपोर्ट दिला असेल मला त्याची डिटेल माहिती नाही.

**मा.सभापती :** आज रोजी मेन सिवर लाईन देखभाल दुरूस्ती करणे गरजेचे आहे.काही ठिकाणी नाल्यामध्ये लाईनवर स्लॅब टाकलेला नाही.काही ठिकाणी लोकांनी जाणूनबुजून तोडलेले दिसून येतील.जसे गांधीनगर भागात सिवर लाईन तोडून त्याची साठवणूक नाल्यामध्ये केलेली आहे. फकीरवाडीचा नाला आताच दाखविण्यात आला. किमान देखभाल दुरुस्तीचे काम महागनरपालिकेतर्फे घेऊ शकते असे माझे मत आहे.आपण दिलेला हा १७० कोटीचा प्रोजेक्ट आहे.त्यास तरतुद करायची हा दुसरा भाग होतो.काही ठिकाणी सिवर लाईन दुरुस्त करुनही उपयोग नाही.त्याकरीता ड्रेनेज लाईन करुन चार ठिकाणी लहान लहान तसटीपी जेथून ते मलमूत्र येत असेल सुरुवातीपासून शेवटपर्यंत तसे तसटीपी बांधून करणे शक्य होणार नाही का? असा माझा प्रश्न आहे.

**कार्य.अभियंता (ड्रे.व वि.) :** शक्य होईल.शहरात चार ठिकाणी चार तसपीटी करणे शक्य होईल.पण सेंट्रलाईज करणे आवश्यक वाटते,त्यासाठी पुन्हा एक वेळेस संपूर्ण शहराचा सर्व्हे होणे आवश्यक आहे.१९८६ ला शहा एजन्सीने रिपोर्ट सादर केला तेव्हा १९७५ चा विकास आराखडा होता.१९७५ च्या प्लॅनमध्ये ज्या अरक्षीत साईटस होत्या त्यानुसार काही जास्त लोकसंख्या वाढणार नाही हे गृहीत धरुन सर्व्हे केला असेल तर आजच्या परिस्थितीत ज्या जागेवर घरे झालेली आहेत.म्हणून शहा कन्सल्टसने एवढया लोकसंख्येचा विचार केलेला नसावा असे वाटते, त्यामुळे ते मेन सिवर पाईप लाईन नादुरुस्त झालेले आहेत.

**मा.सभापती :** रुपये ३.४० कोटी ही रक्कम होईल.ही तडजोडी नंतर येणारी रक्कम आहे का? आणि यास किती कालावधी लागेल.

**कार्य.अभियंता (ड्रे.व वि.) :** प्रस्ताव मंजूर केल्यानंतर वाटाघाटी करून निर्णय घेता येईल.प्रोजेक्ट रिपोर्टला आपण कमी पडतो.एक वर्ष सर्व्हेक्षणासाठी लागेल.

**मा.सभापती :** मनपाकडे तांत्रिक दर्जाचे अधिकारी आहेत.महानगरपालिकेतर्फे हे काम करुन घेता येऊ शकते का?

**कार्य.अभियंता (ड्रे.व वि.) :** महानगरपालिकेकडे तसा कर्मचारी वर्ग नाही जेणे करुन सर्व्हेक्षणाचे काम टेक्नीकली पध्दतीने होईल.

**मा.सभापती :** रुपये ३.४० कोटी द्यावयाचे यामध्ये वाटाघाटी करुन निर्णय घेण्यात यावा.यावर स.सदस्यांनी काही मत मांडावयाचे असेल ते त्यांनी मांडावे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** शहरात बऱ्याच ठिकाणी नाले होते.आता नाल्या झालेल्या आहे.अरुंद का झाले याची कारणे शोधणे आवश्यक आहे.लहान नाले झाल्यामुळे काम करणे अशक्य होत आहे.सर्वेक्षण करुन काय करणार.लोकांनी नाल्यावर घरे बांधलेली आहेत.ती तोडणार आहात का? ती तोडणार असाल तर सर्वे करावा.अतिक्रमण पथक अस्तित्वात असतांना नाल्याच्या बाजूला,नाल्यावर

मोठमोठी घरे झालेली आहेत.प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले म्हणून ही वेळ आलेली आहे.

**मा.सभापती :** स.सदस्यांनी मांडलेली सुचना बरोबर आहे.कार्यकारी अभियंता म्हणून संबंधीत अधिकाऱ्याचे मत काय आहे.मेन सिवर लाईन बंद झालेल्या आहेत.नाल्यातून टाकणार नाही.प्रत्यक्षात कशी टाकणार,कसे किजीबल होईल.आपले नियोजन कसे आहे.

**कार्य.अभियंता (ड्रे.व वि.) :** आजच्या परिस्थितीत लोकसेख्येचा विचार केला तर ठिक आहे.पुढील २० वर्षाच्या लोकसंख्येचा विचार करुन रस्त्याच्या बाजूने टाकावी लागेल.

**श्री.मधुकर सावंत :** प्रस्ताव चांगला आहे,परंतु आताच जी सीडी सभागृहात दाखविण्यात आली,त्यातील बरेचसे नाले माझ्या वार्डातील आहे.उदा.रमानगर मधून निघालेला नाला झांबड इस्टेट पर्यंत जातो.नाथ नगर,शिवशंकर कॉलनीचा नालासुध्दा माझ्या वॉर्डातून वाहत आहे.गेल्या १५-२० वर्षापूर्वी हे नाले बरेच रुंद होते,परंतू आजच्या स्थितीत ते १ ते १.५ मीटर झालेले आहेत.आता नाल्या झालेल्या आहेत.१९७१ मध्ये ड्रेनेज लाईन टाकलेल्या आहेत.१९७५ चा विकास आराखडा विचारात घेऊन ड्रेनेज लाईन टाकलेल्या होत्या असा खुलासा केला.या प्रस्तावानुसार कार्यवाही करतांना जागा कोठून उपलब्ध करणार आहे हा पहिला प्रश्न आहे. दुसरी बाब अशी की,नाल्याच्या बाजूला अतिक्रमणात जी घरे झालेली आहेत ती काढणार आहोत का कारण दररोज १०-१२ तक्रारी नागरीक आमच्याकडे याबाबतीत घेवून येतात.ड्रेनेज लाईन चोकअप होणे,नाल्यात पाणी साचणे त्यामुळे डासांचा त्रास आहे.नागरीकांना त्रास होतो रोजची डोकेदुखी झाली आहे.चांगली योजना आहे.तात्काळ काम सुरु करावे,यामुळे होणारा त्रास कमी होईल.

**मा.सभापती :** या कामासाठी सुमारे रुपये १७० कोटीचा निधी उभा करावा.प्रस्तावानुसार २% रक्कम ही कन्सल्टन्सी म्हणून सर्वेसाठी देणार आहोत.त्यात वाटाघाटी करुन येणाऱ्या सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात तरतुद करण्यात यावी.अशी मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दूषीत जलप्रवाहामुळे पर्यावरणावर होणारा दूरगामी परिणाम ही नक्कीच चिंतेची बाब असून त्यासाठी योग्य परिपूर्ण पूर्ण क्षमतेकरीता प्रक्रीया केंद्र उभारणे व विदयमान जलनिःसारण व्यवस्थेचा स्तर उंचाविणे संदर्भात प्राप्त संक्षिप्त प्राथमिक अहवालानुसार अस्तित्वातील ड्रेनेज व्यवस्था त्यातील बदल व प्रक्रीया केंद्र इत्यादीसाठी अंदाजीत खर्च रु. १७०.०० कोटी अपेक्षित असल्याने उपरोक्त निर्देशानुसार Project Report तयार करणे,निधी उभारणे,अर्थसहाय्य प्राप्ती करीता आर्थिक संस्थांना योजना सादर करणे इ. सह योजना निश्चित करिता असा परिपूर्ण / सक्षम असा Project-report तयार करून घेण्यास तसेच या प्रकल्पाकरिताच्या अंदाजीत खर्च सुमारे रुपये १७० कोटीचा निधी उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रस्तावानुसार कन्सल्टन्सी म्हणून सर्वेक्षणासाठी द्यावयाची २% रक्कमेबाबत वाटाघाटी करून येणाऱ्या सन २००५ २००६ च्या अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी अशी मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७ :**

श्री. एस. बी. शहाणे प्रभारी विभागीय अधिकारी विभाग क्र. ७ यांनी त्यांची देयक वेतनवाढ एक वर्षाकरिता तात्पुरती थांबविण्याबाबत कार्यालयीन आदेश जा. क्र. मनपा अस्था-१/२००१-११९० दि. ११-०४-२००१- रद्द करण्याबाबत सादर केलेले अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रशासनाने लेखी मत दिलेले आहे. श्री. एस. बी. शहाणे यांनी सादर केलेले अपील मंजूर करण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. एस. बी. शहाणे प्रभारी विभागीय अधिकारी, विभाग क्र. ७ यांची देय वेतनवाढ एक वर्षाकरिता तात्पुरती थांबावण्या बाबतचे कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/अस्था-१/२००१/१९९० दि. ११-०४-२००१ रद्द करण्यास व संबंधीतांचे वेतनवाढ पूर्ववत करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. ११८ :**

उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रमजान महिन्याच्या शेवटच्या पंधरा दिवस मुस्लिम बांधवाच्या सणानिमित्त साहित्य सामान खरेदी करण्यासाठी दरवर्षी शहागंज चमन ते निजामुद्दिन दर्गा रोडवर एकूण क्षेत्रफळ ७००० चौ. मी. रस्त्यावर "मीनाबाजार" शहागंज येथे भरविण्यात येतो. मनपातर्फे गेल्यावर्षी पासून बाजार भरविण्याचा ठेका निविदेद्वारे देण्याबाबतचे ठरले आहे. गेल्यावर्षी सदर ठेका रु. १,१६,००१/- या प्रमाणे देण्यात आला होता. यावर्षी सुध्दा जाहिर प्रगटन देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यामध्ये मागील वर्षाच्या दरात १०% वाढ करून आधारभूत किंमत रु. १,२७,५००/- ठेवण्यात आली आहे. पहिल्या वेळेस निविदा वेळेस निविदा प्रसिध्दीस दिल्यानंतर एकूण नऊ टेंडर रु. १,२७,५००/- ठेवण्यात आली आहे. पहिल्या वेळेस निविदा प्रसिध्दीस दिल्या नंतर एकूण नऊ टेंडर फॉर्म विक्री झाले. त्यामध्ये तीन निविदा प्राप्त झाल्या. यामध्ये सर्वात जास्त दराची निविदा रु. ११,७८८/- ची प्राप्त झाली असून जी आधारभूत किंमतीपेक्षा फारच कमी आहे. त्यामुळे फेरनिविदा काढण्यात आली. तयामध्ये सुध्दा एकूण यहा निविदा फॉर्मची विक्री झाली असून दोन निविदा प्राप्त झाल्या. त्यामध्ये एका निविदा धारकांने ई.एम.डी. भरलयाची पावती सोबत जोडली नाही. त्यामुळे फक्त एकच निविदा प्राप्त असून त्यामधील दर रु. ११,७८६/- असे आहेत जे आधारभूत किंमतीपेक्षा कमी आहेत. त्यामुळे प्रशासनाने महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचारी यांचे पथक तयार करून फी वसूली करण्याबाबत ठरविले.

बाजारासाठी एकूण जागा ३९० मी. x २० मी =७८०० चौ. मी. अशी जागा देणे आहे. या जागेमध्ये १०x१० या आकारणी एकूण चार रंगेमध्ये दुकाने तयार होतील. प्रत्येक रांगेत एकूण १२० दुकाने बसू शकतात. तरी ४x१२०=४८० दुकाने तयार होऊ शकतात व १२x६ रुंदीचे दोन रस्ते मध्यभागी होऊ शकतात.

तरी प्रत्येक दुकानदाराकडून जागाभाडे रु. ५००/- व रु. ४०/- (भाड्याच्या ८% दराने सर्व्हिस चार्ज) असे प्रती दुकान याप्रमाणे १५ दिवसाकरिता भाडे वसूल केले असता

एकूण उत्पन्न रु. २,४०,०००/- + सर्व्हिस चार्ज ८% रु. १९,२००/- असे एकूण अंदाजीत उत्पन्न अपेक्षित आहे.

मिनाबाजार फी वसूली वरील दराप्रमाणे मा. स्थायी समितीच्या निर्णयास अधिन राहून दिनांक ०४-११-२००४ पासून सुरू करण्यात येत आहे.

करिता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मुख्य लेखाधिकारी :** गतवर्षीची जी निविदा देण्यात आलेली होती ती निश्चितच १६ दिवसांसाठी देण्यात आलेली होती. आणि त्या दृष्टीने यावर्षी १६ दिवसांसाठीच निविदा देण्यासाठी प्रसिध्द केलेल्या होत्या व निविदा काढून १ तारखेपासूनच बाजारासाठी ठेका देण्यात येईल त्यादृष्टीने ती रक्कम नमूद केलेली होती. आणि आताच स. सदस्य यांनी सांगितल्यानुसार वर्क ऑर्डर होऊन गेल्यानंतर ९ दिवसासाठी तो बाजार देता येईल त्यांची गतवर्षीच्या काळाशी त्याची तुलना करून नैसर्गिक १०% वाढ करून जर पुन:श्च ती एजन्सी रक्कम देण्यास तयार असले तर त्यांना देण्यात येईल. नसता हा दिलेला प्रस्ताव मान्य करावा असे नमूद करतो.

**मा. सभापती :** १०% दरवाढ जे प्रशासनास अपेक्षित आहे. आणि किती दिवस तो बाजार भरणार आहे. याचे कॅलक्यलेशन करून वाटाघाटी करून सदर एजन्सी तेवढी रक्कम देण्यास तयार असेल तर त्या एजन्सीस वाटाघाटी करून देण्यात यावे. अन्यथा प्रशासनाचा हा प्रस्ताव मान्य करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे शहागंज येथील शहागंज चमन ते निजामुद्दिन दर्गा रोडवर एकूण क्षेत्रफळ ७८०० चौ. मी. रस्त्यावर "मीनाबाजार" भरविण्याचा ठेका घेण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदा आधारभूत किंमतीपेक्षा अत्यंत कमी आल्यामुळे यापुढे ९ दिवसांकरिता जर बाजार भरणार असेल तर त्यानुसार गतवर्षीच्या दराशी तुलना करून त्यामध्ये १०% वाढ गृहित धरून जी रक्कम येत असेल. त्याकरिता जर एजन्सी रक्कम देण्यास तयार असेल तर एजन्सीमार्फत काम करावे. नसता महापालिका प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार महापालिकेच्या वतीने बाजाराची फी वसुलीची कार्यवाही करण्यात यावी यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा. सभापती :** या शहरातील जे रस्ते रस्ते विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे ते करण्यात यावे म्हणून सर्व पदाधिकाऱ्यांमार्फत सूचना होत्या. तसेच जे रस्ते अर्थसंकल्पात नमूद आहेत जे काही नाहीत असे सर्व रस्ते बजेटमुळे घेण्यात आलेले नाही व ३ ते ३.५० कोटीची तरतूद करून असे रस्ते दुरुस्त करण्याबाबत तसा प्रस्ताव करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या होत्या. माहिती सादर करण्यात आलेली नाही. प्रस्ताव तयार केलेला असेल तर ती सादर करावा. तसेच स्वच्छ सुंदर, हरीत औरंगाबाद वाहतुक बेटे यासाठी अर्थसंकल्पात रुपये ३० लक्षची तरतूद करण्यात आलेली होती. तात्काळ ती बेटे सुशोभित करावी. म्हणून सूचना दिलेल्या होत्या. व तसा प्रस्ताव स्थायी समितीसमोर सादर करण्याचे आदेशित केलेले होते. तसेच छत्रपती शिवाजी

महाराज यांचा क्रांतीचौक येथील पुतळा वाहतुक बेटाचे काम करण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. ते काम थांबविण्यात आले. त्याबाबतही खुलासा करण्यात यावा. या शहरातील जे ५० ते ५२ वाहतुक बेटे आहेत. काही मुख्य रस्ते आहेत त्या रस्त्याचे दुरुस्तीचे कामासाठी एक कालबध्द कार्यक्रम तयार करण्यात यावा. सभागृहात सादर करावा. तसेच वाहतुक बेटे आहेत त्या संबंधिचा प्रस्ता तयार असेल तर तसा खुलासा करावा. त्याच्या प्रती देण्यात याव्यात.

**श्री. संजय शिरसाठ :** वाहतुक बेटे सुशोभिकरण करण्याचे काम मनपा की विभागीय आयुक्तांमार्फत होते आहे. खुलासा करावा नागरिकांचा यामुळे गैरसमज घेत आहे.

**मा. आयुक्त :** सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात वेगवेगळ्या लांबीचे रस्ते दुरुस्त करणे, पुर्नडांबरीकरण करणे म्हणून घेतलेले आहेत. त्या बाबतीतली कामे वेगवेगळ्या स्तरावर चालू असली तरी सप्टेंबरच्या शेवटी व ऑक्टोंबर मध्ये झालेल्या पावसामुळे त्या रस्त्यांची अवस्था वाईट झालेली दिसून येईल या बाबतीत स. सदस्य सर्व पदाधिकाऱ्यांनी एकमताने ठराव घेतला की, या रस्त्यांच्या दुरस्तीसाठी, डांबरीकरण करण्यासाठी सुध्दा तरतूद उपलब्ध नसली तरी होणाऱ्या बचतीमधून व मिळणाऱ्या संभाव्य उत्पन्नातून एक नवीन कार्यक्रम करणे आवश्यक आहे. एकंदरीत या विषयास सम्मती झाल्यानंतर गेल्या ८-१० दिवसात एक कार्यक्रम रस्ते विभागाने केलेला आहे. तो आपल्या समोर सभागृहात सादर होईल. त्याचा तपशील शहर अभियंता देतील. सौदर्यीकरणाचा विषय हा आपल्या बजेटचा भाग आहे. अर्थसंकल्पात ९५ लक्षची तरतूद केलेली आहे. त्यातील तीन ते चार कामे सुरू होतील. त्यास आणखी गती देण्यासाठी आणि काम सुरू करण्यासाठी अधिक्षक अभियंता व संबंधित अभियंता यांनी कामाचे वेळापत्रक आखणी केलेले आहे. तेही सभागृहात सादर करतील. हा एक प्रकारचा धडक कार्यक्रम ज्यासाठी बजेट आहे त्याची अंदाजपत्रक तयार आहेत. काही कामे मंजूर सुध्दा झालेली आहेत. त्याचा खुलासा केला जाईल. चौकांचे सुशोभीकरण किंवा सौदर्यीकरण करणे हा मुळचाच बजेटमधला भाग आहे. ज्या बाबतीत सुरुवातीपासून काम करीत असून मधल्या काळात आचार संहिता असल्यामुळे काम बंद होते. इच्छा असूनही कामे करता आलेली नव्हती. याची नोंद घ्यावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सौंदर्यीकरण करणे हा विषय नंतर घेता येईल. सविस्तर चर्चा करावी लागेल.

**मा. सभापती :** सौंदर्यीकरण करणे हा महत्वाचा विषय आहे. ज्या स. सदस्यांना चर्चा करायची असेल त्यांनी करावी अतिरिक्त शहर अभियंता यांनी सविस्तर खुलासा करावा. ऐनवेळचा प्रस्ताव आहे.

**अति. शहर अभियंता :** शहरातील मुख्य रस्ते खराब झालेले आहेत. दळणवणासाठी त्रासदायक होत आहे. वृत्तपत्रातून तसेच नागरिकांच्या सुध्दा तक्रारी ऐकाव्या लागत आहेत. या वर्षीच्या अर्थसंकल्पातील जे रस्ते अर्थसंकल्पात नाही परंतु ते करणे आवश्यक आहे. त्याबाबत विभागामार्फत एक आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या आराखड्यात शहरातील सर्वच नागरिकांना मोठ्या प्रमाणात उपयोग होणार आहे. असे रस्ते त्यात घेतलेले आहेत.

एकूण २१ रस्ते यात येतात. ऐनवेळी प्रस्ताव दिलेला असून त्यासाठी २.१२ कोटी खर्च येणार आहे. आणि व आराखडा आपल्या मंजुरीसाठी ठेवलेला आहे. सौंदर्यीकरणाच्या बाबतीत या शहरात ४४ वाहतुक बेटे बसविण्यात आलेले आहेत. त्यास स्थायी समिती व सर्वसाधारण सभेने मंजुरी दिलेली आहे. या कामाचे एकूण ३७ ठिकाणी कामे करण्याचे आराखडे तयार केले. त्यानंतर आचार संहिता लागल्यामुळे पुढील कामे झालेली नाही. सर्व कामे मंजुरीच्या मार्गावर आहेत. मनपाने ४४ वाहतुक बेटांचे दुरुस्ती व सौंदर्यीकरणासाठी अर्थसंकल्पात रुपये ९५ लक्ष तरतूद ठेवलेली आहे. (शहर सौंदर्यीकरण टिप्पणी सोबत जोडली आहे.)

**विषय क्र. ११९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केलेला आहे की, शहरातील विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक असून सन २००४-२००५ मध्ये या कामांकरिता निधी उपलब्ध नाही. परंतु कामे करण्याची निकड लक्षात घेता सदर कामांकरिता वाढीव निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

शहरातील विविध रस्त्यांचे विभागातर्फे सर्वेक्षण करण्यात आलेले असून एकूण २१ रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम करणे आवश्यक या कामाकरिता रु. २१२ लाख एवढा खर्च येणार असून सदर कामाची यादी सोबत जोडलेली आहे. अर्थसंकल्पात अतिरिक्त शहर अभ्झियंता विभागाला सन २००४-०५ मध्ये विविध लेखाशिर्ष अंतर्गत दिलेल्या तरतूदी मधून रु. १०८ लाख एवढी बचत होणार आहे. तसेच शहर अभियंता विभाग व कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांना अर्थसंकल्पात ठेवलेल्या तरतूद मधूनही रु. ३ कोटी एवढी बचत होणार असल्याचे मुख्य लेखाधिकारी यांनी संचिकेत नमूद केलेले असून शहर अभियंता विभाग, अतिरिक्त शहर अभियंता विभाग, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) या तिन्ही विभागाकरिता ठेवलेल्या तरतूदीमधून अंदाजे ३ कोटी एवढा निधी या आर्थिक वर्षात नवीन कामाकरिता वापरता येईल असा अभिप्राय दिलेला आहे.

तरी रुपये ३.०० कोटी बचतीमधून हाती घ्यावयाच्या कामांना मान्यता मिळणे करिता प्रस्ताव विचारार्थ तसेच मान्यतेस्तव सादर.

## औरंगाबाद शहरातील प्रमुख रस्ते सुधारणा कार्यक्रम

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | मुख्य बसस्थानक ते स्विमींग पुल रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,६९,५००/- |
| २. | बाबुराव काळे चौक ते महात्मा फुले चौक रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १४,७८,६५२/- |
| ३. | त्रिमुर्ती चौक ते चेतक घोडा या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | ४,९९,३६५/- |
| ४. | पुंडलिकनगर शिवाजी महाराज पुतळा ते सिडको हद्द या १०० फुट विकास योजना रस्त्याची दुरुस्ती करणे. | ४,०१,९२५/- |
| ५. | एस. टी. कॉलनी (पीरगैब दर्गा) ते चंपाचौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ८,६०,१०७/- |
| ६. | एस. एस. सी. बोर्ड ते एकनाथनगर या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ७,२२,३००/- |
| ७. | निराला बाजार ते नागेश्वरवाडी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९७,२६१/- |
| ८. | औंकार चौक ते ज्ञानेश्वर नगर या ६० फुट विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९४,०००/- |
| ९. | शहागंज ते सिटीचौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९८,०००/- |
| १०. | मिलकॉर्नर ते औरंगपुरा व पुढे औरंगपुरा ते श्री. बसैय्ये (गुलमंडी) यांचे | १५,०८,१२६/- |

| | | |
|---|---|---|
| | घरापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | |
| ११. | अमरप्रित हॉटेजल जालना रोड ते बीड बायपास या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ०८,०९,४००/- |
| १२. | सेव्हनहिल जालनारोड ते सुतगिरणी चौक या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ७,७५,१००/- |
| १३. | क्रांतीचौक ते एस. एस. सी. बोर्ड हा मुख्य रस्ता विकसित करणे. | २१,३२,९००/- |
| १४. | उत्सव मंगल कार्यालय ते पीरबाजार भाजीवालीबाई चौक रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे दुरुस्ती करणे. | १०,०५,५००/- |
| १५. | पीरबाजार ते शहानुरमियाँ दर्गा या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १८,८४,०००/- |
| १६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय त पानचक्की ते बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय ते विद्यापीठ द्वार या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १९,६८,५००/- |
| १७. | रोकडिया हनुमान कॉलनी ते भारत दूरसंचार कार्यालय ते रविवार बाजार व मोतीकारंजा चौक ते किराणाचावडी भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ८,१२,२००/- |
| १८. | जयहिंद कॉलनी, सन्मित्र कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,९५,१००/- |
| १९. | जयदुर्गा कॉलनी भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,३३,७००/- |
| २०. | आय. टी. आय ते महानगरपालिका वाचनालय येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ६,५९,८००/- |
| २१. | उस्मानपुरा भागात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९८,४००/- |
| | **एकूण** | **२,१२,०३,८३६/** |

**संवाद :**

**मा. सभापती :** रस्त्यांच्या कामांची यादी दिली ती सर्व कामे केव्हा होणार कालावधी निश्चित करावा. किती दिवसात रस्त्याची कामे तसेच वाहतुक बेटांची कामे पूर्ण होणार आहेत.

**अति. शहर अभियंता :** याचा आराखडा तयार केलेला आहे. आज मंजुरी मिळाल्यास ६ तारखेपर्यंत निविदा काढता येतील. २० तारखेपर्यंत निविदा स्विकारले जाती. १५ फेब्रुवारी पर्यंत ही सर्व कामे होतील असा आराखडा तयार केलेला आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** दुसरे काही रस्ते यात वाढ करता येईल का.

**मा. सभापती :** आताच मुख्य लेखाधिकारी यांनी मा. आयुक्त यांचेशी चर्चा केली. त्यात आणखी ३८ लक्ष रुपयेंची कामे करून हा प्रस्ताव २.५० कोटीचा घेतो आहे. २.५० कोर्टाचा प्रस्ताव सर्व पदाधिकारी व स. सदस्यांची भावना, निकड लक्षात घेवून सुधारित प्रस्ताव तयार करावा असे या सभागृहाच्या संमतीने आदेशित करण्यात येते. १५ जानेवारी पर्यंत काम पूर्ण करावे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** हर्सूल भागात मयुरपार्क बाजुला २४ मीटरच्या रस्ता आहे. त्याचा यात समावेश करावा.

**अति. शहर अभियंता :** तेथील जागा सध्या ताब्यात नाही. जागा ताब्यात घेऊन करण्यास वेळ लागेल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** जागा ताब्यात घ्यावी. तो रस्ता यात समाविष्ट करावा. तेथील नागरिकांची बऱ्याच दिवसापासूनची मागणी आहे.

**मा. सभापती :** हर्सूल रस्ता जो मुयर पार्कच्या बाजूला आहे त्या रस्त्याची जागा ताब्यात घेण्याबाबत आदेशित केले होते. काय कार्यवाही करण्यात यावी.

**सहा. संचालक न. र. :** पर्चेस नोटीस आलेल्या आहेत. भूसंपादनाची कार्यवाही करण्यात आणखी वेळ लागणार आहे. मोजणीसाठी प्रकरण पाठविण्यात आले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** आतापर्यंत काहीही केलेले नाही. त्या भागात एकही रस्ता नाही. जनतेला चालता येत नाही. शेत नाही कार्यात्तर मंजुरी घ्यावी. च्या रस्त्याचा यात समावेश करावा.

**श्री. संजय शिरसाठ :** जो रस्ता भूसंपादन केलेला आहे. त्याबद्दल काही रक्कम कोर्टात डिपॉझिट करा. ज्या वेळेस भूसंपादनाची कार्यवाही होईल. त्यावेळेस पैसे वळती करता येतील. पैसे डिपॉझिट केल्यानंतर जागेचा ताबा घेता येईल. न्यायालयात जो निर्णय लागेल त्याप्रमाणे नंतर कार्यवाही करता येईल. अर्जन्सी क्लॉजखाली जागा संपादन करावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जाधववाडीचा रस्ता व डी. पी. रोड म्हणून विकास आराखड्यात मंजूर आहे. त्या रस्त्यासाठी सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात २५ लक्ष तरतूद ठेवलेली आहे. त्या भागात जवळपास २४ ते ३० हजार लोकसख्या आहे. त्यांचे जिल्हाळ्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. विकास आराखडा मंजूर झाल्यानंतर तेथील रस्ता होण्या संदर्भात प्रशासनाने आजपर्यंत कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. आताच खुलासा केला. मोजणी होणार आहे. भूसंपादन करणार त्यास वेळ लागणार रस्ता लगेच करणे शक्य नाही. असे मत व्यक्त केले. आचार संहिता लागण्याच्या आगोदरच्या बैठकीत चर्चा होऊनही रस्त्याची जागा तात्काळ संपादन करण्यासंदर्भात उपअभियंता श्री. देशमुख यांची नियुक्त केलेली होती. मोजणी वगैरे झालेली आहे. त्या भागातील बऱ्याचा लोकांच्या पर्चेस नोटीस देखील प्राप्त झालेल्या आहेत. हे सर्व झाले असतांना फक्त तो ठराव सर्वसाधारण सभेत पारीत करणे आवश्यक आहे. यापूर्वी अनेक प्रकरणे मा. आयुक्तांनी तडजोडीने निकाली काढलेली आहेत. त्याप्रमाणे काम करतील परंतु तो प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे येणे आवश्यक आहे. तसे आपण आदेशित करावे. ठराव मंजूर झाल्यानंतर प्रशासन पुढील कार्यवाही करेल. प्राथमिक स्टेजचे जे काम आहे. त्यास उशीर होतो आहे. म्हणून त्वरित प्रस्ताव आणण्याचे आदेश द्यावेत. सर्वसाधारण सभ्झेने त्या प्रस्तावास पारीत केल्यानंतर पुढील कार्यवाही शासन करेल. सर्व साधारण सभेत प्रस्ताव पारीत झालाच नाही तर प्रशासनास त्या ठिकाणची निकड दाखविणार कशी? प्राथमिक पातळीवरील कामास उशीर झालेला आहे. जी भावना रस्त्यांच्या संदर्भात स. सदस्य श्री. भाऊसाहेब ताठे यांनी व्यक्त केली. त्या रस्त्याचा सुध्दा यात समावेश करण्यात यावा. भूसंपादनाचे काम एक महिन्यचे आत करून निविदा वगैरे काढून १ महिण्याच्या आत काम होईल. तसे आदेशित करण्यात यावे.

**मा. सभापती :** स. सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन सदर रस्त्याची जागा ताब्यात घ्यावी लागेल. जागा भूसंपादन केल्यास काम करण्यास अडचण येणार नाही. तसा प्रस्ताव सर्वसाधारण सभेत सादर करावा. त्यानुसार तात्काळ रस्त्याची जागा ताब्यात घेण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** चौकाचे सुशोभिकरण किंवा सौंदर्यीकरण करण्याचा प्रस्ताव आहे. यात इतर बेट व चौक होण्यात आले. परंतु टि. व्ही. सेंटरचा चौक घेण्यात आलेला नाही. वसंत नाईक जवळील पुतळ्याचे चौकाचा उल्लेख नाही. तो मुख्य घेण्यात यावा.

**मा. सभापती :** हे शहर ऐतिहासिक शहर असून दोन ठिकाणी मोठी घड्याळे आहेत. आजच्या घड्याळाची अवस्था बघितली तर वाईट आहे. तसेच गुलमंडी भागात प्रथम नगराध्यक्ष म्हणून राहिलेले स्व. द्वारकादास पटेल यांचे पुतळा आहे. तेथे एक घड्याळ आहे. त्या बेटाचे सौंदर्यीकरण करणे गरजेचे असून यात समावेश करणे गरजेचे आहे. त्याचा समावेश करावा. रस्त्याच्या विषयावर चर्चा करावी. सौंदर्यीकरणाचा वेगळा विषय आहे. एकत्र चर्चा करू नये.

**श्री. संजय शिरसाठ :** या स्थायी समितीच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासं प्रशासनाने सुरुवात केली ही चांगली बाब आहे. प्रस्ताव सादर झालेले आहे. यासाठी निश्चित कालावधी ठेवणार आताच चर्चा झाली म्हणून प्रशासनाचे व सभापती यांचे अभिनंदन या सभागृहातर्फे करतो. दोन महिन्यापूर्वी वृत्तपत्रात रस्त्याच्या बाबत वेगवेगळे चित्र प्रसिध्द झाले. जनतेपर्यंत माहिती पुरविली व आता तरी महापालिकेने जागे व्हावे म्हणून जी भूमिका पत्रकार बांधवानी घेतली त्याबद्दल त्यांचे सुध्दा अभिनंदन करतो. रस्त्याचे काम करण्यासाठी निश्चित कालावधी ठेवणार आहात. चर्चा केली तर खूप वेळ जाणार तसेच सर्व सदस्यांच्या वतीने आपणासं अधिकार देण्यात येतात की, आपणच याबाबतीत जातीने लढा देऊन ही सर्व रस्त्याची कामे मार्गी लावण्याबाबत कार्यवाही करावी. तसे आदेश प्रशासनास द्यावे व काम करून घ्यावे. तशी टिप्पणी स्थायी समिती समोर ठेवावी. त्यास आम्ही मान्यता देत आहोत.

**मा. सभापती :** अति. शहर अभियंता यांनी शहरातील प्रमख रस्ते सुधारणा कार्यक्रम म्हणून प्रस्तावित केले. प्रस्ताव रुपये २,१९ कोटीचे सादर केले. त्यात दुरुस्ती करून २.५० कोटीचे प्रस्ताव व या संबंधी आताच सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सभापतींना अधिकार दिल्यानुसार दुरुस्त असा प्रस्ताव अति. शहर अभियंता देतील. त्यानुसार १५ जानेवारी २००५ बार चार्ट बनवून शहरातील संपूर्ण रस्ते युध्द पातळीवर प्रस्तावित केल्यानुसार पूर्ण करावे असे या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनास देण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार शहरातील प्रमुख रस्ते सुधारणा कार्यक्रमांतर्गत विविध रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम करणे करिता रुपये ३.०० कोटी बचतीमधून खालील दर्शविल्याप्रमाणे रक्कम रुपये २.५० कोटी खर्चा पर्यंतची रस्त्यांची कामे करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

## औरंगाबाद शहरातील प्रमुख रस्ते सुधारणा कार्यक्रम

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | मुख्य बसस्थानक ते स्विमींग पुल रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ५,६९,५००/- |
| २. | बाबुराव काळे चौक ते महात्मा फुले चौक रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १४,७८,६५२/- |

| | | |
|---|---|---|
| ३. | त्रिमुर्ती चौक ते चेतक घोडा या रस्त्यांचे डांबरीकरण करणे | ४,९९,३६५/- |
| ४. | पुंडलिकनगर शिवाजी महाराज पुतळा ते सिडको हद्द या १०० फुट विकास योजना रस्त्याची दुरुस्ती करणे. | ४,०१,९२५/- |
| ५. | एस. टी. कॉलनी (पीरगैब दर्गा) ते चंपाचौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ८,६०,१०७/- |
| ६. | एस. एस. सी. बोर्ड ते एकनाथनगर या मुख्य रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ७,२२,३००/- |
| ७. | निराला बाजार ते नागेश्वरवाडी रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९७,२६१/- |
| ८. | औंकार चौक ते ज्ञानेश्वर नगर या ६० फुट विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९४,०००/- |
| ९. | शहागंज ते सिटीचौक रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९८,०००/- |
| १०. | मिलकॉर्नर ते औरंगपुरा व पुढे औरंगपुरा ते श्री. बसैय्ये (गुलमंडी) यांचे घरापर्यंत रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | १५,०८,१२६/- |
| ११. | अमरप्रित हॉटेजल जालना रोड ते बीड बायपास या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ०८,०९,४००/- |
| १२. | सेव्हनहिल जालनारोड ते सुतगिरणी चौक या रस्त्याची दुरुस्ती करणे. | ७,७५,१००/- |
| १३. | क्रांतीचौक ते एस. एस. सी. बोर्ड हा मुख्य रस्ता विकसित करणे. | २१,३२,९००/- |
| १४. | उत्सव मंगल कार्यालय ते पीरबाजार भाजीवालीबाई चौक रस्त्याचे डांबरीकरणाद्वारे दुरुस्ती करणे. | १०,०५,५००/- |
| १५. | पीरबाजार ते शहानुरमियाँ दर्गा या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १८,८४,०००/- |
| १६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय त पानचक्की ते बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय ते विद्यापीठ द्वार या रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १९,६८,५००/- |
| १७. | रोकडिया हनुमान कॉलनी ते भारत दूरसंचार कार्यालय ते रविवार बाजार व मोतीकारंजा चौक ते किराणाचावडी भागात रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ८,१२,२००/- |
| १८. | जयहिंद कॉलनी, सन्मित्र कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १,९५,१००/- |
| १९. | जयदुर्गा कॉलनी भागात रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २,३३,७००/- |
| २०. | आय. टी. आय ते महानगरपालिका वाचनालय येथील रस्त्यांचे डांबरीकरण करणे. | ६,५९,८००/- |
| २१. | उस्मानपुरा भागात अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण करणे. | ९,९८,४००/- |
| | **एकूण** | **२,१२,०३,८३६/-** |

**विषय क्र. १२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक २०-०७-६६ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. ८१६ अन्वये लघुलेखक (निम्न श्रेणी) या पदाचे लघुलेखक (उच्च श्रेणी) मराठी माध्ये रुपांतरात करण्याचा ठराव पारीत झालेला आहे. उक्त ठराव शासनाच्या मान्यतेसाठी दि. ३०-०७-९७ रोजी पाठविण्यात आलेला आहे. परंतु शासनाची मान्यता मिळाले की नाही. तथापी स्वीय सहाय्यक पदावर कार्यरत असलेले श्री. मोईनोद्दिन हे दि. ३१-१२-२००३ रोजी सेवानिवृत्त झालेले असून दि. ०१-०१-२००४ पासून स्वीय सहाय्यक पदाचा अतिरिक्त कार्यभार श्री. सुनिल ढेकळे , लघुलेखक (निम्नश्रेणी) (मराठी) यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

करिता श्री. सुनिल ढेकळे लघुलेखक (निम्नश्रेणी) मराठी यांना लघुलेखक (निम्नश्रेणी) या पदाची श्रेणीवाढ करून लघुलेखक (उच्चश्रेणी) या प्रमाणे श्रेणीवाढ करण्यास शासनाची मान्यता मिळेल या अटीवर सहा (६) महिन्याच्या कालावधीसाठी लघुलेखक (उच्चश्रेणी) वेतनश्रेणी रु. ६५००-२००-१०५०० मध्ये तात्पपुरत्या स्वरुपात श्रेणीवाढ देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** श्री. सुनिल ढेकळे यांची निम्नश्रेणी पदाची वाढ करून लघुलेखक उच्चश्रेणी पदाची श्रेणीवाढ करण्यास शासनाच्या मंजुरीच्या अधिन राहून ६ महिन्याच्या कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात लघुलेखक (उच्चश्रेणी) रुपये ६५००-२०० ते १०५०० मध्ये श्रेणीवाढ करण्याचा प्रस्तावास मंजुरी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री. सुनिल ढेकळे, लघुलेखक (निम्नश्रेणी) (मराठी) यांचेकडे सोपविण्यात आलेला आहे.

करिता श्री. सुनिल ढेकळे लघुलेखक (निम्नश्रेणी) मराठी यांना लघुलेखक (उच्चश्रेणी) या प्रमाणे श्रेणीवाढ करण्यास शासनाची मान्यता मिळेल या अटीवर (सहा) महिन्याच्या कालावधीसाठी लघुलेखक (उच्चश्रेणी) रुपये ६५००-२००-१०५०० मध्ये तात्पपुरत्या स्वरुपात श्रेणीवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहरास जयकवाडी जलाशयातून पाणी उपसा करून ७०० मी. मी. व १४०० मी. मी. व्यासाच्या जलवाहिणीद्वारे पाणीपुरवठा केला जातो. सदरील जलवाहिनीमधून पाणी गळती झाल्यास किंवा जलवाहिनी फुटल्यास पाण्याचे परिमाण व दाब प्रचंड असल्यामुळे कमी क्षमतेच्या पंपाद्वारे पाणी उपसा करणे शक्य होत नाही. त्यासाठी जास्त विसर्ग असलेला पंप, पाणी पुरवठा विभागाकडे असणे आवश्यक आहे. त्यामुळे जलवाहिनी दुरुस्तीचे काम जलगतीने करण्यास मदत होईल.

यासाठी किर्लोस्कर बनावटीच्या के. पी. एफ. १६०० पोर्टेबल पंप विसर्ग १६०० लिटर प्रति मिनिट हा पंप योग्य असल्यामुळे पंप खरेदी च्या रुपये ११,७५,७५४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्रमांक. ५१ दिनांक २१-०७-२००४ अन्वये मान्यता मिळाल्यानंतर वर्तमानपत्रात निविदा सूचना क्र. मनपा लेखा/निविदा/३२ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये जाहिरात देवून किर्लोस्कर पंपाचे उत्पादक किंवा अधिकृत विक्रेते यांच्याकडून स्पर्धात्मक निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या

शेवटच्या तारखेपर्यंत दर भरलेल्या तीन निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. ओम मार्केटिंग औरंगाबाद | अं. प. दरापेक्षा ०५% कमी दराने |
| २. | मे. अमीत इंजिनिअर्स औरंगाबाद | अं. प. दरापेक्षा ५.५% जास्त दराने |
| ३. | मे. अमेया सेल्स प्रा. लि. नाशिक | अं. प. दरापेक्षा ९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या मे. ओम मार्केटींग औरंगाबाद औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून अं. प. दरापेक्षा ०.५% कमी आहेत. तरी सर्वात कमी दराची मे. ओम मार्केटींग, औरंगाबाद यांची अं. प. दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा मा. स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**
**मा. सभापती :** मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरात जायकवाडी जलाशयातून पाणी पुरवठा करणाऱ्या जलवाहिनीस गळीत झाल्यास किंवा जलवाहिनी फुटल्यास दुरुस्तीचे वेळी आवश्यक पंप (किर्लोस्कर बनावटीच्या के. पी. एफ. १६०० पोर्टेबल) खरेदी करण्यासाठी मागविण्यात आलेल्य निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.५% कमी दराची मे ओम मार्केटींग औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२ :**

उपआयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा क्रिडा मंडळ औरंगाबाद यांना छत्रपतीनगर, गारखेडा येथील सांस्कृतिक सभागृह, क्षेत्रफळ १०५.८२ चौ. मी. भाडे तत्वावर देण्याबाबत मा. स्थायी समितीच्या बैठकीत विषय क्र. ६० दि. ०४-०८-२००४ रोजी ठराव पारित करण्यात आला. भाडे समितीने सदर जागेचे भाडे प्रतिवर्षी रु. ९२७१ व सेवाशुल्क व इतर शुल्कासह भाडे प्रतिवर्ष रु. ९२७१ ऐवजी रु. ९००/- प्रतिवर्ष अशी मान्यता दिली आहे. तरी सदर भाडे निश्चिती बाबत धोरणात्मक निर्णयासाठी फेर प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर विचारार्थ सादर.

**संवाद :**
**मा. सभापती :** दिनांक ०४-०८-२००४ रोजी स्थायी समितीसमोर भाडे निश्चितीचा प्रस्ताव ठेवण्यात आलेला होता. दिनांक ०४-०८-२००४ रोजी ठराव पारीत करण्यात आला तो तशाचा तसा ठराव प्रशासनाने पुर्नविचारासाठी ठेवलेला आहे. प्रतिवर्ष रु. ९००/- ऐवजी १५००/- रुपये भाडे निश्चित करण्यात येते त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी असा निर्णय या समितीमार्फत देण्यात येतो. त्या प्रमाणे अंमलबजावणी करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार स्वामी स्वामी विवेकानंद व्यायाम शाळा क्रिडा मंडळ औरंगाबाद यांना छत्रपतीनगर, गारखेडा येथील सांस्कृतिक सभागृह, क्षेत्रफळ १०५.८२ चौ. मी. भाडे तत्वावर देण्याबाबत मा. स्थायी समितीच्या

बैठकीत विषय क्र. ६० दि. ०४-०८-२००४ रु. ९००/- प्रतिवर्ष ऐवजी रु. १५०० प्रतिवर्ष भाडे निश्चिती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, समर्थनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते सिल्लेखाना या रस्त्याची दुरुस्ती / पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००३-०४ ची. सा. बां. खात्याची दरसूची वापरून तयार करण्यात आले आहे. या कामाचे अंदाजपत्रक रु. १२,८०,४७७/- होत आहे. रहदारीस त्रास होत असल्यामुळे तातडीने दुरुस्ती / पुर्नडांबरीकरण करणे आवश्यक आहे.

औरंगाबाद एकात्मिक रस्ते विकास प्रकल्पाच्या माध्यमातून रस्ते सुधारणा करावयाच्या कार्यक्रम अंतर्गत या रस्त्याचा समावेश आहे. सदर रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरणासाठी त्वरित होती घेण्यात यावा असे मा. मुख्स महामंडळ यांना कळविण्यात आले आहे. परंतु महामंडळाने या विभागास असे कळविले आहे की, रस्त्याची स्थिती खराब झालेली असल्यामुळे महानगरपालिकेने रस्त्याची दुरुस्ती करावी.

सदर दुरुस्ती कामाची रक्कम म. रा. र. वि. म. यांना मनपाकडून मिळाली असे म. रा. र. वि. महामंडळाने मानणे आवश्यक असल्याच्या अटीवर प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवणेसाठी मा. आयुक्त महोदयांनी दि. ०१-११-२००४ रोजी अनुमती दिली आहे. प्रस्तुत कामाचा खर्च पुर्नडांबरीकरण या लेखाशिर्षा अंतर्गत सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात पुस्तिकेतील पान क्र. १३८ वरील अ.क्र. १० नुसार ३.०० लक्ष व पान क्र. १४१ वरील अ.क्र. ७२ नुसार ३० लक्ष पैकी र. रु. ९,८०,४७७/- असे एकुण १२,८०,४७७/- करण्याचे प्रस्तावित आहे. अंदाजपत्रक र. रु. १२,८०,४७७/- प्रशासकीय मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे समर्थनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौक ते सिल्लेखाना या रस्त्याची दुरुस्ती / पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १२,८०,४७७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ७५ बारी कॉलनी, वाहेद कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक सा. बां. विभागाची सन २००३-०४ च्या दरसूचीचा वापर करून तयार करण्यात आले आहे. या कामाचे अं. प. रु. ११,७०,०६९/- होत आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकास दिनांक ०१-११-०४ रोजी मा. आयुक्त महोदयांनी शिफारस केली आहे.

प्रस्तुत कामाचा खर्च सन २००४-०५ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील उपलब्ध रक्कमेतून भागविण्याचे प्रस्तावित आहे. पुर्नडांबरीकरण पान क्.र १४१ ल. क्र. ८३ नुसार ५ लक्ष, कॉंक्रीट रस्ते पान क्र. १३७ अ.क्र. ६८ नुसार २.५ लक्ष पान क्र. १३५ अ.क्र. ११ नुसार ३ लक्ष अशी एकूण १२.०० लक्ष तरतूद उपलब्ध आहे. यापैकी कॉंक्रीट रस्त्यासाठी ठेवण्यात आलेली आर्थिक तरतूद पुर्नडांबरीकरणाच्या कामाकरिता वापरणेसाठी मा. स्थायी समिती

सभा दि. ०२-०८-२००४ रोजी निर्णय झाला आहे. अंदाजत्रक रक्कम रु. ११,७०,०६९/- प्रशासकीय मान्यतेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ७५ बारी कॉलनी, वाहेद कॉलनी अंतर्गत रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,७०,०६९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र. ७६, कैसर कॉलनी भागातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक सन २००३-०४ चे सा. बां. खात्याचे दरसुचीचा वापर करून तयार करण्यात आले आहे. या कामाचे अं. प. रु. १२,२३,०३०/- होत आहे. या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २९-१०-२००४ रोजी मंजुरीची शिफारस केली आहे.

प्रस्तुत भागात पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी अर्थसंकल्प २००४-०५ च्या पुस्तिकेतील पान क्र. १२१ नुसार र. रु. ८ लक्ष, तसेच पान क्र. १२२ वरील अ.क्र. ५८ नुसार ६ लक्ष अशी एकूण १४ लक्ष तरतूद उपलब्ध आहे. सदर कामाचा खर्च या रक्कम रु. १४ लक्ष मधून भागवण्याचे प्रस्तावित आहे. करिता अंदाजपत्रक र. रु. १२,२३,०३०/- प्रशासकीय मान्यतेच्या विचारार्थ.

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ७६, कैसर कॉलनी भागातील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामाकरिता तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १२,२३,०३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**मा. सभापती :** स. सदस्य श्री. सलीम पटेल यांनी वॉर्ड क्र. ७६ कैसर कॉलनी वॉर्डसाठी पुर्नडांबरीकरण करण्यासाठी रु. १४ लक्षची तरतूद होती यातून होणाऱ्या बचत रक्कम रु. २.०० लक्ष मधून जिन्सी एणाम गल्ली, रशिद किराणा गल्ली व अहेमदभाई यांच्या घरापासून बौध्द पुतळ्यापर्यंतची रस्त्याची कामाकरिता वळती करण्याची मागणी केली आहे. तसेच श्री. भाऊसाहेब ताठे यांनी वॉर्ड क्र. ४५ मधील पाणी पुरवठ्यांचे कामासाठी ठेवलेल्या र. रु. १० लक्ष मधून एन-११ मनपा शाळेचा व सभागृहाचा परिसर विकसित करणेसाठी ५ लक्ष वळती करण्याची मागणी केली आहे. त्यास मंजुरी देण्यात येते. प्रशांत हॉटेल ते एम. आय. डी. सी. रेल्वेस्टेशन या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्या रस्त्याचे १०० मी. वाढीव काम करणे

आवश्यक आहे. या संबंधिची घोषणाही केली होती की, या कामासाठी वेगळी तरतूद उपलब्ध करून देता येईल. आता कामाला सुरुवात केलेली येईल. वाढीव काम तात्काळ करून घेण्यात यावे. वॉर्ड क्र. ६५ मधील जुनाबाजार नारायण नगर भागात कॉंक्रीट ऐवजी खडीकरण करण्यांस मान्यता देण्यात येते.

**निर्णय :** सन २००४-२००५ च्या अर्थसंल्पात समाविष्ट असलेल्य कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वॉर्ड क्र. ७६ कैसर कॉलनी वॉर्डासाठी पुर्नडांबरीकरण करण्यासाठी रु. १४ लक्षची तरतूद होती. यातून होणाऱ्या बचत रक्कम रु. २.०० लक्ष मधून जिन्सी हणामगल्ली रशिद किराणा गल्ली व अहेमद भाई यांच्या घरापासून बौध्द पुतळ्या पर्यंतची रस्त्याची कामाकरिता वळती करण्यास तसेच वॉर्ड क्र. ४५ मधील पाणी पुरवठ्याचे कामासाठी ठेवलेल्या र. रु. १० लक्ष मधून एन-११ मनपा शाळेचा व सभागृहाचा परिसर विकसित करणेसाठी ५ लक्ष वळती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. प्रशांत हॉटेल ते एम.आय.डी.सी. रेल्वेस्टेशन या रस्त्याचे काम सुरू करण्यात आले आहे. त्या रस्त्याचे १०० मी. वाढीव काम करणे आवश्यक आहे. या संबंधीची घोषणाही केली होती की, या कामासाठी वेगळी तरतूद उपलब्ध करून देता येईल. आता कामाला सुरुवात केलेली आहे. वाढीव कामासाठी २.५० लक्ष खर्च लागणार आहे. कार्योत्त्र मान्यतेचा प्रस्ताव सादर करावा व सदरचे वाढीव काम तात्काळ करून घेण्यात यावे. तसेच वॉर्ड क्र. ६५ मधील जुनाबाजार, नारायणनगर भागात कॉंक्रीटींग ऐवजी खडीकरण करण्यास मान्यता देण्यात येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव अर्थसंकल्पातील तरतूद | नवीन/सुधारित कामाचे नांव व सुधारित आर्थिक तरतूद | रक्कम |
|---|---|---|---|
| ७६ | वॉर्ड क्र. ७६ कैसर कॉलनी भागात पुर्नडांबरीकरण करणे १४ लक्षच्या तरतूदीतून होणारी बचत रु. २.०० लक्ष | जिन्सी हणामगल्ली रशीद किराणागल्ली व अहेमदभाई यांच्या घरापासून बौध्द पुतळ्यापर्यंतची रस्त्याचे काम करणे. | २.०० लक्ष |
| ४५. | वॉर्ड क्र. ४५ मध्ये पाणी पुरवठ्याची कामे करणे- रु. १० लक्ष | एन-११ येथील मनपा शाळेच्या बाजुचे सभागृह व परिसर विकसित करणे. | ५.०० लक्ष |
| ३१. | हॉटेल प्रशांत ते एम. आय. डी. सी. रेल्वे स्टेशन रोडचे डांबरीकरण करणे. | हॉटेल प्रशांत ते एम. आय. डी. सी. रेल्वे स्टेशन रोडचे डांबरीकरणाचे वाढीव काम करणे. | २.५० लक्ष |
| ६५. | वॉर्ड क्र. ६५, जुनाबाजार नारायणनगर भागात कॉंक्रीट करणे. १.५० लक्ष (पृष्ठ क्र. ११९ अ.क्र. ४१) | वॉर्ड क्र. ६५, जुनाबाजार नारायणनगर भागात खडीकरण करणे.- १.५० लक्ष | १.५० लक्ष |

**संवाद :**

**मा. सभापती :** प्रशांत हॉटेल ते एम.आय.डी.सी. रेल्वेस्टेशन या रस्त्याचे काम सुरू करण्यात आलेले आहे. या रस्त्याचे १०० मीटर वाढीव काम करणे आवश्यक आहे. व या संबंधी घोषणा केली होती की, या कामासाठी वेगळी तरतूद उपलब्ध करून देता येईल. आता कामाला सुरुवात केलेली आहे. वाढीव

कामासाठी रुपये २.५० लक्ष खर्च करणार कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव या सभागृहात सादर करावा व ते काम तात्काळ करून घेण्यात यावे.

**मा. सभापती :** आता चर्चेसाठी अर्ध्या तासाचा वेळ देण्यात येतो. चर्चा करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मागील बैठकीत खुल्या प्रवर्गातील भरती संबंधात जाहिर प्रगटन देवून कार्यवाही करावी म्हणून या सभागृहाने निर्णय घेतलेला होता. माझ्या माहितीप्रमाणे तशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. कोणत्याही वृत्तपत्रात जाहिरात दिलेली नाही. माझ्या वाचनात आलेली नाही. प्रशासनाचा हलगर्जीपणा का होता आहे. या मागचा उद्देश काय आहे? खुलासा करण्यांत यावा.

**मा. सभापती :** यापूर्वी खुल्या संवर्गातील नोकर भरती करण्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला होता. शासनाचे स्थगिती नव्हती तरी नोकर भरती थांबविली. कामाच्या आधारे थांबविली होती. सविस्तर खुलासा सहा. आयुक्त-१ यांनी करावा. वर्तमानपत्रातून जाहिरात देवून किंवा इतर माध्यमातून ज्या प्रकारे भरती करता येते त्याबाबत कार्यवाही करावी म्हणून याच सभागृहात आदेशित करण्यात आले होते. अद्याप का कार्यवाही झालेली नाही.

**सहा. आयुक्त :** १ जुलै रोजी शासनाचा निर्णय झालेला होता. आता तो २८ जूनला प्राप्त झाला त्याबाबत कार्यवाही करण्यात आलेले होती. मध्यंतरी मा. विभागीय आयुक्तांकडून एक पत्र प्राप्त झाले की रोस्टर पध्दती प्रमाणे वर्गवारी नुसार माहिती आवश्यक आहे. तशी माहिती आवश्यक आहे. तशी माहिती त्यांना दाखल केलेली होती. त्यावर काही क्युरीज काढलेल्या आहेत. आपले कर्मचारी तेथे बसून आहे. आताच मी मोबाईलवर चर्चा केली आहे. जो प्रस्ताव आपण जाहिर प्रगटन करून कार्यवाही करावयाची होती त्याबाबत संपूर्ण संवर्गातील रोस्टरप्रमाणे कार्यवाही करावी लागणार आहे. स्वतंत्रअशी कार्यवाही करता येणार नाही. त्या मा. विभागीय आयुक्तांचा आक्षेप आहे. आज उद्दा माहिती मिळाल्यानंतर जाहिर प्रगटन करून कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** निर्णय देवून सुध्दा तीन महिने झाले. आता जातीनिहाय संवर्गातील भरती बाबत कार्यवाहिस वेळ लागणार आहे. खुल्या संवर्गातील भरती बाबत स. सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. भरती करण्यास सुरुवात होते अपेक्षित होते. आतापर्यंत ही कार्यवाही केलेली नाही.

**सहा. आयुक्त-१ :** १००% भरती झाली होती च्यामुळे आरक्षणात झालेली नव्हती.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** खुल्या संवर्गातील भरती करण्यांबाबत जाहिर प्रगटनाचे निवेदन झालेले नाही. असा माझा प्रश्न असून माझ्या प्रश्नाचा खुलासा ते देत नाही. शासनाचेच आदेश आहेत की ज्या ज्या संवर्गातील जागा रिक्त आहेत त्या भरण्यात आरक्षणातील सर्व जागा इतर विभागात भरण्यात आलेल्या आहेत. या महापालिकेत खुल्या संवर्गातील ज्या जागा आहेत त्या जाणून बुजून भरण्यात येत नाही. का भरती होत नाहीत हे कुणाच्या दबावाखाली काम थांबून आहे. ऐवढे दिवस उलटून गेल्यानंतरही पुन्हा सदर प्रकरण विभागीय आयुक्ताकडे पाठविलेले रोस्टर प्रमाणे कार्यवाही करणार अशी उत्तरे मिळत आहे. खुल्या प्रवर्गातील किती जागा रिक्त आहे त्या बाबतीत खुलासा करावा. सहा. आयुक्त-१ श्री. टी. जी. जाधव हे बऱ्याच दिवसापासून त्या विभागाचे काम करतात. त्यांना समाधानकारक उत्तर देता येत नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** ऑगस्ट महिन्याच्या स्थायी समितीमध्ये हा मुद्दा उपस्थित झालेला होता. मा. उच्च न्यायालयाने ऑगस्ट महिन्यापर्यंत खुल्या प्रवर्गातील पदे भरण्यास स्थगिती दिलेली होती. मा. उच्च न्यायालयाचे स्थगितीचे आदेश (मनाई हुकूम) काढून घेतला त्यानंतर प्रशासनामार्फत कार्यवाही प्रस्तावित केल्यानंतर हे लक्षात आले की दर तीन वर्षाला स्थानिक स्वराज्य संस्था असेल किंवा करण्यात आली एकूण पदे भरण्यासाठी मनपाने कार्यवाही प्रस्तावित केल्यानंतर हे लक्षात आले की, दर तीन वर्षाला स्थानिक स्वराज्य असेल किंवा इतर कार्यवाही असतील त्यांना शासनाने नियुक्त केले बी. सी. सेल मार्फत रोस्टर व्हेरीफिकेशन किंवा करून तीन वर्षानंतर त्यांचे पुर्नविजन करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे या मनपामध्ये सन २००१ मध्ये व्हेरीफाय केलेले होते. त्यानंतर ऑगस्टमध्ये तीन वर्ष होतात. त्याच वेळी असा विचार केला की, मनपाकडे एकूण पदे रिक्त किती? भरावयाची किती व खुल्या संवर्गातील किती या पध्दतीने अहवाल तयार केला. तो मा. विभागीय आयुक्ताकडे दिला तेथे आपले कर्मचारी गेल्या आठ दिवसापासून आहेत. या आठवड्यात संपूर्ण रजिस्टर तपासून क्लिअर करून देतील यानंतर प्रशासनास कोणतीही अडचण येणार नाही. तसेच प्रशासनावर कुणाचा दबाव नाही. आठ दिवसाच्या आत कार्यवाही सुरू करू.

**मा. सभापती :** बी. सी. सेल मार्फत ताबडतोब व्हेरीफाय होईल याबाबत तात्काळ प्रशासनाने पाठपुरावा करावा. आता पर्यंत तपासणी होवून येणे अपेक्षित होते. पुढील कार्यवाही करता आली असती. खुल्या प्रवर्गागातील भरती तात्काळ झाली पाहिजे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** किती पदे खुल्या प्रवर्गातील रिक्त आहे. केंव्हापासून आहे माहिती घ्यावी.

**मा. सभापती :** खुल्या संवर्गातील किती पदे रिक्त आहे. केंव्हापासून रिक्त आहे. थोडक्यात खुलासा करावा.

**सहाय्यक आयुक्त :** वर्ग-१ मध्ये मुख्य लेखा परिक्षक एक पद रिक्त आहे. मंजूर पदे-१, वर्ग-२ मध्ये २० पदे मंजूर आहेत. ६ पदे रिक्त आहेत. उपअभियंता संवार्गत १९ पदे मंजूर आहेत. ३ पदे रिक्त आहेत. विभागीय अधिकारी मध्ये १२ पदे आहेत. ४ पदे रिक्त आहेत. शिक्षणाधिकारी पद रिक्त आहे. लघुलेखक (उच्चश्रेणी) (स्वीय सहाय्यकाचे) एक पद रिक्त आहे. सध्या जनसंपर्क अधिकारी एक पद रिक्त आहे. शारिकरीक शिक्षक-१ समुदाय संघटक २ पदे रिक्त, एम. एस. डब्ल्यू चे ४ पदे रिक्त आहेत.

**मा. सभापती :** खुल्या प्रवर्गातील रिक्त पदे किती आहेत. असा स. सदस्यांचा प्रश्न आहे.

**मा. आयुक्त :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी प्रश्न एकदा समजावून घ्यावा त्यानुसार खुलासा करावा सभागृहात फक्त खुल्या प्रवर्गातील जागांच्या बाबत माहिती विचारलेली आहे.

**सहाय्यक आयुक्त :** बी.सी. सेल साठी रजिस्टर दिलेले आहे. सध्या माहिती देता येणार नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सहाय्यक आयुक्त-१ यांचेकडे जे कर्मचारी काम करतात. त्यांना काम न करता वेतन दिले जात आहेत का त्यांचेकडे माहिती उपलब्ध नाही. तर तेथील कर्मचारी काय काम करतात.

**उपआयुक्त (प्र) :** उद्या संध्याकाळ पर्यंत खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांबाबतचा तक्ता मी सदस्य यांचेकडे देईल.

**मा. सभापती :** संपूर्ण स्थायी समितीच्या सदस्यांना त्याची प्रत देण्यात यावी.

**मा. आयुक्त :** मी तेथे नव्हतो परंतु मला माहित आहे की, खुल्या जागे संदर्भात नोटीफिकेशन तयार करण्यात आलेले होते. खुभ्या जागा ह्या खुल्याच असतात कोणी मंजुरी दिल्याशिवाय जाहिर प्रगटन देता येत नाही. असे काही नाही व्हेरीफाय होत राहील. नोटीफिकेशन तयार करावे ना. सभापतींच्या सुचनेनुसार कार्यवाही करावी.

**श्री. शाहीन जफर :** सिल्लेखाना येथील अतिक्रमणाच्या बाबतीत मी अनेक वेळा प्रश्न उपस्थित केला ४८ तासात काय कार्यवाही केलेली आहे. माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती :** संबंधित अधिकारी माझी परवानगी घेवून कामानिमित्त गेलेले आहे. परवाच संबंधित अधिकारी यांनी तेथे जाऊन कार्यवाही केली. काही साहित्य जप्त करून घेऊन आलेले होते. तसा रिपोर्ट केलेला आहे. सकाळी मा. आयुक्तांकडे एक बैठक झाली आहे. त्या बैठकीत संबंधित अधिकारी श्री. कंकाळ तसेच योनी साहेब. मी स्वत: तसेच स. सदस्य श्री. नासेरखॉन कुरैशी उपस्थित होते. मा. आयुक्तांनी सदर जागेवर पुन्हा काम होत आहे की काय म्हणून मा. उपआयुक्त श्री. कांबळे साहेब तसेच श्री. योनी साहेब यांना पाहणी करून रिपोट्र सादर करण्याचे आदेशित केलेले आहे. त्यानुसार मा. आयुक्त स्वत: कार्यवाही करणार आहे.

**श्रीमती शाहीन जफर :** यानंतर या विषयावर मी बोलणार नाही. कार्यवाही होत नसेल तर चर्चा करून अर्थ नाही. ६ ते ८ महिन्यापासून हा प्रश्न उपस्थित करते आहे. मा. आयुक्त यांना स्वत: सदर जागेची पाहणी करावी. एवढीच एक इच्छ राहिलेली आहे.

**मा. आयुक्त :** मी त्यांचे जागेवर भेट होईल.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** शिवाजीनगरचे नागरिक याही निवडणुकीत मतदानापासून वंचित राहतील असे वृत्तपत्रात दिले. हा भाग समावेश करून घ्यावा.

**मा. आयुक्त :** शिवाजीनगरच्या म्हणजेच सिडको प्लॅनींग ऑथर्टीच्या ११,१२ योजनेचा समावेश मतदार याद्यामध्ये होण्यासाठी मनपाच्या या सभागृहात व इतर ठिकाणीही बरीच चर्चा झालेली आहे. त्या भागातील काही नागरिक व त्यांचे शिष्टमंडळ सुध्दा मला भेटण्यासाठी आलेले होते. त्याबाबत त्यांना खुलासा केला. सप्टेंबर मध्ये या संबंधी शासनाकडे अहवाल पाठविलेला होता. परंतु त्यापेक्षाही अधिक माहिती शासनाला पाहिजे होती. पुणे येथे राज्यभरातील सर्व मनपाचे सर्व आयुक्तांची परिषद होती. तेंव्हा तेथे संबंधित उपसचिव आलेले होते. तसेच नगर विकास विभागाचे प्रधान सचिवही होते. उपसचिव यांनी ही संचिका संपूर्ण वाचनू घेतली. विषय समजावून घेतला व या विषयाला गती देवून हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यात येईल असे आयुक्त म्हणून मला सांगण्यात आलेले होते. यावरच न थांबता नगरविकास विभागाचे श्रीयुत नानासाहेब पाटील यांना या चर्चेचा उल्लेख करून एक पत्र परवाच पाठविलेले आहे. १-२ दिवसात मुंबई मनपाचे सहा. संचालक नगररचना अधिकारी हे परत जातील व या बाबतीत पाठपुरावा करतील.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** सणाचे दिवस आहे वॉडात अनियमित पणे पाणी सोडले जाते. तसे होऊ नये तसेच सर्वच वॉर्डात पाणी व लाईटची दुरुस्ती होणे गरजेचे आहे. या दोन्ही समस्या सोडवाव्यात.

**मा. सभापती :** कार्यकारी अभियंता (विद्युत) यांना आदेशीत करण्यात येते की, सणासुदीच्या वेळेस लाईटची दुरुस्ती किंवा लाईट बसविण्याची गरज आहे ती कामे त्वरित करण्यात यावी. जी काही आर्थिक तरतूद लागेल उपलब्ध होईल. एजन्सी मार्फत काम करून घ्यावे. विद्युत गाड्या उपलब्ध नव्हत्या त्या १-२ दिवसापूर्वीच उपलब्ध झालेल्या आहे. कार्यकारी अभियंता यांनी पाण्याचे बाबतीत नियोजन करावे.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव, | मा. सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | स्थायी समिती, महानगरपालिका, |
| | औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**बुधवार दिनांक ४-११-२००४ रोजीच्या स्थायी समितीत सादर करण्यात आलेली**
**: शहर सौंदर्यीकरण टिप्पणी :**

औदयोगिकरण व पर्यटन यामुळे औरंगाबाद शहराचा शिग्रतेने विकास झालेला असुन महानगरपालिकेतर्फे चैक सुशोभिकरण करणे. चौक विकसित करणे पुतळे बसविणे इत्यादी कामे पुर्ण करण्यात आलेली आहे. शहर सौदर्यीकरणा मध्ये औरंगाबाद शहरातील ४४ वाहतुक बेटाचे सौदर्यीकरण व सुशोभिकरण करण्यात आलेले आहे. सदर वाहतुक बेटाची यादी सोबत जोडलेली आहे.

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात शहर सौदर्यीकरण करण या लेखाशिर्षाखाली रु. ०५/- लाखाची तरतुद ठेवण्यात आलेली आहे.

उपरोक्त तरतुदी अंतर्गत विभागाने खालील कामे प्रस्तावित केलेली आहेत.

: शहर सौंदर्यीकरणाच्या कामाचा आराखडा :

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | प्रशासकीय मान्यता | | शेरा. |
|---|---|---|---|---|---|
| | | | प्राप्त | अप्राप्त | |
| १. | महानगरपालिका कार्यालयासमोरील कामगार चौकाची दुरुस्ती करुन रंगरंगोटी करणे. | २५,००० | - | - | |
| २. | मध्यवर्ती जकात नाक्यासमोरील परमवीर चक्र अ. हमीद चौक सुशोभिकरण करणे. | ५०,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ३. | भाऊसाहेब मोरे चौक (लक्ष्मी चौकां) येथे वाहतुक बेट विकसीत करुन सौदर्यीकरण करणे. | ५५,१०० | प्राप्त | - | करारनामा करुन कार्यादेश देण्याच्या कार्यवाहीत आहे. सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| ४. | प्रभाग क्र. २९ विवेकानंद चौक सुशाभिकरण करणे. | ९९,००० | प्राप्त | - | काम चालु सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| ५. | बाबा पेट्रोलपंप ते हॉटेल कार्तिकी पर्यंत मुख्य रस्त्यावर डिव्हायडर सुशोभिकरण करणे. | १०,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ६. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा असलेल्या बेंटाची दुरुस्ती करुन सुशाभिकरण करणे. (भडकल गेट) | १,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ७. | ज्युब्ली पार्क येथील पंप हाऊस लगत असलेल्या धबधब्याच्या परिसरात सौदर्यीकरण करणे व | १,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | रेलींग लावणे. | | | | |
| ८. | लक्ष्मण चावडी येथील सम्राट अशोक चौक नुतीनकरण करुन सौदर्यीकरण करणे. | १,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ९. | महेशनगर येथील राजहंस पक्षी चौकाचे नुतनीकरण करुन सुशोभिकरण करणे. | २५.००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १०. | प्रभाग क्र. १८ गजाजन महाराज मंदिर येथील चौकाची पुर्नरचना करणे व सुशोभित करणे. | ११.००० | - | अप्राप्त | सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| ११. | सेवायोजना कार्यालयासमोरील वाहतुक बेटात पारदर्शक कृत्रिम फुंलाचा देखावा तयार करणे. | १,२०,००० | - | | नविन अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १२. | सेवनहिल जालना रोड येथील चौक विकसित करणे. | १,३०,००० | - | - | नवीन अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १३. | चंपा चौक नुतनीकरण करुन सुशोभीकरण करणे. | १,५०,००० | - | - | नवीन अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १४. | पैठणगेट येथील लक्की ज्युस सेंटर समोरील आयलंडची पुर्नरचना करुन सुशोभिकरण करणे. | १,६९,४०० | प्राप्त | - | निविदा काढली सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| १५. | दिल्ली गेट शेजारील वाहतुक बेटामध्ये पाण्याचे धबधबे दुरुस्ती करुन पुर्ववत चालु करणे व शोभेची झाडे लावणे. | १,७५,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १६. | प्रभाग क्र.४ मधील विविध १४ वाहतुक बॅटाचे/प्रतिकृतीची रंगरंगोटी करणे. | २,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १७. | जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील वाहतुक बेटामध्ये तोफ बसविणे व सुशोभिकरण करणे. | २,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| १८. | छत्रपती शिवाजी महाराज पुराण वस्तु संग्रहालयात कारंजे बसवुन सुशोभिकरण करणे. | २,००,००० | प्राप्त | - | निविदा मंजुरीस्तव सादर. सन २००४-२००५ च्या अर्थकल्पात अंतर्भुत आहे. |
| १९. | सिटी क्लब समोरील सामान्य रुग्णाल्यालगत असलेल्या बेटाची दुरुस्ती करुन सौदर्यीकरण करणे. | २,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| २०. | प्रभाग क्र.स. पिरबाजार आनंद गाडे चौक विकसित करणे. | २,५०,००० | प्राप्त | | निविदा उघडली सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| २१. | रमानगर, चेतनानगर, सिंधी कॉलनी इ. ठिकाणी दिशादर्शक तोरण व सुशोभिकरण करणे. | २,५०,००० | - | - | सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| २२. | लिटील फ्लॉवर शाळेसमोरील | २,९९,१०० | - | अप्राप्त | अंदाजपत्रक सादर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | मिलिंद चौकात बेट तयार करुन सुशोभिकरण करणे. | | | | केले आहे. सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात अंतर्भुत आहे. |
| २३. | रंगीन गेट लगत असलेल्या वाहतुक बेटाभोवताली रॅलींग बसविणे व बेटाची दुरुस्ती करुन सुशोभिकरण करणे. | ३,००,००० | - | - | अंदाजपत्रक सादर केले आहे. |
| २४. | मिलकॉर्नर येथील छत्रपती शाहु महाराजचा पुतळा असलेल्या बेटाची व बेटाभोवताली असलेल्या फुटपाथची व ट्रॅफिक चॅनलयाझर दुरुस्ती करणे. | ३,००,००० | - | - | अंदाजपत्रक सादर केले आहे. |
| २५. | क्रांतीचौक वाहतुक बेटाची दुरुस्ती करणे. | ३,००,००० | प्राप्त | - | अर्थसंकल्पात २००४-०५ मधील या कामासाठी केलेली तरतुद अपुरी असल्याने चौकाचा परिपुर्ण विकासासाठी किमान आणखी ७ लाख रुपये आवश्यक आहेत. |
| २६. | महावीर चौक येथील चौकाचे सुशोभिकरण करणे. | ५,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| २७. | क्रांतीचौक लगत छोटे वाहतुक बेट विकसित करणे. | ५,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| २८. | सतीश मोटर्स ते औरंगपुरा या रस्त्यावरील चार वाहतुक बेटाचे नुतनीकरण करुन सुशोभिकरण करणे. | ३,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| २९. | मा. विभागीय आयुक्त कार्यालय ते अण्णाभाऊ साठे चौक पर्यंत रस्त्यावर रोड दुभाजक सुशोभिकरण करणे. | ५,१०,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ३०. | कर्तिकी हॉटेल समोरील वाहतुक बेटाचे नुतनीकरण व सुशोभिकरण करणे. | २,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ३१. | रेल्वेस्टेशन येथील सेल्प टॅक्स ऑफिस समोरील दुभाजकाचे सौदर्यीकरण करणे. | ४,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ३२. | क्रांतीचौक ते महावीर चौक रस्ता दुभाजकाचे सौदर्यीकरण करणे. | २७,००,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| ३३. | लिटील फ्लॉवर स्कुल ते लक्ष्मी कॉलनी रस्त्यावर दुभाजक तयार करुन सौदर्यीकरण करणे. | १०,००० | - | - | अंदाजपत्रक तयार केले आहे. |
| | | | | एकुण | रुपये. १,२४,१९००० |

औरंगाबाद शहरातील चौक सुशोभिकरण करण्यासाठी शहरातील उदयोजक तसेच खाजगीसंस्था यांनाही या करिता आवाहन करणे आवश्यक आहे. शहर सौदर्यीकरणमध्ये खाजगी संस्था तसेच उदयोजक अल्प प्रतिसाद देतात असा अनुभव आहे.

हौसींग डेव्हलपमेंट फायनान्स कॉर्पोरेशन तसेच वाळुज येथील एका कंपनीने शहरातील २ वाहतुक चौक विकसित करण्याची तयारी दर्शविली होती. याबाबत प्रथामिक चर्चा कारखानदारांच्या प्रतिनिधीबरोबर झाली होती. परंतु नंतर त्यांनी प्रतिसाद दिला नाही.

तरी सर्व वर्तमानपत्रामध्ये शहरातील उदयोजक तसेच खाजगीसंस्था यांना शहरातील वाहतुक बेट विकसित करणे/ नुतनीकरण करणे व देखभाल दुरुस्ती करुन सुव्यवस्थित ठेवण्याकरिता आवाहन करावे. असे मत आहे.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद*

**दिनांक २२.११.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.१९) इतिवृत्त. शुक्रवार दिनांक २२ नोव्हेंबर, २००४ रोजी स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.२० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री. भाऊसाहेब पुंडलिक ताठे
२. श्री. शिरसाठ संजय पांडुरंग
३. सौ. शाहीन जफर महेमुद जफर
४. श्री. इलियास किरमाणी
५. श्री. माणिक लक्ष्मण साळवे
६ श्री. निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
७. श्रीमती जयश्री किवळेकर
८. श्री. पारे सोपान भाऊराव
९. श्री. कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
१०. श्री. रगडे भगवान दगडूजी
११. श्री. स.सलीम स.युसूफ

**संवाद :-**

**मा.सभापती :** अगोदर जनरल चर्चा करावी. नंतर विषयपत्रिकेवर निर्णय घेतला जाईल.

**श्री. संयज शिरसाठ :** चर्चा घेण्यापूर्वी वॉर्ड क्र. ५८ संदर्भात नाला सफाई करिता टेंडर मागविण्यात आले होते. विषयपत्रिकेवरी तो विषय आहे. अनेक दिवसांपासून या विषयाबाबत चर्चा होत आहे. ज्यांनी अंदाजपत्रक तयार केले होते त्या सर्व अधिकाऱ्यांना सभागृहात विषय चर्चेला येईल यावेळी बोलविण्यात यावे. कार्यकारी अभियंता (ड्रेनेज) यांना बोलवावे.

**मा. सभापती :** विषय पत्रिकेवरील प्रभाग क्र. ५८ मधील नाल्यांतील गाळ काढणे मेन सिव्हर लाईनची अपरुटींग करणे, सिव्हर ब्रँच लाईन अपरुटींग करणे, मेनहोल चेंबर नवीन बांधणे, इ. बाबतचा कामाचा अहवाल प्रस्तावात नमूद करण्यात आलेले आहे. या विषया संदर्भात अंदाजपत्रक तयार केलेले शाखा अभियंता, उपअभियंता यांना विषय चर्चेला येण्याआधी सभागृहात बोलाविण्यात यावे. कार्यकारी अभियंता श्री. कुलकर्णी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सभागृहात बोलवावे. सुचनांचे पालन करावे तोपर्यंत दुसऱ्या विषयावर चर्चा करण्यात येते.

**श्रीमती शाहीन जफर :** शाळेच्या फर्निचर बाबत काय कार्यवाही करण्यात आली. टेबल/ खुर्ची वाटप करण्यात आले का? टेंडरमध्ये सर्व शाळांसाठी होते. उर्वरित साहित्याचे टेंडर निघाले की नाही, खुच्या सुध्दा देण्यात आले नाही. शिक्षकांनी कशावर बसावे. शिक्षकांना सुध्दा खुच्या देणे गरजेचे आहे. तसेच शाळेवर विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध नाही. घाण पाणी मुले पितात. बसण्यासाठी डेस्क नाही. एकटेबल एका खुर्ची शाळेत दिली.

एक आलमारी (कपाट) दिले नाही. शाळेत दिलेच नाही असे का? एका शाळेत सहा खुर्च्याची आवश्यकता असतांना एक खुर्ची देण्यात आली हे बरोबर नाही. शिक्षक कर्मचारी यांना सुध्दा खुर्च्या देण्यात आवश्यकात असतांना एक खुर्ची देण्यात आली हे बरोबर नाही. शिक्षक कर्मचारी यांना सुध्दा खुच्या देण्यात.

**मा. सभापती :** ज्या ज्या शाळेवर फर्निचर कमी देण्यात आले तेथे देण्यात यावे. फर्निचर बाबत टेंडर प्रक्रिया होवून फर्निचर उपलब्ध सुध्दा झालेले आहे. विद्यार्थ्यांना पिण्याच्या पाण्यची व्यवस्था रोटरी क्लबला आणि मनपा यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प सुरू करण्यात आला होत. बऱ्याचशा शाळांमध्ये पाण्याची सुविधा उपलब्ध झालेली आहे. ती कार्यवाही कुठपर्यंत झालेली आहे. खुलासा करावा.

**शिक्षणाधिकारी :** शाळेसाठी एकूण जे साहित्य प्राप्त झाले त्यात लहान कपाट-५०, मोठे कपाट-५०,४० वेताच्या खुर्च्या ३००, स्टूल्स-३०, स्टूल-८०, रॅक-२५, ड्युवेळ डेस्क-१०० एवढ साहित्य प्राप्त झालेले आहे.

**श्रीमती शाहीन जफर :** स्टूलवर बसून शिक्षक शिकविणार का? शिक्षकांना बसण्यासाठी खुर्ची आवश्यक आहे. टेबल आवश्यक आहे.

**शिक्षणाधिकारी :** मागणीनुसार सर्व फर्निचर वितरीत करण्यात आलेले आहे. आणखी ८० टेबल येणार आहेत. जुने फर्निचर दुरुस्त झाले तर त्यामधून सध्याची गरज भागेल.

**मा. सभापती :** जुने फर्निचर दुरुस्त करण्याबाबत टेंडर झाले त्यानुसा कार्यवाही करता येईल.

**श्रीमती शाहीन जफर :** जुने फर्निचर दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक घेवून ४-५ महिने झाले केंव्हा दुरुस्त होणार आहे.

**मा. सभापती :** जुने फर्निचर दुरुस्त करण्याचे टेंडर निघालेले आहे. स्थायी समिती समोर प्रस्ताव येईल. तात्काळ शालेय साहित्य वाटप केले जाईल.

**शिक्षणाधिकारी :** रोटरी क्लब या संस्थेतर्फे शाळेतील विद्यार्थ्यांना शुध्द पेय योजना जी चालू आहे. एकूण ६६ शाळा असून ४-३ शाळांवर हे काम पूर्ण झाले आहे. २३ शाळेवर काम चालू आहे. तेही काम लवकर होईल.

**श्रीमती शाहीन जफर :** या पूर्वी मी प्रश्न उपस्थित केला होत. मराठी माध्यमाचे शिक्षक उर्दू माध्यम शिकवितात. त्यांना ते येते का. त्यांची त्वरित बदली करावी म्हणून सूचना केलेली होती. का बदली केली जात नाही. कुणाला दबाव आहे का? सदर शिक्षिका आरेफ कॉलनीच्या शाळेत आहेत.

**श्री. संजय शिरसाठ :** शिक्षणाधिकाऱ्यांनी बदलीची शिफारस करावी. उपआयुक्त (प्र.) बदलीची आदेश काढतील. आजच आदेश काढण्याच्या सूचना द्याव्यात.

**मा. सभापती :** आता स. सदस्य सौ. शाहीन जफर यांनी एक शिक्षिकेच्या संदर्भात सुध्दा उपस्थित कला त्या संदर्भात शिक्षणाधिकारी यांनी आजच्या आज संचिका उपआयुक्त (प्र.) यांचेकडे सादर करावी. आजच बदलीचे आदेश काढावेत.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** क्रीडा शिक्षक सध्या शाळेवर कार्यरत नाही. त्यांचे इतरत्र बदल्या केलेल्या आहेत. त्यांना क्रीडा विभागात घेण्यात यावे. या बाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

**मा. सभापती :** क्रीडा शिक्षकांना त्यांचे मुळ विभागात घेण्यात आले. त्याबाबत झाली असे मला पत्र प्राप्त झाले आहे. परंतु काही क्रीडा शिक्षक हे त्यांचेकडे जे काम

दिले होते तेच काम करण्याची जबाबदारी पार पाडतात असे स. सदस्यांचे म्हणणे आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** स्थायी समितीच्या निर्णयानुसार ज्या क्रीडा शिक्षकांना अतिरिक्त काम दिलेले होते. त्यांना त्याचे मुळ विभागात घेतलेले आहे. त्यांचेकडे इतर अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे. जेणकरून शिक्षणावर काही परिणाम होणार नाही. या बाबत तसे लेखी पत्र दिलेले आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** श्री मालोदे नावाचे क्रीडा शिक्षक ह स्विमिंग पूल येथे कार्यरत आहेत माझ्या माहितीप्रमाणे ते कोणत्याही शाळेत जात नाहीत व शिक्षण देत नाहीत. तसेच ते स्विमिंग पूल येथे सुध्दा नसतात. याबाबत चौकशी व्हावी. मी स्वतः स्विमींग पूल येथे भेट दिली असता दिसून आले नाहीत. मी सभापती असताना सुध्दा भेटी दिल्या. एकदाही आढळून आले नाही. त्यांचे बाबत रिपोर्ट सुध्दा दिलेला होता. तेथे स्विमिंग पुलावर कोणीही. सोबत नाही अशी परिस्थिती आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** श्री. मालोदे हे क्रीडा शिक्षक होते. स्विमिंग पुलाच्या संदर्भात जेव्हा नवीन पदनिर्मिती झाली तेंव्हा त्यांची कायमस्वरुपी व्यवस्थापक म्हणून नेमणूक केलेली आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** आठ-दहा दिवसापूर्वी बातमी प्रसिध्द झाली होती. प्रशासकीय कारणास्तव काही कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या होत्या. दिवाळीच्या कालावधीत जकात अधिक्षक यांना दोन सुरक्षा रक्षक देऊन संरक्षण देण्यात आले. दुसरीकडे वसुलीच्या बातम्या येत होत्या. खरे नावाचे कर्मचाऱ्यांने जकात अधिक्षक यांचेशी वाद घातला, दमदाटी केली. खरे यांची बदली केली तर ते बदलीच्या ठिकाणी रुजू झाले का? याबाबत खरी परिस्थिती काय आहे. खुलासा करावा आपण वाद झाला म्हणून संरक्षण दिले त्यात काय तथ्य आहे.

**उपआयुक्त (प्र.) :** बीड रोड येथील नाक्यावरील जकात पुस्तके गहाळ प्रकरणामध्ये एकूण पाच कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या. त्यात श्री. खरे नावाचे कर्मचारी देखील होते. त्या प्रकरणात चौकशी चालू असून इतरत्र त्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्यात आलेल्या आहेत. श्री. खरे यांची बदली झोन क्र. ८ मध्ये प्रस्तावित केलेली आहे. त्यांनी मेडीकल रजा दिली व रजा उपभोगून जेंव्हा आले तेंव्हा प्रशासनाने मेडीकल प्रमाणपत्राची मागणी केली. त्यांनी मेडीकल प्रमाणपत्र दाखल केले. ते तपासण्यात आले. श्री. खरे यांनी जकात अधिक्षक यांचेकडे जाऊन दबाव आणण्याचा प्रयत्न केला. जकात अधिक्षकांनी ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली व जकात वसुली करण्याचे कामात जकात अधिकाऱ्यांना काही त्रास होऊ नये म्हणून दोन सुरक्षा रक्षक देण्यात आले आहेत. जकात अधिक्षक यांना सूचित केले की, जी घटना घडली व गंभीर आरोप किंवा शिवीगाळ केली असेल या संदर्भात संबंधित पोलिस स्टेशनला गुन्हा नोंद करण्यास परवानगी दिली. या प्रकरणात श्री. खरे यांची विभागीय चौकयाी चालू केली आहे. श्री. कमलाकर फंड यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त केलेले आहे. यामध्ये वरीष्ठांचे आदेन न पाळणे वरिष्ठांवर दबाव आणणे हे सुध्दा आरोप समाविष्ट केलेले आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच जो प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केला त्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास प्रशासन कार्यवाही करीत असतांना कर्मचाऱ्यांना हातून चांगली कामे व्हावीत. प्रशासनामध्ये सुसुगता असावी. कोणीही कुठेही अधिकाऱ्यांशी गैरवर्तन करू नये. शिस्तीचे पालन सर्वांनी करावे व प्रांजळपणाने प्रशासनाच्या दृष्टीने अस्थापना विभागाने जी कार्यवाही केली त्याचा उप आयुक्त (प्र.) यांनी केलेला आहे. स्पष्ट माहिती देणे गरजेचे होते ती दिली नाही. कर्मचारी जर पुन्हा पुन्हा पदाधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांशी गैरवर्तणूक करीत असेल तर निश्चितपणे शिस्तभंगाची कार्यवाही म्हणून ठोस निर्णय प्रशासनाने घेतला पाहिजे. नियमांचे संपूर्ण पालन करावे असे स्पष्टमत या सभागृहाचे आहे. कर्मचा४यांना शिस्त लावणे हे प्रशासनाचे कर्तव्य असून ते आवश्यक आहे. दोन सुरक्षा रक्षक संरक्षणासाठी दिले ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. एखाद्या अधिकाऱ्यांवर कुणी दबाव आणत असेल व वरिष्ठ अधिकारी हे काम करीत असतांना त्यांचे मनोबल खच्चीकरण होते असे माझे मत आहे. दोन सेक्युरीटी देवून संरक्षण देण्याची गरज पडते. अशा कर्मचाऱ्यांवर ठोस कारवाई होणे गरजेचे आहे. त्या सुरक्षा रक्षकाचा खर्च किती कर्मचारी आहेत की ते वरिष्ठ अधिकाऱ्यांना दमदाटी करतात अरेरावीची भाषा बोलतात. संबधित कर्मचाऱ्यास रुजू करून घेतले का? कोठे रुजू करून घेतले. प्रशासनास चांगले काम करता आले पाहिजे. तशी कार्यवाही झाली पाहिजे. हा खरा मुद्दा आहे यापूर्वी देखील गेल्या पाच वर्षात आरोग्य विभागात सुध्दा अनेक प्रकार घडलेले आहेत त्यांना रुजू करून घेतले का.

**उपआयुक्त (प्र.) :** स्थायी सिमतीच्या एकंदरित निर्देशीत केल्यानुसार या प्रकरणात प्रशासनाने गंभीर दखल घेतलेली असून निलंबनाची कार्यवाही प्रस्तावित केलेली आहे व खाते चौकशी पूर्वीच चालू केली आहे.

**मा. आयुक्त :** जकात अधिकाऱ्यांना प्रशासनाच्या वतीने सूचना की, एफ. आय. आर. दाखल केलेल्या प्रशासनाने परवानगी दिली होती.

**जकात अधिक्षक :** उपआयुक्त (प्र.) यांनी एफ. आय. आर. दाखल केले का. प्रशासनाने परवानगी दिली आहे. मध्यंतरीच्या काळात मी रजेवर होतो. आता दोन दिवसात संबंधित कर्मचाऱ्याविरुध्द एफ.आय.आर. दाखल करण्यात येईल.

**श्री. भगवान रगडे :** दिनांक १९-०३-२००३ रोजी सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाला. तीन वाहन चालक कर्मचाऱ्यांना लिपिक पदावर सामावून घेण्याबाबत ठराव होता. एक वाहन चालकास क. लिपीक पदावर घेण्यात आले परंतु दोन वाहन चालकांना घेण्यात आले नाही. सर्वांना सारखा न्याय मिळावा अशी अपेक्षा असते. सविस्तर खुलासा करावा.

**मा. सभापती :** या ठरावानुसार तीन वाहन चालकांना सवंर्ग बदलून क. लिपीक म्हणून घेण्याचा प्रस्ताव होता. या संदर्भात प्रशासनाने मेडीकल बोर्डकडे शिफारस केल्यानुसार कमिटीने एका वाहन चालकास क. लिपीक म्हणून अर्ज करून घेतले. परंतु दोन कर्मचाऱ्यांचे मेडीकल बोर्डाचे अहवाल स्पष्ट नव्हता म्हणून पुन्हा मेडीकल बोर्डकडे पाठविण्यात आलेला होता. अहवाल स्पष्ट झाला असेल तर प्रशासन त्यानुसार निर्णय घेईल.

**श्री. भगवान रगडे :** सर्वांना सारखा न्याय मिळावा. श्री. दांडगे नावांचे कर्मचारी बारा वर्षापासून क. लिपीकांचे काम करतात. त्यांचे पदनाम वेगळेच आहे. तो

कर्मचारी संगणक ऑपरेटर परीक्षा पास आहे. त्यांना लिपीक म्हणून का घेतले जात नाही. त्यांचेकडे मेडीकल बोर्डचे प्रमाणपत्र सुध्दा आहे.

**मा. सभापती :** या संदर्भात या दोन कर्मचाऱ्यांच्या बाबतीत कागदपत्रांची पूर्तता असेल तर मा. आयुक्तांकडे प्रकरण पाठवून काय जी मान्यता घ्यायची तसा सविस्तर असा प्रस्ताव पुढील बैठकीत अस्थापना विभागाने सादर करावा किंवा मा. आयुक्तांकडे द्यावे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** एन-१२ येथील स्वामी विवेकानंद उद्यान येथील कारंजे बंद आहेत. तसेच तेथील रेल्वेगाडी बंद आहे. लहान मुलांसाठी खेळणी होती ती व्यवस्थीत नाही. काही सोयी सुविधा दिल्या जात नाही. संरक्षित भिंत तुटलेली आहे. गार्डन म्हणून हिरवळ राहिलेली नाही. उद्यानात येणाऱ्या नागरिकांची संख्या कमी झालेली आहे. तेथील लाईट बंद आहे. सुविधा देणार आहे की नाही खुलासा करावा.

**मा. सभापती :** एन-१२ येथील उद्यानात आताच स. सदस्यांनी सूचना केली त्याकडे लक्ष द्यावे या प्रमाणेच सिध्दार्थ उद्यानात हीच अवस्था आहे. वृत्तपत्रात आले होते. उद्यानात खेळणी ठेवलेली आहे. तुटलेल्या अवस्थेत आहे. त्याचा उपयोग मुलांना घेता येत नाही. प्राथमिक स्वरुपाची अशी कामे सर्वच उद्यानातील करावी. सर्वच उद्यानातील खेळणी दुरुस्ती करावी.

**उपअभ्नियंता (उद्यान) :** एन-१२ मधील उद्यानातील रेल्वे सध्या बंद आहे. तेथील काही साहित्य चोरीला गेले होते. आता परत चालू करायचे झाल्यास निधी उपलब्ध नाही.

**मा. सभापती :** इतर उद्यानातील कामासाठी निधी ठेवलेला असेल त्यातून काही बचत असेल तर या ठिकाणी वापरावी. किती निधी उपलब्ध होऊ शकतो.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सिडको भागात तीन लक्ष नागरिक राहतात. तेथे एकच उद्यान आहे. तसेच सिडकोतील स्मृतीवन मध्ये सुध्दा काहीही व्यवस्था नाही. लाईट नाही, कारंजे नाही उद्यान विभागाचे बजेट काढून इतर ठिकाणी टाकण्यात आले म्हणून रक्कम उपलब्ध होत नाही असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. निधी तात्काळ उपलब्ध करून आठ दिवसात कामे सुरू करावीत.

**मा. सभापती :** श्री. काकडे उपअभियंता यांना आदेशित करण्यात येते की, सर्व उद्यानांची पाहणी करून दुरुस्तीसाठी जो काही निधी लागत आहे. तो उद्यानातील इतर कामासाठी ठेवलेला असेल त्यातून बचत रक्कम वळती करून तात्काळ कामे हाती घ्यावीत. तसा अहवाल स्थायी समितीच्या बैठकीत सादर करावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** स्वामी विवेकानंद उद्यानाच्या जागेत कारगील स्मारक उभारण्यात आले त्याचे उद्‌घाटन केले नाही. उद्‌घाटन करण्या अगोदर मनपाचे अधिकारी/ पदाधिकारी यांनी दिल्लीला जाऊन ते शहित जवान आहेत. त्यांची आठवण म्हणून या स्मारकात काय ठेवता येईल याची माहिती द्यावी. नंतर उद्‌घाटन करावे. याबाबत मा. आयुक्तांनी दखल घेवून थोडक्यात माहिती द्यावी.

**मा. सभापती :** एन-१२ येथील उद्यानाच्या जागेत कारगील स्मारक उभारण्यात आले जे हुतात्मा म्हणून शहिद झाले त्यांची आठवण म्हणून काही वस्तू वगैरे ठेवता येईल का, किंवा वस्तूंचा संग्रह आहे का? श्री. सोनी साहेबांनी खुलासा करावा.

**शहर अभियंता :** या संदर्भात काहीही केलेले नाही.

**मा. सभापती :** आताच स. सदस्य श्री. ताठे यांनी सूचना मांडल्याप्रमाणे त्या स्मारकास शहिद जवानांच्या आठवणी म्हणून काय ठेवता येईल त्याबाबत दहा-पंधरा दिवसात कार्यवाही करावी.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** नाथ प्रांगण येथे मनपाची तीन-चार एकर जागा आहे. तेथे घरे अनाधिकृत होत आहेत. आम्ही मुद्दा उपस्थित केला की, लोक आमच्यावर दबाव आणतात. अतिक्रमण काढण्याचे काम प्रशासनाचे आहे. वारंवार या सभागृहात चर्चा करावी लागते. लाखो रुपये किंमतीच्या जागा लोक हडप करीत आहेत. नाथ प्रांगण हे अनाथ झाले या संदर्भात प्रशासकीय अधिकाऱ्यांनी माहिती द्यावी.

**प्रशासकीय अधिकारी :** तेथील बांधकाम दोन वेळेस तोडण्यात आलेले होते. आज पाहिले नाही.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** एकदा काढल्यानंतर पुन्हा तेथे अतिक्रमण होते किंवा काय हे बघण्याचे काम प्रशासकीय अधिकाऱ्यांचे आहे. पुन्हा त्या जागेवर बांधकाम झालेले आहे.

**मा. सभापती :** सदर जागेवर प्रशासकीय अधिकारी यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

**सौ. शाहीन जफर :** सिल्लेखाना भागात एका व्यक्तीने अतिक्रमण केले गेल्या सहा महिण्यापासून चर्चा होते. अधिकारी तेथे जातात मार खाऊन येतात. पुढे काहीच कार्यवाही होत नाही.

**प्रशासकीय अधिकारी :** या प्रकरणात मा. न्यायालयाचे स्थगिती आदेश आहे. त्याबाबत कन्टेन्ट ऑफ कोर्टची कार्यवाही केली आहे.

**सौ. शाहीन जफर :** सहा महिन्यापासून मी चर्चा करते. ही सभा का बोलावली? काही कार्यवाही होत का नाही. अधिकारी दिशाभूल करीत आहेत लोक नाव ठेवत आहे.

**मा. सभापती :** सिल्लेखान्याच्या संदर्भात प्रशासकीय अधिकारी व विधी सल्लागार यांनी बरोबर जाऊन तात्काळ कार्यवाही करावी. न्यायालयाचे आदेश आहे त्याप्रमाणे कार्यवाही करावी. स. सदस्या सौ. शाहीन जफर आपण खाली बसून घ्यावे. निर्णय दिलेला आहे. प्रशासकन कार्यवाही करेल.

**सौ. शाहीन जफर :** गेल्या सहा महिन्यापासून कार्यवाही होत नाही. मी गप्प बसणार नाही. दिशाभूल केलेली आहे. सर्व अधिकारी मॅनेज झालेले आहेत. आपण फार तर मला सभागृहाच्या बाहेर काढा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** स. सदस्या वारंवार एका विषयावर बोलतात ही वेळ का येते याचा विचार केला पाहिजे. अधिकारी सूचनांकडे दुर्लक्ष करतात. दखल होत नाहीत ही बाब गंभीर आहे.

**मा. सभापती :** सभागृहात चर्चा होते. नियमित आदेश दिले जातात. पालन होत नाही. आता या प्रकरणात न्यायालयाचे स्थगिती आदेश आहेत. परंतु ज्या वेळेस स्थगिती आदेश नव्हते त्या कार्यकाळात कार्यवाही होणे आवश्यक होते ती झालेली नाही.

**श्री. माणिक साळवे :** सिल्लेखान्याच्या प्रकरणाचे बाबतीत सदर जागा मनपाच्या मालकीची आहे का? नसेल तर या जागेवर अतिक्रमण काढण्याबाबत मागणी झालेली होती का? तसेच खाजगी जागेवरील अतिक्रमण काढता येते का? नियम काय आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** सभागृहाच्या भावना लक्षात घेवून निर्णय दिले जातात. त्यांची अंमलबजावणीचे होत नाही. अधिकाऱ्यांनी त्या त्या विभागात काम करण्याची इच्छा नसेल तर चर्चा बदली करण्यात यावी. मा. महापौरांनी आदेश देवूनही बदली केलेली नाही. कारण काय? तांत्रिक अधिकारी द्यावे.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी त्यांच्या भावना व्यक्त केल्या. स. सदस्य श्री. साळवे यांनी सुध्दा मुद्दा उपस्थित केला ती जागा मनपाची का खाजगी आहे.

**प्रशासकीय अधिकारी :** ही जागा खाजगी आहे. या जागेवरील अतिक्रमण चार वेळेस काढलेले आहे. त्या बाबतचे छायाप्रत सुध्दा आहे. संबंधित व्यक्तीने अर्ज दिलेला नव्हता. स. सदस्यांच्या मागणी वरुन कार्यवाही केलेली आहे.

**मा.सभापती** : श्री. कांबळे, उपआयुक्त तसेच शहर अभियंता यांना सुध्दा मा. आयुक्तांनी आदेशित केले होते की, पाहणी करुन कार्यवाही करण्याचे तर स्थळ पाहणी केलेली आहे का?

**श्री. माणिक साळ्वे :** खाजगी जागेवरील अतिक्रमण काढायचे असेल तर संबंधितांनी तसा विनंती अर्ज दयावयास पाहिजे आणि त्यासाठी जो खर्च येईल तो त्या व्यक्तीकडून वसूल करुन घेतला पाहीजे.

**मा. सभापती** : स. सदस्या सौ. शाहीन जफर व श्री. नासेरखान कुरेशी यांनी तक्रारी केलेल्या आहेत. जमनी मालकांशी संबंध नाही. अनाधिकृत बांधकाम घेत असेल तर, मनपास काढता येते.

**सौ. शाहीन जफर :** पूर्ण अनाधिकृत बांधकाम केलेले आहे. समोर लाकडी फळी लावलेल्या असून आतील भागस सर्रासपणे अनाधिकृत बांधकाम सुरु आहे. बांधकाम केलेले आहे.

**उपआयुक्त (प्र) :** या जागेच्या संदर्भात मी स्वतः व सोनी साहेब आम्ही पाहणी केली होती. त्यावेळी त्या विभागाचे श्री. कंकाळ हे सुध्दा होते. पाठीमागे १५.१६ पीलरचे आरसीसीचे बांधकाम चालु होते ते बंद केले. त्याबाबत पंचनामा केला आणि त्यासंबंधीचा अहलवा न्यायालयात सादर केला. त्यानंतर असे निर्दशनास आले की, संबंधित व्यक्तीने न्यायालयाचे " जैसे थे " आदेश घेतलेले आहे. पंचनामा व त्या जागेचे फोटोग्राफ आम्ही सादर केले. मा. न्यायालयात विनंती केली की, सदर व्यक्ती हे न्यायालयाच्या आदेशाचे उल्लघंन करुन आतील बाजूस बांधकाम करतात व मी अतिक्रमण करीत नाही. म्हणून मनपास दाखवित आहे. मा. न्यायालयाने याची दखल घेवून कोर्ट कमीशन सुध्दा नियुक्त केले आहे. कोर्ट कमीशन त्या जागेची पाहणी करणार आहे व त्या जागेवर संबंधितांनी कोणतेही बांधकाम करु नये असेही आदेशात म्हटले आहे. त्या संबंधीचा अहवाल आपणांकडे सादर केलेला आहे. आजच्या स्टेजला कोणतेही बांधकाम चालु नाही. ज्या स्थितीत होते त्याच स्थितीत आहे.

**सौ. शाहीन जफर :** झालेले बांधकाम अधिकाऱ्यांनी पाहिलेले नाही. त्या ठिकाणी नवीन बांधकाम झालेले आहे. आताच मा. आयुक्त मा. सभापती यांनी पाहणी केल्यास योग्य होईल. सत्य परिस्थिती दिसून येईल.

**मा. सभापती** : सदरचे बांधकाम प्रशासकीय अधिकारी, उपआयुक्त श्री. कांबळे साहेब, विधी सल्लागार यांनी साहेब इत्यादींनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन स्थळ पाहणी करावा व अहवाल दयावा. एक तासासाठी सभा तहकूब करण्यात येते.
(वेळ दुपारी १.०० वाजता सभेला सुरुवात २.१० वाजता)

**श्री. संजय शिरसाठ :** सिल्लेखाना येथील अनाधिकृत बांधकाम बाबत चर्चा झाली. चर्चेअंती उपआयुक्त (प्र.) शहर अभियंता सोनी साहेब तसेच श्री. कंकाळ प्र. अ. स्थळ पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यांचे बरोबर स. सदस्या सौ. शाहीन जफर ह्या सुध्दा होता. दोन मिनिटांपूर्वी स. सदस्या यांना त्या ठिकाणी मारहाण झाली असल्याचे समजते. याबाबत सविस्तर खुलासा उपआयुक्तांनी करावा.

**उपआयुक्त (प्र.) :** आपल्या आदेशानुसार आम्ही स्थळ पाहणी साठी गेलो असता स. सदस्य सौ. शाहीन जफर ह्या देखील आमच्या बरोबर होत्या. ज्यावेळेस गेलो तेव्हा कोणतेही बांधकाम चालु नव्हते. ज्या तारखेला पंचनामा केला होता त्यावेळी जे वाढीव बांधकाम केले त्याचा अहवाल न्यायालयात दिलेला आहे. ज्यावेळेस पाहणी करावयास गेलो तेथील परिसर असा की, तेथे तट्टयाची घरे आहेत. त्यातच कुंटुबे राहतात. बरेच लोक जमा झाले. त्यावेळी एका व्यक्तीने त्यांचे पत्नीला सांगितले. स. सदस्या झालेला आहे. त्यांना मध्ये येवू नये. जाण्याचे सांगितले. बरीचशी वादावादी झाली. काही महिलांनी मारहाण केली. काही मी काठीने मारहाण केला. काही लहान मुलांनी दगडाने मारहान केली. त्या परिस्थितीत सोनी साहेब व मी स.सदस्या यांना गाडीत बसवून कार्यालयात घेवून आलो. त्या ठिकाणी जास्त वेळ थांबणे मला उचित वाटले नाही. अशी धारणा झाल्यानंतर स. सदस्या यांना घेवून आलो. आता त्यांना दवाखान्यात पाठविलो व प्रशासकीय अधिकाऱ्यांना या घटनेबाबत पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद करण्याचे सूचित केले आहे.

**श्री. संजय शिरसाठ :** आताच खुलासा केला त्यापेक्षा जास्तीचे बांधकाम दिसून आले. जेष्ठ अधिकारी तेथे जातात. असा प्रकार होतो. यापुर्वीही मनपाच्या काही कर्मचाऱ्यांना मारहाण झालेली होती. याबाबतीत सर्व जाणीव असतांना सोबत पोलीसांना का घेतले नाही. हा प्रश्न माझा आहे. तीन अधिकारी व एक महिला सदस्या पाहणीसाठी जातात व एका महिला सदस्यास मारहाण होते. अधिकाऱ्यांना होत नाही. याचा अर्थ जाण्यापुर्वीच निरोप मिळाला एकत्र आल्या व मारहाण झाली. हे अत्यंत गंभीर प्रकरण असून, एक महिला नगरसेविका या शहरात अतिक्रमण होवू नये म्हणून या सभागृहात निर्दशनास आणून देतात. जबाबदारी कोणावर फिक्स केली जाते याच सुध्दा खुलासा करावा.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** संबंधित अधिकारी यांचेमुळे हा प्रकार उद्‌भवला त्यांचेवर काय कार्यवाही करणार आहात. कर्मचारी/अधिकारी यांना मारहाण होते. नगरसेवकांना मारहाण होते. तरी दुर्लक्ष होते. यामागे कुणाचा हात आहे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** गेल्या सहा महिन्यापासुन स. सदस्या पोटतिडकीने प्रश्न मांडत होत्या त्या जागेवर २-३ वेळेस कर्मचाऱ्यांना मारहानीचे प्रकार झाले. व आज स. सदस्या श्रीमती शाहीन जफर ह्या सुध्दा स्पॉटवर अधिकाऱ्यांसोबत आपण केलेल्या सुचनेनुसार पाहणी करण्यासाठी गेल्या असता पुढील गांभीर्य लक्षात घेवून पोलीस संरक्षणानिशी तेथे जायला पाहिजे होते. प्रशासनाचे उपआयुक्त व संबंधित अधिकारी सोबत होते. पोलीस बरोबर घेऊन का गेले नाही व एका महिला सदस्या लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असतांना त्यांना मारहाण होणे योग्य बाब नाही. म्हणून प्रशासनाला याबाबत आदेशीत करुन ताबडतोब कार्यवाही होणे अपेक्षीत आहे. पोलीस प्रोटेक्शन न होता

सरळ स. सदस्यांना अधिकारी स्पॉटवर घेवून गेले व तेथे मारहानीचा प्रकार आला अतिशय वाईट वाटते व लोकप्रतिनिधींना काम करीत असतांना त्यांच्या जिवितास धोका होवू शकतो. या संदर्भात काय दखल घेणार आहे. त्याबाबत खुलासा करण्यात यावा.

**श्री. भगवान रगडे :** गेल्या ६ महिन्यापासुन हा प्रश्न सभागृहात उपस्थित होते. म्हणून आज आपण पाहणी करण्यासाठी तातडीने आदेश दिले व वेळीच कार्यवाही न झाल्यामुळे आज एका महिला सदस्यांना मारहाण होते गंभीर बाब आहे. व उदया अशी परिस्थिती निर्माण होईल की, कोणीही व्यक्ती कोठेही घर बांधेल अतिक्रमण करीत ते मनपाने/सदस्यांनी सहज घ्यायचे का? महापालिका कशी सुरक्षित राहील हा दृष्टीकोन समोर ठेवून लोकप्रतिनिधी काम करतात. असे होत राहीले तर त्यास बाधा येईल. यापुर्वीच कर्मचारी/अधिकरी यांना त्या जागेवर मारहाण झालेली होती काय कार्यवाही केलेली आहे. अधिकारी / पदाधिकारी / नगरसेवक यांना मारहाण होत राहील व मनपाचे मोठे-मोठे भुखंड कोणीही अतिक्रमण करुन दादागिरी करेल व जागा बळकावुन घेतील मनपाकडे पोलीस पथक आहे. लाखो रुपये महिन्याच्या त्याचा खर्च आहे ते कशासाठी आहे. पोलीस पथक असतांना सोबत गेले नाही. यामागचे षडयंत्र काय आहे. याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. जर अशा प्रकारातून लोक प्रतिनिधींवर हल्ला होत असेल तर, तो मान्य नाही. म्हणून मी निषेध करतो.

**श्री. इलियास किरमाणी :** यापुर्वीही त्या जागेवर कर्मचाऱ्यांना मारहाण झालेली होती. दगडफेक झालेली होती. असे सर्व माहिती असतांना पोलीस पथक का बरोबर घेतले नाही. मुद्दामहुन पोलीस पथक न नेता स. सदस्यांना मारहाण घेण्याच्या दृष्टीने हा प्रकार घडवुन आणलेला आहे. अधिकाऱ्यांना मारहाण झालेली नाही. नसता बैठक रद्द करावी लागली असती.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** संबंधित अधिकारी दोषी असतील त्यांचेवर कार्यवाही होणे गरजेचे आहे. त्यांचे निलंबन करावे. ६-६ महिने चर्चा होते. कार्यवाही होत नाही.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** एक लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असतांना स. सदस्या श्रीमती शाहीन जफर यांना मारहाण झाली त्याचे निषेधार्थ आजची सभा तहकूब करावी व पुढील कार्यवाही होण्याच्या दृष्टीने मा. पोलीस आयुक्त यांचेकडे एक निवेदन प्रशासनामार्फत देण्यात यावे.

**श्री. भगवान रगडे :** अधिकाऱ्यांना मारहाण झाली नाही. लोकप्रतिनिधी स. सदस्य श्रीमती शाहीन जफर यांनाच मारहाण झाली याचा अर्थ षडयंत्र रचलेले होते.

**श्री. माणिक साळवे :** विषय पत्रिका तात्काळ घेण्यात यावी या प्रकरणात पोलीस आयुक्त यांचेकडे आपण सर्व सदस्य जावून भेट घेऊन निवेदन सादर करु.

**मा. सभापती** : झालेल्या या मारहाणीच्या प्रकरणाबाबत निषेध करण्यात येतो. जर हे लोकप्रतिनिधी यांचेवर अशा प्रकारचा हल्ला होतो. गंभीर स्वरुपाची बाब आहे. या संदर्भात सर्व स. पदाधिकारी स. सदस्य एक निवेदन तयार करुन पोलीस आयुक्तांकडे जाऊन कार्यवाही करण्याची मागणी करण्यात येईल. अतिक्रमणाच्या बाबतीत जसे श्री. निमंगावकर यांचे वॉर्डातील सुध्दा तसेच श्रीमती शाहीन जफर यांचा मुद्दा अतिक्रमणाच्या बाबतीत या प्रकरणात न्यायालयाचा स्थगिती आदेश होता. कन्टेप्ट ऑफ कोटीची कार्यवाही विधी सल्लागार यांचेमार्फत झालेली आहे. शहरातील वाढते अतिक्रमण लक्षात

घेता. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता. स. सदस्यांच्या भावना अतिशय संतप्त आहे. या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत मा. आयुक्त यांना स्थायी समिती मार्फत सूचना करण्यात येते आहे. श्री कंकाळ यांची बदलीचे आदेश सर्वसाधारण सभेत आलेले होते. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. स. सदस्या श्रीमती शाहीन जफर यांना झालेल्या मारहाणीच्या पूर्ण चौकशी करावी व अहवाल पुढील सभेत सादर करावा. प्रशासकीय अधिकारी श्री. कंकाळ यांची तात्काळ त्या विभागातुन बदली करण्यात यावी.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** पुंडलीकनगर भागातील लोकसंख्या जवळपास ४२००० पर्यंत गेलेली आहे. एन-३, एन-४ भागातील जीवन प्राधिकरण विभागाच्या मार्फत पाण्याच्या टाकीचे काम होत आहे. मध्यंतरी काम चालू असतंना निधी असावी बंद पडलेले होते. आता पुन्हा चालू आहे. परंतू जे काही सांडपाणी साठविण्यासाठी आवश्यक आहे. त्या ठिकाणी गिरजा देवी सहाकारी गृहनिर्माण संस्थाच्या मालकीची ओपन स्पेस रितसर मनपाच्या ताब्यात घेऊन जीवन प्राधिकरणास एन. ओ. सी. देणे आवश्यक आहे. ही कार्यवाही पूर्ण केली तर जलकुंभ बांधकाम पूर्ण होईल. जनतेला पाण्याचा त्रास होतो आहे. तो घेणार नाही. जागा मनपाच्या ताब्यात घेतली नसेल तर ताबडतोब नगररचना विभागामार्फत कार्यवाही करण्याचे आदेशीत करावे. एम जेपी व मनपाकडून संयुक्तरित्या कार्यवाही अपेक्षीत आहे.

**मा. सभापती** : स. सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** गिरजादेवी गृहनिर्माण संस्थेच्या ओपन स्पेसवर व जि. प्रा. मंडळाचा पाच लक्ष मिटर क्षमतेचा एक जी. एस. आर. बांधण्याचे प्रस्तावित आहे. या योजनेबाबत आठवडाभरात पाहणी करुन ज्या त्र्युट्या आहेत. त्याचा तांत्रिक अभ्यास केलेला आहे. जी पाईप लाईन आहे. त्या लाईनला क्रॉस कनेक्शन करुन हा पीएसआर बांधण्याचे प्रस्तावित आहे. जी. एस. आर. मधील पाणी पंपगी करण्याचा असा तो प्रस्ताव आहे. प्रस्ताव योग्यच आहे. मनपाची फक्त परवानगी मागितलेली आहे. मा. आयुक्त यांनी त्या संचिकेवर पाहणी करुन निर्णय घेता येईल. असा शेरा होता. मध्यतंरी आचारसंहिता होती म्हणून प्रस्ताव प्रलंबीत राहील. या आडवड्यात मा. आयुक्तांची पाहणी करुन हे प्रकरण निकाली काढण्यात येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** गेल्या आठ-दहा दिवसापासून टिळकनगर ते रोपळेकर हॉस्पीटल पर्यंत पाणी पुरवठा अत्यंत कमी प्रमाणात होत असून, तेथील नागरीकांच्या तक्रारी आलेल्या आहेत. पाणी पुरवठा विस्कळीत घेण्याचे कारण काय, त्यासाठी काही प्रयत्न झालेले आहेत का? खुलासा करावा. त्या भागाच्या स. नगरसेविका व उपमहापौर मा. सौ. सुरडकर यांचेकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

**कार्य. अभियंता (पा.पु.) :** जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात खुलासा करतो की, जय विश्वभारती कॉलनी भागातील पाण्याची टाकी पूर्णपर्ण भरत नव्हती. त्यामूळे तशी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतू आता त्या ठिकाणच्या तक्रारी नाहीत. टाकी पूर्णपणे भरत आहे. ज्योतीनगरच्या सुध्दा तक्रारी होत्या. क्रॉस कनेक्शन करुन पाणी पुरवठा सुरळीत केलेल्या आहे. श्री. देशपांडे हे त्या सोसायटीचे अध्यक्ष आहेत, त्यांनी स्वतः दूरध्वनीवरुन सांगितले की, तक्रारी निवारण आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृहाचा मुद्दा एक वर्षापासून उपस्थित करीत आहे. दि. २६-१२-२००२ रोजी कम्पलीशनसाठी प्रकरण दाखल केले होते. २ वर्षात परवानगी दिलेली नाही. या कार्यकाळात न्यायालयीन प्रकरण सुरु झाले. त्यात न्यायालयाने जैसे थे आदेश दिले होते. आता सदर प्रकरण पक्के होण्यासाठी मुद्दाहून त्यांना परवानगी देण्यात आली. परवानगी मध्ये १९ नंबरची अट अशी आहे की, शैक्षणिक वापराशिवाय वाणिज्य वापर करु शकत नाही. असे असतांनाही वाणिज्य वापर होत आहे. या इमारतीच्या परिसरालगतच ४-५ झालेल्या इमारत कम्प्लीशन देण्यात आले नाही. नंतर तयार झालेल्या इमारतीस कम्प्लीशन देण्यात आले तो एकूण क्षेत्र किती होते, (-५) किती वापरला आजही वाणिज्य वापर सुरु आहे. सर्व माहिती देण्यात यावी. अनाधिकृतरित्या परवानगी देण्यात आली. आजही तेथे कमर्शियल वापर होत आहे. दुकाने चालू आहे. संचिका मागपा समोरही एक इमारत आहे. ती पूर्ण नाही. रस्ता बंद करुन दुकाने काढली याबाबत कार्यवाही न होता. उलट या इमारतीस बाजूलाच परवानगी देण्यात आली यात भ्रष्टाचार झाल्याची शंका येत आहे. अतिक्रमण होत आहे. नगरसेवकास मारहाण होते. ही परिस्थिती निर्माण करणार काय? याची चौकशी होणे गरजेचे आहे. संचिका मागवावी. मी न्यायालयात जाणार आहे. मला सर्व कागदपत्र आवश्यक आहे. पूर्णपणे अनाधिकृत व चूकीची परवानगी दिली. न्यायालयाचे स्थगिती आदेश असतांना या इमारतीच्या बाजूला इतर इमारती यापूर्वीच झालेल्या असून त्या इमारत मालकांनी सुध्दा कम्लीशन प्रमाणपत्र मागणी केली. त्यांना दिले नाही. मनपाचे संत एकनाथ रंगमंदिर रिकामे आहे. या नाट्यगृहामूळे संत एकनाथ रंगमंदिराचे उत्पन्न कमी झाले आहे. जनहित संचिका दाखल करावयाची आहे. मला पूर्ण कागदपत्र देण्यात यावीत.

**मा. सभापती** : पुढील बैठकीत संबंधित अधिकारी यांनी इन्थंभूत माहिती दयावी.

**श्री. इलियास किरमाणी :** यापुर्वीच्या बैठकीत मी मालमत्ता सर्वेक्षणाच्या एजन्सीबाबत माहिती देण्याची सूचना केली होती. त्याची मुदत संपलेली आहे की नाही, पुन्हा वाढवून दिली का, दिली असेल तर, कुणाच्या अधिकाराने दिली. किती कालावधीसाठी दिलेली आहे. खुलासा दयावा. तसेच एजन्सीकडे कोणते कर्मचारी काम करतात त्यांची यादी झालेली नाही. ज्या ज्या अटी-शर्ती होत्या त्यानुसारच काम होत आहे का? त्याचा रिपोर्ट देणार होते. मला प्रत दिली नाही.

**मा. सभापती** : उपआयुक्त यांचेकडून सभापती या नात्याने मला माहिती मिळालेली आहे. त्या बुकलेटची छायाप्रत सर्व स. सदस्यांना देण्यात यावी. या बुकलेटवर कर निर्धारक व संकलक अधिकारी श्री. कड साहेब यांची स्वाक्षरी आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** मी त्यात असा प्रश्न केला की, निविदा मंजुरीनंतर कार्यादेश दिल्याचा दिनांक कामाची मुदत व किती तारखेला संपणार आहे. मुदतीत काम झाले नसेल तर दंड आकारला गेला का? नसेल तर का नाही याचा खुलासा देण्यात यावा.

**मा. सभापती** : ३१ डिसेंबर २००४ पर्यंत कामाची मुदतवाढ दिली आहे. मा. आयुक्तांनी त्यांचे अधिकारात कालावधी वाढवून दिला.

**श्री. इलियास किरमाणी :** स्थायी समिती/सर्वसाधारण सभेच्या मंजुरीशिवाय मा. आयुक्त अशा अधिकाराचा वापर करु शकतात का?

**मा. सभापती** : उपआयुक्त (प्र) येथे उपस्थित आहेत. कृपया नोंद घ्यावी. श्री. कड साहेब यांनी स. सदस्यांच्या सूचना लक्षात घ्याव्यात ज सर्व्हेचे काम मुदतीत करावयाचे ते मुदतीत का करण्यात आले नाही. केले नाही म्हणून दंड का आकारण्यात आलेले नाही जी काही मुदत मा. आयुक्तांनी वाढवून दिली तो अधिकार कोणाचा स्थायी समिती की, सर्वसाधारण सभेचा आहे. याबाबत खुलासा विचारलेला आहे. तसेच त्या एजन्सीकडे असलेला स्टाफ पूर्ण आहे का? जी माहिती मला दिली त्याची प्रत स. सदस्यांना देण्यात यावी.

**श्री. इलियास किरमाणी :** वृत्तपत्रात आले जे की, वॉर्ड रचनेबाबत चर्चा निर्णय होत आहे. हॉटेलमध्ये बसून जे काम होत आहे. ही काय चेष्टा लावली. स. सदस्य हॉटेलमध्ये चालले. पेपरला आले मनपाच्या अनेक इमारती आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च सेंटर छत्रपती शिवाजी मुझीयम मौलाना आझाद रिसर्च सेंटर ई. इमारती आहेत. मनपाचे काम करण्यासाठी हॉटेल कशाला लाजीरवाणी बाब आहे. मनपाची यात बदनामी आहे. तसेच हॉटेलमध्ये बसून तेथील खर्च कोण करणार आहे. लेखी परवानगी आहे का?

**मा. आयुक्त** : राज्य निवडणूक आयोगाचे जे निकष आहेत. त्यानुसार वॉर्ड रजनेचे काम चालू आहे. मनपाच्या कायदयानुसार व निवडणूक आयोगाच्या सूचनेनुसार काम चालू आहे. मी राज्य निवडणूक आयोगाकडून माहिती घेतली. या स्टेजला आता बोलता येणार नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** कामाशी काही देणे घेणे नाही. परंतु खाजगी हॉटेलमध्ये बसून वॉर्ड रचनेचे काम करणे योग्य नाही. यावर माझा आक्षेप आहे.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. किरमाणी यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्या संदर्भात वृत्तपत्रात आले व त्याची गोपनियता भंग झाल्याचे नाकारता येत नाही. त्याकरिता या प्रकरणात मा. आयुक्त यांनी जातीने लक्ष द्यावे व गोपनीयतेचा भंग होणे व एखादया खाजगी हॉटेलमध्ये असे काम करणे अपेक्षीत नाही.

**श्री. इलियास किरमाणी :** बील कोण देणार?

**मा. आयुक्त** : बील देण्याचा प्रश्न नाही. मनपास संगणकाची वेगळी सुविधा आवश्यक होती ती तेथे होती. म्हणून बसलेले होते आणि हे काम सुध्दा झालेले आहे.

**श्री. भगवान रगडे :** माझ्या वार्डातील मिसारवाडी हा भाग स्लम घोषीत करण्याबाबत आपण आदेशीत केलेले होते. गेल्या चार वर्षापासून हा प्रश्न गाजतो आहे. गुंठेवारी कायदा लागू होण्यापूर्वी ठराव घेतलेला होता. आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे.

**प्रकल्प संचालक** : उपअभियंता श्री. विष्णू वझे व मी स्वतः मा. उपआयुक्त यांचे स्वाक्षरीचे एक पत्र घेवून अंबेकर नावाचे वर सचिव यांची भेट घेतली. ते पत्र सादर केले आहे. त्यावर त्यांनी असे सांगितले की, ज्या वसाहती गुठयांच्या पटीमध्ये निर्माण झाल्या. त्यांना गुंठेवारी लागू करता येईल. ह्या वसाहती मध्ये अतिक्रमण झाले आहे. घरे झाली आहेत. अशा वसाहतींना झोपडपट्टी घोषित करण्याबाबत पुढील कार्यवाही गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभाग यांचे मार्फत करण्यासंदर्भात पत्रव्यवहार करावे असे म्हटले आहे. त्यानुसार मी तशी टिप्पणी मा. उपआयुक्त यांचेकडे सादर केलेली आहे. या संदर्भात सहाय्यक संचालक यांनाही अहवाल दिला आहे.

**श्री. भगवान रगडे :** या प्रकरणा संदर्भात मला बरोबर घेवून गेले असते तर खरी परिस्थिती लक्षात आली असती तशा सूचना आपण केलेल्या होत्या.

**मा. सभापती** : उपआयुक्त यांचे पत्र का घेऊन पुन्हा जाणारच आहात त्यावेळी स. सदस्य श्री. रगडे यांना सोबत घेवून जावे. श्री. वझे साहेब २४ तारखेला येतील. २५ तारखेला स. सदस्य श्री. वझे यांनी या संदर्भात मुंबईस जावे.

**प्रकल्प संचालक :** झोपडपट्टी घोषीत करण्याबाबतचे सर्व प्रकरण नगररचना विभागामार्फत हाताळण्यात येते.

**श्री. भगवान रगडे :** स्लम घोषीत करण्याबाबत प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केली. त्याच्या प्रती मला देण्यात याव्या.

**मा.सभापती** : स. सदस्य श्री. रगडे ह्यांना सर्व कागदपत्राच्या प्रती देण्यात याव्यात.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** गादीया विहार येथे डांबरीकरणाचे कामासंदर्भात काय कार्यवाही करण्यात आली. ती वसाहती घेवून १५ वर्षे झाले. विकास करावा.

**अति. शहर अभियंता :** सेल्फ डेव्हलपमेंटचा तो भाग आहे. जो पर्यंत मनपाकडे हस्तांतर होणार नाही. तो पर्यंत काम करता येणार नाही.

**मा.सभापती** : ज्या बिल्डरने बांधकाम केले त्यांनी तो रस्ता मनपाकडे हस्तांतर करुन द्यावयास पाहिजे होता. तो पर्यंत काम करता येत नाही. त्या भागातील त्या डेव्हलपर्सनी सर्व रस्ते, पथदिवे, ड्रेनेज पाणी पुरवठा इ. रितसर हस्तांतर करुन दिले पाहिजे. एकतर बेंटरमेंट चार्जेस भरुन मनपाकडे हस्तांतर करुन घेणे एवढाच उपाय होऊ शकतो. हस्तांतर केल्यानंतर तीन वर्षानंतर देखभाल दुरुस्तीची कामे मनपा हाती होते.

**श्री. इलियास किरमाणी :** तत्कालीन उपआयुक्त श्री. शिंदे हे चुकीच्या मार्गाने नियम सोडून काही संचिकेवर सह्या करुन गेले. वृत्तपत्रात आले. यात मनपाची बदनामी आलेली आहे. खरी परिस्थिती काय आहे. खुलासा घ्यावा.

**मा. आयुक्त** : आपण चांगला विषय उपस्थित केला. ती बातमी मी पण वाचलेली आहे. उपआयुक्त (म) सध्या जे आहेत. त्यांना यापुर्वीच सूचना केल्या की, प्रत्येक संचिकेची तपासणी करावी श्री. रामटेके यांचे पातळीवर तपासणी सुरु आहे. अहवाल तयार आहे. उपआयुक्त पाहतील त्याप्रमाणे माहिती देतील.

**श्री. इलियास किरमाणी :** ठेकेदाराचे एक निवेदन होते. आपणास पत्र दिले असेल. कॉल डिपॉझीट हे उपआयुक्तांच्या नावावर असते. व ते ठेवून टेंडर काढावे असे आहे.

**मा. सभापती** : बँक डेट जे कॉल डिपॉझीट होते ते उपआयुक्तांच्या नांवे होते. विशिष्ट कामाचे नव्हते उदाहरणार्थ काहींना २६००/- असेल तर ३०००/- लावण्यात आलेले आहे. जसे कामासाठी कॉल डिपॉझीट काढले तर रिलीज करुन नवीन कामासाठी लावण्यात आले पाहिजे. असा प्रशासनाचा खुलासा होता परंतु काही टेंडर बँक डेटच्या कॉल डिपॉझीटच्या कारणामुळे काढले गेले नाही. या संदर्भात मी व पदाधिकारी मा. आयुक्त सुध्दा बरोबर होते यानंतर ही पध्दत पाहीजे नको असेल तर यानंतर कन्सल्टंट करावयाचे त्यासाठी जाहीर प्रगटन देवून त्यांची अंमलबजावणी करावी अशा सूचना दिल्या. त्या निविदा उघडण्यात याव्यात व त्या तारखेच्या नंतर नोटीस वैगेर काढून जाहीर प्रगटन देवून त्यांची अंमलबजावणी करावी. याबाबत लेखा विभागाचे काय मत आहे की, अशा प्रकारच्या काही विशिष्ट निविदेच्या बाबत कॉल

डिपॉझीट घेण्यात येवू नये. यानंतर ज्या निविदा भरल्या गेल्या असतील तर प्रशासनाने सहानूभूतीपूर्वक विचार करुन त्या निविदा उघडण्यात याव्यात.

**विषय क्र. १२६ :**

दिनांक २७-१०-२००४ (का. प्र. १९) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**ठराव :**

दिनांक २७-१०-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नक्षत्रवाडी मनपा शाळेसाठी नविन इमारत बांधणेच्या कामाकरीता सा. बा. खात्याचे जिल्हा दरसूची सन २००२-२००३ नुसार रु. १९,९९,९११/- च्या अंदाजपत्रकास मुळ संचिकेतील पान क्र. ९ परिच्छेद क्र. २४ व २६ च्या एकूण ३ मुद्दे मधील अटीच्या अधिन राहून दि. ०७-०८-२००४ रोजी मा. स्थायी समितीमध्ये मान्यता मिळालेली आहे.

सदर कामासाठी निविदा सूचना क्र. मनपा/ले.नि/२००४/४३ दि. ०९-०८-२००४ अन्वये निविदा मागविण्यता आल्या असता विक्रीच्या तारखेला एकूण २६ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकूण पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. अमन असोसिएटस | ४.९९% जास्त दराने |
| २. | मे. शहा कन्स्ट्रक्शन | ७.१०% जास्त दराने |
| ३. | मे. के. बी. पाथ्रीकर | ८.००% जास्त दराने |
| ४. | मे. मन्नान खान | १०% जास्त दराने |
| ५. | मे. ऋषीकेश कन्स्ट्रक्शन | निविदा उघडलेली नाही. (रजिष्टर प्रमाणित नसल्याने) |

वरील प्रमाणे सर्वात कमी म्हणजे अ. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा मे. अमन असोसिएटस यांची असल्याने दि. २८-१०-२००४ रोजी मा. आयुक्तांनी वाटाघाटीस बोलाविले व वाटाघाटी अंती मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे निविदा मान्य करण्यास शिफारस केली आहे.

करीता सदर कामासाठी मे. अमन असोसिएटस यांचे मा. आयुक्तांनी शिफारस केल्यानुसार निविदेला अंदाजपत्र्यकी दराने मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नक्षत्रवाडी मनपा शाळेसाठी नविन इमारत बांधणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे व अं. प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदाधारक मे. अमन असोसिएटस यांचे झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पहाडसिंगपूरा व लगतच्या परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी १० लाख लिटर्स

क्षमतेचा जलकुंभ बांधून वितरण व्यवस्था करावयाची आहे. त्यासाठी र. रु. ६६,००,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. त्यास सर्वसाधारण सभेचा ठराव क्र. १५७/५ दिनांक १९-११-२००३ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे. आता निविदा प्रसिध्दीस द्यावयाच्या आहेत. त्यासाठी लागणारी खाजगी जागा महानगरपालिकेच्या ताब्यात नसल्याने पुढील कार्यवाही प्रलंबीत आहे.

पहाडसिंगपुरा भागात जी. एस. आर बांधणे करीता सर्व्हे क्र. ३८, मौजे पहाडसिंगपूरा ही जमीन श्री. शितलचंद सुधाकर डळाळे यांच्या मालकीची आहे. पैकी २५०० चौ. मी. जमीन संपादन करावी लागणार आहे. प्रस्तावित भुसंपादन करावयाची जमनी ही ना-विकास क्षेत्रामध्ये (Non-Development Zone) असून, त्याकरीता २४ मी. विकास योजना रस्त्याचा भागही संपादन करावयाचा आहे.

संपादन प्रस्तावामध्ये सर्व्हे क्रमांक ८ मधील २५०० चौ. मी जमीन पाण्याचे टाकीकरीता ४७८५ चौ. मी. जमीन विकास योजना रस्त्याची असे एकूण ७२८५ चौ. मी. क्षेत्र संपादीत करावयाचे समावेश आहे.

संपादन करावयाच्या जमनी मालकासह चर्चा केली असता त्यांनी काही अटी/शर्तीवर जागा देवू केली आहे. त्या अटी/शर्ती खालील प्रमाणे प्रस्ताव-अः- महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या ७२८५ चौ. मी. क्षेत्राचा आर्थिक मोबदला मावेजा भुसंपादन नियमाला धरु+१२% सोत्यॉशियम+३०% अतिरिक्त घटकांची रक्कम

**प्रस्ताव-ब :** महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या ७२८५ चौ. मी. क्षेत्रा इतकी पोच रस्ता असलेली महानगरपालिकेची रहिवाशी क्षेत्रातील जमीन अदलाबदलीच्या स्वरुपात द्यावी. त्यासाठीचा मुद्रांक व इतर खर्च महानगरपालिका व जमीन मालक यांनी अर्धा-अर्धा करावा.

**प्रस्ताव-ब :** महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या ७२८५ चौ. मी. क्षेत्रा इतके इतरत्र वापरता येईल.

वरील अटी/शर्तीबाबत प्रकरण नगररचना विभाग तसेच मुख्य लेखाधिकारी यांचेकडे योग्य त्या कार्यवाही तथा अभिप्रायार्थ पाठविले असता त्यांनी अभिप्राय दिला आहे की, श्री. डहाळे यांनी दिलेल्या प्रस्तावांचे अनुषंगाने सविस्तर व खुलासेवार सादर केलेल्या प्रमाणे प्रस्तावित जी एस. आर. साठी २५०० ३ प्रस्तावित चौ. मी. क्षेत्र घ्यावयाचे झाले तरी त्यासाठी पोच रस्ता असणे आवश्यक आहे. अधिकृत करावयाच्या जमिनीला लागून विकास योजना रस्त्यातील ४७८५ चौ. मी. असे एकूण ७२८५ चौ. मी. क्षेत्र होणे आहे. सदरील जमिनीचे मुल्यांकन सन २००३-०४ शिघ्रसिध्द गणकानुसार नगररचना विभागातर्फे रुपये ३४,३३,१७५/- एवढे करण्यात आले आहे. त्यामुळे विकास योजनेमध्ये प्रस्तावित २४ मी. रुंद विकास योजना रस्त्याखालील अर्जदाराची जागा सुध्दा संपादीत करणे योग्य राहील. अर्जदाराचे मिळकतीचा मोबदला देण्यासाठी (प्रस्ताव) वरील (अ) (ब) व (क) नुसार एकूण तीन पर्याय सुचविण्यात आलेले आहेत. त्यापैकी पर्यायी जागा देण्याचा प्रस्ताव संयुक्तीक वाटतो. या जागेबाबत संबंधित जमीन मालक श्री. डहाळे यांनी महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडे जमिनीचा आगावू ताबा देण्याबाबत तातडीचे व अत्यावश्यक काम असल्याने लेखी संमतीपत्र पाणी पुरवठा विभागास दिले आहे. प्रस्ताव ' ब ' ला मुख्य लेखाधिकारी, सहाय्यक संचालक नगररचना व मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे. या

अभिप्राय संदर्भाने अधिकतम खुलासा सहाय्यक संचालक नगर रचना यांचेकडून मागविला असता त्यांनी खालील प्रमाणे खुलासा केला आहे.

**मुद्दा क्र. १** : नुसार अभिप्राय दिलेला आहे की, हर्सुल येथील सर्व्हे क्र. २१६ ही जमीन शासनाकडून महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेली आहे व त्याचा ७/१२ मध्ये अंमल आहे. रिक्त जागेतून पर्यायी जागा देणे आहे. त्या बदल्यात अर्जदाराची जागा विकास कामासाठी (जी. एस.आर.) व पोच रस्त्यासाठी घेण्यात येत आहे. सबब विकास कामासाठी जमीन संपादन करुन त्य बदल्यात अदला बदलीने पर्यायी जागा देणेबाबत प्राधिकरण, महानगरपालिका औरंगाबाद यांची मान्यता घेऊन देता येईल.

**मुद्दा क्र. २** : संपादीत करावयाची जागा ही Non-Development Zone मधील आहे. परंतु त्या जमिनीच्या खुल्या इतकीच जागा Development Zone मधील जागा संबंधितास अदलाबदलीच्या अटीनुसार देता येईल.

उपरोक्त खुलाश्याप्रमाणे नगररचना विभागाच्या अभिप्रायानुसार संबंधित जमीन मालकाने मागणी केलेल्या पर्यायी जागा ७२८५ चौ. मी. साठी मौ. हर्सुल येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या रहिवाशी क्षेत्रामधील स. न. २१६ पैकी रुपये ३४,३३,१७५/- इतके मुल्य असलेले महानगरपालिकेचे क्षेत्र देण्याची शिफारस सहाय्यक संचालक नगर रचना यांनी केलेली आहे.

करीता मालमत्ता अधिकारी यांनी अदलाबदलीचे नोंदणीकृत दस्तऐवज करुन सदरील जमिनीचा ताबा पाणी पुरवठा विभागास द्यावा तद्नंतर निविदेची कार्यवाही सुरु करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पहाडसिंगपुरा व लगतच्या परिसरासाठी पाणी पुरवठा करण्यासाठी १० लाख लिटर्स क्षमतेचा जलकुंभ बांधून वितरण व्यवस्था करण्याकरीता पहाडसिंगपूरा भागात जी. एस. आर. बांधणे करीता सर्व्हे क्रमांक ३८ मधील २५०० चौ. मी. जमीन पाण्याचे टाकीकरीता व ४७८५ चौ.मी. जमीन विकास योजना रस्त्याची असे एकूण ७२८५ चौ. मी. क्षेत्र संपादन करण्यास तसेच मिळकतीचा मोबदला देण्याच्या पर्यायानुसार मौ. हर्सुल येथील महानगरपालिकेच्या मालकीच्या रहिवाशी क्षेत्रामधील स. न. २१६ पैकी पर्यायी जागा ७२८५ चौ. मी. रुपये ३४,३३,१७५/- इतके मूल्य असलेले महानगरपालिकेचे क्षेत्र देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२९ :**

सहाय्यक संचालक नगररचना महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद शहर मंजूर विकास योजनेनुसार ५० फुट रुंद रस्ता चेलीपूरा ते रोषनगेट या रस्त्याने बाधीत मिळकतीचे क्षेत्र महानगरपालिकेने खाजगी वाटाघाटीने सन १९९१ मध्ये संपादन केलेले आहेत. त्यात ९७८६ मिळकतधारक श्री. रहेमान खान, श्री. रहेमान रवॉ पिता चॉंद खॉं यांचे उक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्र २४.३७ चौ. मी. चा समावेश आहे. त्यांना उक्त बाधीत क्षेत्राचा मोबदलारुपये १०,१७७/- (रुपये दहा हजार एकशे सत्याहत्तर फक्त) निश्चित करुन संबंधिताकडून करारनामा, ताबा पावती करुन घेण्यात आला आहे. प्रत्यक्षात मोबदला अदा केलेला नाही. दरम्यान मिळकत धारकाने बाधित

क्षेत्राच्या मोबदल्यात पर्यायी जागा मागणी केलेली होती. परंतु पर्यायी जागा देता येत नाही. असे संबंधितास कळविण्यता आलेले आहे.

सबब मिळकत धारकाने मोबदला मिळणेसाठी विनंती केली असल्याने सन १९९१ मध्ये ताबा व करारनामा करुन दिला असल्यामुळे त्यावेळी निश्चित केलेला मोबदला रुपये १,०१७७/- (रुपये दहा हजार एकशे सत्याहत्तर फक्त) मिळकतधारक श्री. रहेमान खॉन पिता चाँद खाँ यांना अदा करणेस्तव प्रस्ताव मान्यतेस्तव सादर. तसेच या मिळकतीशिवाय इतर सद्य मिळकती बाधीत आहेत. त्या मिळकतीत बाधीत क्षेत्र ताब्यात घेतलेले नाहीत. करारनामा करुन घेतलेले नाहीत. त्यामूळे त्या मिळकतीचे बाधीत क्षेत्र संपादन करणेच्या मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर मंजूर विकासयोजनेनुसार ५० फूट रुंद रस्ता चेलीपूरा ते रोषणगेट या रस्त्याने बाधीत मिळकतीचे क्षेत्र न. भू. क्र. ९७८६ मिळकत धारक श्री. रहेमान खाँन पिता चाँद खाँ यांचे उक्त मिळकतीचे बाधीत क्षेत्र २४.३७ चौ. मी. चा मोबदला रुपये १०,१७७/- (रुपये दहा हजार एकशे सत्याहत्तर फक्त) अदा करण्यास तसेच या मिळकती शिवाय इतर सहा बाधित मिळकतीचे बाधीत क्षेत्र संपादन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३० :**

कार्यकारी अभियंता (ड्रे. व वि.) मनपा औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, प्रभाग क्र. ५ मधून वाहणाऱ्या नाल्यातील गाळ काढणे, मेन सिव्हर लाईनची अपरुंटीग करणे मेन सिव्हर ब्रँन्च लाईन अपरुटींग करणे मेन होल चेंबर नविन बांधणे व नाल्यातील गाळ नारेगांव ट्रेचिंग ग्राऊंड येथे टाकण्याच्या कामाचे रुपये २९,९६,०००/- च्या रक्कमेच्या अंदाजपत्रकास दिनांक ०५-०८-२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत मंजुरी प्राप्त झालेली आहे. त्यानुसार कामासाठी निविदा सुचना जा. क्र./मनपा/निविदा/२००४/५४ दि. १६-०८-२००४ रोजी प्रसिध्द करुन प्राप्त झालेल्या पाच निविदापैकी सर्वात कमी दराची निविदा श्री. शेख मसुद यांची ३.९९९% निविदेर खाडाखाडीसह अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीची लिखाण झालेली आहे. परंतु सदरील निविदा दरामध्ये खाडाखोड झाल्याचे प्रथमदर्शनी/निर्दशनास आल्याने मा. आयुक्त यांनी आदेशीत केल्यानुसार सदरील प्रकरणी सविस्तर तांत्रिक चौकशी त्रयस्थ यंत्रणा, मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय औरंगाबाद यांचे मार्फत करण्यात आलेली आहे. मा. प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय यांनी सदरील प्रकरणी तज्ञ प्राध्यापकाकडून स्थळ पाहणी करुन सविस्तर तांत्रिकदृष्ट्या तपासणी करुन दिनांक २०-१०-२००४ रोजी तपासणी अहवाल मा. आयुक्त महानगरपालिका औ. बाद. यांना सादर केलेला आहे.

सदरील अहवालातील मुदयांचा सारांश खालील प्रमाणे आहे.

१. सदरील प्रस्तावित कामात जलनि:सारण वाहिनीची दुरुस्ती आहे. त्यावाहिनीच्या वरील भागातील व खालच्या भागातील वाहिनी चोक व सुटलेल्या स्थिती असल्याने मध्य भागाची जलनि:सारण वाहिनी दुरुस्त करुन उपयोग नसल्याने सुरुवाती काम करण्याचे नमूद केलेले आहे. सुरुवाती पासून जलनि:सारण वाहिनीपासून जलनि:सारण वाहिनी टाकतांना सविस्तर सर्वेक्षण व कन्टूर contours घेणे, जलनि:सारण वाहिनी नाल्यातून न टाकता रस्त्याच्या कडेने टाकणे. ट्रायल पीट घेणे. अंदाजपत्रकापुर्वी लाईनचे डिझाईन करणे व नाला सफाई करतांना योग्य

मोजमापे घेवून साचलेल्या मटेरियलची (exact quantity) नमूद करण्यास सुचित केलेले आहे.

२. प्रस्तावित कामाच्या बाबीचे दर डी. एस. आर. मधील दरांची जुळत नसल्याचे व त्यांचा पान क्रमांक व बाब क्रमांक टाकलेले नाही. असे नमूद केलेले आहे.

३. निविदेमध्ये खाडाखोड/over writing झालेली आहे. यासाठी सुधारीत अद्यावत निविदा फॉर्म तयार करणे आवश्यक व दर अक्षरी लिहीण्यात येईल अशी व्यवस्था असली पाहिजे.

४. सदरील काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी लागणारे तांत्रिक माहिती उपलब्धता मनपाकडे नसल्याने तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचे सुचविले आहे व जलनि:सारण वाहिनी तुकडया तुकडयात करता येत नसल्याचे नमूद केलेले आहे.

५. तांत्रिकदृष्ट्या कोणत्याही परिस्थिती मुख्य जलनि:सारण वाहिनी नाल्यातुन टाकण्यात येवू नये व नाला सफाई व लाईनची दुरुस्ती वेगवेगळी करु नये असे स्पष्ट केलेले आहे.

६. निविदा नोटीसचा कालावधी नियमापेक्षा कमी असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे.

उपरोक्त अहवालातील मुद्दे विचारात घेता सदरील प्रस्तावित काम रद्द करण्याच्या व फक्त नाला सफाईसाठी पुन्हा सविस्तर सर्वेक्षण करुन नविन अंदाजपत्र्यक तयार करण्याच्या व मा. प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय यांनी दिलेला चौकशी अहवाल मा. स्थायी समितीच्या माहितीस्तव व मंजूरीस्तव सादर करण्यास मा. आयुक्तांनी शिफारस केल्याप्रमाणे प्रस्ताव स्थायी समिती सभेच्या विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. इलियास किरमाणी :** जेव्हा टेंडर निघाले होते. त्यावेळी वृत्तपत्रात आलेले होते. अटी शर्तीनुसार बरोबर नसेल ती निविदा रद्द करण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त आहे. स्थायी समितीला नाही. हे सुध्दा २० लक्ष रुपयेपेक्षा जास्तीचे आहे. सर्वसाधारण सभेसमोर ठेवावे. हा प्रस्ताव एजन्सी फिक्सींगचा नाही. चुकीने प्रस्ताव झालेला आहे.

**मा. सभापती** : दोन दिवसांपुर्वी सर्वसाधारण सभा संपन्न झालेली आहे. आता पुढील सभा घेण्यास एक महिना अवधी आहे. त्यामूळे उशीर होईल. कामास विलंब लागेल काम तातडीचे आहे. चर्चा करुन निर्णय घेतला जाईल. या सभागृहाच्या अधिकारात प्रस्ताव येत असेल तर, चर्चा करुन विचार करण्यास हरकत नसावी.

**श्री. इलियास किरमाणी :** कोणत्याही परिस्थितीत स्थायी समिती सभेचा विषय नाही. या सभागृहाच्या अधिकारात हा प्रस्ताव येत नाही. यापुर्वीही सर्वसाधारण सभेत ६० लक्षचा मंजूरीसाठी आलेला होता. नंतर २९ लक्षचा प्रस्तावास मंजूरी झाली. शहरातील इतर १९ नाल्यांबाबत पुन्हा केव्हा कार्यवाही होणार आहे. यापूर्वी २० लक्ष मध्ये १९ नाले सफाई करण्यात आले आता एका नाल्यासाठी प्रस्ताव येत आहे. हा विषय सभागृहाच्या नाही. टेंडर रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तांना आहे. त्यांनी निर्णय घ्यावा. निर्णय घेवून यासभागृहाची बदनामी होईल असा निर्णय घेवू नये. वृत्तपत्रातून खूप काही मनपाच्या विरुध्द छापून झालेले आहे.

**मा.सभापती** : प्रस्ताव आपणांकडे आला आहे तर चर्चा करुन निर्णय घेण्यास हरकत नसावी.

**श्री. इलियास किरमाणी :** एक तर हा प्रस्ताव या सभागृहात यावयास नको होता. सर्वसाधारण सभेच्या अधिकारात हा प्रस्ताव येतो. टेंडर रद्द करण्याचा अधिकार मा. आयुक्तांनी आहे.

**मा. आयुक्त** : महापालिकेच्या कायदयात ही स्पष्ट तरतुद आहे. मुख्य लेखाधिकारी तसेच ऑडीटचे कर्मचारी या ठिकाणी उपस्थित आहेत. १० लक्षच्या वर कोणत्याही महापालिकेच्या आयुक्तांना त्यांना बी.पी. एम. सी. ॲक्ट १९४९ लागू आहे. अशा निविदा परस्पर स्विकारता येत नाही. त्या स्थायी समितीसमोर सादर करण्यात लागतात. परंतू ही निविदा स्विकारण्यापुर्वी ज्या काही मुदयांवर चौकशी केली. ती चौकशीही समिती समोर यायला पाहिजे म्हणून हा प्रस्ताव स्थायी समिती समोर आले आहे.

**श्री. इलियास किरमाणी :** आठ दहा दिवसापूर्वी टेंडर रिकॉल झाले. वृत्तपत्रात आले. आयुक्तांनी केले असे असतांना स्थायी समितीसमोर प्रस्ताव येण्याचे कारण काय? २० लक्षच्या वरचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर यावयास पाहिजेत. ६० लक्षच्या प्रस्तावास मंजूरी दिली नाही. एक नाल्यासाठी २९ लक्षची मंजूरी देणार का. जनतेचा पैसा आहे. योग्य तऱ्हेने वापर करावा. निविदाबाबत सभागृहाने का जबाबादारी घ्यायची. विनंती की, आपण कुणाच्याही दबावाखाली येवून निर्णय घेवू नये. आपल्या सर्वांच्या फायदयासाठी सूचना करता आहे.

**मा. सभापती** : मा.आयुक्तांनी आताच सांगितले आहे. खुलासा केलेला आहे. आपण चर्चा करुन काय जो निर्णय घेता येईल तो घेवू. जेव्हा प्रस्ताव या सभागृहापर्यंत येतो याचा अर्थ आपणांस निर्णय घेण्याचा हक्क पोहचतो.

**श्री. इलियास किरमाणी :** जबरदस्ती चर्चा होणे बरोबर नाही. चर्चा केली तर फार मोठी चर्चा होईल. आपल्या अधिकारात विषय येत नाही. मा. आयुक्त निर्णय होतील. चर्चा केल्यास कुणावर काय ॲक्शन घेतली. तो मुद्द उपस्थित होईल. टेंडर रद्द केलेले आहे. मा. आयुक्तांना निर्णय घेण्याचा अधिकार आहे. चर्चा करु शकता निर्णय घेणार असाल तर, कुणाच्या तरी दबावाखाली निर्णय घेत आहात असे मी समजेल.

**श्री. माणिक साळवे :** स्थायी समितीच्या अधिकारात हा विषय येत नसेल तर प्रशासनास निर्णय घेऊ दयावा. स्थायी समितीला २० लक्षच्या आतील अधिकार असून हा प्रस्ताव २० लक्ष रक्कमेच्या पुढील आहे.

**मा. सभापती** : प्रस्ताव अंदाजपत्रक मंजुरीसाठी आलेले नाही. जर अंदाजपत्रक २० लक्षचे पुढील असेल तर, सर्वसाधारण सभेत निर्णय घेतला जातो. निविदेच्या संदर्भात काही निर्णय घ्यायचा असेल तर, स्थायी समिती तसा निर्णय घेवू शकते. .

**श्री. माणिक साळवे :** आताच स. सदस्य श्री. इलियास किरमाणी यांनी सूचना केली की, हा वादग्रस्त विषय आहे. असे असतांना आपण कशासाठी निर्णय दयायचा प्रशासनाचा खुलासा घ्यावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकारी कार्यकारी अभियंता या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी सविस्तर खुलासा करावा.

**कार्य. अभियंता (वि. ड्रे.) :** वॉर्ड क्र. ५८ मधून वाहणाऱ्या नाल्यातील गाळ काढणे, मेन सिव्हर लाईनची अपरुटींग करणे मेन सिव्हर ब्रँच लाईन अपरुंटींग करणे बाबत रुपये २९.९६ लक्षची निविदा काढण्यात आलेली होती. निविदेत खाडाखोड आल्याचे वृत्तपत्रात आल्यानंतर चौकशीचे आदेश दिले. निविदेच्या भरलेल्या दरामध्ये खाडाखोड झालेली आहे. चौकशी करण्यासाठी मा. आयुक्त यांनी शहर अभियंता यांना नियुक्त केले होते. त्यांनीही सदर निविदेमध्ये खाडाखोड झाल्याचे अहवालात म्हटले आहे. त्यानंतर सुध्दा निविदेमध्ये खाडाखोड झाल्याचे तपासणीसाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडे वाढविण्यात आलेले होते. यासंबंधी काही स. सदस्यांनी तक्रारी सुध्दा केलेल्या होत्या. पत्र पाठविल्यानंतर शासकीय अभियांत्रिकी महाविदयालय औरंगाबाद यांनी त्यांचे तज्ञ प्राध्यापकाकडून स्थळ पाहणी करुन अहवाल मा. आयुक्त महोदयाकडे सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने प्रशासनाने हा प्रस्ताव आपल्या समोर ठेवलेला आहे. त्यात ....................

१. सदरील प्रस्तावित कामात जलनिःसारण वाहिनीची दुरुस्ती आहे. त्या वाहिनीच्या वरील भागातील व खालच्या भागातील वाहीनी चोक व तुटलेल्या स्थितीत असल्याने मध्य भागातील जलनिःसारण वाहिनी दुरुस्त करुन उपयोग नसल्याने सुरुवातीपासून जलनिःसारण वाहिनी टाकतांना सविस्तर सर्वेक्षण व कन्टूर contours घेणे जलनिःसारण वाहिनी न टाकता रस्त्याच्या कडेने टाकणे, ट्रायल पीट घेणे, अंदाजपत्रकपुर्वी लाईनचे डिझाईन करणे व नाला सफाई करतांना योग्य मोजमापे घेवून साचलेल्या मटेरीअलची Exact Quantity नमुद करण्यास सुचित केलेले आहे.

२. प्रस्तावित कामाच्या बाबीचे दर डी. एस. आर. मधील दरांशी जुळत नसल्याचे व त्याचा पान क्रमांक व बाब क्रमांक टाकलेले नाही असे नमूद केलेले आहे.

३. निविदेमध्ये खाडाखोड/over writing झालेली आहे. यासाठी सुधारीत अदयावत निविदा फॉर्म तयार करणे आवश्यक आहे व दर अक्षरी लिहण्यात येईल अशी व्यवस्था असली पाहीजे.

४. सदरील काम विशिष्ट प्रकारचे असल्याने त्यासाठी लागणारे तांत्रिक माहीती उपलब्धता मनपाकडे नसल्याने तांत्रिक सल्लागार नियुक्त करण्याचे सुचविले आहे व जलनिःसारण वाहिनी तुकडया तुकडयात करता येत असल्याने नमूद केलेले आहे.

५. तांत्रिकदृष्ट्या कोणत्याही परिस्थितीत मुख्य जलनिःसारण वाहिनी नाल्यातून टाकण्यात येऊ नये व नाला सफाई व लाईनची दुरुस्ती वेगवेगळी करावी एकत्र करु नये असे स्पष्ट केलेले आहे.

६. निविदा नोटीसचा कालावधी नियमापेक्षा कमी असल्याचे अहवालात नमूद केलेले आहे.

नाल्यामध्ये मेन सिव्हर लाईन टाकु नये. मेन सिव्हर लाईन चोक असल्यामुळे फक्त मिडल कोर्स याक करुन आपला एक्स्पेडीवर व्यवस्थीत होईल. म्हणून सदर काम प्रशासनाने आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या अभिप्रायाप्रमाणे प्रस्तावित काम रद्द करण्याच्या व नाला सफाईसाठी पुन्हा सविस्तर सर्वेक्षण करणेचे नवीन अंदाजपत्रक तयार करण्याच्या अभियांत्रिकी

महाविद्यालयाच्या अभिप्रायानुसार मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे.

**श्री.ईलियास किरमाणी :** आताच अधिकाऱ्यांनी खुलासा केला आहे. खाडाखोड संबंधीची चौकशी पूर्ण झालेली नाही. हा प्रस्ताव स्थायी समितीकडे कोणत्या अधिकारात झाला आहे. अगोदर चौकशी होवू द्यावी नंतर येवू द्यावे.

**मा.सभापती :** एकूण निविदा किती विक्री झालेल्या होत्या व भरुन आलेल्या निविदा किती दर नमूद केलेले आहेत. खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.) :** एकूण १९ निविदा विक्री झालेल्या होत्या. पाच निविदा दर भरुन झालेल्या होत्या श्री.शेख मसूद यांची निविदा होती त्यात खाडाखोड झाली असे निश्चित सांगता येणार नाही. ३.९९९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराची अशा शब्दात सांगता येईल. आर.एस.भाटीया ०.०५% कमी शहा कन्स्ट्रक्शन २% जास्त डी. अजितसिंग १% जास्त श्री.मन्नान खान २% जास्त.

**मा.सभापती :** प्रशासकीय अंदाजपत्रक केव्हा तयार करण्यात आले व कोणत्या सभेत मान्यता घेतली.

**कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.) :** प्रशासकीय व सर्वसाधारण सभेची मान्यता आहे. दिनांक ०३.०८.२००४ रोजी प्रशासकीय मान्यता व दि.०५.०८.२००४ रोजीच्या सर्वसाधारण सभेत ऐनवेळचा प्रस्ताव म्हणून मान्यता झाली आहे.

**मा.सभापती :** अहवालात असे म्हटलेले आहे जलनिःसारण वाहिनी नाल्यातून न टाकता सत्याच्या कडेने टाकणे ट्रायल पीट घेणे, अंदाजपत्रकापुर्वी लाईनचे डिझाईन नकाशे तयार करणे व नाला सफाई करतांना योग्य मोजमापे घेवून साचलेल्या मटैरियलचा निश्चित कॉन्टीटी नमूद करण्यांस सुचित केलेले आहे. मनपाची काम करण्याची पध्दत कशी असते. एक तर नाल्यामध्ये ज्या मेन सिव्हर लाईन या १७-१८ वर्षापुर्वी टाकलेल्या आहेत. या लाईनचे डिझाईन, ड्रॉईंग व अंदाजपत्रके जी तयार करण्यांत आली ती माझ्या माहितीप्रमाणे भारतातील प्रसिध्द शहा टेक्नीकल कन्सल्टन्सी आहे. त्यांनी दिलेल्या डिझाईन नुसारच या ड्रेनेज लाईन टाकलेल्या होत्या. आजच्या स्थितीत मेन सिव्हर लाईन आहेत. त्या चालू नाहीत. बऱ्याच ठिकाणी फुटलेल्या अवस्थेत आहेत. सी.डी.च्या माध्यमातून दाखविण्यांत आले. जे मलमुत्र वाहणे गरजेचे आहे ते वाहून जात नाही. अहवालानुसार भविष्यात कडेला जलनिःसारण वाहिनी टाकता येतील. परंतू अस्तित्वात असलेल्या जलनिःसारण वाहिन्यांचे बाबतीत किमान मेन्टेनन्स करणे गरजेचे आहे या बाबत मत व्यक्त करावे.

**कार्यकारी अभियंता (ड्रे.वि.) :** मेटेनन्स करणे आवश्यक आहे. परंतू ते होत नाही. ज्यावेळेस मेन सिव्हर लाईन टाकल्या त्या नाल्याच्या मध्यभागी न टाकता कडेला टाकलेल्या असाव्यात. आज स्थितीला त्या लाईन मध्यभागी नाल्यात आलेल्या आहेत. बाजूने अतिक्रमणे झालेली आहेत. म्हणूनच मी सी.डी.वर दाखविण्याचा प्रयत्न केलेला होता. गेल्या चार-पाच वर्षात देखभाल दुरुस्तीचे बजेट व एक्सपेंडीचर बघितले तर भांडवली खर्च कमी कमी होत आहे. एम.ॲण्ड.आर.चे बजेट वाढत जात आहे. त्या घाटीनेच एक रिपोर्ट १७० कोटीच्या योजनेचया दिलेला होता. त्यास सर्वसाधारण सभेने मंजूरी दिली व मागील स्थायी समितीने सुध्दा २% रक्कम भरण्यास मंजूरी दिलेली

आहे. म्हणून मेन सिव्हर लाईन नाल्याच्या सेंटरमध्ये आलेल्या आहेत. पूर्वी त्या कडेला असाव्यात त्याचा शोध घेत आहेत. अभिलेख तपासणी करत आहे. आजच्या स्थितीत संपूर्ण गाळाने त्या भरलेल्या आहेत. काही तुटलेल्या अवस्थेत आहेत. शहा कन्सल्टन्सीच्या अहवालानुसार १० ते १५% अंमलबजावणी झालेली आहे.

**मा.सभापती :** शहा कन्स्टल्टन्सीच्या डिझाईन नुसार/ड्राईंग नुसार अंदाजपत्रक तयार करुन या लाईन्स टाकण्यांत आलेल्या होत्या. आज त्या लाईन चालू नाहीत. लोकांच्या घरात ड्रेनेजचे पाणी जाते. जसे भवानी नगर भागात ही अवस्था आहे. अशा नागरिकांना रिलिफ मिळण्याकरिता आपण काय पर्यायी व्यवस्था करणार आहोत?

**श्री.संजय शिरसाठ :** आताच खुलासा केला की मेन सिव्हर लाईन ही नाल्याच्या कडेलाच टाकली असावी. नाला अरुंद झाला. नाला शिफ्ट होवून सेंटरला आला.

**कार्य.अभियंता (ड्रे/वि) :** सिव्हर लाईन आहे. तेथेच आहे. नाला शिफ्ट झाला आहे.

**मा.सभापती :** आज अस्तित्वातील मेन सिव्हर लाईन व ब्रँच लाईनचे प्रवाह (डिस्पोजल) बंद झाला आहे. मेन सिव्हर लाईन चालू नाही म्हणून ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर येवून लोकांच्या घरात जाते. पाणी परत (बँक) येते. यास ही काय उपाययोजना करणार आहोत.

**कार्य.अभियंता (ड्रे/वि) :** त्यासाठीच १७० कोटीचा प्रस्ताव सादर केलेला होता.

**मा.सभापती :** तो प्रोजेक्ट करण्यास वेळ लागेल. आजच्या परिस्थितीत आपण काय करणार आहोत.

**श्री.इलियास किरमानी :** यापुर्वी १९ नाले सफाई केलेले होते.

**कार्य.अभियंता (ड्रे/वि) :** यापुर्वी १९ नाल्यांची सफाई केली. १० लक्ष रुपयात ते फक्त वाहते पाणी वाहून जाण्या इतपत साफ केलेले होते. एका नाल्यासाठी ४०-५० हजार एवढाच खर्च केलेला आहे.

**श्री.ईलियास किरमाणी :** खाडाखोड संबंधी चौकशी बाकी आहे. एकाच नाल्याचे काम मागे का. प्रशासन आपला वेळ वाया घालवत आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** नाल्यातील गाळ काढणे. मेन सिव्हर लाईनची अपरुटींग करणे इत्यादी कामासाठी रुपये २९.९६ लक्षचा प्रस्ताव समोर आलेला आहे. वेगवेगळ्या वृत्तपत्रात ज्याच्या त्याच्या पध्दतीने या बाबतीत वाच्यता झालेली आहे या प्रकरणाला भ्रष्टाचार झाल्याचा संशय आलेला आहे. या प्रकरणाचे निविदा निघाल्या टेंडर भरुन आले. नगरसेवकांच्या सांगण्यानुसार टेंडरमध्ये बदल करुन आले अशाही बातम्या आल्या. कोणताही नगरसेवक त्यांचे वार्डात विकास कामे होण्यासाठी प्रयत्न करीतच असतो. यात शका नाही. माझा अनुभव आहे. मी संचिकेच्या मागे असतो. अधिकाऱ्यांना नेहमी सांगतो कामे करावीत म्हणून एखाद्या कामाबद्दल नगरसेवकांनी बोलणे व त्यांचे मत व्यक्त करणे इथपर्यंत त्यांचे अधिकार आहेत. त्यात काही गैर आहे असे मला वाटत नाही. कामाचे अंदाजपत्रक कनिष्ठ अभियंता तयार करतात. उप अभियंत्यांकडून कार्यकारी अभियंता यांचे मार्फत मा.आयुक्तांपर्यंत जातात. सर्व अधिकाऱ्यांची मान्यता झाल्यानंतर शेवटी मा.आयुक्तांची मान्यता होते. आयुक्तांबद्दल चांगलेही बोलले जाते. वाईटही बोलले जाते. काही जागांचे म्हणणे आहे की, अर्ध्या दिवसाचे आयुक्त दुपारी स्थळ पाहणीसाठी जातात असा कार्यक्रम असतो. कोणत्याही कामास मंजूरी देताना जर संचिकेवर

स्थळ पाहणी असे असेल तर मा.आयुक्त जे स्वत:च्या ठिकाणी पाहणी करतात. व त्यांचे समाधान झाल्यानंतरच त्या संचिकेवर सही करतात तो पर्यंत करीत नाहीत. म्हणून या प्रस्तावाच्या बाबतीत सुध्दा जे टेंडर झालेल्या संचिकेची संपूर्ण छाननी जे.ई.पासून ते मा.आयुक्तांपर्यंत झालेली असावी. असे माझे मत आहे. सही केल्यानंतर टेंडर काढले. सर्व टेक्नीकलची माहिती मा.आयुकतांना आहे. अशातला भाग नाही. खालच्या अधिकाऱ्यांवर मा.आयुक्तांचा विश्वास जास्त असेल असेही त्यांनी गृहीत धरले असेल परंतू जो अहवाल स्थायी समिती समोर आला त्यात सर्वात कमी दराची निविदा श्री.शेख मसूद यांची ३.९९९% निविदेवर खाडा खोडीसह अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीची लिखाण झालेली आहे. परंतू सदरील निविदा दरामध्ये खाडाखोड झाल्याचे निदर्शनास आल्याने मा.आयुक्त यांनी आदेशित केल्यानुसार सदरील प्रकरणी सविस्तर तांत्रिक चौकशी त्रयस्थ यंत्रणा मा.प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद यांचेकडे पाठविले. पाठविले कशासाठी, वृत्तपत्रात बातम्या आल्या खाडाखोड झाली. टेंडरही छापून आले कशी खाडाखोड झालेली आहे. म्हणून आजपर्यंत मला माहित नव्हते की, हॅंडरायटींग एक्सपर्ट शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे कर्मचारी असतात. ते टेक्नीकलचे कर्मचारी असावेत. हे प्रकरण तपासणीसाठी गेले व त्यांनी अहवालात काही नमूद केले आहे. मेन सिव्हर लाईन आहे. ती मुळात नाल्यात नसावी असे अहवाल दिले आहे. अपरुंटींग करण्याचा त्रास होतो. आताच कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, जी मेन सिव्हर लाईन होती ती बरोबर होती. रस्त्याच्या कडेला असावी. माझ्या माहितीप्रमाणे दोन्ही बाजुने नाल्याच्या कडेला अतिक्रमण झाले म्हणून ती मेन सिव्हर लाईन सेंटरमध्ये आलेली आहे. जी मेन सिव्हर लाईन टाकणे टाकली ती अनुभवी लोकांच्या सल्यानुसारच व लोकसंख्येचा विचार करुनच टाकलेली असावी. म्हणून च्यावेळी १० लक्ष रुपये खर्च केलेले आहे. ज्यांनी अंदाजपत्रक तयार केले त्यांनी त्या संचिकेवर काय लिहिले त्याचे उत्तर द्यावे. या कामाची गरज आहे. गरज असेल तर काम झाले पाहिजे. गरज नसेल तर टेंडर कशासाठी काढले. चुक झाली असेल तर मान्य करावी. टेंडरसाठी झालेला संपूर्ण खर्च त्या त्या अधिकाऱ्यांच्या पगारामधून वसूल करण्यांत यावा. प्राथमिक अहवाल प्राप्त झाला. निविदेमध्ये खाडाखोड झालेली आहे. असे म्हटले. सेकंड निविदाधारक असेल व इतरही असतील त्यांचेशी चर्चा करुन निर्णय घ्यावा. हा नजतेचा पैसा आहे. हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. अधिकारी मनमानी करतात. चुक झाली तर झाली. उद्या म्हणतील बरोबर तर बरोबर ही पध्दत आपण राबविता ती बरोबर नाही. टेंडरमध्ये झालेली खाडाखोड ही त्या सर्व टेंडरला कारणीभूत आहे. कोणीतरी मॅनेज केलेले आहे. एक नाही तर नाही या मनपामध्ये ३०० ठेकेदार टेंडर घेण्यासाठी आहेत. ज्यांनी प्रथम अंदाजपत्रक बनविले ते जे.ई.त्यानंतर उपअभियंता त्यानंतर कार्यकारी अभियंता यानंतर सोनी साहेब यांची सही संचिकेवर असेल या अधिकाऱ्यांनी कोणीही सांगावे या कामाची आवश्यकता नाही ते रद्द करावे. टेंडर केले तर कशाच्या आधारावर केले त्याचाही खुलासा करण्यांत यावा. आताच

स.सदस्य श्री.किरमाणी यांनी सांगितले की हा विषय या सभागृहाचा नाही. हे सत्य आहे. त्यांनी टेंडर प्रोसेस केले त्यांचे स्टेटमेंट घ्यावे.

**मा.आयुक्त :** तांत्रिक अधिकाऱ्यांना खुलासा करण्याचे आदेशित केले व तांत्रिक बाब असल्यामुळे दुसरे काही बोलणार नाही. ज्या वेळेस या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले तेव्हा आता चर्चा झाल्याप्रमाणे संबंधी कनिष्ठ अभियंत्यापासून कार्यकारी अभियंता यांचेपर्यंत कामाची पाहणी करुन शिफारस झालेली होती. तांत्रिकदृष्ट्या व या कामासाठी आणखी काही माहिती आवश्यक होती यात कार्यकारी अभियंता यांनी प्रशासकीय मान्यता आयुक्तांनी दिली असा शब्द वापरला आहे तो इतिवृत्तात आलेला आहे. प्रशासकीय मान्यता देण्याचा अधिकार आयुक्तांना नसतो. तो सर्वसाधारण सभेला असतो. तशी दुरुस्ती इतिवृत्तात घेणे आवश्यक आहे. टेंडरच्या संदर्भात काही अभिप्राय दिलेले आहे. टेंडर निघाले स्विकृत झाले त्या काळात मी रजेवर होतो. दुसरे आयुक्त होते.

**श्री.संजय शिरसाठ :** स्थायी समिती सर्वसाधारण सभेसमोर जेव्हा प्रस्ताव येतात. तेव्हा मा.आयुक्त यांची मान्यता होणे गरजेचे असते. त्यावेळी रजेवर जाण्यापुर्वी मान्यता घेतलेली असावी. जर मा.आयुक्तांच्या जागी दुसरे आयुक्त म्हणून असतील तर माझ्या माहितीप्रमाणे त्यावेळेस सिडकोचे प्रशासक हे प्रभारी आयुक्त म्हणून होते का? हे सुध्दा तपासण्यात यावे. असतील तर ते एम.टेक आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने एवढाच खुलासा अपेक्षित आहे. जे.ई.पासून खुलासा घ्यावा. या कामाची आवश्यकता होती का?

**मा.सभापती :** उपअभियंता (ड्रेनेज) यांनी खुलासा करावा.

**उप अभियंता (ड्रेनेज) :** कैलास नगर स्मशान मारोती ते जाफरगेट नाल्यापर्यंत नाल्यातील गाळ काढणे व त्या ठिकाणी अस्तित्वात असलेली मुख्य जलनिःसारण वाहीनी अपरुटींग करुन चोकअप काढणेसाठी प्राप्त परिस्थितीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले होते. सदरची जलनिःसारण वाहिंन ही एम.जी.एम.दवाखान्यापासून ते शेट सिध्दार्थ उद्यानापर्यंत जात आहे. अस्तित्वातील ड्रेनेज लाईनचा विचार करुन अर्थसंकल्पात जेवढी तरतूद केलेली होती त्या तरतूदीत जेवढे काम शक्य होवू शकेल तेवढेच कामाचे अंदाजपत्रक प्रचलित पध्दतीनुसार केलेले आहे. अस्तित्वातील लाईनच्या अलाईनमेंट नुसारच ही लाईन प्रस्तावित करण्यांत आलेली आहे. यात कोणत्याही प्रकारची तांत्रिकदृष्ट्या चूक झालेली नाही. शिवाय मध्य भागीचा नाला व जलनिःसारण वाहिनी असल्यामुळे त्यामागील कामे व पुढे नाल्याचे व जलनिःसारण वाहिनीचे काम आहे करणे सुध्दा आवश्यक आहे. सर्वसाधारण सभेत ठराव ठेवतांना तसे नमूद केलेले होते. यासाठी पुढील आर्थिक वर्षात भरीव आर्थिक तरतूद ठेवण्यांत यावी त्या अटीवरच हे काम मंजूर करावे असे सर्वसाधारण सभेत प्रस्तावित केलेले आहे.

**श्री.ईलियास किरमाणी :** आपल्याकडे तांत्रिक अधिकारी आहेत. नाले साफ करणे न करणे हे प्रशासनाचे काम आहे. मा.आयुक्त सक्षम आहेत. या बाबत छाननीचा अधिकार आपणांस नाही. निगोशिएशन करणे, टेंडर दुसरे, तिसरे, चौथ्या, निविदाधारकास द्यावयाचा अधिकार मा.आयुक्तांना आहे. चुकीने प्रस्ताव आलेला आहे. आणखी चौकशी चालू आहे. टेंडरमध्ये खाडाखोड झालेली आहे.

**मा.सभापती :** अंदाजपत्रकास मंजूरी देण्याचे अधिकार मा.आयुक्तांना आहेत. एजन्सी ॲक्सेप्ट करण्याचे निश्चित करण्याचे अधिकार या सभागृहास आहेत. अद्याप आपण निर्णय घेतलेला नाही. चर्चा होत आहे. चर्चेनंतर निर्णय घेवू.

**श्री.ईलियास किरमाणी :** टेंडर आलेले आहे. रद्द करण्यासाठी प्रस्ताव आहे. निर्णय घेण्यासाठी नाही.

**मा.सभापती :** तांत्रिक सल्लागार म्हणून श्री.सी.एस.सोनी साहेब, अधिक्षक अभियंता यांनी मत देणे आवश्यक आहे. त्यांनी मत नोंदवावे.

**मा.आयुक्त :** कोणतीही नोटीस ही प्रशासनाच्या कार्यकारी प्रमुखाच्या सहीनेच निघत असते. स्थायी समितीने किंवा सर्वसाधारण सभेने नाकारले असे कळवत नाही. आयुक्तांना अधिकार दिला जातो. तो कायद्याप्रमाणे दिलेला अधिकार आहे. बाहेर जेव्हा का जाते ते आयुक्तांचे सहीने जाते, म्हणून ते जाहिरातीत नमूद असते.

**शहर अभियंता :** प्रभाग क्र.५८ मधून पाहणारा नाला या नाल्याची ड्रेनेज लाईन ही एम.जी.एम. दवाखान्यापासून ते वॉर्ड क्र.५८, गांधीनगर, औरंगपुरा या मार्गे खामनदीला जाऊन मिळतो. ज्या वेळेस वॉर्ड क्र.५८ मध्ये ड्रेनेज लाईनची पाहणी केली. त्यावेळी ड्रेनेज व नाल्याची परिस्थिती अत्यंल्प बिकट होती. डिसील्टींग शब्द वापरला परंतू नाल्या मध्ये काही ड्रेब्रीज वगैरे असतील व तो नाला मनपास क्लीन करणे हे अत्यंत आवश्यक आहे. त्यामध्ये माझे आजही दुमत नाही. पुर्वीही नव्हते. नाल्यातील शील्ट/ड्रेब्रीज काढणे व जी सिव्हर लाईन जाते ती पुर्वीपासूनच टाकलेली आहे व त्या लाईनद्वारे त्या भागातील मैला वाहून जात नव्हता. तो सिव्हर लाईनमधून वाहून जायला पाहिजे. बऱ्याच ठिकाणी चेंबरर्स आणि लाईनची मोठी मोडतोड झालेली आहे. म्हणून मैला वाहून जात नाही. बाहेरुन वाहत आहे. तो आरोग्याच्या दृष्टीने (हायजेनिक) योग्य नाही. म्हणून अर्थसंकल्पात जी वॉर्ड क्र.५८ साठी ३० लक्षची तरतूद केलेली होती. त्या हद्दीपर्यंत अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. टिप्पणी (नोटींग) मध्ये लिहीलेले आहे की, शेवटपर्यंत टप्पा-टप्प्याने का होईना काम करावे लागणार आहे. संचिकेस तशी नोंद केलेली आहे. नसता केलेल्या मागील कामाचा उपयोग होणार नाही. शेवटी खामनदीला पर्यंत काम करावे लागणार आहे. त्यासाठी किमान १.८० कोटी आणखी लागणार आहे. अशी नोंद अंदाजपत्रक मंजूर करतांना सुध्दा नोटींगमध्ये ठेवलेली होती व अशीही नोटींग केली आहे की, पुढील काम करण्यासाठी प्रशासनाने किंवा सर्वसाधारण सभेने आता होत असलेली ड्रेनेज लाईन पुन्हा चोक अप होऊ नये म्हणून भरीव तरतूद करुन पुढील ड्रेनेज लाईन कडून नवीन टाकणे आवश्यक आहे. नसता झालेला खर्च हा वाया जाण्याची शक्यता आहे. शहरातील हायजनिक कन्डीशन बघता हे प्रस्तावित काम करणे गरजेचे असून इतर नाल्यांची कामे करणेही आवश्यक आहे. नसता झालेला खर्च हा वाया जाण्याची शक्यता आहे. शहरातील हायजनिक कन्डीशन बघता हे प्रस्तावित काम करणे गरजेचे असून इतर नाल्यांची कामे करणेही आवश्यक आहे.

**श्री.संजय शिरसाठ :** सदरील काम होणे गरजेचे आहे असा उपअभियंता कार्यकारी अभियंता आणि जेष्ठ अधिकारी अक्षिक अभियंता यांनी खुलासा केलेला आहे. तरी प्रशासनाने हा प्रस्ताव रद्द करण्या बाबत शिफारस केलेली आहे. १७०

कोटीची योजना जरी घेतली असेल त्याचा सर्व्हे होणे ती लाईन कोठून टाकायची कोणाच्या जमीनी संपादित करायच्या यास १०-१५ वर्षाचा दिर्घकाळ लागणार आहे. आज हा शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचा प्रस्ताव स्विकारला तर कोणतेही काम होणार नाही. अभियांत्रिकी महाविद्यालयाचे असे म्हणणे आहे की, नाल्यामधील जी जलनि:सारण वाहीनी आहे. त्याचे काम करु नये असे त्यांचे मत आहे. ते आपल्यासाठी रुलींग होईल. म्हणून भविष्यांत या शहरातील नागरिकांचे आरोग्य चांगले रहावे. त्रास होवू नये. म्हणून जी काही टेंडरमध्ये खाडाखोड झाली असेल कशी झाली कुणाकडून झाली. त्याची वेगळी चौकशी मा.आयुक्तांमार्फत चालू द्यावी व टेंडरमधील इतर सेकंड थर्ड लोएस्ट निविदा धारकास बोलावून जो कोणी लोएस्ट असेल त्यांचेकडून हे काम तातडीने करुन घ्यावे. काम करणे आवश्यक आहे. असे अधिकाऱ्यांनी मत मांडले आहे. तसे आपण रुलींग द्यावे अशी विनंती आहे.

**श्री.रगडे भगवान :** प्रस्ताव मंजूर करावा किंवा नाही याबद्दल माझे काही मत नाही मंजूर करायचा असेल तर अगोदरच माझ्या वार्डात शहरातील सर्व कचरा आणून टाकला जातो. आता प्रस्तावात स्पष्ट दिलेले आहे. एम.जी.एम.पासून ड्रेनेज लाईन साफ करणार मैल निघणारी दुर्गंधी नारेगांव येथील कचरा डेपोमध्ये आणून टाकणार त्या भागातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. म्हणून ही निविदा पास करण्याच्या अगोदर मैला कोठे टाकणार आहे. याचा विचार करावा नसता मागे हवा छोडो आंदोलन केलेले होते. पुन्हा तशी वेळ येवू नये. नारेगांव डेपोमध्ये आणून टाकू नये अशी विनंती आहे. जर निर्णय घेतला तर लोकशाहीच्या मार्गाने आंदोलन करावे लागेल.

**मा.सभापती :** कार्यकारी अभियंता (वि/ड्रे) यांनी प्रस्ताव क्र.१३० हा प्रस्ताव नाल्यातील गाळ काढण्याचा सिव्हर लाईन अपरुटींग करणे बाबतचा प्रस्ताव ठेवलेला आहे. तो नामंजूर करण्यांत येत आहे. या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रशासनास संबंधित निविदेमध्ये केसर काम्पीटेशन (खुली स्पर्धा) होवून १९ निविदा विक्री गेलेल्या होत्या. त्यापैकी ५ निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यात श्री.शेख मसूद यांची निविदेमध्ये खाडाखोड झाल्याचे दिसून आल्याचे प्रशासनाचे मत आहे. म्हणून सदरील श्री.शेख मसूद यांची निविदा रद्द करण्याचा आदेश देण्यांत येतो. उर्वरित जे चार निविदाधारक आहे या निविदेमध्ये दर भरलेले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने प्रशासनास असे सुचित करण्यांत येते की, या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रु.२९,९६,०००/- ग्राह्य धरुन उर्वरित चार निविदाधारकांशी वाटाघाटी करुन निविदा अंतिम करावे व प्रत्यक्ष कामाला सुरुवात करावी. सदरील काम हे महानगरपालिकेच्या तांत्रिक विभागाचे उप अभियंता तसेच अधिक्षक अभियंता श्री.सोनी साहेब यांनी खुलासा दिला की, हे काम करणे गरजेचे आहे. एम.जी.एम. ते सिध्दार्थ उद्यान पर्यंत काम करण्याची गरज आहे. असे म्हटले आहे. फक्त मधील भागच आपण या निविदेमध्ये घेतलेला आहे. म्हणून टप्प्याटप्प्याने जस-जसा निधी उपलब्ध होईल. त्याप्रमाणे जसे अे.बी.सी.असे पार्ट असतील. तर आता बी पार्टची निविदा आपण काढलेली आहे. उर्वरित अे आणि सी पार्टचे काम सुध्दा हाती घेण्यांत यावे. ही निविदा अभियांत्रिकी

महाविद्यालय यांचेकडे पाठविण्यांत आलेली होती. इंजिनियरिंग कॉलेजचे उप अभियंता यांना टेक्नीकली ज्ञान आहे. परंतू हस्ताक्षर तज्ञ हे वेगळे असतात. त्यांचे मत/अहवाल विचारात घेणे. संयुक्तीक वाटत नाही. जे टेक्नीकल ओपिनियन त्यांनी दिलेले आहे. जसे सिव्हर लाईन रस्त्याच्या बाजूला असाव्यात आणि कोणत्या पध्दतीने त्या टाकण्यांत याव्यात. त्याचा भविष्यांत पुर्नविचार करावा. तो अहवाल या निविदे बाबत/कामाबाबत ग्राह्य धरु नये. सदरील अहवालनुसार वीस वर्षाचा कालावधी लागणार आहे. त्या अहवालाचा आताच विचार करु नये. परंतू प्रभाग क्रमांक ५८ मधील अस्तित्वात असलेल्या व बंद असलेल्या मेन सिव्हर लाईन दुरुस्त करणे आज गरजेचे आहे. म्हणून अशा मेन सिव्हर लाईनची दुरुस्ती तसेच नाल्यातील गाळ काढणेची जी कामे आहे ती व शहरातील अशी २९ नाला सफाईची कामे ज्याचा आताच स.स.श्री.किरमाणी यांनी उल्लेख केलेला आहे. ते नाले साफ होण्याबाबतही विचार करावा. सदरील प्रभाग ५८ मधील काम करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न जो निर्माण झालेला आहे. सध्याच्या भागातील नाल्यांमध्ये ५ ते ७ फुट गाळ साचलेला आहे. जो मैला आहे तो वाहून जात नसल्यामुळे या भागात गंभीर परिस्थिती निर्माण झालेली असून सर्व स.पदाधिकारी, मा.आयुक्त व संबंधित अधिकारी यांनी स्थळ पाहणी सुध्दा केलेली आहे. तरी तात्काळ उर्वरित चार निविदाधारकांशी दर वाटाघाटी करुन योग्य ती निविदा स्विकारणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी अशा सुचना देण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार प्रशासनाने सादर केलेला प्रस्ताव रद्द करण्यांत येतो. प्रभाग क्रमांक ५८ मधील सदरील काम करणे गरजेचे आहे. अशी सभागृहाची भावना झाल्याने आणि सर्वात कमी दराची असलेल्या श्री.शेख मसूद यांच्या निविदेस खाडाखोड झाल्याचे प्रशासनाचे मत असल्यामुळे ती निविदा रद्द करुन उर्वरित निविदाधारकांना वाटाघाटीस बोलावून दर निश्चित करुन नाला सफाई व मेन सिव्हर लाईन दुरुस्तीचे मुळ अंदाजपत्रकानुसार रु.२९,९६,०००/- चे काम तात्काळ करुन घेण्यांस मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.१३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा.स्थायी समितीच्या दिनांक ०४.११.२००४ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत विषय क्र.११९ प्रमाणे रुपये २.५० कोटी विशेष तरतूदीमधून शहरातील मुख्य रस्त्यांच्या डांबरीकरण करण्याचा ठराव पारित झालेला आहे. त्यामध्ये खालील कामांचा समावेश आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | बाबुराव काळे चौक ते महात्मा फुले चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे | १४,७८,६५२ |
| २. | मिलकॉर्नर ते औरंगपुरा रस्त्याचे डांबरीकरण करणे | १५,०८,१२६ |
| ३. | क्रांतीचौक ते एस.एस.सी.बोर्ड रस्त्याचे डांबरीकरण करणे | २१,३२,९०० |
| ४. | मुथीयान चौक ते पीरबाजार भाजीवाली बाई चौक रस्त्याचे डांबरीकरण द्वारे दुरुस्ती करणे | १०,०५,५०० |

| | | |
|---|---|---|
| ५. | पीरबाजार चौक ते शहानुरमियाँ दर्गा रस्त्याचे डांबरीकरण करणे | १८,८४,००० |
| ६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ते पानचक्की ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय ते विद्यापीठद्वार रस्त्याचे डांबरीकरण करणे | १९,६८,५०० |
| ७. | सिटी चौक ते बाराभाई ताजिया ते गुलमंडी वाहन तळापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे | १४,९१,९०० |

उपरोक्त सर्व कामे विहीत मुदतीत पुर्ण करावयाची असल्याने उपरोक्त सर्व अंदाजपत्रकांना मंजूरी मिळणे करिता प्रस्ताव सादर.

## संवाद :-

**श्री.संजय शिरसाठ :** माझ्या वॉर्डातील रस्त्याचे डांबरीकरणाचा प्रस्ताव येतो किंवा नाही. पदमपुरा भागातील सर्व रस्ते खराब झालेले आहे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** या प्रस्तावात हर्सुल रस्त्याचा समावेश करण्यांत आलेला नाही. मागच्या बैठकीत आपण रुलींग दिलेले होते.

**सहा.संचालक, नगररचना :** हर्सुल रस्त्याबाबत जागेची मोजणी करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. मोजणी झाल्याशिवाय काम करता येणार नाही.

**श्री.संजय शिरसाठ :** माझ्या वॉर्डातील रस्त्याचे डांबरीकरणाचा प्रस्ताव येतो किंवा नाही. पदमपुरा भागातील सर्व रस्ते खराब आलेले आहेत.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** या प्रस्तावाबाबत हर्सुल रस्त्याचा समावेश करण्यांत आलेला नाही. मागच्या बैठकीत आपण रुटींग दिलेले होते.

**सहा.संचालक, नगररचना :** हर्सुल रस्त्याबाबत जागेची मोजणी करण्यासाठी कार्यवाही चालू आहे. मोजणी झाल्याशिवाय काम करता येणार नाही.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** मोजणी झाल्यानंतर का होईना काम करावे. उशीर लागेल परंतू यामध्ये त्या रस्त्याच्या कामाचा सुध्दा समावेश करावा.

**श्री.संजय शिरसाठ :** मी ऐनवेळी प्रस्ताव सुध्दा दिलेला होता की, पंचवटी ते कोकणवाडी चौकापर्यंत डांबरीकरण झाले होते. त्यातील २.५० लक्ष रुपये सेव्हींग झालेले आहेत. ती रक्कम शिल्लक आहे. त्यातून रस्त्याचे फुटपाथचे काम करण्यांत यावे म्हणून माझी सूचना आहे.

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांना आदेशित करण्यांत येते की, स.सदस्य श्री.शिरसाठ यांनी जी सूचना केली त्यास कार्योत्तर मान्यता देण्यांत येईल. तेथील काम करावे. तसा दुरुस्ती प्रस्ताव सादर करावा. तसेच प्रशांत हॉटेल ते रेल्वेस्टेशन पर्यंत रस्त्याचे १०० मीटर वाढीव काम करण्यासाठी २.५० लक्ष तरतूद करावी. म्हणून "खासदार, मी स्वत: तेथे होतो." आम्ही घोषणा केलेली होती त्याला काही महत्व दिले जात नाही. उद्‌घाटनाच्या वेळी आपणही उपस्थित होता. बचतीमधून काम करावे. म्हणून घोषणा केलेली होती. स.सदस्य श्री.विकास जैन यांचे वॉर्डातील इतर कामाच्या बचतीमधून या रस्त्याचे काम करावे.

**अति.शहर अभियंता :** तपासणी करुन कार्यवाही करावी लागेल. स.सदस्य श्री.शिरसाठ यांचे वॉर्डातील कामाच्या संदर्भात कार्यवाही करता येईल. अंदाजपत्रक तयार करण्यांत येईल.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.विकास जैन वॉर्डातील जी कामे आहेत. त्यातून शिल्लक रक्कम असेल तर त्यातून २५० लक्ष रक्कम वळती करुन प्रशांत हॉटेल ते रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी.पर्यंतच्या रस्त्याचे १०० मीटर वाढीव काम पूर्ण करण्यांत यावे. उद्‌घाटनाच्या वेळी मा.खासदार तसेच मा.महापौर व मी स्वत: उपस्थित होतो. लोकप्रतिनिधीच्या शब्दाला न्याय मिळत नसेल तर बरोबर नाही. हे काम करण्यांच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येते.

**श्री.भगवान रगडे :** रुपये २५० कोटीचा प्रस्ताव समोर आलेला आहे. या कामा संबंधी निविदा काढण्यांत आलेल्या आहेत. यापुर्वी मी सूचना केलेली होती की, मनपास जास्त उत्पन्न एम.आय.डी.सी. भागातील कंपन्यामुळे जकातीच्या माध्यमातून मिळते. त्या पोटी मनपाकडून त्या भागात काय सुविधा दिल्या जातात. याचा खुलासा करावा. किमान त्या भागात काय सुविधा दिल्या जातात. देणे गरजेचे आहे. कंपनीकडून कर वसूल केला जातो. एम.आय.डी.सी. भागातील रस्ते यामध्ये का घेतले जात नाही. तसेच नारेगांव येथील कचरा डेपोकडे जाणाऱ्या रस्त्यावरुन अनेक वाहने जातात. रात्रंदिवस या रस्त्यावरुन वाहतूक होते. शहरातील कचऱ्यांची वाहने सुध्दा जातात. दररोज ३५० टन कचऱ्यांची वाहतूक होते. रस्ता पूर्णपणे खराब झालेला असून खड्डे पडलेले आहेत. अनेक वेळा अपघात झालेला होता. आर्थिक मदत जाहिर करावी लागलेली होती. असे रस्ते दुरुस्ती साठी का घेतले जात नाही.

**अति.शहर अभियंता :** यावर्षीच्या अर्थसंकल्पात एम.आय.डी.सी. भागातील रस्त्यांसाठी २० लक्षची तरतूद ठेवण्यांत आलेली होती. सर्व कामांच्या निविदा झाल्या आहेत. दोन-तीन दिवसांत कामे सुरु होतील. नारेगांव येथील रस्त्याचे काम सुध्दा आठ दिवस सुरु होईल. औद्योगिक वसाहतीतील आणखी काही रस्त्याची कामे करणे आवश्यक आहे. परंतू निधी उपलब्ध नाही. म्हणून पुढील वर्षी त्या रस्त्यांची कामे द्यावी घ्यावी लागतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात आलेल्या चर्चेनुसार २.५० कोटी विशेष तरतूदी मधून शहरातील मुख्य रस्त्याच्या डांबरीकरण कामाकरिता तयार करण्यांत आलेल्या खालील दर्शविल्याप्रमाणे अ.क्र.५ ते ७ च्या अंदाजपत्रकास प्रशांत हॉटेल ते रेल्वेस्टेशन एम.आय.डी.सी. पर्यंतच्या रस्त्याचे १०० मीटर वाढीव काम पूर्ण करण्याच्या अधिन राहून मंजूरी देण्यांत येते.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | बाबुराव काळे चौक ते महात्मा फुले चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे | १४,७८,६५२ |
| २. | मिलकॉर्नर ते औरंगपुरा रस्त्याचे डांबरीकरण करणे | १५,०८,१२६ |
| ३. | क्रांतीचौक ते एस.एस.सी.बोर्ड रस्त्याचे डांबरीकरण करणे | २१,३२,९०० |
| ४. | मुथीयान चौक ते पीरबाजार भाजीवाली बाई चौक रस्त्याचे डांबरीकरण द्वारे दुरुस्ती करणे | १०,०५,५०० |
| ५. | पीरबाजार चौक ते शहानुरमियाँ दर्गा रस्त्याचे डांबरीकरण करणे | १८,८४,००० |
| ६. | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय ते पानचक्की ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालय ते विद्यापीठद्वार रस्त्याचे डांबरीकरण करणे | १९,६८,५०० |
| ७. | सिटी चौक ते बाराभाई ताजिया ते गुलमंडी वाहन तळापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे | १४,९१,९०० |

## संवाद :-

**मा.सभापती :** प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**विषय क्र.१३२ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा विभाग) प्रस्ताव सादर करीत आहे की, एन-७ पुजा हॉटेल ते एन-७ बौध्द विहारापर्यंत २५० मी.मी.व्यासाची डी.आय.जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु.११,६३,६६२/- चे तयार करण्यांत आले होते. सदरील अंदाजपत्रकास ठराव क्र.५६ दि.२१.०७.२००४ अन्वये मा.स्थायी समितीची मंजूरी मिळाल्यानुसार लेखा विभागामार्फत निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेला एकूण ४ (चार) निविदा विक्री झाल्या व स्विकारण्याच्या अंतिम तारखेला एकूण ३ (तीन) निविदा प्राप्त झाल्या. निविदेचे दर खालीलप्रमाणे -

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री.मन्नान खान | - | २८.७८६% जास्त दराने |
| २. | श्री.एस.एम.शेख | - | २९.१०% जास्त दराने |
| ३. | श्री.अशोक कन्स्ट्रक्शन | - | ३०.०१% जास्त दराने |

वरीलप्रमाणे प्राप्त निविदामध्ये सर्वात कमी दराची निविदा श्री.मन्नान खान यांची असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८.७८६% जास्त दराची आहे. संबंधित निविदा धारकाने भरलेल्या जास्त दरा संदर्भात त्यांचेकडून दर पृथःकरण मागविले असता त्यांनी मार्केटमध्ये पाईपचे दरांची किंमत ही डी.एस.आर.दरापेक्षा जास्त आहे. त्यामुळे निविदेत जास्त दर भरलेले आहेत. त्यामुळे माझ्या दरांचा विचार करण्यांत यावा. त्या अनुषंगाने लॅन्को कंपनीकडून फॅक्स द्वारे पाईपचे दर मागविण्यांत आले. डी.एस.आर. मध्ये २५० मी.मी.व्यासाची डी.आय.के. के-९ पाईपचे दर हे १५६१ रुपये प्रती मीटर आहेत व कंपनीचे पाठविलेले दर हे १७७३.८२ रु. प्रति मीटर असून त्यावर जकात व अनलोडींग चार्जेस अतिरिक्त लागतील असे नमूद केलेले आहे. त्यामुळे पाईपच्या बाबीमध्ये १,२४,१४८/- व इतर बाबी विचारात होता मुळ अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा एकूण १,२४,१४८+२५,९१२= १,५०,०६०/- इतका वाढीव खर्च आहे. त्यानुसार सदरील काम हे मुळ अंदाजपत्रकापेक्षा १३.५४% जास्त दराने देण्यांस हरकत नाही. असा पाणी पुरवठा विभागाने अनुमान काढला. त्याप्रमाणे संबंधित निविदाधारकास मा.आयुक्त यांचेसमोर वाटाघाटीस बोलविले असता वाटाघाटी अंती संबंधित गुत्तेदार यांनी २८.७८६% जास्त ऐवजी २०% जास्त दराने काम करण्यास संमती दिली. सदरील दर हे जास्त वाटत असल्याने पुन्हा तडजोडी अंती १५% जास्त दराने काम करण्यांस संमती दिली. सदरील दर हे जास्त वाटत असल्याने पुन्हा तडजोडी अंती १५% जास्त दराने काम करण्यास संमती दिली. सदरील दर हे जास्त वाटत असल्याने पुन्हा तडजोडी अंती १५% जास्त दराने काम करण्यास संबंधित गुत्तेदार यांनी संमती दिली आहे. त्यास मा.आयुक्तांची मान्यता झाली असून निविदा स्विकारणे साठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवण्यासाठी मा.आयुक्तांनी शिफारस केली आहे. करिता संबंधित निविदाधारक श्री.मन्नान खान यांची १५% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे एन-७ पुजा हॉटेल ते एन-७ बौध्द विहारापर्यंत २५० मी.मी.व्यासाची डी.वाय.जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.मन्नान खान यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने करुन घेण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## संवाद :-

**मा.सभापती :** अतिरिक्त शहर अभियंता यांनी शहरातील वाहतूक बेटे खाजगी संस्थेमार्फत सुशोभीकरण करुन घेण्यासाठी सादर केलेल्या करारनामा विधी सल्लागार यांनी तपासून घ्यावा व पुढील कार्यवाही करावी.

त्याच प्रमाणे स.सदस्य डॉ.आशा बिनवडे (वॉर्ड क्र.१८) श्री.विकास जैन (वॉर्ड क्र.३१), श्री.संजय शिरसाठ (वॉर्ड क्र.३३), श्री.प्रशांत देसरडा (वॉर्ड क्र.५४) श्री.ईलियास किरमाणी, (वॉर्ड क्र.४), श्री.अफसर खान (वॉर्ड क्र.७२), श्री.अब्दुल कादर अ.हफीज (वॉर्ड क्र.३९) सौ.कचराबाई लोखंडे (वॉर्ड क्र.१६) मधील कामासाठी लेखाशिर्ष बदलणे बाबत विनंती केल्या नुसार लेखाशिर्ष मध्ये बदल करण्यास मान्यता देण्यांत येते.

**निर्णय : -**

सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव प्राप्त प्रस्तावानुसार वॉर्ड क्र.१८ शिवनेरी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे. २.०० लक्ष या कामांऐवजी वॉर्ड क्र.१८ भगवती कॉलनी येथील डी.पी.स्थलांतरीत करणेसाठी १.५० लक्ष व वॉर्ड क्र.१८ मधील मनपाच्या विविध खुल्या जागेमध्ये खेळणी बसविणेसाठी ५० हजार वॉर्ड क्र.३१ संत गाडगे महाराज मंगल कार्यालयाची दुरुस्ती करणेच्या रु.३.०० लक्ष तरतूदीतून रु.१.५० लक्षची तरतूद विविध ठिकाणी पथदिवे बसविणे व दुरुस्ती करणेच्या कामासाठी वळती करणे, वॉर्ड क्र.३३ शहरी भागात रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणे/फुटपाथ बांधणे हॉटेल पंचवटी ते नंदनवन कॉलनी रस्त्याचे पुनडांबरीकरण करणे- (२.५० लक्ष स्पील रक्कम) या ऐवजी "युथ हॉटेल" समोरील रस्त्यावर बांधणे. वॉर्ड क्र.५४ मधील मोतीवाला नगर ते गांधी नगर ४०० मी.मी.मेन सिव्हर लाईन दुरुस्त करणे रु.३,३२,००० व व्यंकटेश नगर बसैय्ये नगर नाल्याची संरक्षित भिंत बांधणे रु.२,००,०००/- या कामांऐवजी सुराणा नगर वॉर्डात मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे रु.४,००,०००/- व सुराणा नगर वॉर्डातील उद्याने विकसीत करणे रु.२,१२,०००/- वॉर्ड क्र.४ विविध ठिकाणी खडीकरण करणे ऐवजी वॉर्ड क्र.४ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत खांब बसविणे रु.२ लक्ष हिमायत बाग महमूदपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे ऐवजी हर्षनगर येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन ६ टाकणे, रु.२ लक्ष वॉर्ड क्र.७२ किराडपुरा रहेमानियाँ कॉलनी जोड लोखंडी पुल बांधणे, किराडपुरा विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ते तयार करणे विविध ठिकाणी खडी रस्ता कल्व्हर्ट तयार करणे, किराडपुरा विविध ठिकाणी पुनडांबरीकरण करणे, किराडपुरा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे, विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. किराडपुरा बंबाजवळ अर्धगोलाकार गटार बांधणे. वॉर्ड क्र.७२ येथील नाल्यावर पुल बांधणे ही कामे अर्थसंकल्पात अतिरिक्त शहर अभियंता विभागांतर्गत दर्शविण्यांत आलेली आहेत. ती शहर अभियंता विभागाकडे वळती करणे. वॉर्ड क्र.३९ अर्धगोलाकार गटार बांधणे, वॉर्ड क्र.१६ नवीन डांबरीकरण रु.५.०० लक्षची तरतूदीतून गजानन महाराज मंदिर ते पुंडलिक नगर रस्ता दुभाजकावर जाळी बसविणे व सौंदर्यीकरण करणे तसेच नवीन डांबरीकरण रु.५.०० लक्ष तरतूदीतून श्री.गजानन हॉटेल ते आशप रेसिडेन्सी १५ मी. विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण या कामासाठी वळती करण्यांस मान्यता देण्यांत येते.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतूद | नवीन/सुधारित कामांचे नांव व सुधारित रक्कम आर्थिक तरतूद | रक्कम |
|---|---|---|---|
| १८. | वॉर्ड क्र.१८ शिवेनरी कॉलनी येथील खुली जागा विकसीत करणे- २.०० लक्ष या कामा ऐवजी..... | १) वॉर्ड क्र.१८ भगवती कॉलनी येथील डी.पी.स्थलांतरीत करणे.<br>२) वॉर्ड क्र.१८ मधील मनपाच्या विविध खुल्या जागेमध्ये खेळणी बसविणे | १.५० लक्ष<br>५० |
| ३१. | पान क्र.१०९ अ.क्र.१७ प्रभाग क्र.३१ संत गाडगे महाराज मंगल कार्यालयाची दुरुस्ती करणे. ३.०० लक्ष मधून १.५० लक्ष वळती करणे. | प्रभाग क्र.३१ मध्ये विविध ठिकाणी पथदिवे बसविणे | १.५० लक्ष |
| ३३. | हॉटेल पंचवटी ते नंदनवन कॉलनी रस्त्याते पुनडांबरीकरण (स्पील रक्कम) २.५० लक्ष | युथ हॉस्टेल समोरील रस्त्यावर फुटपाथ बांधणे. | २.५० लक्ष |
| ५४. | पान क्र.१६४ क्र.२ मोतीवाला नगर ते गांधी नगर ४०० मी.मी.मेन सिव्हर लाईन दुरुस्ती करणे रु.३.३२ लक्ष व पा.न.१६५ क्र.७ व्यंकटेश नगर बसैय्ये नगर नाल्याची संरक्षित भिंत बांधणे. २.८० लक्ष या कामाऐवजी | १) सुराणा नगर वॉर्डात मोठ्या व्यासाची जलवाहिनी टाकणे.<br>२) सुराणानगर वॉर्डातील उद्याने विकसीत करणे व देखभाल करणे. | ४.०० लक्ष<br>२.१२ लक्ष |
| ४. | प.न.१३४ क्र.२४ वॉर्ड क्र.४ अंतर्गत विविध ठिकाणी खडीकरण करणे- २ लक्ष<br>वॉर्ड क्र.४ हिमायत बाग महमूदपुरा येथे ड्रेनेज लाईन टाकणे- २ लक्ष | प्रभाग क्र.४ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युत खांब बसविणे.<br>हर्षनगर येथे मोठ्या व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे. | २.०० लक्ष<br>२.०० लक्ष |
| | १) पा.न.१३ व ५३ प्रभाग क्र.४ अंतर्गत कॉंक्रेटींग करणे या कामाऐवजी | वॉर्ड क्र.४ अंतर्गत विविध ठिकाणी विद्युतीकरण करणे (कार्य अभि.विद्युत या विभागाकडे) वळती करणे. | |
| ७२. | १) पान १३४ वॉर्ड क्र.७२ मध्ये किराडपुरा रहेमानिया कॉलनी.<br>२) पान नं.१३६ वॉर्ड क्र.७२ विविध ठिकाणी कॉंक्रीट रस्ता तयार करणे.<br>३) पान नं.१३४ वॉर्ड क्र.७२ विविध ठिकाणी खडी रस्ता कल्व्हर्ट तयार करणे.<br>४) पा.न.१४० वॉर्ड क्र.७२ मध्ये विविध ठिकाणी पुनडांबरीकरण करणे.<br>५) पा.न.१६९ वॉर्ड क्र.७२ मध्ये किराडपुरा येथे नवीन ड्रेनेज लाईन टाकणे.<br>६) पान नं.१७०- वॉर्ड क्र.७२ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे.<br>७) प.न.१७१ वॉर्ड क्र.७२ मध्ये विविध ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे. | अर्थसंकल्पातील अ.क्र.१ ते ९ ची कामे अतिरिक्त शहर अभियंता विभागांतर्गत दर्शविलेली आहेत. वॉर्ड क्र.७२ स्लम विभाग असल्यामुळे सदरील कामांची तरतूद शहर अभियंता विभागाकडे वळती करण्यांस मंजूरी देण्यांत येते. | |

| | | | |
|---|---|---|---|
| | ८) प.न.१७५ वॉर्ड क्र.७२ किराडपुरा बंबाजवळ अर्धगोलाकार गटार बांधणे.<br>९) प.न.१७६ वॉर्ड क्र.७२ येथील नाल्यावर पूल बांधणे. | | |
| ३९. | ड्रेनेज विभागातील इतर कामाचे बचतीमधून ........... | नवीन काम-ड्रेनेज विभागाच्या इतर कामाच्या बचतीमधून भडकलगेट ते आय.टी.आय.पुलापर्यंत ४५० मी.मी.व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणे. | १.६१ लक्ष |
| १६. | पान नं.१३२ क्र.४९ नवनी डांबरीकरण रु.५.०० लक्ष | गजानन महाराज मंदिर ते पुंडजिलक नगर रस्ता दुभाजकावर जाळी बसविणे व सौंदर्यीकरण करणे. | ५.०० लक्ष |
| | पान.न.३२ क्र.४८ नवीन डांबरीकरण रु.५.०० लक्ष | श्री.गजानन हॉटेल ते आशप रेसीडेन्सी १५ मी विकास योजना रस्त्याचे डांबरीकरण करणे | ५.०० लक्ष |

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरीत/- | स्वाक्षरीत/- |
| नगरसचिव | सभापती (स्थायी समिती) |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# औरंगाबाद महानगरपालिका, औरंगाबाद

**दिनांक ०१.१२.२००४ रोजी तहकूब झालेल्या दिनांक १३.१२.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२२) इतिवृत्त.**

**सोमवार दिनांक १३ डिसेंबर, २००४ रोजी स्थायी समितीची सभा (दि.०१.१२.२००४ रोजीची सभा तहकूब सभा) मा.सभापती श्री.नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतेखाली "मलीक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी १२.४५ वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील स.सभासद उपस्थित होते.**

१. श्री.भाऊसाहेब पुंडलिक ताठे
२. श्री.शिरसाठ संजय पांडुरंग
३. सौ.शाहीन जफर महमूद जफर
४. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
५. श्री.सावंत मधुकर दामोधर
६. श्री.इलियास किरमाणी
७. श्री.माणिक लक्ष्मण साळवे
८. श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
९. श्रीमती जयश्री किवळेकर
१०. श्री.पारे सोपान भाऊराव
११. श्री.कोकाटे काशिनाथ हरीभाऊ
१२. श्री.रगडे भगवान दगडुबी
१३. श्री.स.सलीम स.युसूफ

## संवाद :-

**मा.सभापती :** दिनांक ०१.१२.२००४ रोजी तहकूब झालेल्या सभेस सुरुवात होत आहे.

**विषय क्र.१३३ :**

दिनांक ०४.१२.२००४ (का.प.क्र.२०) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

## संवाद :-

**श्री.भाऊसाहेब ताठे :** इतिवृत्तातील पा.क्र.१३ वरील रस्ता दुरुस्ती व डांबरीकरण करणे बाबतच्या प्रस्तावात हर्सुल, मयुरपार्क २४ मी व ३६ मी. रुंद रस्त्याचा उल्लेख केलेला नाही. मागील बैठकीत या संदर्भात मी सूचना केलेली होती. आपण रुलींग दिलेले होते. तरीही समावेश का करण्यांत आलेला नाही. खुलासा करावा. त्याचप्रमाणे टी.व्ही.सेंटर चौकाचे सुशोभीकरण करणेचे काम यात नमूद केलेले नाही. आपल्या आदेशाचे पालन अधिकारी करीत नाहीत. खुलासा करावा.

**मा.सभापती :** मागील बैठकीत स.सदस्य श्री.ताठे यांनी हर्सुल जळगांव रस्त्यापासून मयुरपार्क रस्ताचे काम करण्याबाबत सूचना केलेली होती व त्या रस्त्याच्या यामध्ये समावेश करावा म्हणून प्रशासनास आदेशित करण्यांत आलेले होते. आज इतिवृत्ता मंजूर करीत असतांना सदर ठरावामध्ये या रस्त्याचा समावेश नसल्याचे स.सदस्यांचे म्हणणे आहे. तसेच स्व.वसंतराव नाईक यांचे पुतळ्याचे मा.मुंढे साहेबांचे हस्ते नुकतेच अनावरण झालेले आहे. त्याचही चौकाचे सौंदर्यी करण करण्यांत यावे. वाढीव तरतूदी करुन या चौकाचे सौंदर्यीकरणाचे काम हाती घेण्यांत यावे.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** स्व.वसंतराव नाईक यांचे पुतळ्याचे नुकतेच मा.मुंढे साहेबांचे हस्ते अनावरण झालेले आहे. परंतू या चौकाच्या सुशोभीकरणाचे काम बाकी आहे. तसेच मोठमोठ्या होर्डींग्ज लावण्यांत आलेल्या आहेत. त्या हटविण्याची कार्यवाही करावी जेणे करुन तो पुतळा येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना दिसेल व आकर्षक वाटेल. ठळक अक्षरात मोठे बोर्ड त्यांचे नांव लावण्यांत यावे.

**मा.सभापती :** स.सदस्या श्रीमती किवळेकर यांची सूचना विचारात घेवून कार्यवाही करावी. तसेच आताच सुचना केल्याप्रमाणे हर्सुल जाधववाडी भागातील २४ मीटर डी.पी.रस्ता ठरावात नमूद कलेले नाही. माझ्या माहितीप्रमाणे हा रस्ता जाधववाडी भागातही येतो आहे. या रस्त्याबाबत मोजणी होणार होती. त्या बाबत खुलासा अपेक्षित आहे.

**सहा.संचालक, नगररचना :** चार ते आठ दिवसांत मोजणीचे काम पूर्ण होईल. जागा संपादन करावी लागणार आहे.

**मा.सभापती :** या रस्त्याचे संदर्भात अतिरिक्त शहर अभियंता यांनी नगररचना विभागाकडून सविस्तर माहिती घेऊन संयुक्तपणे कार्यवाही करावी. तात्काळ मोजणी करुन या रस्त्याचे काम लवकरात लवकर करण्याची कार्यवाही व्हावी. तसेच स.सदस्य श्री.ताठे यांनी टी.व्ही.सेंटर चौकाचे सौंदर्यीकरण करण्याचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**अति.शहर अभियंता :** या चौकातील जागा मनपाच्या ताब्यात नसल्यामुळे काम करु शकत नाही.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** टी.व्ही. चौकामध्ये महानगरपालिकेमार्फत संभाजी महाराजांचा पुतळा बसविण्यांत आलेला आहे. त्या चौकाचे सौंदर्यीकरण करायचे झाल्यास सिडकोकडून एन.ओ.सी.घेवून काम करता येईल.

**अति.शहर अभियंता :** सिडकोकडून सर्वच चौकांचे सुशोभीकरणासाठी एन.ओ.सी.मिळेल परंतू महानगरपालिकेने का करावे. असा प्रश्न आहे व यासाठी आर्थिक तरतूद सुध्दा उपलब्ध पाहिजे.

**श्री.भाऊसाहेब ताठे :** मौलाना आझाद रिसर्च सेंटरची जागा सिडकोचीच होती. आपण विकसीत केलेली आहे. यासाठी चार ते पाच कोटी खर्च केलेले आहेत. एका लहानशा चौकाचे सुशोभीकरण करण्यासाठी तीन चार लक्ष रुपये खर्च करु शकणार नसल्यास ते बरोबर नाही. अधिकारी त्यांना वाटेल त्याप्रमाणे निर्णय घेणार व स.सदस्यांच्या सुचना व सभागृहात झालेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणार नसतील तर योग्य नाही.

**श्री.मोहन मेघावाले :** संभाजी महाराजांच्या पुतळ्या पुरते तसे सौदर्यीकरण करायला पाहिजे.

**श्री.काशिनाथ कोकाटे :** विषय क्र.११९ मध्ये रस्ते दुरुस्ती व डांबरी करणाची कामे होणार असल्याचे प्रस्तावात नमूद केलेले आहे. सुशोभीकरण सौंदर्यी करणासाठी १.२४ कोटीची कामे होत आहेत. आताच स.सदस्य श्री.ताठे यांनी हर्सुल जळगांव रस्त्यापासून मयुरपार्ककडे जाणारा २४ मीटर डी.पी.रस्त्याचा समावेश करावा म्हणून सूचना केलेली आहे. यापुर्वी यावर चर्चा झालेली होती व आपणही रुलींग ही दिलेले होते. परंतू प्रस्तावात त्या रस्त्याचा समावेश केलेला दिसून येत नाही. तसेच टि.व्ही.सेंटर चौकात मनपाच्या वतीने संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसविलेला आहे. त्या बेटाचे सौंदर्यीकरण होणे आवश्यक आहे. पुतळा बसविला म्हणजे जबाबदारी मनपावर आलेली आहे हे विसरता येणार नाही. निश्चितपणे त्या बेटाचे सौंयदीर्यकरण  झाले पाहिजे. तसेच स्व. वसंतराव यांचे पुतळयाचे नुकतेच अनावरण झालेले आहे. त्या बेटाचेही काम करणे आवश्यक आहे. मा. सभापती यांनी दिलेले आदेशानुसार कार्यवाही करावी. अतिरिक्त शहर अभियंता यांचे म्हणणे आहे करता येत नाही. फाईल पाठवावी. अभिप्राय मा. आयुक्तांपुढे ठेवावे. सभापतींचे रुंलीग आहे काम करावे. करता येते नाही तर नियमाला अनुसरुन दाखवावे. हडको भागात जवळपास २ लक्ष लोकसंख्या आहे. त्या नागरीकांकडुन जवळपास जकातीपोटी महापालिकेस दोन तृतींयाश हिस्सा रक्कम गृहीत धरल्यास किमान २० कोटी रुपये मिळतात. परंतु या परिसरात मनपाच्या माध्यमातुन कोणतेही काम होत नाही. किमान अशी कामे तरी झाली पाहिजेत तसेच पाणीपट्टीच्या माध्यमातुन वसुली होते. दोन्हीही चौकांचे (बेटांचे सुशोभिकरण करण्याचे कांमाचा या प्रस्तावातामध्ये समावेश करावा.

**मा. सभापती :** संबंधीत अधिकाऱ्यांना सुचना देण्यात येतात की, टी. व्ही. सेंटर चौकात मनपाच्या वतीने संभाजी महाराजांचा पुतळा बसविण्यात आलेला आहे. तसेच तेथे मनपाच्या वतीने अशोक स्तंभही उभारण्यात आलेला आहे. त्या चौकाचा विकास करण्याची जबाबदारी महापालिकेची आहे. सौंदर्यीकरणास अडचण येत असेल तर तशी जबाबदारी महापालिकेची आहे. सौदर्यींकरण अडचण येत असेल तर तशी एनओसी सिडकोकडुन घेता येईल. अशी कामे करण्यास एनओसी लागणार नाही असे माझे तरी मत आहे. सिडको टि. व्ही. सेंटर चौकाचे तसेच स्व. वसंतराव नाईक यांचा पुतळा ज्या ठिकाणी बसविण्यात आलेला आहे त्या चौकाचे सुशोभिकरण करण्याच्या कामाचा या प्रस्तावामध्ये समावेश करावा या दुरुस्तीसह विषय क्र. १३३ इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**अति. शहर अभियंता :** सौदंर्यीकरणाच्या कामासाठी जी तरतुदे ठेवण्यात आलेली होती. ती संपलेली आहे.

**मा. सभापती :** अशा काही बेटांचे, चौकांचे सुशोभिकरण सौंदर्यीकरण करण्याबाबत आपण काही सेवाभावी संस्थाकडुन आर्थिक मदत लाभणार होतो. ५०% कामे अशा संस्थांनी केल्यास आर्थिक बचत होऊ शकेल. त्यातयुन हे काम करण्यात यावे.

**श्री काशीनाथ कोकाटे :** सेंटल नाक्याजवळ सिडकोच्या हद्दीत परमवरी चौक येतो त्याचे सुशोभिकरण होण्यात आलेले आहे. त्यासाठी सिडकोची एनओसी घ्यावी.

लागलेली आहे का तो पण खुलासा करावा. यामध्ये दुजाभाव होतो आहे हे स्पष्ट होते.

**अति. शहर अभियंता :** दुजाभाव करण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. आर्थिक तरतुद शिल्लक नाही. चौक मनपाच्या ताब्यात नाही. म्हणुन टि. व्ही. सेंटर चौकाचे काम करता येत नाही.

**श्री संजय शिरसाठ :** काम करता येत नाही हे चुकीचे मत मांडलेले आहे. त्या चौकात रु. ६.६० लक्ष खर्च करुन हायमास्ट दिवा बसविण्यात आलेला आहे. संभाजी महारांच्या पुतळा आलेला आहे. तसेच अशोक स्तंभ उभारण्यात आलेला आहे ही कामे झालेली असतांना बेटांचे सुशोभीकरण करता येत नाही असे म्हणणे चुकीचे आहे. इतर काम बाजुला ठेवुन उलट या चौकांचे सुशोभिकरण करण्यास प्राधान्य देण्यात यावे. असे आपण रुलींग दयावे.

**मा. सभापती :** ५०% आर्थिक तरतुद खाजगी सेवाभावी संस्था करण्यास तयार होतील त्यांचे माध्यमातुन ५०% रक्कम सेव्हींग होवु शकत त्या बचतीतुन तरतुद या कामासाठी वळती करावी या चौकाचे सुशोभिकरण करण्यात यावे. प्राधान्याने काम हाती घेण्यात यावे. गरज असल्यास सिडको कार्यालयाची एनओसी घेण्यात यावी.

**श्री भगवान रगडे :** एम.आय.डी.सी. भागातील रस्ते दुरुस्त व्हावे म्हणुन मी मागील सभेत सुचना मांडलेली होती. रस्ता दुरुस्ती कामे झालेली दिसुन येत नाहीत. एम.आय.डी.सी. भागात मोठमोठया कंपन्या असुन त्यापासुन मनपास जकातीपोटी मोठे उत्पन्न मिळते. मालमत्ता करही मिळतो. वार्डास भेट दिल्यास जनता आमच्याकडे बघुन त्या भागात लाईट रस्ते इ. सुविधा दिली जात नाही. रस्त्याच्या बाजुस मोठमोठे सोडीयम व्हेपर दिवे बंद आहेत. बचतीमधुन का काम होत नाही खुलासा करावा.

**मा. सभापती :** एम. आय.डी.सी. भागाचे रस्त्याच्या नवीन डांबरीकरण काही रस्त्यांचे दुरुस्ती करणे बाबत स. सदस्य श्री रगडे यांनी मागील बैठकीतच सुचना मांडलेली होती. त्यांनी सुचना केलयानुसार प्रस्तवाता समावेश का केलेला नाही. खुलासा करण्यात यावा. त्या भागातुन महानगरपालिकेस मोठया प्रमाणात जकात वसुल होते.

**अति. शहर अभियंता :** सिडको एम.आय.डी.सी. भागातील रस्ते दुरुस्त व डांबरीकरण करण्यासाठी जवळपास १.०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. जवळपास सर्वच रस्ते दुरुस्तीस आलेले आहे. मनपाच्या सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात २० लक्षची तरतुद होती. एवढया रक्कमेचे अंदाजपत्रक मंजुर होवुन टेंडरही झालेले आहे. कामे ह्या रस्तयाचे सुरु होतील परंतु सर्वच रस्त्याचे दुरुस्ती करणे या वर्षाच्या तरतुदीमधुन होणे शक्य नाही.

**श्री भगवान रगडे :** गेल्या ४ वर्षात रस्त्याची कामे केलेली आहे. माझ्या माहितीप्रमाणे यापुर्वी गेल्या चार वर्षात त्या रस्त्याचे काम करण्यात आलेले नाही. फक्त या वर्षीच्याच अर्थसंकल्पात २० लक्षची तरतुद होती. त्या कंपन्यांपासुन मनपास मोठया प्रमाणात मालमत्ता कर मिळतो. जकातीचे मोठे उत्पन्न मिळते.

**मा. सभापती :** एम. आय.डी.सी. भागातील ज्या रस्त्यांचे कामांचे टेंडर झाले ते रस्त्याचे काम तातडीने हाती घेण्यात यावे. तसेच सुधारीत बजेटमध्ये काही रक्कम उपलब्ध होत असेल तर प्राध्याने जास्तीत जास्त खराब झालेले रस्त्याचे

काम करण्यात कार्यवाही करण्यात यावी. त्यात नारेगावं कचरा डेपो रस्त्याचे काम अगोदर करण्यात यावे. इतिवृत्त कायम करण्यास मंजुरी देण्यात येते.

इतिवृत्तातील पान क्र. १६ वर छत्रपती नगर गारखेडा येथील सांस्कृती सभागृह भाडे निश्चित करण्याचा प्रस्तवा आलेला होता. ९००/- रुपये प्रतीमहा असे भाडे निश्चित करण्यात आलेले होते. परंतु मालमत्ता अधिकारी यांनी त्यांचे पत्र जा. क्र. मनपा/मामअ/२०७०/२००४ दि. ७-१२-२००४ अन्वये सदर सभागृहाचे भाडे हे ९०० रुपये प्रतीवर्ष ऐवजी ९००/- रुपये प्रतीमहा अशी दुरुस्ती करण्यात यावी. असे कळविलेले आहे. त्यानुसार दुरुस्ती करण्ययास मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

इतिवृत्तातील पान क्र. १६ वर ठराव क्र. १२२ छत्रपती गारखेडा येथील सांस्कृतीक सभागृह स्वामी विवेकांनद व्यायामशाळा व क्रिडा मंडळ, औरंगाबाद यांना ९००/- रुपये प्रतीवर्ष ऐवजी ९००/- रुपये प्रतीमहा तसेच इतिवृत्त हर्सुल-जाधवाडी-मयुरपार्क २४ व ३६ मी रुंद रस्त्योच कामांचा तसेच टी.व्ही. सेंटर चौकाचे सुशोभिकरण करणे कै. वसंतराव नाईक पुतळा असलेला बेटाचे सौदंर्यीकरण करणे, इत्यादी कामाचा समावेश करणे व खाजगी संस्थेकडुन ५०% व महानगरपालिका ५०% विकास करणार या ५०% रक्कमेतुन बचत होणारी रक्कम वरील कामात वळती करणे या व इतर दुरुस्तीसह दिनांक ०४-११-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३४ :**

उपआयुक्त (प्रशासन) यांनी प्रस्तवात सादर केला की, शासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाची अंमलबजावणी सुरु केल्यानंतर शासन निर्णय क्र. १०९८/८३/९८ सेवा-५ मंत्रालय, मुंबई दिनांक १४.१२.१९९८ अन्वये किमान ४०% अपंग असलेल्या कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण कर्मचाऱ्यांना वेतनात दयेय असलेल्या वाहन भत्यायाच्या दुप्पटी दराने वाहतुंक भत्ता मंजुर करण्यात आलेल्या होता. उक्त शासन निर्णयामध्ये शासनाने शासन निर्णय क्र. /ए वाहभ/ १००३/प्र. क्र. -९४/सेवा-५ वित्त विभाग मंत्रालय मुंबई दिनांक २-८-२००४ अन्वये अपंग कर्मचाऱ्यांच्या वाहतुक भत्त्यात खालील प्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे.

| अ. क. | कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी | दरमहा वाहतुक भत्याचा दर रुपये अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
|---|---|---|---|
| १. | रु. ८०००-१३५०० किंवा त्याहुन वरच्या वेतनश्रेणी मध्ये वेतन घेणारे कर्मचारी | १६०० | ८०० |
| २. | रु. ६५००-१०५०० किंवा त्याहुन वरच्या परंतु रु. ८०००-१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ८०० | ५०० |
| ३. | रु. ६५००-१०५०० पेक्षा वेतनश्रेणी मध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ५०० | ५०० |

वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी

वरील प्रमाणे मंजुर करतांना खालील अटीच्या अधिन राहील असे उक्त शासन निर्णयात नमुद करण्यात आलेले आहे.

१. अपंगत्वासंबधी यापुर्वी विहित करण्यात आलेल्या अटींसह उर्वरीत अटींची पुर्तता करण्याच्या अधिन राहुनवरील प्रमाणे वाहतुक भत्ता मंजुर करण्यात येईल.
२. कर्तव्य स्थानापासुन एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवास्थान यांचा एकत्र परिसर असले अशा ठिकाणी राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना वरील तक्यात नमुद केलेल्या दराच्या निम्म्या दराने मात्र अशा प्रकारे दर निम्मा केलयाने तो रु. ५००/- पेक्षा कमी होत असल्यास किमान रु. ५००/- या दराने वाहतुक भत्ता मंजुर करण्यात येईल.
३. ज्या कर्मचाऱ्यांना शासकीय वाहन पुरविले आहे त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.
४. हे आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासुन लागु असतील.

करीता वरील नमुद केलेल्या तक्यात्यानुसार महापालिकेतील अंध, हातापायने विकलांग ते सहीत अस्थीव्यंगामुळे अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या ज्या कर्मचाऱ्यांना हयपुर्वी अपंगासाठी विशेष वाहन भत्ता लागु करण्यात आला आहे. अशा कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी नुसार वरील तक्यात नमुद केलेल्या दराप्रमाणे व अटी-शर्तीच्या अधिन राहुन माहे ऑगस्ट २००४ पासुन विशेष वाहन भत्ता माहे ऑगस्ट २००४ पासुन विशेष वाहन भत्ता मंजुर करण्याबाबतचा प्रस्तवा विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्रीमती जयश्री किवळेकर :** जयभवानी नगर एन-४ भागात शिवाजी महाराज यांचे पुतळयाजवळ क्रॉस कनेक्शन करुन पाईपलाईन टाकलेली आहे. एन-४ भागालगत असलेले काही नागरीकांनी दररोज पिण्याच्या पाण्याची मागणी केलेली आहे. तेथील नागरीक नळ कनेक्शन घेण्यास तयार आहे. काहीनी घेतलेले आहे. परंतु सिडकोचे अधिकारी यांनी येवुन जागा निश्चित करुन द्यावी. असे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांचे सांगणे आहे. तेथील काही नागरीक यापुर्वी शिष्टमंडळासह आपली भेट घेतलेली आहे. त्यावेळी आपण अर्धातास पाणी पुरवठा करुन असे आश्वासन दिलेले होते. माझ्याच वार्डात तो भाग येतो. गेलया ५ महिण्यापासुन तेथील नागरिक मागणी करीत आहे. अधिकाऱ्यांना दूरध्वनी करुन चर्चा केली असता पाणी देवु शकत नाही अशी उत्तरे जबाबदार देतात हे बरोबर नाही. ज्या भागातील लोक पाणीपट्टी भरणा करीत नाही तेथे दररोज पाणी पुरवठा होतो. सविस्तर खुलासा मागवावा.

**मा. सभापती :** यापुर्वी हा विषय चर्चेला आलेला होता. त्यावेळी किमान त्या भागास अर्धातास पाणी देण्याबाबत आदेशीत केलेले होते. पाहणी करुन कार्यवाही करावी असे मी म्हटलेले होते.

**कार्यकारी अभियांत (पा. पु.) :** त्या भागात मी स्वतः पाहणी केलेली आहे. ४००-५०० घरे येतात. घरांची संख्या जास्त आहे. त्या भागात पाणीपुरवठा केल्यास एन-३, एन-४ भागातील पाणी पुरवठा विस्कळीत होवु शकतो. महाराष्ट्र जिल्हा प्राधिकरण मार्फत पाणीपुरवठा लाईनचे काम झाल्यास जवळपास ७ एमएलडी पाणी पुरवठयात वाढ होईल त्यानंतर अशा भागात वाढीव पाणी झाल्यास देता येईल. सिडकोने लाईन टाकलेली आहे. त्या भागात लाईटची

व्यवस्था पण आहे. परंतु अपुरा पाणीपुरवठा साठा असल्यामुळे नविन भागात दिल्यास इतर भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत होवु शकतो.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** ज्या भागातील पाणीपट्टी भरणा करीत नाही. त्या २४ तास पाणी दिले जाते. अनाधिकृत नळ घेतलेले आहे. त्यांचेवर कार्यवाही होत नाही. जे पाणीपट्टी भरण्यास तयार आहे. नळ कनेक्शन घेण्यास तयार आहे अशा नागरीकांना पाणी पुरवठा करणे गरजेचे आहे. पाणी देवु शकत नाही असे शब्द वापरणे बरोबर वाटत नाही. पाणी प्रश्न हा जनतेचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे. ६ महिन्यापुर्वी हे उत्तर का दिले नाही.

**श्री भाऊसाहेब ताठे :** गेल्या १५-२० वर्षापासुन सिडको-हडको भागात पाणीपुरवठा होतो. यापुर्वी दररोज पाणी पुरवठा देण्याची पध्दत होती. सर्वांना पाणी मिळावे म्हणुन १ दिवस आड पाणी देण्याची कार्यवाही सुरु केली. त्या वेळी १ दिवसाआड पाणी देतांना विभाग एक भागात १ तास १५ मिनीटे (सव्वा तास) पाणी पुरवठा करण्याचा निर्णय झालेला होता. परंतु आजची परिस्थिती पाहता काही भागात १५-२०, २०-३५ मिनीटेच पाणी पुरवठा होतो. असे होत असेल तर एक दिवसाआड पाणी पुरवठा करण्याचे कारण काय? पाणी सोडण्याची वेळ मर्यादा नाही. केव्हाही पाणी सोडण्यात येते. रात्री बेरात्री पाणी येते. काही वेळ दिवसा पाणी येते. लोकघरी नसतात त्यामुळे त्यांना पाणी मिळत नाही पाण्यासाठी घरी राहावे लागते. अशी परिस्थिती झालेली आहे. याबाबत नियोजन असावे पाणी सोडणारी कर्मचारी यांना ताकीद द्यावी.

**मा. सभापती :** किमान अर्धा तास तरी पाणी सोडण्यात यावे. स. सदस्यांचा बऱ्याच दिवसापुर्वीचा हा प्रश्न आहे. कोणत्या भागात किती वेळ पाणी कमी दिल्यानंतर इतर भागात दिल्या जाऊ शकते ते तपासुन कार्यवाही करावी.

**श्री संजय शिरसाठ :** प्रायोगिक तत्वावर पाणी सोडून बघावे त्या नागरिकांना पाणी देता येतो किंवा काय समजुन येईल.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** ज्या ज्या भागात ४-४ तास पाणी पुरवठा होतो तो कमी करुन या भागासाठी देण्यात यावा.

**कार्यकारी अभियंता (पापु):** कोठेही ४ तास पाणी दिले जात नाही. सध्या तरी या भागात पाणी देणे शक्य नाही. जीवन प्राधिकरणामार्फत जास्तीच्या पाणी पुरवठयाची योजना पुर्ण झाल्यानंतर पाणी पुरवठयात वाढ होईल आजच्या विषय पत्रिकेवर विषय आहेत. त्यानंतरच पाणी देता येईल.

**मा. सभापती :** टाकण्यात आलेली पाईप पुन्हा तपासुन किमान अर्धातास पाणी एन-४ भागा लगतच्या नागरीकांना पुरवठा करण्याबाबत उपाय योजना करावी.

**श्री मधुकर सांवत :** काही भागातील परिस्थिती अशी आहे की, अनाधिकृत नळ घेतलेले असुन दररोज पाणी त्यांना मिळते परंतु जे नागरीक १८००/- भरणा करतात. त्यानां एक दिवसाआड पाणी दिले जाते. या शहरात जवळपास १००० अनाधिकृत नळ कनेक्शन असतील कार्यवाही केली पाहिजे. अधिकाऱ्यांची बैठक आयोजित धोरण ठरविले पाहिेज. अनाधिकृत नळधारकांवर कार्यवाही केली पाहिजे.

**मा. सभापती :** अनाधिकृत नळ कनेक्शन कोठे आढळुन आल्यास त्यांचेवर कार्यवाही करावी तशी शोध मोहिम प्रशासनाने राबवावी.

**श्री प्रल्हाद निंमगावकर** : ३-४ दिवसांपुर्वी रामकृष्ण भागात पाहणी केली. नंतर आलेल्या लोकांना पाणी मिळते आम्हाला पाणी मिळत नाही.

**मा. सभापती :** स. सभासद श्री निमगांवकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्या संदर्भात मी स्वत:त्या भागात पाहणी केलेली होती व पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत सूचना दिलेल्या होत्या. निविदा काढण्याची कार्यवाही पुर्णकरुन कार्यादेश देणेची कार्यवाही पुर्ण होणे अपेक्षित होते.

**श्री काशीनाथ कोकाटे :** पाणी प्रश्नावर चर्चा चालु आहे. पाणी प्रश्न हा नागरीकांच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. हे शहर पर्यटक व ऐतिहासीक शहर म्हणुन ओळखले जाते. हे शहर स्वच्छ, सुंदर असावे व मनपा समोर अधिकृत अनाधिकृत हा भाग जरी समोर असेल तरी या शहरातील प्रत्येक भागात वास्तव्य करुन राहणाऱ्या प्रत्येक नागरीकांचे आरोग्य स्वच्छ व तो राहत असलेला भाग हा सुंदर दिसावा यासाठी प्रत्येक भागात पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी ही मनपाची आहे हे विसरता येणार नाही. अनाधिकृत च्या नावाखाली पाणीपुरवठा त्या त्या भागात करुन शकत नसेल तर त्या नागरीकांवर अन्याय होतो असे मत आहे. सिडकोतील नागरीकांना पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी मनपाची आहे. मनपाने ठराव पारीत केला. पाणी पुरवठा करण्याची योजना हाती घेतली वाढीव पाणी पुरवठा योजनेचा ठराव सर्वसाधारण सभेने पारित केला. जास्त कॅपिसिटीचे पंप बसविण्याच्या खर्चास मान्यता दिलेली आहे. तसेच व पाईप लाईन बदलण्याच्या ७०० कोटीच्या प्रस्तावास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. काही भागात जास्त वेळ पाणी दिल्या जाते आताच स. सदस्यांनी मुद्द उपस्थित केला, अनाधिकृत नळांची संख्या सुध्दा जास्त आहे. त्याबाबत कार्यवाही करुन नियोजन करुन कार्यवाही होऊ शकते. पाणी पुरवठा करू शकत नाही. असे बोलुन जबाबदारी झटकुन टाकणे बरोबर नाही. शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करण्यास मनपा सक्षम आहे. निधी कमी पडत असेल तसा प्रस्तवा मंजुरीसाठी सादर केल्यास सभागृह नाकारणार नाही अशी खात्री आहे परंतु लिगल वस्त्यात पाणी देणार नाही. टँकरद्वारे पाण्याची सुविधा उपलब्ध करणार नाही. नियोजन करणार नाही व अमूक भागात पाणीच देवु शकत नाही. असे अधिकाऱ्यांचे स्टेंटमेट जनतेपर्यंत जावु देऊ नये. मनपा पाणी पुरवठा करेल व अशी संकल्पना समोर ठेवावी. शहरात सध्या १०० एमएलडी पाणी पुरवठा होतो. एक दिवसाआड पाणी येते. पाणी पुरवठा येण्याच्या दृष्टीने अधिकाऱ्यांची एक स्वतंत्र्य बैठक आयोजित करावी. जलवाहिन्या कोठे टाकण्याची गरज आहे. त्याबाबत नियोजन करावे. चांगले नियोजन केल्यास कोणीही पाण्यापासुन वंचित राहणार नाही. जबाबदार अधिकारी यांनी सर्वांना बरोबर घेवु अशी कामे हाताळावी. भविष्यात उदा. उन्हाळयामध्ये सुध्दा पाणी टंचाई भासणार नाही याची सुक्ष्म नियोजन करणे भाग आहे.

**मा. सभापती :** मी आताच सुचन केली की, स. सदस्य श्री निमगांवकर यांचे वार्डात १००% बेटरमेंट चार्जेस भरणाऱ्या वस्तीत पाणी पुरवठा होत नाही. हे बरोबर नाही. त्या भागात जलनि:सारण वाहिनी टाकण्यात आलेली आहे. पाणी पुरवठा करण्याची सुध्दा जबाबदारी मनपाची आहे. वेळेवर पाणी दिले पाहिजे. मनपाची जबाबदारी आहे. ७.०० कोटी रुपये खर्च करुन वाढीव पाणी

पुरवठा करण्यासाठी सभागृहाने संम्मती दिलेली आहे. असे होवु नये जनतेला पाणी दिले जात नसेल तर काय उत्तर देणार आहे. एक दिवसाआड पाणी का होईलना परंतु सर्वचभागात पाणी दिले पाहिजे. तातडीने अधिकाऱ्यांची बैठक बोलवावी नियोजन करावे. ज्यांना पाणी दिल्या जात नाही त्यांचेवर अन्याय झाल्यासारखे होईल या संबधी प्रशासनाने ८ दिवसात निर्णय घेण्यात यावा. नागकिाचे समाधान होईल असे निर्णय दयावे या बैठकीत मा. महापौर हे अध्यक्ष म्हणुन राहतील . सविस्तर चर्चा करुन निर्णय घेतला जाईल.

**श्री भगवान रगडे :** आताच डांबरीकरण होत नाही. रस्त्याची दुरुस्ती होत नाही म्हणुन प्रश्न उपस्थित केला महाएक्स्पो भरवण्यात आला होता. त्यांचे मार्फत मनपास रस्ते दुरुस्त व इतर कामासाठी ५.०० लक्ष रुपये मिळणार होते. धनादेश दिला परंतु तो वटवला गेला नाही. असे समजते हे सत्य आहे काय?

**अतिरिक्त शहर अभियंता :** मनपास महाएक्स्पो मार्फत ५.०० लक्ष पैकी २.५० लक्ष रक्कम प्राप्त झालेली आहे. उर्वरीत रक्कम ८ दिवसाच्या आत देण्याचे कबुल केलेले आहे. तसे प्रशासनातर्फे ३ वेळेस स्मरणपत्र देऊन रक्कमेची मागणीही केली होती.

**मा. सभापती :** तहकुब सभा संपविण्यात येत आहे. नियमीत सभा अर्धा तासानंतर घेण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तवात दर्शविल्याप्रमाणे शासन निर्णय क्र. वाहभ/१००३/प्र.क्र.६४/सेवा-५, वित्त विभाग मंत्रालय, मुंबई दिनांक २.८.२००४ अन्व्ये महापालिकेतील अंध, हातापाये विकंलागतेसहीत अस्थीव्यंगामुळे अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असणाऱ्या कर्मचाऱ्यांना हयापुर्वी अंपगसाठीचा विशेष वाहनभत्ता लागु करण्यात आला आहे. अशा कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणी नुसार खालील तक्यात नमुद केलेल्या दराप्रमाणे व प्रस्तावातील अटी शर्तीच्या अधिनराहुन माहे ऑगस्ट २००४ पासुन विशेष वाहन भत्ता देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

| अ. क. | कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी | दरमहा वाहतुक भत्याचा दर रुपये अ-१ आणि अ वर्ग शहरे | इतर ठिकाणे |
|---|---|---|---|
| १. | रु. ८०००-१३५०० किंवा त्याहुन वरच्या वेतनश्रेणी मध्ये वेतन घेणारे कर्मचारी | १६०० | ८०० |
| २. | रु. ६५००-१०५०० किंवा त्याहुन वरच्या परंतु रु. ८०००-१३५०० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ८०० | ५०० |
| ३. | रु. ६५००-१०५०० पेक्षा वेतनश्रेणी मध्ये वेतन घेणारे कर्मचारी | ५०० | ५०० |

वैधानीक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगीतानंतर सभा संपल्याचे मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १३.१२.२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे का. (प्र. क्र. २३) इतिवृत्त.सोमवार दि. १३ डिसेंबर २००४ रोजी स्थायी समितीची सभा मा. सभापती श्री नंदकुमार घोडेले यांचे अध्यक्षतखाली "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे दुपारी २.२० वाजता "वंदेमातरम्" या गिताने सुरु झाली. या सभेस मा. आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१. श्री भाऊसाहेब पुंडलिक ताठे
२. श्री शिरसाठ संजय पांडुरंग
३. सौ. शाहीन जफर महेमुद जफर
४. श्री मोहन मेघावाले
५. श्री मधुकर सांवत
६. श्री इलियास किरमाणी
७. श्री माणिक लक्ष्मण साळवे
८. श्री निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
९. श्रीमती जयश्री किवळेकर
१०. श्री पारे सोपान भाऊराव
११. श्री कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
१२. श्री रगडे भगवान दगडुजी
१३. श्री स. सलीम स. युसूफ

**संवाद :**

**मा. सभापती :** चर्चेसाठी अर्ध्यातासाचा वेळ देण्यात येतो. चर्चा आणि त्यानंतर पत्रिका घेण्यात येईल.

**श्री प्रल्हाद निमगांवकर :** मागील बैठकीत मी गादीया विहार कडील अंतर्गत विकास केलेला नसल्याचा मुद्दा मांडलेला होता. त्यावर सेल्फ डेव्हलपमेंटची कामे करु शकत नाही त्या बिलडरांनी करुन द्यावयास पाहिजे असे म्हटले होते. त्या बिर्ल्डसने विकास काम (डेव्हलप) करुन दिले नाही तर मनपाने त्यांचेवर काय पत्रव्यवहार केले थोडक्यात माहिती दयावी. घरे होवुन १५ वर्षे झालेली आहेत. अद्याप सुविधा नाही.

**मा. सभापती :** अटीचे पालन केले नाही किंवा कराराचे उल्लंघन केले, बॉण्ड लिहुन दिलेला होता का? इत्यादी बाबत सहा. संचालक नगररचना यांनी माहिती दयावी.

**सहाय्यक संचालक न. र. :** गादिया विहार येथील प्रश्न स. सदस्यांनी उपस्थित केला तेथील जी विकास कामे होती ती त्या बिल्डरांन करुन घ्यायचे होते. संचिका तपासुन उत्तर देतो.

**मा. सभापती :** स. सदस्यांचा मुद्दा पुन्हा विचारात घ्यावा. सेल्फ डेव्हलपमेंट करण्याच्या दृष्टीने ज्या बिल्डरांना मनपा मार्फत परवानगी दिली त्यात काही गृह निर्माण सोसायटया येतात. त्या बिल्डरांनी ज्या अटी-शर्ती दिल्या होत्या त्याचे पालन केलेले नाही. गादीया विहार मध्ये इन्टरनल विकास कामे करुन दिली नाही.

या संदर्भात टिपी विभागाचे प्रमुख अधिकारी म्हणुन काय कार्यवाी केलेली आहे. आजच्या स्थितीत आजुबाजूला प्लॉट झाले. मोठमोठ्या इमारती झालेल्या आहेत. संबंधीत बिल्डरने तेथील घरे विक्री केली. तेथील विकास काम मनपा करु शकत नाही यास पर्याय काय याचा खुलासा द्यावा. गादीया विहार हे जनरल उदाहरण दिले इतर भागात अशी परिस्थिती आहे. यासाठी मनपाचे धोरण काय खुलासा करावा.

**सहा. संचालक नगररचना :** अशा प्रकरणांत ले-आऊटला ारवानगी केव्हा दिली, बांधकाम परवानगी केव्हा दिली मुदत केंव्हा संपणार आहे व संबधीत बिल्डरांनी कम्प्लीशनसाठी प्रकरण दाखल केव्हा केले याची तपासणी करावी लागणार आहे.

**मा. सभापती :** परिस्थिती सर्व समोर आहे. सेल्फ डेव्हलपमेंटच्या धर्तीवर परवानगी दिली संबधतांनी अंतर्गत विकास केला नाही. मनपा करु शकत नाही. सबंधीत बिल्डरांनी अटीचे पालन केले नाही. उल्लघंन केले तर त्यांचेवर काय कार्यवाही करु शकतो. ले-आऊट मंजुर करुन दिला कम्प्लीशनसाठी आलेच नाही. काय कार्यवाही करु शकतो.

**सहाय्यक संचालक न. र. :** संचिका तपासुनच कार्यवाही करावी लागेल ती करण्यांत येईल. स्पेसिफिक हा विषय असल्यामुळे त्या त्या संचिका तपासुनच कार्यवाही करता येईल.

**मा. सभापती :** बँक गॅरंटी वगैरे असते त्या बाबत माहिती.

**सहा. संचालक न. र. :** एक वर्षाची बँक गॅरटी मुदत असते. बँक गॅरंटी ठेवलेली आहे की, भुखंड ठेवलेला आहे. ते त्यापासुनच कार्यवाही करता येईल.

**मा. आयुक्त :** स. सदस्य. श्री निमगांवकर यांनी यापुर्वी हा प्रश्न उपस्थित केलेला होता. मा. सभापती व आयुक्त म्हणुन सुचना देण्यात आलेल्या होत्या. जो कालावधी ठरवितो तो या प्रकरणात संपलेला आहे हे प्रथम दर्शनी स्पष्ट झालेले आहे. शहर अभियंता यांना खुलासा देण्यात येतात की, या कामाचे अंतर्गत रस्ते तयार करण्याची अंदाजपत्रक तयार करावे. निधी उपलब्धतेबाबत लेखी विभागाचा सल्ला घ्यावा. जे विकास करुन देणार होते तो मुदतीत केलेला नाही. त्यांचेकडुन जी बँक गॅरंटी किंवा भुखंड व अनामत रक्कम ठेवुन घेतली असेल याबाबत त्यांचेवर कार्यवाही करावी व येणाऱ्या बैठकीत केलेल्या कार्यवाहिचा अहवाल सादर करावा.

**मा. सभापती :** शहर अभियंता आजच्या सभेला उपस्थित नाही. श्री एम. डी. सोनवणे सुध्दा मला विचारणा करुन गेलेले आहेत. मा. आयुक्तांनी ज्या प्रमाणे आदेशीत केले त्याची दखल सहा. संचालक नगर रचना यांनी घेवुन अतिरिक्त शहर अभियंता यांच्या निर्देशनास आणुन दयावी. योग्य खुलासा न मिळाल्याने आयुक्त यांना आदेश करावे लागले. आजच्या चर्चेचा संदर्भ सहा. संचालक नगररचना यांनी अति. शहर अभियंता यांना आदेश करावे लागले. आजच्या चर्चेचा संदर्भ सहा. संचालक नगररचना यांनी अति. शहर अभियंता व शहर अभियंता यांना दयावा की, असे ले-आऊट धारक यांनी त्यामध्ये अटी-शर्तीनुसार सेल्फडेव्हलपमेंटची कामे केलेली नाही. अशा ले-आऊट मध्ये त्या नागरकांची अडचण झालेली आहे. ड्रेनेज लाईन नाही. लाईट नाही रस्ते नाही तसेच जलवाहिनी नाही अशा सर्व कांमाचे अंदाजपत्रक तयार करुन लेखा विभागाचा अभिप्राय घेवुन जर निधी उपलब्ध होत असेल तर

अधिक चांगले परंतु नसेल तर पुढील आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात आर्थिक तरतुद ठेवण्याबाबत कार्यवाही करावी.

**श्री भगवान रगडे :** मागील बैठकीत मी मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करण्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला होता. आतापर्यंत काय कार्यवाही झाली. त्यांच्या प्रती देण्याचे आपण आदेशीत केलेले होते. अदयाप मला प्रत मिळालेली नाही. सन २००० मध्ये सर्वसाधारण सभेने मिसारवाडी हा भाग स्लम घोषित करावा म्हणुन ठराव घेतलेला आहे. कार्यवाही व्हावी हे प्रकरण शासनास पाठविण्यात यावे असे सुध्दा म्हटले होते. ३-४ वर्ष झाले. शासनास प्रकरण का पाठविले नाही. ज्यांनी या कामात दिरंगाई केली त्यांचेवर कार्यवाही करण्यात यावी.

**मा. सभापती :** स्लम घोषित करण्याबाबत कार्यवाही करणार होतो. चार-पाच दिवसात विशेष अधिकारी पाठवुनव स. सदस्यांना बरोबर घेवुन मुंबईला जावुन त्यांना आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीच्या प्रती देण्याच्या सुचना केलेल्या होत्या. तीन चार वर्ष झाली कार्यवाही झालेली नाही. असा स. सदस्य श्री रगडे यांचा प्रश्न आहे. त्यांना कागदपत्राच्या प्रती सुध्दा देण्यात आलेल्या नाहीत.

**श्री भगवान रगडे :** गेल्या तीन- चार वर्षापासुन मी हा प्रश्न उपस्थित करतो आहे. नगरसेवकांचे प्रश्न सोडविल्या जात नसतील तर सर्वसामान्य व्यक्तींचे काय हाल होत असतील. प्रश्न निर्माण होतो. वेळीच हे प्रकरण शासन स्तरावर गेले असते व कार्यवाही झाली असती तर लोकशाही मार्गाने मोर्चे अंदोलने करुन मंजुरी घेतली असती. त्या भागात सोयी सुविधा तेथील नागरीकांना उपलब्ध करुन देता आल्या असता. ज्यांनी या कामात हलगर्जीपणा केला अशा अधिकारी/कर्मचारी यांचे वर कार्यवाही व्हावी.

**मा. सभापती :** स.सदस्य श्री रगडे यांनी उपस्थिती केलेला मिसारवाडी स्लम घोषित करण्याच्या कार्यवाहीस का उशीर झाला. या संपुर्ण प्रकरणाची मा. आयुक्तांनी चौकशी करुन १५ दिवसात अहवाल सादर करावा. त्या अहवालानुसार जो कोणी दोषी असेल त्यांचेवर कार्यवाही करण्याच्या सुचना चर्चे अंती प्रशासनास देता येईल.

**श्री भगवान रगडे :** इतिवृत्तात आपण मागील वेळेस रुलींग दिलेले आहे. पान क्र. १२ वर उपअभियंता हे पत्र होऊन पुन्हा जाणार आहेत. स. सदस्य श्री रगडे यांना सोबत घेवुन जावे २४ तारखेला श्री वझे येतील २५ तारखेला स. सदस्य श्री वझे यांनी मुंबईला जावे असे आदेश दिलेले आहेत. तसेच स. सददस्य श्री रगडे यांना सर्व कागदपत्रांच्या प्रती देण्यात याव्यात म्हणुन आदेशित केलेले होते अदयाप मला प्रती दिलेल्या नाहीत.

**सहा. संचालक न. र. :** श्री. वझे व श्री. जावरे हे या प्रकरणा संदर्भात मुंबईला जाऊन आलेले आहेत. नगर विकास विभागाचे अवर सचिव यांची भेट घेतली या संदर्भात चौकशी त्यानुसार असे समजले की, स्लम घोषित करणे हा मुद्दा स्लम डिक्लेरेशन, रिहॅबीलीटेशन या विभागाकडे येतो. गुंठेवारीचा मुद्दा हा वेगळा आहे. सदर संचिकाही प्रकल्प विभागाकडून नगर रचना विभागाकडे सादर झालेली असून पुढील कार्यवाही करीत आहोत.

**श्री. भगवान रगडे :** मागील बैठकीत जावरे साहेबांनी असा खुलासा केलेला होता की, याबाबत सर्व कार्यवाही नगररचना विभागामार्फतच होत आहे. मागील सभेचे मिनिट्स काढून बघितले तर दोन्ही विभागाचे अधिकारी या प्रकरणाबाबत

टोलवाटोलवीची उत्तरे देतात. एक दुसऱ्या विभागाचे नाव दाखवितात. स्लम घोषित करण्याची कार्यवाही कशी केली जाते याचाच अभ्यास अधिकाऱ्यांना नाही असे माझे मत आहे.

**मा. सभापती :** श्री. वझे उपअभियंता (न. र.) यांनी खुलासा करावा.

**उपअभियंता (न. र.) :** मी २४ तारखेपासून रजेवर होतो. रजेवरून आल्यानंतर मागील आठवाड्यात संचिका माझ्याकडे प्राप्त झालेली आहे. स. सदस्य श्री. रगडे यांचेशी चर्चा करून मुंबईला या प्रकरणाच्या कार्यवाहीसाठी केव्हा जायचे वेळ निश्चित करून घेण्यात येईल.

**मा. सभापती :** यापूर्वी अधिकारी या प्रकरणाच्या बाबतीत गेले असतील पुन्हा सभागृहात चर्चा झाल्यानुसार स. सदस्य हे स्वत: या संदर्भात प्रयत्न करणार होते. परंतु अधिकारी जाऊन आले व त्यांना कुठलीच माहिती दिली नाही.

**श्री. भगवान रगडे :** मुंबईला अधिकारी जाण्याच्या अगोदर हा विषय झालेला होता. स. सदस्य श्री. रगडे यांना बरोबर घेवून जावे असे आपले रुंलीग आहे. त्याचे पालन केलेले नाही व कागदपत्राच्या प्रती सुध्दा दिलेल्या नाही. सभापतीचे जे आदेश त्याकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे.

**मा. सभापती :** सत्यप्रती देण्याच्या सूचना दिलेल्या होत्या. आदेशाचे पालन होत नसेल इतिवृत्तातील नोंदी होतात त्या विभागाचे अधिकारी तपासून नसतील व कार्यवाही करीत नसतील तर योग्य नाही. दोन दिवसात स. सदस्यांशी संबंधित अधिकाऱ्यांनी चर्चा करावी व मंत्रालयात जाण्याची तारीख निश्चित करून पुढील कार्यवाहीसाठी मुंबईला जावे.

**श्री. भगवान रगडे :** आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीची संपूर्ण कागदपत्रे त्या संचिकेमध्ये आहेत की नाही तपासावे. नसतील तर पूर्तता करावी. चार वर्षात काय कार्यवाही केली हे समजेल.

**सहा. संचालक न. र. :** स्लम घोषित करतांना नगर रचना विभागशी फक्त सदरील वसाहत निवासी झोनमध्ये येते का किंवा काही आरक्षण, डी. पी. रोडने बाधित होते काय असेल तर कोणता भागीत बाधित होतो आणि बाधित होत असलेल्या भागातील जे आरक्षण ते वगळायचे किवां कायम ठेवायचे याबाबत चा अभिप्राय देण्यापुरता संबंध येतो. स्लम घोषित करण्याची जी प्रक्रिया करावयाची ती संपूर्ण प्रकल्प विभागामार्फत करायची असते. इतर बाबतीत नगर रचना विभागाचा संबंध येत नाही असे माझे मत आहे.

**प्रकल्प संचालक :** गेल्या दोन-तीन महिन्यापूर्वीच मा. आयुक्तांच्या आदेशानुसार स्लम डिक्लेरेशनची कार्यवाही ही नगररचना विभागाकडून करावी असे ठरले म्हणून संचिका नगररचना विभागास पाठविण्यात आलेली आहे. मागील बैठकीत चर्चा झाल्यानुसार आम्ही दोघे मुंबईला जाऊन आलो. तेथे असे सांगण्यात आले की, स्लम डिक्लेरेशन व गुंठेवारी हे वेगवेगळे विभाग आहेत. आणि ही वसाहत गुंठेवारीच्या यादीतून वगळावी म्हणून नगररचना विभागाला सुध्दा पत्रव्यवहार केलेला आहे. मिसारवाडी ही वसाहत गुंठेवारी कायद्यातून वगळल्यास स्लम डिक्लेरेशनची कार्यवाही होईल आणि आरक्षण जे आहे त्याचे मेजरमेंट करून दिल्यास तात्काळ कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** नगर रचना आणि प्रकल्प विभागाच्या टोलवा टोलवीच्या उत्तरामुळे कार्यवाही होवू शकली नसावी अशी शंका येते. स्लम घोषित करण्यात तीन वर्षे लागली अद्याप निर्णय दोन्ही विभाग मनपाचे असून फक्त अधिकाऱ्यांमधील

समन्वयाच्या अभावामुळे कार्यवाही झालेली नाही वारंवार सूचना करूनही प्रशासनाने कार्यवाही केलेली नसल्याने स्लम घोषित होऊ शकला नाही. जबाबदारी मनपाची होती. याचा अर्थ संबंधित सर्व विभाग येतात. मा. आयुक्तांनी नुकतेच आदेश दिले. परंतु यापूर्वी प्रकल्प विभागाकडून कार्यवाही होणे अपेक्षित होते असा अर्थ निघतो प्रत्येक वेळेस स. सदस्य सर्वसाधारण सभा स्थायी समितीच्या सभेच्या वेळी गुन्हा उपस्थित करतात हे योग्य नाही. आता बुधवार पर्यंत नगर रचना व प्रकल्प विभाग यांनी संयुक्तपणे यासंबंधी कार्यवाही करावी. संबंधित जे अधिकारी मुंबईला जाणार असतील त्यांचे सोबत स. सदस्यांना घेवून जावे यास उशीर का झाला याबाबत मा. आयुक्त चौकशी करून १५ दिवसात अहवाल सादर करतील.

**सौ. शाहीन जफर :** सिल्लेखाना प्रकरणाच्या संदर्भात मला जी मारहाण झाली याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. श्री. कंकाळ यांची बदली केली. नुसती बदली करणे म्हणजे कार्यवाही नव्हे. मला मारहाण होऊ देण्याचा त्यांचा इरादा होता. त्यांना निलंबित करावे नसता याबाबत मा. आयुक्तांना आठ दिवसाच्या आंत चौकशी अहवाल मागविण्याचे आदेशित करावे.

**प्रशासकीय अधिकारी :** दिनांक २२-११-२००४ रोजी जी मारहाणीची घटना घडली. त्या संदर्भात तत्कालीन प्रशासकीय अधिकारी यांनी क्रांतीचौक पोलिस स्टेशनला तक्रार नोंद केलेली आहे. जे बांधकाम झाले त्या संदर्भात मा. न्यायालयाने २७ तारखेला कोर्ट कमिशन नियुक्त केलेले होते. त्याचा अहवाल मा. न्यायालयाकडे सादर केलेला आहे. मा. न्यायालयाचे पुढील निर्देश प्राप्त झाल्यानंतर विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेवून पुढील कार्यवाही करता येईल.

**सौ. शाहिन जफर :** पुढील कार्यवाही केव्हा होणार आहे हा मुद्दा एक वर्षापासून चालू आहे. कोणता ठोस निर्णय घेतलेला नाही. या समितीची सदस्य म्हणून काय उपयोग झाला. ८-९ महिन्यापासून एका विषयावर चर्चा करते आहे. कार्यवाही होत नाही हे बरोबर नाही. सदर दिवशी पाहणी करण्याचे सभापतींनी निर्देश दिले तेंव्हा कांबळे साहेब यांना पोलिस बंदोबस्त घ्यावा म्हणून मी बोलले. तरी पोलिस फोर्स बरोबर घेतला नाही. अधिकाऱ्यांना मारहाण झाली नाही. याचा अर्थ मला मारहाण होऊ द्यायची होती व मारहाणीचा प्रकारही झाला. यास जबाबदार कोण? असे का करण्यात आले. पोलिसांना का कळविले नाही.

**मा. सभापती :** पोलिस संरक्षण घ्यावयास पाहिजे होते. अधिकारी तेथे जाणार असल्याची माहिती कुणीतरी अधिकाऱ्यांनी दिली असा संशय व्यक्त केलेला आहे. तिसरी बाब अशी की, जैसे थे ची परिस्थिती असावी असे निर्देश असतांना अतिरिक्त बांधकाम जे अनाधिकृत बांधकामात वाढ णालेली आहे. स. सदस्य यांना मारहाण झाली. त्यांना रुग्णालयात औषधोपचार केले. त्याच्या जिवितास धोका निर्माण झाला होता. परंतु त्यातून त्या बचावल्या. प्रत्यक्ष जागेवर जाण्या आधीच तेथे लोक हलण्याच्या मनस्थितीत होती. माहिती कोणी दिली उपआयुक्त (प्रशासन) म्हणून मत व्यक्त करावे.

**उपआयुक्त (प्र.) :** ज्या दिवशी ही घटना घडली त्या घटनेचा त्या दिवशीच्या स्थायी समितीच्या बैठकीत सविस्तर खुलासा केलेला होता. पुनश्च खुलासा करतो की ही घटना घडली तेंव्हा या घटनेबाबत त्यावेळचे प्रशासकीय अधिकारी

यांना पोलिस स्टेशनला फिर्याद नोंद करण्याचे आदेशित केलेल होते. स्थायी समितीच्या निर्णयानुसार आम्ही तेथे पाहणी करण्यास जाणार याबाबतची माहिती मनपाच्याच कर्मचारी / अधिकारी यांनी दिली काय? याबाबत दोन बाबीनुसार चौकशी करावी लागेल. एकतर ज्या अधिकाऱ्याकडे मोबाईल आहे त्यामार्फत माहिती दिली किंवा काय? याबाबत चौकशी करावी लागेल.

**सौ. शाहीन जफर :** मी माहिती घेतली असता त्या ठिकाणी. कुणीतरी फोन केला अशी माहिती मिळाली. पोलिस कार्यवाही काय झाली.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** प्रशासनाचा भाग आहे. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून चौकशीचे आदेश करावे. अहवाल आल्यानंतर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

**उपआयुक्त (प्र.) :** घटना घटडली त्यावेळेस संबंधित अधिकारी यांनी पोलिस स्टेशनला लेखी फिर्याद दिलेली आहे. त्याची प्रत उपलब्ध आहे.

**मा. सभापती :** पोलिसात तक्रार केली त्यात काय कार्यवाही झाली चौकशी करावी. प्रशासनाचे पत्र देवून माहिती घ्यावी व या घटनेमुळे स. सदस्य यांना मानसिक त्रास झालेला आहे. त्यांना मारहाण झालेली आहे. गंभीर असा प्रकार झालेला आहे. प्रशासनाने दखल घ्यावी.

**मा. आयुक्त :** दोन सूचना देऊ इच्छितो. एक तर प्रशासकीय विभागामार्फत एक आय. आर नंबर त्या केसेसची कार्यवाही प्रशासकीय विभागामार्फत हाताळली जावी कोर्ट कमिशन रिपोर्ट या दर झाल्याबाबत माझ्याकडे आयुक्त म्हणून माहिती झालेली आहे. न्यायालयाची तारीख पुन्हा राहील सभागृहाची भावना अशी झाली की, न्यायालयाच्या कामास वेळ लागतो. कोर्ट कमिशनच्या अहवालाची सर्टिफाईड प्रत मिळवावी ती सभागृहास द्यावी त्यातून काही बोध होवू शकेल.

**मा. सभापती :** या प्रकरणाबाबत मा. आयुक्त यांनी चौकशी करून १५ दिवसात अहवाल सादर करावा.

**श्री. इलियास किरमाणी :** मालमत्तेच्या सर्वेक्षणाच्या बाबत मी प्रश्न विचारलेला होता. त्याचे उत्तर मला देण्यात आले त्यात तफावत दिसून येते. यापूर्वी सभागृहात तपशीलवार रिपोर्ट दिलेला होता काम पूर्ण झाले त्यावेळी ५०० आकडेवारी दिलेली होती मला जे उत्तर दिले त्यात २५१ आकडेवारी दाखविण्यात आली. झोन क्र. १,४,८ यामध्ये पूर्णच्या पूर्ण अ.क्र. २८ पर्यंत रिपोर्टमध्ये तफावत दिसून येते. ही सर्व सभागृहाची दिशाभूल असून मनपाचा म्हणजेच जनतेच्या पैशाची उधळण होत आहे. याचा विचार व्हावा यामध्ये कोणतीही काम करण्याची पध्दती नाही. नियम व अटीचे पालन होत नाही मुदतवाढ दिली. दंड आकारला नाही. काम चालू आहे. झोन न. २, ५, ८ चे काम पूर्ण झाल्याबाबत दि. २७-१०-२००४ च्या बैठकीत स्टेटमेंट सादर केले. नोव्हेंबर २००४ पर्यंत माहिती दिली. ३०-११-२००४ च्या पत्रात नमूद केले असे उत्तर दिले. यात मोठी तफावत आहे दुसरा प्रश्न असा होता की, असेसमेंट रजिस्टर केलेले आहे का? कामाचा बारचार्ट तयार केला आहे काय, बारचार्ट कसा आहे? नवीन सर्व्हे केलेला आहे का असा माझा प्रश्न होता. उत्तर बरोबर दिलेले नाही. फक्त २% तपासणी करणार आहे. संबंधित एजन्सीने सर्वेक्षण केल्यानंतर मनपा मार्फत किती तपासणी झालेली आहे? गोलमोल उत्तरे देण्यात येतात. जनतेचा पैसा आहे? योग्य तऱ्हेने

वापर व्हावा अशी अपेक्षा आहे. कमी वयाची मुले सर्वेक्षण करीत आहेत. त्यांना कोणत्याही प्रकारचे ज्ञान नाही. नविन सर्व्हे झालेल्या मालमत्तेचे असेसमेंट बुक तयार आहेत का? १,३२,७८६ चा सर्वे झाला त्यांना दिमांड नोटीस पाठविली का? वर्क ऑर्डरच ६ महिने कालावधी कोणत्या निकषानुसार ठरविला १० महिने का नाही केले. सर्वेक्षणाचे कामात कोणी अडथळा आणला. किती आक्षेप नोंदले गेले टेंडरची अट क्र. ९ काय आहे. या कामामध्ये मोठा भ्रष्टाचार होत आहे.

**मा. सभापती :** श्री. फड साहेब सभागृहात उपस्थित नाहीत. त्यांच्या विभागाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झालेला होता. सहाय्यक आयुक्त-१ यांचेकडे त्यांची रजा नाही मला विचारणा केलेली नाही. यानंतर परवानगी शिवाय त्यांनी गैरहजर राहू नये. उपआयुक्त (प्रशासन) यांनी नोंद घ्यावी व तसे त्यांना कळवावे मालमत्तेच्या संदर्भातील प्रश्नाचा खुलासा पुढील बैठकीत दिला जाईल.

**श्री. इलियास किरमाणी :** माझ्या प्रश्नाचा खुलासा करावा. मी मा. आयुक्तांना पत्र देत आहे. लेखी खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** जो अहवाल आलेला आहे. त्यावर फड साहेबांनी सही आहे. ते उपस्थित नाहीत पुढील बैठकीत सविस्तर चर्चा केली जाईल.

**मा. आयुक्त :** श्रीयुत कालेले व श्री. फड सुध्दा आज उपस्थित नाही सदर संचिकेवर मुख्य लेखाधिकारी व माझेही रिमार्क आहेत. पुढील बैठकीत संचिका सादर केली जाईल.

**श्री. इलियास किरमाणी :** माझ्या प्रश्नाचे उत्तर एक-दोन दिवसात देण्याचे आदेशित करावे. सभेच्या दिवशी २-४ तास अगोदर उत्तराची प्रत मिळते. त्यावर अभ्यास होत नाही.

**मा. सभापती :** ठिक आहे स. सदस्य श्री. किरमाणी यांनी दिलेल्या लेखी प्रश्नाचा खुलासा त्यांना लेखी स्वरुपात दोन तीन दिवसात देण्यात यावा.

**श्री. इलियास किरमाणी :** मागील बैठकीत चर्चा झाली. पेट्रोल पंप साठी एन.ओ. सी. दिली संबंधिताकडे मालकी हक्काचे कागदपत्र नव्हते. नंतर कागदपत्र सादर केले असे समजते. सामान्य व्यक्ती पिठाणी गिरणीची एन.ओ.सी. घेण्यास गेल्यास दिली जात नाही. एकास एक न्याय व दुसऱ्यास दुसरा न्याय हे का होते. मालकी हक्क नसतांना एन.ओ.सी. दिली नंतर कागदपत्र दाखल केले. इतरांनाही एनओसी आवश्यक असेल त्यांचे मोठी असे नियम वापरावे हे माझे मत आहे. अशी रुलींग द्यावी.

**मा. आयुक्त :** पेट्रोल पंपाच्या एन.ओ.सी.च्या संदर्भात जादा कागदपत्रांची आवश्यकता आहे हे माझ्या पाहणती आले. या संदर्भात उपआयुक्त (म) यांना मी सूचना दिलेल्या आहेत. शुक्रवार पर्यंत कागदपत्र णालेली नव्हती. आजच काही कागदपत्र उपआयुक्त (महसूल) यांचेकडे आल्याची माहिती मला मिळालेली आहे. सभागृहाचे समाधान झाले असे हा भाग वेगळा परंतु त्या संदर्भात प्रशासन अजुनही कागदपत्रांची तपासणी करीत आहे. अशा प्रकारणामध्ये किंवा शहराच्या अन्य मध्यवतस्तीत ज्या ठिकाणी मनपामार्फत एफ. एस. आय. जास्त दिला जातो. एन. ओ. सी. देतांना आजपर्यंत मनपातील कायद्यानुसार जे अधिकार आहे. सहा संचालक नगररचना यांना प्रदान केलेले आहे. त्यांचा त्यांनी वापर केला. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर

मा. सभापती व सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, हे अधिकार परत घेवून आयुक्तांनी वापरावे असा विचार चालू आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एन. ओ. सी. दिल्याबाबतची मध्येच चर्चा सुरू झाली. ज्या सभेत चर्चा होत होती त्यावेळी ती सभा आपण तहकूब करून ८ दिवसात संपूर्ण कागदपत्र सभागृहासमोर सादर करावे म्हणून आदेशित केलेले होते. कागदपत्र आलेले नाही. परंतु त्या विषयावर पुन्हा चर्चा होत आहे. ले-आऊट केंव्हा मंजूर झाला कागदपत्र केंव्हा सादर करणार खुलासा द्यावा.

**मा. आयुक्त :** ज्या सभेत हा प्रश्न उपस्थित झाला तेंव्हा मी हजर नव्हतो. सविस्तर कागदपत्रासह माहिती सादर करावी. असे सभापतींचे आदेश होते. माहिती मिळाली तशा सूचना मी उपआयुक्त (महसूल) यांना दिलेल्या आहेत. संपूर्ण कागदपत्र विचारात घेऊनच कार्यवाही करणे प्रशासनास आवश्यक आहे. आज त्या संदर्भात काही कागदपत्र सादर केल्याच माहिती होती आलेली आहे.

**श्री. भगवान रगडे :** पेट्रोल पंपाकरिता मनपाने एन.ओ. सी. कागदपत्रांची पूर्तता नव्हती व एक माजी खासदार यांचे सांगण्यावरून एन.ओ.सी. दिली असे वृत्तपत्रात छापून आलेले आहे. यात मनपाची बदनामी होती आहे. कोण माजी खासदार होते खुलासा द्यावा.

**मा. सभापती :** या संबंधी मा. आयुक्तांनी समाधानकाकर खुलासा केलेला आहे. मनपात कुणाच्या दबावाखाली कामकाज चालत नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एखाद्या वृत्तपत्रात जर राजकीय भाषेत छापून दिले असेल तर त्यावर चर्चा करणे बरोबर नाही.

**श्री. भगवान रगडे :** ठिक आहे. राजकीय भाषेत छापली असेल परंतु कागदपत्रांची पूर्तता नसतांना एन.ओ.सी. दिली कशी याचा सविस्तर खुलासा पुढील बैठकीत देण्यात यावा. यात मनपाची बदनामी झालेली आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** यात मनपाची बदनामी होते यास मी सहमत आहे. प्रशासन चौकशी करेन पुढील बैठकीत माहिती समोर येणारच आहे.

**श्री. प्रल्हाद निमगांवकर :** मनपाच्या ओपन स्पेस किती? दोन-तीन महिन्यापूर्वी प्रश्न उपस्थित केला होता. खुलासा मिहालेला नाही.

**मा. सभापती :** मागील एका बैठकीत हा विषय चर्चेला होता. ओपन स्पेस बाबत बुकलेट तयार करण्याचे निर्देश देवून सर्व सदस्यांना प्रती देण्याच्या सूचना केलेल्या होत्या बुकलेट तयार असेल तर स. सदस्य श्री. निमगांवकर यांना एक प्रत द्यावी. उर्वरित सदस्यांना नंतर देण्यात यावी.

**मालमत्ता अधिकारी :** ले-आऊट मंजूर केलेल्या जागा व ओपन स्पेसच्या जागेबाबत बुकलेट तयार आहे. ले-आऊट मंजूर केल्यानंतर त्याबाबतची पुढील कार्यवाही मालमत्ता विभागामार्फत होते. या विभागाकडे पी. आर. कार्ड काढण्याची जबाबदारी आहे. तसा रेकॉर्ड नगररचना विभागाकडून प्राप्त होतो. मनपाच्या हद्दित एकूण ३६५ खुल्या जागांचे कागदपत्र आहेत. त्यापैकी १३९ जागांचे पी.आर. कार्ड ७/१२ उतारे आहेत. त्यांची यादी सोबत जोडण्यात आलेली आहे. ४० मध्ये मंजूर ले-आऊट मधील खुल्या जागा असे शब्द वापरलेले आहेत. प्रत्यक्षात त्यात कॉलनी किंवा ले-आऊटचे नाव असल्यामुळे यात काही करता येत नाही. यासाठी नगररचना विभागाचे दोन कर्मचारी उपलब्ध झाले तर माहिती संकलित करण्यात येईल.

**मा. आयुक्त :** बुकलेट तयार केले ही रेखांकनातील खुल्या जागेची यादी आहे. जे नगर परिषदेच्या काळापासून ले-आऊट ओपन स्पेस असतील त्यात बरेचसे स्तंभ आहे. स. सदस्यांनी अभ्यास करावा. आहे ती प्रत स. सदस्य निमगांवकर यांना देण्यात यावी. उर्वरित सदस्यांना नंतर प्रती देण्यात याव्यात अशी संबधित अधिकारी यांना सूचना करतो. सभागृहात बऱ्याच वेळा लिज होल्ड बाबत सुध्दा चर्चा झालेली आहे. लिजवर दिलेल्या जागांची सुध्दा यादी तयार करण्यात आलेली आहे. उपआयुक्त (महसूल) यांचेकडे चार्ज असल्यामुळे मी स्वत: बैठक्ा घेवून बुकलेट अद्यावत करण्यासाठी सूचना केलेल्या आहेत त्या बाबतीत नोटीसा सुध्दा दिलेल्या आहेत. किती नोटीस व कोणास दिल्या त्याची माहिती सुध्दा प्रशासन घेवू शकेल. ॲग्रीमेंट मध्ये लीज व रेटमध्ये ७ या त्रुटी राहिलेल्या आहेत किंवा नुतनीकरण आवश्यक आहे. आयुक्त स्तरावर मालमत्ता अधिकाऱ्यांना सूचना दिलेल्या आहेत जे बुकलेट आताच दिले त्यात आणखी काही माहिती नमूद करणे आवश्यक आहे त्याची सुध्दा कार्यवाही चालू आहे. नियमित उपआयुक्त (महसूल) जेंव्हा रुजू होतील तेंव्हा या कामास आणखी गती येईल. वृत्तपत्राच्या माध्यमातून आव्हान करण्यात येते.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** उपआयुक्त (महसूल) तीन-चार महिन्यापांसून नाहीत. मुख्य लेखा परिक्षक पद सुध्दा तीन-चार वर्षापासून रिक्त आहे. अनेक अधिकाऱ्यांकडून अतिरिक्त कार्यभार दिलेले आहे हे किती दिवस चालत राहणार आहे.

**मा. आयुक्त :** यापूर्वीच याबाबत खलासा केलेला होता. उपआयुक्त (महसूल) पदाच्या बाबत दिवाणी न्यायालयाचा स्थगिती आदेश आहे. हे खारीज करण्याचे प्रयत्न चालू आहे. याशिवाय आयुक्त म्हणून माझी अशी शिफारस आहे की, उप-जिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी या पदावर यावेत अशी विभागीय आयुक्तांना मी स्वत: विनंती केलेली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** उपआयुक्त (महसूल) मुख्य लेखा परिक्षक नाहीत. कोणत्याही वृत्तपत्रात काहीही बातम्या छापून येत आहेत. कोणत्याही कामे होत आहेत. कोणाचे चार्ज कोणत्याही अधिकाऱ्यांस दिले जात आहेत. अभियंत्याचा चार्ज उपअभियंता यांना क अभियंता यांना उपअभियंता असे चार्ज दिले जात आहेत. अतिरिक्त कार्यभार देण्यासाठी काही नियम असतील. किती दिवस द्यावा म्हणून परंतु २-३ वर्षे अतिरिक्त कार्यभार एकाच अधिकाऱ्याकडे ठेवला जातो हे बरोबर नाही. ८-८ वर्षापासून काही कर्मचारी एकाच विभागात काम करतात त्यांच्या बदल्या होत नाहीत. काही अधिकाऱ्यांच्या ५-६ महिन्यात बदल्या होतात.

**मा. सभापती :** ज्या ज्या पदाचे अतिरिक्त कार्यभार आहेत. त्या पदावर कर्मचारी / अधिकारी नियुक्त करावेत उपआयुक्त (महसूल) हे पद रिक्त आहे. मुख्य लेखापरिक्षक पद रिक्त आहे याबाबत प्रशासनामार्फत कार्यवाही व्हावी. यापूर्वी मालमत्ता, नगररचना विभागाचे सक्षमीकरण करण्याच्या सूचना सुध्दा दिलेल्या होत्या.

**श्री. मधुकर सावंत :** अनेक वेळेस बैठक्ीत मी सूचना केली की मालमत्ता विभाग हा मनपाच्या उत्पन्नाचा मोठा सोर्स आहे. त्यामध्ये पी.आर. कार्ड काढणे, मालमत्ताचे दस्ताऐवज ठेवणे ते आजही मनपाकडे काहीच नाही. किमान

काही भाग सक्षम करून १०-१२ कर्मचारी / अधिकारी नियुक्त करावेत. वारंवार प्रश्न उपस्थित करतो परंतु कार्यवाही होत नाही.

**मा. आयुक्त :** दोन्ही बाबतीत बुकलेट तयार आहे. आपण येण्याच्या अगोदर बुकलेट देण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. ती कार्यवाही माझ्याच स्तरावर सुरू आहे. मालमत्ता अधिकाऱ्याकडे जो कर्मचारी वर्ग आहे तो अपुरा आहे हे सत्य आहे. म्हणून त्यांनी दुसऱ्या अधिकाऱ्यांची मदत घेतलेली आहे. मालमत्ता विभागाचे जे काम उत्पन्न वाढीसाठी चालू आहे. जे. जे. करणे शक्य आहे त्या बाबतच्या सूचना मालमत्ता अधिकाऱ्यांना दिलेल्या आहेत. मालमत्ता विभाग सक्षम असा करता येईल. याबाबत इतर मनपाची माहिती मागविण्यात आलेली आहे. आणखी काही वेगळ्या सूचना सभागृहाच्या असतील तर त्यानुसार कार्यवाही करता येईल.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** एकूण ९ विभागीय कार्यालये असून त्या मार्फत सर्व कामकाज मनपाचे चालते अनेक पदावर अतिरिक्त कार्यभार कोणावर तरी सोपविलेला आहे. म्हणून त्या अधिकाऱ्यांना त्यांचेकडील असलेल्या पदावर पूर्णवेळ काम करता येत नाही. स्वतंत्र पदभार व सक्षम अधिकारी दिले तर निश्चित वसुलीत वाढ होईल. चांगले काम ते करू शकतील. चार अधिकारी यांनाच विभागीय अधिकारी म्हणून चार्ज आहे. उर्वरित विभागीय अधिकारी पदावर प्रभारी अधिकारी नियुक्त केलेले आहेत. प्रभारी चार्ज देण्याची मुदत असते. परंतु वर्षानुवर्ष, तीन-चार वर्षापासून काही अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार आहेत. त्यामुळे मागदपत्र करण्यास वेळ कमी मिळतो व कामे होण्यास वेळ लागतो. विधी सल्लागार हे पद किती तरी वर्षापासून रिक्त आहे. अतिरिक्त कार्यभार ज्यांचेकडे आहे ते पात्र असतील तर त्यांना ते पद द्यावे नसता बाहेरून भरावे तात्काळ कार्यवाही का होत नाही. स. सदस्यांच्या भावना लक्षात घ्याव्यात. अतिरिक्त कार्यभार काढून अधिकारी कर्मचारी यांना पूर्णवेळ काम करण्याची संधी द्यावी. जेणे करून जनतेची कामे वेळेवर होतील. झोन सक्षमीकरणाचा प्रस्ताव आला त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मी चर्चा केलेली होती. अतिरिक्त कार्यभार हा किती दिवसासाठी असावा त्यासाठी मर्यादा असावी. कोणी पदोन्नतीला असेल त्यांना ती ती पदे द्यावी. परंतु पूर्णवेळ कार्यभार त्या त्या पदाचा सोपविल्यास प्रशासन अधिक सक्षम होईल. प्रमोशन करीत असतांना सर्व पदांच्या बाबतीत विचार करावा.

**मा. आयुक्त :** अतिरिक्त कार्यभाराबाबत मुद्दा उपस्थित झाला म्हणून सभागृहाच्या माहितीसाठी सद्यः स्थितीवर खुलासा करतो. सभागृहाचे समाधान होईल विभागीय अधिकाऱ्यांची विभाग क्र. ५-६ ही दोन पदे २००१-२००२ पासून रिक्त आहेत विभगीय अधिकारी पदावर पदोन्नती देण्यासाठी आढावा घेतला असता मनपाकडे कर्मचारी पदोन्नतीस पात्र ठरत नाही. विभागातील नायक तहसीलदार दर्जाचे अधिकारी होण्याची कार्यवाही चालू होती. दोन नायब तहसीलदार दर्जाचे अधिकारी मनपात कार्यरत आहेत. आणखी दोन अधिकारी आवश्यक आहेत. मध्यंतरी आचार संहिता असल्यामुळे निवडणूकीच्या कामासाठी सर्वच कर्मचारी दिलेले होते. त्यामुळे त्यांनी नकार दिला होता. आचार संहिता संपूण बराच कालावधी झालेला असून आणखी दोन अधिकारी मनपाकडे पाठविण्याबाबत महसूल विभागाकडे पाठपुरावा चालू आहे. जसा जसा काळ निघून जाईल त्याप्रमाणे कोणी कर्मचारी या

पदासाठी पात्र ठरत असेल तर तशी संचिका तयार करून कार्यवाही करावी. अशा सूचना उपआयुक्त (प्रशासन) यांना दिलेल्या आहेत. पूर्वीच्या मालमत्ता अधिकारी यांचेनंतर श्री. रामटेके हे ४ जानेवारी २००४ पासून मालमत्ता अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. अपेक्षेप्रमाणे काम करण्याच्या त्यांच्या प्रयत्न दिसतो आहे. त्यांचेकडे जो अतिरिक्त कार्यभार आहे तो कमी करण्याचा प्रस्ताव प्रशासनाकडे आहे. प्रशासकीय अधिकारी श्री. कंकाळ यांची काही कारणास्तव बदली झाली. सध्या त्यावर मी बोलू इच्छित नाही. तसेच बी. के. गायकवाड उप अभियंता (स्लम) यांचेकडे जो जादा चार्ज आहे तो सप्टेंबर २००३ पासून आहे. अधिक्षक अभियंदा पदी ज्यांची निवड होईल त्यांनी जॉब चार्ट केला आहे. तेंव्हा त्यांचे काम कुणाकडे द्यायचे याबाबत त्यांनी निर्णय घ्यायचा आहे. श्री. भारसाकळे यांचेकडे अतिरिक्त चार्ज आहे. त्याचेंकडूनही काढून घेण्यात येईल. मख्य लेखा परिक्षक पदाचा चार्ज श्रीयुक्त महेंद्र खैरनार, मुख्य लेखाधिकारी यांचेकडे २००३ पासून आहे. या पदाबाबत ठराव झाला. शासनाकडे अधिकारी द्यावे म्हणून पाठपुरावा झाला. सभागृहाला याची सर्व जाणीव आहे. उपअभियंता श्री. कालेले यांचेकडील सभागृहाला याची सर्व जाणीव आहे. उप अभियंता श्री. कालेले यांचेकडील अतिरिक्त चार्ज काढून सेवा जेष्ठतेनुसार शाखा अभियंता यांना पदोन्नती होईल. इतर पदांच्या पदोन्नती बाबत उपआयुक्त (प्रशासन) कार्यवाही करतीलच. तसेच आयुक्तांचे स्वीय सहाय्यक हे पद सुध्दा रिक्त असून श्री. सुनील ढेकळे यांचेकडे अतिरिक्त चार्ज आहे. याबाबतीचा सेवा जेष्ठता यादीअंतीम केलेली आहे. ज्यांना पदोन्नती द्यायची तेही आदेश लवकरच काढण्यात येतील. श्री. जाधव यांचेकडे दोन चार्ज होते. तो कमी करण्यात आला आहे. श्री. जावरे प्रकल्प संचालक यांचेकडे शिक्षण विभागाचा अतिरिक्त कार्यभार होता तो त्यांचेकडून कमी केला आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** आताच मा. आयुक्तांनी सविस्तर असा खुलासा केला. अनेक दिवसापासून काही अधिकाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार दिलेले आहेत. तसेच आयुक्तांचे स्वीय सहाय्यक हे पद गेल्या एक वर्षापासून रिक्त आहे. श्री. सुनिल ढेकळे यांना त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. मनपा अस्थापनेवर श्ररी. के. एस. नवले हे गेल्या ७ वर्षापासून 'लघुटंकलेखक' पदावर दैनिक वेतनावर काम करीत सऊन त्यांना मिळणारे दैनित वेतन खूपच कमी आहे ते गेल्या सात वर्षापासून सर्वसाधारण सभा स्थायी समिती सभांच्या इतिवृत्ताच्या नोंदी घेऊन ते इतिवृत्त लिहून देण्याचे काम करीत आहेत. सुटीच्या दिवशीही त्यांना काम करावे लागते. त्यांची या महापालिकेत प्रशासकीय समितीने निवड केलेली असून मा. आयुक्तांचे स्वीय सहाय्यक पद पदोन्नतीने तात्काळ भरल्यास रिक्त होणाऱ्या पदावर त्यांचा अनुभव व कामाचा व्याप लक्षात घेता त्यांना कायमस्वरुपी या पदावर सेवेत सामावून घ्यावे. या संदर्भात गेल्या दोन बैठकीतही या सभागृहात चर्चा होवून त्यांना 'लघुटंकलेखक' या पदावर कायस्वरुपी वेतनश्रेणी वर सामावून घेण्याबाबत निर्णय घेतलेला आहे त्याची कार्यवाही अद्याप झालेली नाही. दुर्लक्ष होत आहे. उपआयुक्त (प्रशासन) यांनी याबाबत तात्काळ त्याना आदेश देण्याबाबत कार्यवाही करावी. पुन्हा पुन्हा तीच ती चर्चा होणे बरोबर नाही. त्याच प्रमाणे काही वाहनाचालक हे देखील क. लिपीक म्ळणून दहा-

बारा वर्षापासून काम करतात. त्यांचा संवर्ग बदलून त्यांना ते पद देण्याबाबत विचार व्हावा. प्रशासनाचे धोरण काय आहे. नियम काय दाखवतो. स. सदस्यांच्या भावना लक्षात घेता सर्वांना सारख्या पध्दतीने लाभ, न्याय मिळवा अशीच अपेक्षा स. सदस्यांची आहे.

**श्री. भगवान रगडे :** मनपाच्या अस्थापनेवर १०-१२ वर्षापासून श्री. पत्की, श्री. दांडगे व श्री. लुटे हे वाहनचालक क. लिपीक पदाचे काम करतात. कामाचा व्याप लक्षात घेता त्यांना त्या पदाचे काम लिे असावे असे स्पष्ट होते. मेडीकल बोर्डकडे कागदपात्रांची पूर्तता करून रिपोर्ट मागविला. त्या कर्मचाऱ्यांनी संवर्ग बदलून लिपीक पदावरच ठेवण्याची मागणी मेडीकल बोर्डचा रिपोर्ट त्यांनी सादर केला. परंतु तीन कर्मचाऱ्यापैकी श्री. पत्की, नावाचे कर्मचारी यांनाच वाहन चालक संवर्ग बदलून क. लिपीक म्हणून घेण्यात आले. श्री. दांडगे व कुटे यांचे रिपोर्ट येवूनही त्यांचा सवंर्ग बदलण्यात आला नाही.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सन १९९७ मध्ये सर्वसाधारण सभेत ठराव पारीत झाला. त्यात जेसीबी चालक, रिक्षाचालक व लघुटंकलेखक अशी विविध पद निमिर्तीचा निर्णय झाला. शासनाकडे मंजुीसाठी पाठविला असता जेसीबी वाहन चालक व रिक्षा चालक पदास मंजुरी दिली. शासनाने फक्त लघुटंकलेखक पदास मंजुरी दिली नाही. लघटंकलेखक पदास शासनाच्या मंजुरी येण्याच्या अधिन राहून जशी श्री. सुनिल ढेकळे यांना निम्नश्रेणी (लघुसेवक) ऐवजी उच्चश्रेणी लघुलेखक पदाची वेतनश्रेणी देण्याचा ठरावा याच सभागृहाने पारीत केला. त्याच प्रमाणे श्री. नवले यांना सुध्दा १९९७ च्या लघुलेखक पदनिर्मितीच्या त्या ठरावास (पदास) शासन मंजुरी येण्याच्या अधिन राहून वेतश्रेणी देण्यात यावी. सर्वांना सारखा न्याय मिळावा. त्या पदास मंजुरी आणण्यासाठी ते मुंबईला जाऊ शकत नाही. त्यांची आर्थिक बाजू कमकुवत आहे. त्यांचेवर अन्याय होवू नये. त्यांना न्याय द्यावा.

**उपआयुक्त (प्र) :** आयुक्तांचे स्वीय सहाय्यक पद भरल्यानंतर एक कोणते तरी पद रिक्त होईल. नियमित त्या पदावर श्री. के. एस. नवले (दैनिक वेतन) लघुलेखक यांना कायस्वरुपी वेतन श्रेणीवर घेण्याबाबत कार्यवाही होईल. सध्या मनपात स्टेनोच्या पदावर दैनिक वेतनांवर कोणीही नाही त्यांचे स्पर्धेत कोणीही नाही. त्यांचा रिक्त पदावर विचार करता येईल.

**मा.सभापती :** श्री. नवले 'लघुटंकलेखक' यांना कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर सामावनू घेण्याबाबत यापूर्वीच्या बैठकीत आदेशित करण्यात आलेले होते. आयुक्तांचे स्वीय सहाय्यक पदावर पदोन्नती जेष्ठ स्टेनोची नियुक्त होईल त्यानंतर पुन्हा एक पद रिक्त होईल. त्या पदावर श्री. नवले यांना कायमस्वरुपी वेतनश्रेणीवर नियुक्ती आदेश देण्यात यावे. त्यांची प्रशासकीय समितीनेच निवड केलेली आहे. याकडे दुर्लक्ष होवू नये. तसेच वाहनचालक श्री. लुटे व श्री. दांडगे यांचा संवर्ग बदलून त्यांना क. लिपीक पदावर सामावून घेण्याबाबत मागील एक बैठकीत निर्णय दिलेला होता.

**श्री. भगवान रगडे :** तीनही वानचालक यांचा मेडीकल रिपोर्ट बरोबरच सादर झालेला होता फक्त श्री. पत्की यांनाच क. लिपीक म्हणून घेण्यात आले. इतर दोघे श्री. कुटे व श्री. दांडगे यांना का घेतले नाही.

**उपआयुक्त (प्र.) :** या तीन कर्मचाऱ्यांना वाहन चालविणे शक्य होत नाही म्हणून मेडीकल रिपोर्ट मागविला होता या संदर्भात यापूर्वीच्या स्थायी समितीच्या बैठकीत

चर्चा झालेली होती. श्री. पत्की यांचे मेडीकल रिपोर्ट बरोबर होता. म्हणून त्यांना संवर्ग बदलून क. लिपीक पद देण्यात आले. परंतु श्री. दांडगे व श्री. लुटे यांचे प्रमाणपत्रांची फेरतपासणी करण्यात येत आहे. मेडीकल बोर्डकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले. मेडीकल बोर्डकडून आल्यानंतर नियमानुसार कार्यवाही होईल.

**श्री. भगवान रगडे :** संवर्ग बदलता येतो. श्री. पत्की यांना क. लिपीक म्हणून पद दिले, श्री. दांडगे व श्री. लुटे यांना दिले नाही. तिघांचे मेडीकल प्रमाणपत्र एकाच वेळी तपासणी होवून सादर केलेले आहे.

**मा. आयुक्त :** प्रशासन कुणाचीही बाजू घेणार नाही. तुजाभाज होवू शकत नाही. एक तर संवर्ग बदलण्याची कोठेही तरतूद नाही. शासनाचा नियम नाही. सभागृहाच्या निर्णयानुसार कार्यवाही होत आहे. अत्यंत अपवादात्मक बाब म्हणून करतो. दोन पर्याय आहेत. श्री. पत्की यांना परत घ्या किंवा कोणालाही घेवू नका. उर्वरित दोघांचा मेडीकल रिपोर्ट सादर झाल्यानंतर कार्यवाही होईल.

**मा. सभापती :** मेडीकल बोर्डचा पुनः र्तपासणी साठी पाठविलेला रिपोर्ट आल्यानंतर विशेष बाब म्हणून श्री. दांडगे व श्री. कुटे यांना त्यांचा वाहनचालक हा संवर्ग बदलून त्यांना कनिष्ठ लिपीक पदावर सामावून घ्यावे.

**मा. आयुक्त :** कार्यरत दैनित वेतनावरील सर्व टाकून १३८ कर्मचाऱ्यांची पदसंख्या निहाय विभागवाईज पदास मंजुरी घेण्यासाठी प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेला आहे. त्या प्रस्तावास शासनाचे आताच ४-५ दिवसांपूर्वी पत्र प्राप्त झाले. तीन-चार मुद्यांबाबत त्रुट्या काढलेल्या आहेत. त्याचा सविस्तर तपशील मागविला आहे तो तार करण्याच्या संबंधीतास अधिकाऱ्यांना दिल्या. आठ दिवसाच्या आत सर्व तपशील त्या पदाच्या ठरावाच्या संदर्भात शासनास दिल्या जातील. आयुक्त स्तरावर ही कार्यवाही चालू आहे. लवकरच त्या पदांना मंजुरी घेतल्या नंतर अमूद कर्मचारी राहिला हा प्रश्न निर्माण होणार नाही. शासनाची त्या पदास मंजुरी मिळाल्यानंतर पुढील योग्य ती कार्यवाही होईल.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** कार्यकारी अभियंता यांचे स्वीय सहाय्यक कनिष्ठ अभियंता दर्जाचे अधिकारी असावे. त्याचप्रमाणे सेल ॲड कंपनीस होर्डीग्ज बाबत टेंडर दिले. त्यांनी मुदतीत पैसे भरणा केले नाही ते न्यायालयात गेले.

**मा. सभापती :** स्वीय सहाय्यक म्हणून शाखा अभियंता असावेत असे यापूर्वीच ठरले आहे. श्री. सी. एस. सोनी यांचे स्वीय सहाय्यक म्हणून श्री. काकडे उपअभियंता यांना नेमले आहे. त्यांना इतरत्र बदलावे.

**मालमत्ता अधिकारी :** सेल ॲड कंपनीचे न्यायालयात प्रकरण न्यायालयात आहे. सध्या स्थगिती आदेश आहे. आता ५ जानेवारी रोजी न्यायालयाने सुनावणीची तारीख दिली आहे.

**श्री. भाऊसाहेब ताठे :** संबंधित मालकास न्यायालयात जाण्याची संधी देण्यात आली. वेळेपूर्वीच रक्कम नियमानुसार वसूल करणे आवश्यक होते. एक वर्ष गेले. ती कार्यवाही न केल्यामुळे संबंधित व्यक्ती न्यायालयात गेले परंतु यात मनपाचे मोठे नुकसान झालेले आहे.

**मा. सभापती :** संबंधित एजन्सी धारक हे जरी न्यायालयात गेले असले तरी महापालिकेची जी रक्कम मुदतीत त्यांनी भरणा केली नाही ती भरणा करण्यासाठी व

वसूल होण्यासाठी मा. न्यायालयाकडून परवानगी घ्यावी. व्याजाची देखील वसूली होईल.

**विधी सल्लागार :** पुढील तारखेच्या वेळेस तसे निवेदन मा. न्यायालयासमोर सादर करता येईल. परंतु जेव्हा न्यायालयात याचिका दाखल झाली तेंव्हा मा. न्यायालयाने असे म्हटले की मनपा व संबंधित एजन्सी धारक यांनी आपसात हा वाद मिटवावा. तडजोड करून घ्यावी आर. बी. ट्रेडर नेमावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

**मा. सभापती :** नियम अटी-शर्तीनुसार मनपास संबंधित एजन्सीकडून रक्कम येणे होती. ती वसूल झाली नाही. मनपाची जी थकबाकी संबंधित एजन्सीकडे आहे ती वसूल करण्यासाठी मा. न्यायालयाचे आदेश घ्यावेत.

**मा. आयुक्त :** मुळ करारनामा पहावा. त्यात आरबी ट्रेशनची तरतूद आहे का? आरबीट्रेशन मध्ये गेल्यास अनेक कालावधी जाईल. को इसेसीव्ह आरबीट्रेशनमध्ये कठोर उपाययोजना करण्याबाबत मा. न्यायालयात काय अडचण आहे.

**विधी सल्लागार :** अशा प्रकारची अडचण नाही. मा. न्यायालयासमोर सादर करता येईल.

**श्री. प्रल्हाद निमगावकर :** उदयान अधिक्षकांचे वाहन बंद पडलेले आहे. अशी माहिती हाती आली. त्या वाहनावर किती खर्च होतो. खुलासा करावा.

**मा. सभापती** : स. सदस्य श्री. निमंगावकर यांनी उदयान विभागाचे वाहन नादुरुस्त असल्याची तक्रार केलेली आहे. ताबडतोब दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात यावे.

**श्री. इलियास किरमाणी :** तापडीया नाट्यगृहाच्या संदर्भात मला कागदपत्रांच्या सर्व प्रती या बैठकीत देण्यात येणार होत्या. आपण आदेशीत केले होते. एकही कागदपत्र दिले नाही.

**सहा. संचालक न. र. :** माहिती पाठविली आहे.

**मा. आयुक्त** : स. सदस्य श्री. किरमाणी यांना कागदपत्रांची प्रत मिळालेली नसेल तर दिली जाईल.

**श्री. इलियास किरमाणी :** शिक्षकांचे वेतन बॅंकेद्वारे अदा करणार अशी माहिती मिळाली. शाळा सोडून शिक्षकांना येण्यास वेळ मिळणार नाही. जाण्या येण्यास खर्च लागेल.

**मा. आयुक्त** : या संदर्भात राज्य शासनाच्या शिक्षण खात्याची सूचना आहे. तसेच मा. विभागीय आयुक्त यांच्या सुध्दा सूचना आहेत. महाराष्ट्रातल्या सर्व जिल्हा परिषद, नगर परिषद व महानगरपालिकातील शिक्षकांचे वेतन बॅंकेद्वारे अदा करण्याचे शासनाचे निर्देश आहेत. हे धोरण महापालिकेने पाळावे. मुख्य लेखाधिकारी यांना सूचना केलेली आहे. माझे तर असे मत आहे की, इतर वर्ग-३ संवर्गातील सर्वच कर्मचाऱ्यांचे वेतन बॅंकेद्वारे अदा करण्याबाबत विचार व्हावा म्हणून संचिकेवर नोटींग केलेले आहे. याबाबत लेखा विभाग निर्णय होईल.

**विषय क्र. १३५ :**

दिनांक २२-११-२००४ (का. प. क्र. २१) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**मा. सभापती** : इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**ठराव :**

दिनांक २२-११-२००४ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १३६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका अस्थापनेवरील वर्ग-३ संवर्गात दैनिक वेतनावर कार्यरत असलेले कर्मचाऱ्यांना रु. १००/- एवढे दैनिक वेतन देण्यात येते.

दैनिक वेतनावरील कार्यरत कर्मचाऱ्यांना वाढीव दराने वेतन अदा करणे तसेच त्या अनुषंगाने १ एप्रिल २००४ पासुन अदा करावयाची थकबाकी याकरीता एकूण ४३.०० लक्ष खर्च अपेक्षीत असून, ज्या कर्मचाऱ्यांना दिनांक १६ ऑक्टोबर २००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाढीव वेतन अदा करण्यात आलेले नव्हते. त्याकरीता अपेक्षीत खर्च ७.४७ लक्ष असे एकूण अपेक्षीत खर्चाकरीता साधारणत: रु. ५०.५० लक्ष खर्चाकरीता सुधारीत अंदाजपत्रकात वाढीव तरतुदीसह वर्ग-३ संवर्गातील कर्मचाऱ्यांना रु. १६३/- दैनिक वेतन वाढीव दराचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** यापुर्वी हा प्रस्ताव सादर झालेला होता. त्यास एकमताने सभागृहाने मंजूरी दिली. शासनाने मंजूरी दिलेल्या तारखेपासून या सभागृहाने मंजूरी न देता एप्रिल २००४ पासून जे मनपाचे आर्थिक वर्ष सुरु होते. तेव्हापासून १६३/- रुपये दैनिक वेतन लागू करण्याची मंजूरी दिलेली होती. जी शासकीय सेवेत दैनिक वेतनाचे कामगार आहे. त्याप्रमाणे प्रस्ताव समोर आला तेव्हा मानवतेचा दृष्टीकोन समोर ठेवून ते कर्मचारी सकाळी ५ वाजेपासून साफसफाई करतात. जिवाची पर्वा न करता हे शहर स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांचे आटोकाट प्रयत्न व सिहांचा वाटा आहे. म्हणून या सभागृहाने मान्यता दिली. परंतू मी तुमच्या दैनिक वेतनात वाढ केली मला पैसे दया असे म्हणून काही कर्मचाऱ्यांना पैसे मागविण्यात आले. सभागृहाने मंजूरी द्यायची त्याचे श्रेय दुसऱ्याने घ्यायचे हे बरोबर नाही. यात काही कर्मचारी वगळण्यात आले असतील ती गळती नसावी. प्रस्ताव मंजूर करावा. यामध्ये कोणतेही दैनिक वेतनावरील कर्मचारी वगळता कामा नये. ते मेहनतीने काम करतात. त्याचा मोबदला त्यांना मिळालाच पाहिजे या मताचा मी आहे. आणि कोणी पैसे मागणार नाही. याची पारदर्शकता ठेवली गेली पाहिजे.

**मा. आयुक्त** : या बाबतची संचिकाच उपआयुक्तांच्या सहीने माझ्याकडे सादर झालेली होती. मी काम केले अशातला भाग नाही. यानंतर अशा प्रस्तावाबाबत उपआयुक्तांचे प्रमाणपत्र घेऊनच संचिकेवर सही करावी लागेल. वर्ग-३ व वर्ग-४ चे कर्मचारी यांनी या प्रस्तावाच्या अगोदर माझी भेट घेतली. त्यांनी दैनिक वेतन वाढीबाबत विनंती केलेली होती. याबाबत आयुक्त स्तरावर कार्यवाही घेऊन दैनिक वेतनवाढ करण्यात आलेली आहे. गरज नसतांना त्या कर्मचाऱ्यांनी माझा सत्कार केला.

**मा. सभापती** : यापुर्वीही प्रस्ताव सादर झालेला होता. परंतू काही कर्मचारी यांचा समावेश करण्यात आलेला नव्हता जे वर्ग-३ व वर्ग-४ चे दैनिक वेतन कर्मचारी

राहीले असतील त्या सर्वांचा समावेश करावा. १ एप्रिल २००४ पासुन मान्यता देण्यात येते. हा प्रस्ताव सर्वानुमते मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील वर्ग-३ संवर्गातील दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांना दिनांक ०१-०४-२००४ पासून रु. १६३/- प्रति दिवस प्रमाणे दैनिक वेतन देण्यास मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मोहल्ला शहाबाबजार स्लम प्रभाग क्र. ६९ येथे नाल्यालगत दगडी संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाचे सन २००३-२००४ च्या जिल्हा दरसूचीनुसार रक्कम रुपये १४,६३,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, सदरील कामाचा खर्च अर्थसंकल्प २००४-२००५ या आर्थिक वर्षातील लेखाशिर्ष स्लम भागात खुल्या गटारी व संरक्षित भिंत अंतर्गत ठेवण्यात आलेल्या तरतुदीमधून करण्यात येईल. सदरच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक २१-१०-२००४ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

सदर कामाचे अंदाजपत्रकास मा. आयुक्त महोदयांनी साध्या नाल्यालगत असलेली अतिक्रमण काढुन घेतल्यानंतरच काम हाती घ्यावे. तसेच ड्रेनेज विभागाकडुन केलेल्या अस्तित्वात असलेल्या दगडी संरक्षित भिंती प्रमाणे नियोजीत दगडी भिंत बांधणेच्या अटींना अधिन राहून अंदाजपत्रकास मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे.

करीता र. रु. १४,६३,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला शहाबाजार स्लम प्रभाग क्र. ६९ येथे नाल्यालगर दगडी संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १४,६३,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वेरुळ औरंगाबाद महोत्सव २००४ साठी प्रायोजकत्व स्विकारण्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सुचित केले आहे. यासाठी त्यांनी प्रायोजकत्व स्विकारुन महापालिकेकडुन र. रु. ५.०० लक्ष इतकी रक्कम भरुन सहभाग नोंदविणेबाबत विनंती केली आहे. त्यानुसार या हेतुसाठी धोरणात्मक निर्णय घेवून ही रक्कम रु. ५.०० लक्ष उपलब्ध करुन देण्याच्या विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्रीमती जयश्री किवळेकर :** वेरुळ-औरंगाबाद महोत्सव २००४ साठी प्रायोजकत्व स्विकारण्यासाठी ५ लक्ष रुपये मनपाकडून मागणी केलेली आहे. प्रस्ताव यापूर्वीच यावयास पाहीजे होता. उशिरा का सादर झाला. असा कार्यक्रम होत असेल तर, महानगरपालिकेचा सहभाग असावा याबद्दल दुमत नाही. दरवर्षी दोन महिने अगोदर प्रस्ताव यावयास पाहिजे. तेथील कार्यक्रमाचा कालावधी संपत आलेला आहे. मनपाने स्वतंत्र प्रायोजकत्व दयावे. योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा. सभापती** : स. सदस्य यांनी प्रस्ताव उशिरा आला म्हणून मत व्यक्त केले. हा प्रस्ताव १ तारखेला आला होता. सभा तहकूब झाली. हा प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो. पुढील वर्षी देणेबाबत विचार व्हावा.

**मा. आयुक्त** : स. सदस्य पदाधिकारी यांचेसोबत तोंडी चर्चा झालेली होती. कार्यक्रम संपत आला आहे. अशा प्रकारचे प्रायोजकत्व स्वतंत्रपणे मनपाने घेण्याचा विचार करावा.

**ठराव :**

सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील प्रस्ताव नामंजूर करण्यात येतो.

**विषय क्र. १३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, औरंगाबाद शहर सौंदर्यीकरणाच्या कार्यक्रमात खालील दोन कामांचा समावेश आहे.

१. सेव्हनहिल जालना रोड येथील चौक विकसीत करणे, अंदाजपत्रक र. रु. १,३०,०००/-

२. सेवायोजन कार्यालयासमोरील चौक विकसित करणे अंदाजपत्रक र. रु. १,१०,०००/-

सेव्हन हिल चौकात कार्बन फायबरमध्ये सिंहाची हुबेहुब शिल्पाकृती बनविण्याचा प्रस्ताव आहे. तसेच सेवायोजन कार्यालयासमोरील चौकात पारदर्शक फायबर वापरुन अंडाकृती रंगीत फुलाचे डिझाईन असलेली हुबेहुब शिल्पाकृती बनविण्याचा प्रस्ताव आहे.

प्रस्तावित कामे ही शिल्पकलेची कामे असून, शिल्पकाराने सादर केलेल्या फोटोप्रमाणे हुबेहुब तयार करुन नियोजीत चौकता बसवायची आहेत. तरी सदर कामे ही अनुभवी शिल्पकार श्री. सुनील देवरे, औरंगाबाद यांच्याकडुन मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (सी) अन्वये अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहर सौंदर्यीकरणाच्या कार्यक्रमाअंतर्गत सेव्हनहिल चौकात कार्बन फायबर मध्ये सिहांची हुबेहुब शिल्पाकृती बनविणे (अ. प. र. रु. १,३०,०००/-) तसेच सेवा योजन कार्यालयासमोरील चौकात पारदर्शक फायबर वापरुन अंडाकृती रंगीत फुलाचे डिझाईन असलेली हुबेहुब शिल्पाकृती बनविणे (अ. प. र. रु. १,१०,०००/-) च्या कामाकरीता शिल्पकाराने सादर केलेल्या फोटो प्रमाणे हुबेहुब तयार करुन नियोजीत चौकात बसविणेचे काम अनुभवी शिल्पकार श्री. सुनील देवरे औरंगाबाद यांच्याकडून मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (सी) अन्वये अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सागर बडवे ह्यांची ५ ते १६ जानेवारी २००५ दरम्यान मेलबॉर्न (ऑस्ट्रेलिया) येथे होणाऱ्या मुकबधिंराच्या ऑलिपिंकसाठी जाणाऱ्या भारतीय संघात जलतरण पटू, म्हणून निवड झाली आहे. जन्मतः कमी दृष्टी व मुकबधिरत्व असलेल्या १५ वर्षीय सागरने आतापर्यंत ३ मुकबधिरांच्या, ४ अपंगाच्या व २ सर्वसाधारण मुलांच्या राष्ट्रीय स्पर्धेमधून सहभाग नोंदविला त्यात त्याला एकूण २४ सुवर्ण, १० रौप्य व ३ कास्य पदके मिळाली व ४ राष्ट्रीय विक्रमांची नोंदही त्याने

केलेली आहे. तसेच त्योन ५ ते ७ कि. मी. च्या सागरी स्पर्धाही यशस्वीरित्या पूर्ण केल्या आहेत. त्याच्या या यशाची दखल घेवून १४ नोव्हेंबर २००२ रोजी बालदिनानिमित्त मा. राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या हस्ते सागरचा सत्कारही करण्यात आला आहे.

या ऑलिपिंकमधील सहभागाचा सर्व खर्च खेळाडूला स्वत: करावा लागतो त्यामुळे सागर राजीव बडवे याला मूकबधिरांच्या ऑलिपिक करीता जाण्यासाठी महानगरपालिकेतर्फे रु. २५,०००/- एवढी आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. काशिनाथ कोकाटे :** लेख प्रज्वल मिठावाला, हा १४ वर्षीय मुलगा नाथ व्हॅली शाळेमध्ये इयत्ता ९ वी मध्ये शिकत असून, तो बुध्दीबळात आंतरराष्ट्रीय मानांकित खेळाडू आहे. त्याची सिंगापूरा येथे होणाऱ्या आशियायी युथ बुध्दीबळ अजिंक्यपद स्पर्धेकरीता निवड झालेली आहे. त्यास या स्पर्धेसाठी रक्कम रुपये २५,०००/- आर्थिक मदत देण्यात यावी.

**मा.सभापती** : स. सदस्य श्री. कोकाटे यांनी सूचना केल्याप्रमाणे सिंगापूर येथे होणाऱ्या आशियायी युथ बुध्दीबळ अजिंक्यपद स्पर्धेकरीता लेख प्रज्वल मिठावालायाची निवड झालेली असल्याने त्यास देखील रक्कम रुपये २५,०००/- आर्थिक मदत देण्याच्या मान्यतेसह सदरील प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सागर बडवे ह्यांची ५ ते १६ जानेवारी २००५ दरम्यान मेलबॉर्न (ऑस्ट्रेलिया) येथे होणाऱ्या मुकबधिंराच्या ऑलिपिंकसाठी जाणाऱ्या भारतीय संघात जलतरण पटू, म्हणून निवड झाली असल्याने सागर राजीव बडवे याला मुकबधिरांच्या ऑलिपिंक करीता जाण्यासाठी महानगरपालिकेतर्फे रु. २५,०००/- एवढी आर्थिक मदत देण्यास त्याप्रमाणे सिंगापूर येथे होणाऱ्या आशियायी युथ बुध्दीबळ अजिंक्यपद स्पर्धेकरीता नाथ व्हेली शाळेमध्ये नववी इयत्तेत शिकत असलेला लेखप्रज्वल मिठावाला याची निवड झालेली असल्याने त्यास देखील रक्कम रुपये २५,०००/- आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ईटखेडा गांव ते पैठण रोडला जोडणाऱ्या रस्त्यावरील नदीवर पुल बांधणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ३४,४६,०००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती मंजुरी प्राप्त झाली आहे. सदरील कामासाठी निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रक विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण २४ कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त ५ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके उघडण्यात आली असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मन्नानखान महेबुबखान | ५ टक्के जास्त दराने |
| २. | डी. अजितसिंग | ६ टक्के जास्त दराने |
| ३. | मेसर्स निता कन्स्ट्रक्शन | १० टक्के जास्त दराने |
| ४. | एस. पी. घुले | ११ टक्के जास्त दराने |
| ५. | ऋषीकेश कन्स्ट्रक्शन | निविदा उघडली नाही. |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी मन्नानखान यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने आहेत. वाटाघाटी अंती श्री. मन्नानखान महेबुब खान यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. तरी मन्नानखान महेबुबखान यांचेकडून काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ईटखेडा गांव ते पैठण रोडला जोडणाऱ्या रस्त्यावरील नदीवर पुल बांधणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम श्री. मन्नानखान महेबुब खान यांचेकडून अं. प. दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४२ :**

कार्यकारी अभियंता (पा.पु.) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, पुंडलिकनगर (जलकुंभापासून) ते जयभवानी नगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची डी. आय. जलवाहिनी टाकणे आवश्यक आहे. कारण सदरील भागाचा विकास झपाटयाने होत आहे. व पुंडलीकनगर जलकुंभाचे काम देखील लवकरच पुर्ण होणार आहे. करीता अस्तित्वातील जलवाहिनी ही कमी व्यासाची असल्याने अपुरी पडणार आहे. त्यामुळे मुख्य जलवाहिनी म्हणून सदरील जलवाहिनीचे काम करणे आवश्यक आहे. तसेच जलकुंभावरुन १३ वी योजना सिडकोस देखील पाणीपूरवठा करता येईल.

करीता पुंडलीक नगर (जलकुंभ) ते जयभवानी नगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची डी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक र. रु. १७,९२,३८४/- चे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे सन २००४-२००५ चे दरसूचीनुसार तयार करण्यात आले असून, या कामावर होणारा खर्च अर्थसंकल्प २००४-२००५ मधील पृष्ठ क्रमांक १५५ वर अ. क्र. ९३ वर प्रभाग क्र. १४, पुंडलीकनगर जयभवानीनगर येथे जलवाहिनी करणे या शिर्षकाखाली रु. १५.०० लक्षची तरतुद असून, अ. क्र. ९४ रु. ५.०० लक्ष तरतुद असून, (१५+५=२०) लाखातून प्रस्तावित करण्यात आले आहे व सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मान्यता झालेली असून, स्थायी समिती समोर ठेवण्याबाबत शिफारस आहे.

करीता पुंडलीकनगर (जलकुंभ) ते जय भवानीरगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची डी. आय. जलवाहिनी टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक र. रु. १७,९२,३८४/- चे मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा. स्थायी समितीचे मंजूरीसाठी व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. भगवान रगडे :** विषय क्र. १४२ बाबत शंका आहे, आक्षेप नाही. जयभवानी नगर, पुंडलिकनगर भागातून जलवाहिनी टाकणार आहे तो भाग गुंठेवारीमध्ये येतो. जलवाहिनी टाकण्यास काही अडचण येते नाही का? खुलासा करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** जनतेला पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. जीवन प्राधिकरण विभागामार्फत जलकुंभाचे काम होणार आहे. गुंठेवारीच्या भागातून जरी जलवाहिनी येत असेल तरी, जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. चांगले काम होत आहे. समाधान मानावे. प्रस्तावास मंजूरी देण्यात यावी.

**श्री. भगवान रगडे :** ही पाईप लाईन अनाधिकृत भागातून जात असेल तर त्या भागातील सर्व जनतेला पाणी द्यावे असे माझे मत आहे.

**मा. आयुक्त** : पाण्याची पाईप लाईन ही अधिकृत भागातून येते. स. सदस्यांना नकाशे वैगेरे दाखविण्यात येतील.

**मा. सभापती** : प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर (जलकुंभापासून) ते जयभवानी नगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची डी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. १७,९२,३८४/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३ :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रात पाण्याच्या निर्जंतूकीकरणासाठी विरंजक चूर्णाचा (Bleaching Powder) वापर करण्यात येतो. तसेच विविध जलकुंभावर क्लोरीनची मात्रा योग्य राखण्यासाठी देखील विरंजक चूर्णाचा वापर केला जातो. ह्यासाठी १०० मे. टन विरंजक चूर्ण खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दरसूची सन २००४-०५ नुसार रक्कम रुपये ११,५५,०००/- एवढयाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर खरेदीचा खर्च हा पाणी पुरवठा रसायन खरेदी या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार आहे. लेखाशिर्षकामधून करण्यात येणार आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल जलशुध्दीकरण केंद्रात पाण्याच्या निर्जंतूकीकरणासाठी १०० मे. टन विरंजक चूर्ण (Bleaching Powder) खरेदी करणेसाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ११,५५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४ :**

कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे, स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे. अंदाजपत्रक र. रु. ७१४.०० लक्ष किंमतीच्या रक्कमेअंतर्गत (भाग-अ) रुपये २६३.८५ लक्ष किमतींच्या स्थापत्य कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४७/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. ४७/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ. क्र. २ चे काम हे योजनेच्या १२०० व ७०० मी. मी. व्यासाच्या उध्दरण नलिकेवरील ३०० व ४०० मी. मी. व्यासाचे स्कोअर व्हॉल्व बदलणे या कामाची निविदा र. रु. ११.५३ लक्ष किंमतीची आहे. निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत या कामाकरीता एकूण आठ कोऱ्या निविदा विक्री आल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या आठ निविदापैकी तीन दर

भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थित दिनांक ०६-०९-२००४ रोजी उघडण्यात आल्या. त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. मे. एल. के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद
अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने
२. मे. एस. बी. इंजिनियअर्स औ. बाद.
अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने
३. मे. से. ॲन्ड सुरा इं. जि. प्रा. लि. पुणे
अंदाजपत्रकीय दरापेक्षा १९% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे. एल. के. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराने आहेत. सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी करणेबाबत सूचीत केले.

मा. आयुक्त यांचे सुचनेनुसार निविदाधारकांना दिनांक २०-११-२००४ रोजी वाटाघाटीस्तव पाचारण करण्यात आले. दिनांक २३-११-२००४ रोजी मा. आयुक्त, मुख्यलेखाधिकारी, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) व निविदाधारक यांच्यात दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटीअंती सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराने करणे बाबत निर्णय घेऊन यास निविदाधारकांनी स्विकृती दर्शविली आहे.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १२०० मी. मी. व ७०० मी. मी. व्यासाच्या उध्दरण नलीकेवर ३०० व ४०० मी. मी. व्यासाचे स्कोअर व्हॉल्व बदलणेच्या कामासाठी रुपये ११.५३ लक्ष किंमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराने स्विकृत करणेबाबत मा. आयुक्त यांनी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराची निविदा मा. स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १२०० मी. मी. व ७०० मी. मी. व्यासाचे स्कोअर व्हॉल्व बदलणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं. प. दरापेक्षा ७.५०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४५ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७.१४ लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे. अंदाजपत्रक र. रु. ७१४.०० लक्ष किंमतीच्या रक्कमे अंतर्गत भाग (ब) रुपये

४५०.०० लक्ष किमतींच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ. क्र. ०४ चे काम हे नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अ. श. पंपासाठी कॉलम पाईपचा पुरवठा करणे. यासाठीचे असून, कामाची निविदा रक्कम रुपये १३,१९,२६५/- किंमतीची आहे. (पंपगृहाकरीता वर्ष १९९१ मध्ये सहा पंप संच बसविण्यात आले असून, या पंपासाठी बसविण्यात आलेल्या ४०० मी. मी. व्यासाचे कॉलम पाईप पाण्यातील क्लोरीन वायूमूळे खराब झालेले आहेत. त्यामुळे सदरील पाईप नवीन खरेदी करणे प्रस्तावित आहे. निविदा विक्रीची शेवटची दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ३०-०८-२००४ रोजी दर भरलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद | ०.५५५% कमी दराने |
| २. | मे. ॲक्वा पंपस् प्रायव्हेट लिमिटेड, पुणे | ८% जास्त दराने |
| ३. | फ्रेन्डस् इंजिनिअरींग कॉर्पो., मुंबई | ९% जास्त दराने |
| ४. | मे. बडगुजर ॲण्ड कंपनी, नाशिक | १२% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे. अमित इंजिनिअर्स, औरंगाबाद यांचे दर सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५% कमी दराने आहेत. सदरचे दर मा. आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता, मा. आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत श्री. ए. एस. नरसापुर निवृत्त मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदरील प्रस्तावाची छाननी करुन, त्यांचा अहवाल घेणे बाबत सुचना दिल्या. दिनांक १६-११-२००४ रोजी श्री. ए. एस. नरसापुर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्यांचेकडे प्रकरणी अहवाल घेणेसाठी निविदा पाठविण्यात आल्या. त्यानुसार श्री. ए. एस. नरसापुर यांनी त्यांचे पत्र दिनांक २४-११-२००४ अन्वये छावणी अहवाल दिला असून, सर्वात कमी दराची निविदा मान्य करणे बाबत शिफारस केली.

श्री. ए. एस. नरसापुर, निवृत्त मुख्य अभियंता महराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्राप्त अहवालानुसार औरंगाबाद यांनी पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योनजेचे सशक्तीकरण) अंतर्गत नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अं. श. पंपासाठी कॉलन पाईपचा पुरवठा करणे या कामासाठी रुपये १३,१९,२६५/- किंमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५% कमी दराने स्विकृत करणेबाबत मा. आयुक्त यांनी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे. अमित इंजिनियर्स औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५५५% कमी दराची निविदा मा. स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत नवीन फारोळा पंपगृह येथील ६७० अश्वशक्ती पंपासाठी कॉलम पाईपचा पुरवठा करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या

निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं. प. दरापेक्षा ०.५५५% कमी दराची मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे. अंदाजपत्रक र. रु. ७१४.०० लक्ष किमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-अ) रुपये २६३.८५ लक्ष किंमतीच्या स्थापत्य कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४७/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सूचना क्र. ४७/०८ दिनांक १०-०८-२००४ मधील अ. क्र. १ चे काम योजनेच्या १२०० व ७०० मी. मी. व्यासाच्या उध्दरण वाहिनी वर २०० व १५० मी. मी. व्यासाचे ड्रम पईप एयर व्हॉल्व बसविणे या कामाची निविदा र. रु. २२.८४ लक्ष किंमतीची आहे. निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत या कामाकरीता एकूण सात कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या सात निविदांपैकी दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एल. के. कन्स्ट्रक्शन, औरंगाबाद | अं. प. दरापेक्षा १०% जास्त दराने |
| २. | मे. से. ॲन्ड सुरा इंजि. प्रा. लि. पुणे | अं. प. दरापेक्षा १७.७८% जास्त दराने |
| ३. | मे. व्ही. आर. महाजन औ. बाद | अं. प. दरापेक्षा १.६% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे. एल. के. कन्स्ट्रक्शन औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने आहेत. सदरचे दर जास्तीचे वाटत असल्याने मा. आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी करणे बाबत सूचीत केले.

मा. आयुक्त यांच्या सुचनेनुसार निविदाधारकांना दिनांक १३-११-२००४ रोजी वाटाघाटीस्तव पाचारण करण्यात आले. दिनांक २३-११-२००४ रोजी मा. आयुक्त मुख्य लेखाधिकारी कार्यकारी अभियंता (पाणी पूरवठा) व निविदा धारक यांच्यात दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी अंती सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराने करणेबाबत निर्णय घेवून यास निविदाधारकांनी स्विकृती दर्शविली आहे.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १२०० मी. मी. व ७०० मी. मी. व्यासाच्या उध्दरण नलिकेवर २०० व १५० मी. मी. व्यासाचे ड्रम टाईप एयर व्हॉल्व बसविण्याच्या कामाची रुपये २२.८४ लक्ष किमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराने स्विकृत करणेबाबत मा. आयुक्त यांनी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.५०% जास्त दराची निविदा मा. स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १२०० व ७०० मी. मी. व्यासाच्या उध्दरण वाहिनीवर २०० व १५० मी. मी. व्यासाचे ड्रम टाईप एसर व्हॉल्व बसविण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील कामे मे. एल. के. कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं. प. दरापेक्षा ७.५०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा विभाग महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पूरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे. अंदाजपत्रक र. रु. ७१४.०० लक्ष किमतींच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किंमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र./मनपा/लेखा/४६/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४६/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ. क्र. ०३ चे काम हे १०० द. ल. ली. पंपगृह फारोळा येथे व्हर्टीकल टरबाईन पंप पुरविणे बसविणे व चाचणी देणे यासाठीचे असून, कामाची निविदा र. रु. २३,७५,९३६/- किंमतीची आहे. (या पंपगृहाकरिता वर्ष १९९१ मध्ये ६७० अ. श. चे सहा पंप बसविण्योत आले आहे.) निविदा विक्रीची शेवटची दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण अकरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ०८-०९-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण अकरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ०८-०९-२००४ रोजी दर भरलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे. पी. एच. एस. इंजिनियर्स, मुंबई, | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | मे. रेणुका इले. कंपनी, औरंगाबाद | १% जास्त दराने |
| ३. | फ्रेन्डस इंजिनिअरींग कॉपौ. मुंबई | ३% जास्त दराने |
| ४. | बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक | ५% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे. पी. एच. एस. इंजिनिअर्स, मुंबई यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दराने आहेत. सदरचे दर मा. आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा. आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत श्री. ए. एस. मरसापुर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडून सदरील प्रस्तावाची छाननी करुन त्यांचा अहवाल घेणेबाबत सुचना दिल्या दिनांक १६-११-२००४ रोजी श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ह्यांचेकडे प्रकरणी अहवाल घेण्यासाठी निविदा पाठविण्यात आल्या त्यानुसार श्री.ए.एस. नरसापूर यांनी ह्यांचे पत्र दिनांक २४-११-२००४ अन्वये छाननी अहवाल दिला असून, सर्वात कमी दराची निविदा मान्य करणे बाबत शिफारस केली आहे.

श्री. ए. एस. नरसापूर, निवृत्त मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्राप्त अहवालानुसार औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १०० द. ल. ली. पंपगृह फारोळा येथे व्हर्टीकल टरबाईन पंप पुरविणे, बसविणे व चाचणी देणे या कामासाठी रु. २३,७५,९३६/- किमतीची निविदा अंदाजपत्रकीय दराने स्विकृत करणे बाबत मा. आयुक्त यांनी प्रस्ताव मा. स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे.पी.एच.एस.इंजिनिअर्स, मुंबई यांची अंदाजपत्रकीय दराची निविदा मा. स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पूरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १०० द. ल. लिटर्स पंपगृह फारोळा येथे व्हर्टीकल टर बाईन पंप पुरविणे, बसविणे, व चाचणी देणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराची मे. पी. एच. एस. इंजिनिअर्स, मुंबई यांची निविदा स्विकारण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्ती करण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे. अंदाजपत्रक र. रु. ७१४.०० लक्ष किमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे. या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४५/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ. क्र.-०३ चे काम हे जुना फारोळा पंपगृह येथील ४७५ अ. श. पंपाची रोटेटींग असेंब्ली पुरविणे, बसविणे व चाचणी देणे यासाठीचे असून कामाची निविदा र. रु. ३७,०६,९८०/- किंमतीची आहे. (या पंपगृहामध्ये वर्ष १९७५ मध्ये चार नग व वर्ष १९८५ मध्ये दोन नग असे एकूण सहा नग ॲथर ॲन्ड प्लॅट बनावटीचे पंप बसविण्यात आले आहेत. सद्यस्थितीत या पंपाचा डिशचार्ज कमी झाल्याने याच पंपाचा डिशचार्ज वाढविण्यासाठी त्याची रोटेटींग असेंब्ली बदलविणे प्रस्तावित आहे. निविदा विक्रीची शेवटची दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ३०-०८-२००४ रोजी दर भरलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १. | मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद | १% कमी दराने |
| २. | मे. ॲक्वा पंप प्रायव्हेट लिमिटेड, पुणे | ७.५% जास्त दराने |
| ४. | फ्रेन्डस इंजिनिअरींग कॉपौ. मुंबई | ८% जास्त दराने |
| ४. | मे. बडगुजर ॲन्ड कंपनी, नाशिक | १५% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्ट्या विचार करता मे. अमित इंजिनिअर्स औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराने आहे.

सदरचे दर मा. आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा. आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदरील प्रस्तावाची छाननीकरुन त्यांचा अहवाल घेणेबाबत सुचना दिल्या. दिनांक १६-११-२००४ रोजी श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदरील प्रस्तावाची छाननी करुन त्यांचा अहवाल घेणेबाबत सूचना दिल्या दिनांक १६-११-२००४ रोजी श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण त्यांचेकडे प्रकरणी अहवाल घेण्यासाठी निविदा पाठविण्यात झाल्या. त्यानुसार श्री. ए. एस. नरसापूर यांनी त्यांचे पत्र दिनांक २४-११-२००४ अन्वये छाननी अहवाल दिला असून, सर्वात कमी दराची निविदा मान्य करणेबाबत शिफारस केली.

श्री. ए. एस. नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्राप्त अहवाल

**संवाद :**

**मा. सभापती** : विषय क्र. १४८ संदर्भात सविस्तर खुलासा करावा.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** मुख्य जलवाहिनीवर किती कनेक्शन

**कार्य. अभियंता (पा. पु.) :** औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेसाठी ७१४ लक्षच्या कामास सर्वसाधारण सभेने मान्यता दिलेली आहे. सात भांडवली कामे, स्थापत्याची ११ व यांत्रिकीची ११ अशी एकूण २२ कामे होती. या सर्व कामांची रक्कम रु. २१-०६-७८ कोटी एवढी होते. यादीतील क्र. ४, ७, ९ व १० ची निविदा नाही. सद्यःस्थिती पाणी पुरवठा कमी पडते. फारोळा पासून अलाना स्वतंत्र पाण्याची पाईप लाईन टाकायची आहे. त्यासाठी १.३४ कोटी रुपये खर्च येणार आहे. इनफुट कंझ्युमर कनेक्शन हटवून स्वतंत्र लाईन टाकावयाची आहे.

**श्री. काशिनाथ कोकाटे :** सभागृहात नागरिकांना पाणी देण्यासाठी पोटतिडकीने चर्चा होते. शहरातील जनतेला पाणी आवश्यक आहे. येणाऱ्या मुख्य जलवाहिनीतून पाणी दिल्या जात असेल आणि ते पाणी शेती व इतर वापरात कोणी होत असेल तर योग्य नाही. पाणी विक्रीसाठी नाही. जनतेचा हा जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. अनाधिकृत जरी भाग असेल तरी पाणी देण्याची जबाबदारी मनपाची आहे. आताच खुलासा केला मुख्य जलवाहिनीवरुन कनेक्शन दिले याचा अर्थ २४ तास ते कनेक्शन धारक यांना पाणीपुरवठा होतो हे स्पष्ट होते. या शहरात नागरिकांनी स्वतःच्या घरात, परिसरात हातपंप बोंरीग घेतली. तर पाणी नसते. पिण्याच्या पाण्याची शहरात टंचाई आहे. ग्रामीण भागात, विहीर, बोंरीग घेतल्यास पाणी लागू शकते. नको तेथील जबाबदारी घेण्याची मनपा पाणी पुरवठा विभागस गरज नाही. ताबडतोब जो १-१४ कोटीचालाईनचा प्रस्तावाबाबत निविदा काढून तात्काळ काम करावे जेणे करुन मुख्य जलवाहिनीतील पाणी पुरवठयात वाढ होईल व शहरास मुबलक पाणी मिळेल. हा प्रस्ताव मंजूर करावा. आपण किती एम. एल. डी. पाणी देतो. किती कनेक्शन आहेत?

**कार्य. अभियंता :** ३.५ ते ४ एम. एल. डी. पाणी देतो. २४ तास देत नाही. मा. सचिव स्तरावर करारनामा झालेला आहे.

**मा. सभापती** : विषय क्र. १४८ मंजूर करण्यात येत आहे. आताच सभागृहात चर्चा झाली. फारोळयापासूनची जी. जल वाहिनी टाकायची त्याचे काम तात्काळ सुरु

करावे. जेणे करुन मुख्य जलवाहिनीवरील नळ कनेक्शन बंद करता येतील. तसेच लाईनमन पासून सर्वांची एक व्यापक बैठक घेण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुनर्बांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत जुना फारोळा पंपगृह येथील ४७५ अश पंपाची रोटेटींग असेंब्ली पुरविणे बसविणे व चाचणी देणेच्या कामाकरीता प्राप्त आलेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराची मे. अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,महानगरपालिका प्रशासकीय इमारत टप्पा क्र. ३चे आवारात सिमेंट कॉंक्रीटच्या इंटरलॉकीगल बॉक्सचे पेव्हींग करणेच्या कामाकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. ४,८६,०००/- चे तयार करण्यात आले आहे.सदरील काम प्रशासकीय इमारत टप्पा क्र. १,२,व ३ याकरीता ठेवलेल्या लेखाशिर्षातून सन २००४-२००५ च्या तरतुदीमधून प्रस्तावित केले होते,परंतु त्या लेखाशिर्षात निधी उपलब्ध नाही असे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत,म्हणून सदरील काम सिडको नाटयगृहासाठी ठेवलेल्या रक्कम रु. ५०.०० लक्ष मधून प्रस्तावित करण्यात आहे तरी सदर कामासाठी अर्थ तरतुद वळती करणेचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मा.आयुक्त :** याविषया संबंधी माझा अभिप्राय घेतला नसावा असे वाटते.मुख्येखाधिकारी व मी पाहिलेला नाही.रद्द करावा.

**श्रीमती जयश्री किवळेकर :** आताच मा.आयुक्तांनी खुलासा केला की यावर माझा अभिप्राय घेतला नसावा म्हणून असा चुकीचा पायंडा पाडून असे प्रस्ताव सभागृहात येवू नये.दखल घेतली जावी. सिडकोमध्ये नाटयगृह असावे.सर्वांची इच्छा आहे.त्या रकमेतून अशा कामांसाठी निधी मंजुर करुन घेऊन असे प्रस्ताव ठेवणे बरोबर होणार नाही. एक कोटी रक्कम नाटयगृहासाठी वापरावी.नाटयगृहास चालना मिळावी हा प्रस्ताव रद्द करावा.

**मा.सभापती :** प्रस्ताव रद्द करण्यात येत आहे.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की,सदरील प्रस्ताव रद्द करण्यात यावा.

**-:ऐनवेळचे विषय :-**

**विषय क्र. १५० :**

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर आहे केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्व साधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे.अंदाजपत्रक रक्कम रुपये ७१४.०० लक्ष किमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किमतीच्या यांत्रिकी कामाचा समावेश आहे.या कामासाठी

महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४६/४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. मनपा /लेखा /४६/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ.क्र.०१ चे काम हे जुने जायकवाडी पंपगृह येथे ४०० अ.श.व्ही.टी.पंपाचा मोटारचा व इतर उपकरणाचा करणे व उभारणी करुन चाचणी देणे यासाठीचे असुन कामाची निविदा रक्कम रुपये ९३,२३,१५८/- किमतीची आहे.(या पंपगृहामध्ये ऑगस्ट २००३ मध्ये दोन नवीन पंप व मोटार अनुक्रमे मॅथर ॲण्ड प्लॅटव क्राम्पटन बनावटीचे बसविण्यात आलेले आहे.एकाच पंपगृहात मशिनरी मध्ये सारखेपणा असावा यासाठी याच बनावटीचे पंप मोटार बसविण्याचे प्रस्तावित आहे.) निविदा विक्रीच्या शेवटच्या दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ०८-०९-२००४ रोजी दर भरलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १) | फ्रेन्डस इंजिनिअरींग कार्पो.मुंबई. | १४.२ % जास्त दराने |
| २) | मे.पी.एच.एस.इंजिनिअर्स,मुंबई. | १५% जास्त दराने |
| ३) | मे.अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद | १६% जास्त दराने |
| ४) | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक. | १८% जास्त दराने |

वरील प्रमाणे,प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्टया विचार करता मे. फ्रेण्डस इंजिनिअरींग कॉर्पोरेशन,मुंबई यांचे दर हे सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.२% जास्त दराने आहेत.सदरचे मा.आयुक्त यांचेकडे शिफारशी सहमान्यतेस्तव सादर केले असता,मा.आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी करणेबाबत सुचीत केले.

मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार निविदा धारकांना दिनांक २३-११-२००४ रोजी वाटाघाटीस्तव पाचारण करण्यात आहे. दिनांक २३-११-२००४ रोजी मा.आयुक्त मुख्यलेखाधिकारी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा व निविदा धारक यांच्यात दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या.वाटाघाटीअंती सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करणेबाबत निर्णय घेवून यास निविदा धारकांनी स्विकृती दर्शविली आहे.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत जुने जायकवाडी पंपगृह येथे ४०० अ.श.व्ही.टी.पंपाचा मोटारचा व इतर उपकरणाचा पुरवठा करणे व उभारणी करुन चाचणी देणे या रुपये ९३,२३,१५८/- किंमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने स्विकृत करणे बाबत मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे.फ्रेण्डस इंजिनिअरिंग कॉर्पोरेशन,मुंबई यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत जुने जायकवाडी पंपगृह येथे ४०० अ.श.व्ही.टी. पंपाचा,मोटारचा व इतर उपकरणांचा पुरवठा करणे व उभारणी करुन चाचणी देणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा

धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.फ्रेन्डस इंजिनियअरींग कॉर्पोरेशन,मुंबई यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५१ :**

कार्यकारी अभियंता,पाणीपुरवठा महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी (टप्पा-१ योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे,स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्व साधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे.अंदाजपत्रके रक्कम रुपये ७१४.०० लक्ष किमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किंमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे.या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. मनपा/लेखा/४५/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ.क्र. ०१ चे काम हे जायकवाडी नवीन पंपगृह येथील ४९० अ.श.पंपाकरीता बाहुल असेंब्ली व सुटया भागाचा पुरवठा करणे यासाठीचे असून कामाची निविदा रक्कम रुपये ५६,५०,३९४/- किंमतीची आहे.निविदा विक्रीच्या शेवटच्या दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ३०-०८-२००४ रोजी दर भरलेल्या पाच सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १) | मे.अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद | १.०२% कमी दराने |
| २) | मे.रुसो ॲग्रोपोजेक्ट प्रा.लि.पुणे | ७.५% जास्त दराने |
| ३) | मे.ज्योती लि.मुंबई | ७% जास्त दराने |
| ४) | मे.फ्रेण्डसइंजिनियरिंग कॉर्पो.मुंबई | १०% जास्त दराने |
| ५) | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक | ११% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्टया विचार करता मे.अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद यांचे दर हे सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०२% कमी दराने आहेत.सदरचे दर मा.आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत श्री.ए.एस.नरसापुर निवृत्त मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदरील प्रस्तावाची छाणणी करुन त्यांचा अहवाल घेणेबाबत सुचना दिल्या.दिनांक १६-११-२००४ रोजी श्री.ए.एस.नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण हयांचेकडे प्रकरणी अहवाल घेणेसाठी निविदा पाठविण्यात आल्या,त्यानुसार श्री. ए.एस.नरसापुर यांनी त्यांचे पत्र दिनांक २४-११-२००४ अन्वये छाननी अहवाल दिला असून सवत कमी दराची निविदा मान्य करणेबाबत शिफारस केली.

श्री.ए.एस.नरसापुर निवृत्त मुख्य अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्राप्त अहवालानुसार औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत जायकवाडी नीवन पंपगृह येथील ४९० अ.श.पंपाकरीता बाहुल असेंब्ली व सुटया भागाचा पुरवठा करणे या कामासाठी रुपये ५६.५०,३९४/- किमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०२% कमी दराने स्विकृत करणेबाबत मा.आयुक्त यांनी

प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे.अमित इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०२% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुनर्बांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत जायकवाडी नवीन पंपगृह येथील ४९० अ.श.पंपाकरीता बाहुल असेंब्ली व सुटया भागाचा पुरवठा करणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०२% कमी दराची मे. अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यता येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५२ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुनर्बांधणी टप्पा-१ (योजनेचे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्व साधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे.अंदाजपत्रक रक्कम रुपये ७१४.०० किंमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे.या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४६/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र.मनपा/लेखा/४९/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ.क्र.०२ चे काम हे ढोरकीण बुस्टर पंपगृह येथे वाटर लुब्रीकेटेड व्हर्टीकल टर्बाईन पंप डिझाईन करणे,पुरवठा करणे,उभारणी करणे व चाचणी देणे यासाठीचे असून कामाची निविदा रक्कम रुपये ४९,६८,७२६/- किंमतीची आहे.(येथील पंपाचा विसर्ग कमी झालेला असल्यामुळे नवीन पंप बसविण्याचा प्रस्ताव आहे.) निविदा विक्रीच्या शेवटची दि.२३-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण अकरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ०८-०९-२००४ रोजी दर भरलेल्या पाच सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
|---|---|---|
| १) | मे.रेणूका इलेक्ट्रीक कंपनी,औरंगाबाद | ०.१% कमी दराने |
| २) | मे.पी.एच.एस.इंजिनिअर्स,मुंबई | १.०% जास्त दराने |
| ३) | मे.शैलराज इंटरप्रायजेस,पुणे | ५% जास्त दराने |
| ४) | मे.फ्रेण्डस इंजिनिअरींग कॉर्पो.मुंबई | ७.०% जास्त दराने |
| ५) | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक | १.०% जास्त दराने. |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्टया विचार करता मे.रेणुका इलेक्ट्रीक कंपनी,औरंगाबाद यांचे दर हे सर्वांत कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराने आहेत.सदरचे दर मा.आयुक्त यांचेकडे शिफारसीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्त यांनी प्रस्तावाबाबत श्री.ए.एस.नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून सदरील प्रस्तावाची छाननी करुन त्यांचा अहवाल घेणेबाबत सुचना दिल्या.दिनांक १६-११-२००४ रोजी श्री. ए.एस.नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र

जीवन प्राधिकरण हयांचेकडे प्रकरणी अहवाल घेणेसाठी निविदा पाठविण्यात आल्या.त्यानुसार श्री.ए.एस.नरसापूर यांनी त्यांचे पत्र दिनांक २४-११-२००४ अन्वये छाणणी अहवाल दिला असून सर्वात कमी दराची निविदा मान्य करणेबाबत शिफारस केली.

श्री.ए.एस.नरसापूर निवृत्त मुख्य अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्या प्राप्त अहवालानुसार औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत देखील बुस्टर पंपगृह येथे वाटर लुब्रीकेटेड व्हर्टीकल टर्बाईन पंप डिझाईन करणे,पुरवठा करणे,उभारणी करणे व चाचणी देणे या कामासाठी रुपये ४९,६८,७२६/- किंमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराने स्विकृत करणेबाबत मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे. रेणुका इलेक्ट्रीक कंपनी,औरंगाबाद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुनर्बांधणी टप्पा-१ (योजनेचे औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत ढोरकीन बुस्टर पंपगृह येथे वॉटर लुब्रीकेटेड व्हर्टीकल टर्बाईन पंप डिझाईन करणे,पुरवठा करणे,उभारणी करणे व चाचणी देणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०१% कमी दराची मे.रेणुका इलेक्ट्रीक कंपनी,औरंगाबाद यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४.०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे,स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता झालेली आहे.अंदाजपत्रक रक्कम रुपये ७१४.०० लक्ष किंमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-ब) रुपये ४५०.०० लक्ष किंमतीच्या यांत्रिकी कामांचा समावेश आहे.या कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४६/०४ दिनांक १०-०८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. ४६/०४ दिनांक १०-०८-२००४ मधील अ.क्र.५ चे काम हे नक्षत्रवाडी बुस्टर पंपगृह येथे तीन नवीन पंप,मोटर व इतर उपकरणे पुरवठा करणे,उभारणी करणे व चाचणी देणे यासाठीचे असून कामाची निविदा रक्कम रुपये ४५,०९,१३३/- किंमतीची आहे.(या पंपगृहामध्ये ऑगस्ट २००४ मध्ये दोन नवीन पंप व मोटार अनुक्रमे मॅथर ॲण्ड प्लॅट व किर्लोस्क्र बनावटीचे पंप व मोटार बसविण्याचे प्रस्तावित आहे.) निविदा विक्रीच्या शेवटच्या दि. २५-०८-२००४ पर्यंत या कामाकरीता एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृती दिनांक ०८-०९-२००४ रोजी दर असलेल्या चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| | | अंदाजपत्रकीय दरापेक्षा |
| १) | मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक | ५% जास्त दराने |
| २) | मे.अमित इंजिनिअर्स,औरंगाबाद | ६% जास्त दराने |
| ३) | मे.फ्रेण्डस् इंजिनिअरींग कार्पो.मुंबई | १०% जास्त दराने |
| ४) | मे.एच.एस. इंजिनिअर्स,मुंबई | ५% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्टया विचार करता मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक यांचे दर हे सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने आहेत.सदरचे दर मा.आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी करणे बाबत सूचीत केले आहे.

मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार निविदा धारकांना दि. २३-११-२००४ रोजी वाटाघाटीस्तव पाचारण करण्यात आले दिनांक २३-११-२००४ रोजी मा.आयुक्त मुख्यलेखाधिकारी,कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) व निविदा धारक यांच्यात दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या.वाटाघाटीअंती सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने करणे बाबत निर्णय घेवून यास निविदा धारकांनी स्विकृती दर्शविली आहे.

औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत नक्षत्रवाडी बुस्टर पंपगृह येथे तीन नविन पंप,मोटार व इतर उपकरणे पुरवठा करणे व उभारणी करणे व चाचणी देणे या रुपये ४५,०९,१३३/- किमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराने स्विकृत करणे बाबत मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुनबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत नक्षत्रवाडी बुस्टर पंपगृह येथे तीन नवीन पंप,मोटर व इतर उपकरणे पुरवठा करणे.उभारणी करणे व चाचणी देणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकांशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.बडगुजर ॲण्ड कंपनी,नाशिक यांचेकडून अ.प.दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५४ :**

कार्यकारी अभियंता,पाणी पुरवठा महानगरपालिका,औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत रुपये ७१४०० लाखाच्या कामाच्या (भांडवली कामे,स्थापत्य व यांत्रिकी) प्रस्तावास मा.सर्वसाधारण सभा विषय क्र. ४१६/४ दिनांक ०५-०८-२००४ अन्वये मान्यता प्रदान झालेली आहे.अंदाजपत्रक रक्कम रुपये ७१४.०० लक्ष किंमतीच्या रक्कमे अंतर्गत (भाग-अ) रुपये २६३.८५ लक्ष किंमतीच्या स्थापत्य कामांचा समावेश आहे.या

कामासाठी महानगरपालिका निविदा सुचना क्र. ४७/०४ दिनांक १०-८-२००४ नुसार निविदा प्रसिध्द करण्यात आल्या.

निविदा सुचना क्र. ४७/०४ दिनांक १०-०८-२००४ मी.मी.व्यासाच्या गुरुत्व वाहीनीवरील विविध व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व स्लूस व्हॉल्व बदलणे व चेंबरचे बांधकाम करणे इत्यादी या कामाची निविदा रक्कम रुपये २६.८६ लक्ष किमतीची आहे.निविदा विक्रीच्या शेवटच्या दिनांकापर्यंत या कामाकरीता एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या सहा निविदांपैकी तीन दर भरलेल्या सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.प्राप्त निविदा सक्षम अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत दिनांक ०६-०९-२००४ रोजी उघडण्यात आल्या.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे.व्ही.आर.महाजन | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७५% जास्त दराने |
| २) | मे.से.ॲण्ड सुरा इंजि.प्रा.लि.पुणे | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने |
| ३) | मे.पॅटसन व्हॉल्वस ॲण्ड इंजि.इंडस्ट्रीज,लातूर | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराने. |

वरील प्रमाणे प्राप्त निविदेचा तुलनात्मकदृष्टया विचार करता मे.पॅटसन व्हॉल्वस् ॲण्ड इंजि.इंडस्ट्रीज,लातूर यांचे दर हे सर्वात कमी असून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराने आहेत.सदरचे दर मा.आयुक्त यांचेकडे शिफारशीसह मान्यतेस्तव सादर केले असता मा.आयुक्त यांनी दराच्या वाटाघाटी करणेबाबत सुचीत केले.

मा.आयुक्त यांचे सुचनेनुसार निविदा धारकांना दिनांक २३-११-२००४ रोजी वाटाघाटीस्तव पाचारण करण्यात आले.दिनांक २३-११-२००४ रोजी मा.आयुक्त मुख्य लेखाधिकारी,कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) व निविदा धारका यांच्यात दराबाबत वाटाघाटी करण्यात आल्या.वाटाघाटीअंती सदर काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराने करणेबाबत निर्णय घेऊन यास निविदा धारकांनी स्विकृती दर्शविली आहे.

औरंगाबाद पाणी पुरवठा योजनेच्या टप्पेनिहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १४०० मी.मी.व्यासाचया गुरुत्व वाहीनीवरील विविध व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व स्लुस व्हॉल्व बदलणे व चेंबर बांधकाम करणेच्या कामाची रुपये २६.८६ लक्ष किंमतीची निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराने स्विकृत करणे बाबत मा.आयुक्त यांनी प्रस्ताव मा.स्थायी सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता उपरोक्त कामाची मे.पॅटसन व्हॉल्वस ॲण्ड इंजि.इंडस्ट्रीज,लातूर यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराची निविदा मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेच्या टप्पे निहाय पुर्नबांधणी टप्पा-१ (योजनेचे सशक्तीकरण) अंतर्गत १४०० मी.मी.व्यासाच्या गुरुत्व वाहीनीवरील विविध व्यासाचे बटरफ्लाय व्हॉल्व्ह स्लूस व्हॉल्व बदलणे व चेंबरचे बांधकाम करणे इ.कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.पॅटसन व्हॉल्वस् ॲण्ड इंडस्ट्रीज,लातूर यांचेकडून अ.प.दरापेक्षा ०.५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की,शहरातील प्रमुख रस्त्यांची सुधारणा व डांबरीकरण करण्यासाठी मा.स्थायी समितीने उपलब्ध करुन दिलेल्या वाढीव तरतुदीमधुन प्रस्तावित कामांपैकी सिटीचौक ते बाराभाई ताजिया ते गुलमंडी वाहनतळापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे हे एक काम आहे.अस्तित्वात असलेला हा रस्ता काँक्रीटचा आहे.प्रस्तुत रस्त्यावर काही भागात टेलीफोनची केबल टाकण्यासाठी खोदकाम झालेले आहे.त्यामुळे रस्त्याच्या एका बाजूने चर निर्माण झाली आहे. तसेच काँक्रीटचा फार पुर्वी बांधण्यात आला आहे.या रस्त्यावर डांबरीकरण करण्याचे प्रयोजन आहे.या कामाचे अंदाजपत्रक सन २००३-०४ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून अंदाजपत्रक रक्कम रुपये १४,९१,९००/- होत आहे.अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिटीचौक ते बाराभाई ताजिया ते गुलमंडी वाहन तळापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १४,९१,९००/- होत आहे.अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५६:**

अतिरिक्त शहर अभियंता,विभागाकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की,प्रभाग क्र. ८२ मधील व त्या प्रभागाच्या लगतच्या रस्त्याचे पुनर्डाबरीकरण करण्याच्या कामासाठी सन २००३-०४ च्या दरसुची आधारे अंदाजपत्रक रक्कम रु. ९,२०,२१२/ चे तयार करण्यात आले आहे.सदर रस्ते हे घनदाट वस्तीमधील जास्त वर्दळीच्या व रहदारीच्या भागातील आहेत.सदर रस्त्याखालून विविध सुविधा जसे की,पाणी पुरवठा,ड्रेनेज,दूरध्वनी इत्यादींच्या वाहीन्या आहेत.वेळप्रसंगी उपरोक्त सुविधांच्या देखभाल दुरुस्तीसाठी रस्त्यावर खोदकाम झाल्यामुळे तसेच कालांतराने रस्त्याची दुरुस्ती करणे आवश्यक आहे.स्थायी समितीने रक्कम रु. २.५० कोटी विशेष अर्थ तरतुद उपलब्ध असलेल्या कामाच्या यादीत उक्त कामाचा समावेश करण्यात आला आहे.करीता रु. ९,२०,२१२/- चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र.८२ मधील व त्या प्रभागाच्या लगतच्या रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करण्याच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ९,२०,२१२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७:**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,वॉर्ड क्र. ३२ पदमपूरा येथील रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु.१४,९८,०९६/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी प्राप्त झाली आहे.सदर कामासाठी निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण आठ निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके उघडण्यात आली असता खाली प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | डी.अजितसिंग | अ.प.दरापेक्षा २१% जास्त दराने |
| २) | के.बी.पाथ्रीकर | अ.प.दरापेक्षा २६.२१% जास्त दराने |
| ३) | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा २६.३३% जास्त दराने |
| ४) | गुरुनानक इंडस्ट्रीज | अ.प.दरापेक्षा २७% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी श्री.डी.अजितसिंग यांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा २१% जास्त आहेत.वाटाघाटीअंती श्री.डी.अजितसिंग यांनी अ.प.दरापेक्षा ५% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे.तरी डी.अजितसिंग यांच्याकडून सदरील काम अ.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,वॉर्ड क्र. ३२ पदमपूरा येथील रस्त्याचे पुर्नडांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम श्री.डी.अजितसिंग यांचेकडून अ.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की,प्रभाग क्र. १८,गजानन महाराज मंदीर ते त्रिमूर्ती चौक (हेडगेवार हॉस्पीटल पर्यंत) रुंदीकरण,फुटपाथ डांबरीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. ११,८२,५३०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झालेली आहे.सदर कामासाठी निविदा पत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकुण सात निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतीम तारखेपर्यंत यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या.त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | रेणूका कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा २५% जास्त दराने |
| २) | आदीनाथ कन्स्ट्रक्शन | अ.प.दरापेक्षा २५.९१% जास्त दराने |
| ३) | के.बी.पाथ्रीकर | अ.प.दरापेक्षा २७.०३% जास्त दराने |

वरील प्राप्त निविदापैकी रेणूका कन्स्ट्रक्शन यांचे निविदापत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अ.प.दरापेक्षा २५% जास्त आहेत.वाटाघाटीअंती मे. रेणूका कन्स्ट्रक्शन यांच्याकडून सदरील काम अं.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,प्रभाग क्र. १८,गजानन महाराज मंदीर ते त्रिमूर्ती चौक (हेडगेवार हॉस्पीटल पर्यंत) रुंदीकरण फुटपाथ डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा धारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम मे.रेणूका कन्स्ट्रक्शन यांचेकडून अं.प.दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९:**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहे की, शिवेश्वर कॉलनी,जाधववाडी परिसरातील मंजूर रेखांकनातील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. १४,१९,३५०/- चे सन २००३-०४ च्या सा.बां.खात्याच्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असता त्यामधील ५% कॉन्टेन्जसीजची रक्कम वगळून अंदाजपत्रकीय रक्कम रु. १३,५१,५७१/- ला मा.आयुक्तांनी दि. १०-१२-२००४ रोजी शिफारस केली आहे.सदर कामाचा खर्च सन २००४-०५ च्या अर्थसंकल्प पुस्तिकेतील नविन खडडे रस्ते या लेखाशिर्षाखाली पान क्र. १३४ अ.क्र.२५ मधील तरतुदी अन्वये भागविण्याचे प्रस्तावित आहे.तरी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १३,५१,५७१/- प्रशासकीय मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,शिवेश्वर कॉलनी जाधववाडी परिसरातील मंजूर रेखांकनातील रस्त्याचे खडीकरण करणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रु. १३,५१,५७१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री.मधुकर सावंत :** शनिवार रोजी वॉर्डात जी ड्रेनेज लाईन आहे.त्यातून पाणी बाहेर येऊन जलवाहीन्यामध्ये जात होते.वॉर्डात पिण्याच्या पाण्याची मोठया प्रमाणात टंचाई आहे.एक व्यक्ती त्याच्या मालकीची दीड एकर जागा मनपास पाण्याची टाकी बांधण्याकरीता विनामूल्य देण्यास तयार आहे.ती जागा मनपाने ताब्यात घ्यावी.तसे आदेश आपण करावेत.

**मा.सभापती :** स.सदस्य श्री.सावंत यांनी चांगला मुद्दा उपस्थित केला.एखादी व्यक्ती मनपास त्या भागातील नागरीकांना पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व्हावी म्हणून पाण्याची टाकी बांधण्याकरीता विनामूल्य जागा देत असेल तर तात्काळ कार्यवाही करावी असे आदेश देण्यात येतात.लेखाशिर्ष बदलणे बाबतचे व इतर काही प्रस्ताव सादर झालेले आहेत.

**मुख्यलेखाधिकारी :** लेखाशिर्ष बदलण्याचे जे प्रस्ताव येत आहेत.त्यामुळे पूर्ण बजेट बुकमध्ये बदल होतो आहे.कामाची संचिका मंजूरीसाठी आल्यानंतर त्या हेडमध्ये बजेट नसते.त्यामूळे डावलले असा गैरसमज निर्माण होतो.लेखाशिर्ष बदलण्याचे जे काही प्रस्ताव असतील ते प्रशासनाच्या अगोदर निदर्शनास आणून दयावेत.

**श्री.संजय शिरसाठ :** लेखाशिर्ष बदलणे म्हणजे संपूर्ण बजेट बुक बदल होत आहे.अर्थसंकल्प मंजूर करण्याला अर्थ राहणार नाही.

**मा.सभापती :** वॉर्ड क्र. ४५ श्री.भाऊसाहेब ताठे, वॉर्ड क्र.६५ श्री.जयवंत ओक,वॉर्ड क्र. १८ डॉ.आशा बिनवडे ,वॉर्ड क्र. ७१ श्री.अजीजखान गणीखान,वॉर्ड क्र. २३ श्री.मधुकर सावंत,वॉर्ड क्र. ४८ सौ.जयश्री मोरे यांनी त्यांचे प्रभागातील कामांसाठी लेखाशिर्ष बदलणेबाबत विनंती केल्यानुसार लेखाशिर्षामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात येते.भगवती कॉलनी येथे मनपातर्फे बांधण्यात आलेल्या टेबल टेनिस हॉलमध्ये टेबल टेनिसच्या टेंबलांची व्यवस्था संबंधीत प्रभागाच्या स.सदस्या डॉ.आशा बिनवडे यांच्या स्वेच्छानिधीतून करण्यास मान्यता देण्यात येते.तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाला दिलेल्या वरद

गणेश मंदीराच्या मागील जागेस नाममात्र भाडे आकारण्याबाबत कार्यवाही व्हावी.

**निर्णय :**

सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात समाविष्ठ असलेल्या कामांचे लेखाशिर्षात बदल करणेस्तव व प्राप्त प्रस्तावानुसार वॉर्ड क्र. ४५,६५,१८,७१,२३,४८ या प्रभागातील विविध कामासाठी आर्थिक तरतुद वळती करण्यास मान्यता देण्यात येते.भगवती कॉलनी येथे मनपातर्फे बांधण्यात आलेल्या टेबल टेनिस हॉलमध्ये टेबल टेनिसच्या टेबलांची व्यवस्था ासंबंधीत प्रभागाच्या स.सदस्या डॉ.आशा बिनवडे यांच्या स्वेच्छा निधीतून करण्यास मान्यता देण्यात येते.तसेच जिल्हा मराठी पत्रकार संघाला दिलेल्या वरद गणेश मंदीराच्या मागील जागेस नाममात्र भाडेआकारण्याबाबत कार्यवाही व्हावी.

| वॉर्ड क्र. | कामाचे नांव व अर्थसंकल्पातील तरतुद | नविन / सुधारीत कामांचे नांव व सुधारीत आर्थिक तरतुद | रक्कम |
|---|---|---|---|
| ४५ | एन-११ हडको येथील सांस्कृतिक सभागृहाचे आणि या परिसरात उदयान विकसीत करणे या दोन्ही कामांच्या बचतीमधून | एन-११ हडको येथील सांस्कृतिक सभागृहाचे व परिसर विकासाची उर्वरीत कामे करणे. | २.०० लक्ष |
| ६५ | पृष्ठ क्र. १५७ अ.क्र.१२४ वॉर्ड क्र.६५ विविध ठिकाणी नवीन जलवाहिन्या टाकणे. | वॉर्ड क्र. ६५ अंतर्गत भाजी मंडई पिया मार्केट येथे स्वच्छतागृह बांधणे. | २.०० लक्ष |
| १८ | नगरसेवक स्वेच्छानिधीतून | वॉर्ड क्र. १८ मधील भगवती कॉलनी येथे मनपातर्फे बांधण्यात आलेल्या टेबल टेनिस हॉलमध्ये स्वेच्छानिधीतून टेबल टेनिसच्या टेबलांची व्यवस्था करणे. | |
| ७१ | अति.शहर अभियंता विभागाअंतर्गत तरतुद-<br>१) पृष्ठ क्र. १३५-काँक्रीट रस्ते तयार करणे-३ लक्ष<br>२) पृ.क्र.१०९-रंगकाम करणे-१लक्ष | १) वॉर्ड क्र. ७१ मध्ये काँक्रीट रस्ते तयार करणे-३ लक्षाची तरतुद शहर अभियंता विभागाकडे वर्ग करणे.<br>२) रंगकाम करणे-१लक्ष तरतुद शहर अभियंता विभागाकडे वर्ग करणे. | ५.००लक्ष |
| २२ | प्रभाग क्र. २३ मध्ये रमानगर येथे व्यायामशाळा बांधणे. | प्रभाग क्र. २३ मध्ये रमानगर येथे बहुउद्देशीय हॉल बांधणे. | |
| ४८ | पृष्ठ क्र.१५६ अ.क्र.११८-मधील उर्वरीत तरतुदीतून ... | एन-९ के पवननगर येथील सध्या असलेल्या विहिरीवरुन पाईप लाईनकरुन पाण्याची टाकी बांधणे-१,५१,५२०/- | १.५१ लक्ष. |

**श्री.भगवान रगडे :** स्थायी समिती यासाठी असते की,मनपाचे किती उत्पन्न प्राप्त आहे.खर्च किती आलेला आहे.त्यानुसार ही समिती विकास कामाच्या संदर्भात निर्णय होवू शकते.परंतू स्थायी समितीच्या कोणत्याच सदस्यांना जकात,मालमत्ता,पाणीपट्टी वसुली किती होते,किती झाली माहिती दिली जात नाही.सविस्तर माहिती सर्व सदस्यांना प्रशासनाकडून दररोज किंवा प्रत्येक आठवडयाची माहिती दिली तर चांगल्या पध्दतीने कामकाज चालेल असे वाटते.

**मा.सभापती :** दररोज माहिती देणे शक्य होणार नाही, परंतु दर महिन्याचा जमा-खर्चाचा तपशील सर्व सदस्यांना लेखाविभागातून देता येईल.तशी कार्यवाही प्रशासनाने करावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

स्वाक्षरीत/-
नगरसचिव
महानगरपालिका,औरंगाबाद

स्वाक्षरीत/-
सभापती
स्थायी समिती,महानगरपालिका,
औरंगाबाद.